एकूण दोन लक्ष चौसष्ट हजार रुपये करार केले असेत, तरी सदरहू हप्तेबंदीप्रमाणें सरकारांत पावते करून पावलियाचा जाब घेत जाणें, तेणेंप्रमाणें मजुरा पडेल. याखेरीज बितपशील कलमें.

देशीं ऐवज निमे पुणें व निमे औरंगाबाद याप्रमाणें द्यावा. त्यांस हुंडणावळ दरसदे रुपये १॥ दीड रुपया करार केला असे, मजुरा पडेल. येणेंप्रमाणें करार. कलम १.

तुम्हांस व वकीलास बहुमान व वकीलाचा दोनशें रुपयांचा असामीचा ऐवज साल गुदस्तप्रमाणें सालमजकुरीं घेणें. मजुरा पडेल येणेंप्रमाणें करार. कलम १.

महादाजी विष्णु यांची फडनीसीची असामी तैनात रुपये ६०० सहाशें शिवाय मक्ता आहे, त्याप्रमाणें वेतन पावतें करणें येणेंप्रमाणें करार. कलम १.

457. The Mamlat of Parganas Bhelse and Khamkheda was farmed out for Rs. 339000 to FaijMahomedKhan Rohile of Sansthan Bhopal.

A. D. 1765-66.

एकूण तीन कलमें करार केलीं असेत, सदरहू लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें म्हणोन.

सनद १.

रसानगीयादी.

दादासाहेब यांच्या रोजकीर्दी पैकीं.

४९८ (४०१). चिमणाजी दलपतराव यांचे नांवे सनद कीं, प्रांत बागलाण निसबत गोविंद हरि यांजकडील तर्फांत भिलांचा दंगा बहूत होऊन रयत तजावजा जाली, मशार निल्हेच्यांनीं बंदोबस्त न होय, सबब सालमजकुरापासून त्यांजकडील तर्फा दूर करून तुम्हांकडे कमावीस सांगितली. तर्फा बितपशील, मक्ता सन सितैनापासून रुपये.

इ० स० १७६५।१७६६. सित सितैन मया व अलफ. जमादिलावल २८.

२४५२३ सरकार जागीर भिलानतर्फा एकूण आकार.

१८६६९ बरहुकूम गुदस्त सन खमस विद्यमान गोविंद हरि

४८६० परगणे पिंपळें.
३६५४ परगणे कनासी.
७४०४ परगणे वारसें.
२२५० कसबे उमरपाठे.
५०१ परगणे जैतापूर पैकीं देहें ३

१८६६९

१२७१० जाजती चढ विद्यमान गोविंद हरि.

	सनसित.	सनसबा.	सनसमान.
पिंपळें.	१२०२	१३५४॥-	१२७१॥-
कनासी.	७९०	६९०	६४३
वारसें.	२०००	२०००	१९२८
उमरपाटें.	२५०	२५०	२५१
जैतापूर.	१६२	१६२	१५६
	४४०४	४४५६॥	३८४९॥

१४५० गोविंद हरि यांजकडून तर्फा दूर केल्या सबब जाजती चढ एक साली बेरीज.

३२८२९

यासी सालें तपशील.

२४५२३ सन सित सितैन.

१८६६९ बरहुकूम गुदस्त.

५८५४ जाजती चढ.

458. Govind Hari, the Kamavisdar of Prant Baglan having failed to quell the disturbance created by the Bhils, Chimnaji Dalapatrao was appointed Kamavisdar of the province.

A. D. 1765-66.

४४०४ विद्यमान गोविंद हरि
१४५० जाजती.
५८९४

२४९२३.

२८९७९॥. सन सबा सितैन.
२४५२३ बरहुकूम गुदस्त.
४४५६॥ जाजती चढ विद्यमान गोविंद हरि.
२८९७९॥.

३२८२९ सन समान सितैन.
२८९७९॥. बरहुकूम गुदस्त.
३८४९॥. जाजती चढ.
३२८२९

८६३३१॥.

पैकीं सालमजकुरची बेरीज.

२४५२३ सन सितैन.
९१४२॥-। दिगर जहागिरीची इसमे आकार बरहुकूम हिशेब सन खमस विद्यमान राजश्री गोविंद हरि साल दरसाल कमावीसमुळें आकार होईल तो जमा करावा. तूर्त अजमास गुदस्ताप्रमाणें. रुपये.

२०५९८- अमल बाबती सरदेशमुखी
दिगर पैकीं.
२७८ परगणे जैतापूर.
२६२॥. परगणे पिंपळें.
२८ परगणे वारसें.
८४९।॥. परगणे कनासी.
६४०॥॥- तर्फ कनरोळी.
२०५९८-

१८७४८।- जागीर साल्हेर.
१६३२८-॥॥. तर्फ कारोळी.
२४१॥॥=॥. मानूरडांग.
१८७४ ८।.

६९९॥. इनाम खैरातीगांव जप्ती जागीर.
४७७॥ परगणे जैतापूर.
१८२ परगणे पिंपळें.
६५९॥

५५० जाजती चढ एकंदर तूर्त अजमासें एक सालीं बेरीज पुढें हंगामीं शिवाजी बल्लाळ यांनीं चौकशी करून इस्तावे बांधून घ्यावे त्याप्रमाणें जाजती आकार होईल तो जमा करावा. रुपये.
५१४२॥-।.

३६७५ जकात एकंदर तालुका निसबत गोविंद हरि
२९३४ बरहुकूम गुदस्त सन खमस.
७४१ जाजती चढ.
३३३४०॥-। ३६७५

एकूण तेहतीस हजार तीनशें साडेचाळीस रुपये सवा आणा सन सितचा इस्तावा करार करून महालचीं कलमें येणेप्रमाणें बितपशीलः—

महाल मजकूर गोविंद हरि यांसी नेमणूक करून दिली आहे. त्याप्रमाणें तुम्हांस हिसेरसीद मजुरा पडेल कलम १.

रसद हिसेरसीद घेतल्यास व्याज शिरस्तेप्रमाणें मजुरा पडेल. कलम १.

तीन सालें मामलतेची घालमेल होणार नाहीं. कलम १.

आफ्त फितूर मातबर जाहल्यास मुलूक शिरस्तेप्रमाणें मजुरा पडेल. कलम १.

सालगुदस्ताची बाकी सदर तर्फांत गांवगन्ना असेल ती जमीदाराचे रुजवातीनें गोविंद हरि यांजकडे वसूल द्यावी. कलम १.

सदरहूप्रमाणें तीन सालां मक्ता सरकारांतून करार करून दिला आहे, त्याची निभावणी करून आबादानी करून द्यावी. रयतीचा बोभाट आणूं नये. कलम १.

भिलाचे बंदोबस्तास दोन माही शिबंदी असामी १०० एकूण तैनात एकसालीं मजुरा ६०० रुपये सहाशे शंभर असामींस कलम १.

भिलांचा उपद्रव प्रांतांतील दूर करून लावणी यथास्थित करून सरकारच्या तर्फा आबाद करून द्याव्या भिलांचा बोभाट आणूं नये. मामलत इस्ताव्याप्रमाणें निभावणी करावी. कलम १.

हप्तेबंदी ऐवजास.
९५०० कार्तिक अखेर.
९३०० पौष अखेर.
९३०० फाल्गुन अखेर.
९२४०॥-। वैशाख अखेर सालीं.
३३३४०॥-।

सदरहू हप्तेबंदी अगोदर ऐवज सरकारांत

घेतल्यास व्याज शिरस्तेप्रमाणें हस्तेबंदीप्रमाणे मजुरा पडेल. ऐवज हस्तेबंदीप्रमाणेंच वसूल घेतल्यास व्याज मजुरा पडणार नाहीं. येणेंप्रमाणें. कलम १.

येणेंप्रमाणें नऊ कलमें करार करून कमावीस सांगितली असे. सदरहूप्रमाणें निभावणी करून इमानें इतबारें सरकार चाकरी करून आबादानी करणें म्हणून. सनद १.

छ. २१ जमादिलावल रसानगीयादी.

चिटणिसी ——————————————— पत्रें २.

१ जमीदार तर्फे मजकूर यांस.
१ गोविंद हरि यांस.

२ ३

४५९ (७३६–७३७). फत्तेसिंग गायकवाड यांस पत्र कीं, तालुके अमदाबाद येथील मामलत सन सित सितैनांत राव आपाजी गणेश यांजकडे सरकारांत सांगितली, त्यांस गोपाळराव गणेश यांनीं शहर बळावून अमल दाखल न दिला, याजकरितां सरकार आज्ञेवरून दमाजी-गायकवाड यांनीं फौजसुध्धां तुम्हांस कुमकेस पाठविले ते समयीं फौजेचे खर्चाचे म्हणून पंचवीस हजार रुपयांचें खत तुम्हीं आपाजी गणेश यांजपासून लिहून घेतलें. म्हणून त्यांनीं विदित केलें. ऐशास सरकारचे कामास तुम्हीं आलां असतां त्यांजपासून खर्चाबद्दल पंचवीस हजार रुपयांचें खत घेतलें हें समजून न जाहलें. त्यांनीं ऐवज ध्यावा तेव्हां सरकारांतून तुमचे नांवें लिहून ध्यावें. तेव्हां तुमची कुमक ती कोणती, त्यांस ऐवज सरकारांतून मजुरा पडला नाहीं. यास्तव हें पत्र लिहिलें आहे. तरी त्यांजपासून सदरहू पंचवीस हजारांचे खत घेतलें आहे तें माघारें देणें. उजूर न करणें म्हणोन चिटणिसी पत्र १.

इ० स० १७७२।७३.
सलास सबैन मया व अलफ.
जमादिलावल १३.

फत्तेसिंग गायकवाड यांचे नांवें पत्र कीं, आपाजी गणेश यांनीं निवेदन केलें कीं, सन सित सितैनांत सरकारांतून तालुके अमदाबाद येथील मामलत गोपाळराव गणेश यांजकडून दूर करून आपल्यास सांगितली, त्यास आम्ही शहरास गेल्यावर मशारनिल्हे [यांनीं]

---

459. The taluka of Ahmadabad was in charge of Mamlatdar Appaji Ganesh. Gopalrav Ganesh took possession of Ahmadabad by force, A. D. 1772-73. Fatesing Gaikwar was sent by Damaji Gaikwar to assist the Mamlatdar, Fatesing obtained from the Mamlatdar a promisary note for Rs. 25000 on account of the expenses of his army. He was told that he had proceeded to Ahmadabad on Government service and had no right to demand payment for his assistance. The note was ordered to be returned. (Another promisary note for Rupees 150000 obtained by the same person from the Mamlatdar in the same connection was also ordered to be returned.)

शहरचे ठाणें बळकावून अमल दिला नाहीं. याजकरितां सरकारचे आज्ञेप्रमाणें दमाजी गायकवाड यांनीं फौजसुद्धां राजश्री फत्तेसिंग गायकवाड यास कुमकेस पाठविलें. ते समयीं त्यांनीं गोपाळराव गणेश यांस शहराबाहेर काढावयासी भानगड केली. सहा लक्ष रुपये शिबंदीस द्यावें असें बोलण्यांत आणलें, त्याजवर जास्त ऐवज गोपाळराव गणेश यांनीं शहरांत रयतेपासून खंडणी तीन लाख रुपये घेतले त्याचा निमा हिस्सा दीड लाख रुपये आपला जाहला तो ऐवज एकूण साडे सात लाख पैकीं सहा लक्षाची निशा केली, बाकी दीड लक्ष रुपयांचें खत त्यांनीं दमाजी गायकवाड यांचे नांवें करून घेतले, त्यापैकीं वसूल रुपये ९१५२९ एक्याणव हजार पांचशें पंचवीस पावले बाकी एकावन्न हजार आठशें येकूण पन्नास राहिले (चूक आहे) ते हल्लीं सरकारचे हिशेबीं बाद घातले याजकरितां आमचें खत माघारें देविलें पाहिजे म्हणून, ऐशास गोपाळराव गणेश यांनीं शहर लुटलें व खंड घेतला, त्याबाबत हिशाचें खत दिढा लक्षाचें तुम्हीं आपाजी गणेश यांजपासून घेतलें. ही गोष्ट उचित नसे. व एक्याणव हजार सवापांचशें रुपये तुम्ही वसूल घेतला तो वाजवी पाहतां तुम्हांपासून सरकारांत ध्यावा लागेल. कांकीं गोपाळराव लुटारे झाले, चाकरी टाकून बदलून गेले, तसा तुमचा प्रकार नाहीं यास्तव लिहिलें आहे. तरी मशारनिल्हेचें दिढालक्षाचें खत माघारे देणें. उजूर न करणें म्हणोन चिटणिसीं पत्र १.

---

३ मुलकी खातें.

(ह) जमीन महसुलाचे हिशेबाची तपासणी.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

इ० स० १७६३।६४ अर्बा सितैन मया व अलफ. जिल्काद २०.

४६० (२०४). तुम्हांकडील महालचे रुजुवातीस कारकून पाठविले आहेत, त्यांस रोजमरा दीड माहीचे दुमाहीस रुपये देविले आहेत; तरी मशारनिल्हे महालचे रुजवातीस असतील तोंपर्यंत सदरहू रोजमरा देत जाणें. हुजूरचा रोजमरा छ. ७ जिल्कादी दिला आहे. पुढें दोन महिने जहाल्यावर देणें म्हणोन नारोकृष्ण यांचे नांवें सनदा.

१ रामचंद्र शामजी कारकून रोजमरा रुपये ४० चाळीस देणे.

१ पांडुरंग रामचंद्र रुपये ५० पन्नास देत जाणे म्हणोन.

० अमृतराव गदाधर कारकून दिमत हुजुरांत रुपये ३० तीस देत जाणे, कामगिरीस जात नाहीं सबब असामी बाद.

२

दोन सनदा छ. २० जिल्काद रसानगी याद.

---

460. Two Karkuns on Rupees 50 and 40 respectively per 1½ months, were deputed to audit the accounts of the Mahals in charge of Naro Krishna, and he was directed to pay them their salaries.

A. D. 1763-64.

दादासाहेबांच्या रोजकीर्दीपैकीं.

४६१(२८९). नारोकृष्ण यांचे नांवें सनद कीं, हरि नारायण यांस प्रांत खानदेश व प्रांत गुजराथ येथील कमावीसदार यांचे फाजिलाची व महालोमहालची जमीदारांची रुजुवात करावयाबद्दल पाठविले आहेत, तरी मशारनिल्हे यांचे हातून रुजुवातीचें कामकाज घेऊन सनद पैवस्तगिरीपासून रोजमरा दीडमाही रुपये ४० चाळीस दीड माहिचे दीड माहीस पावते करून महालोमहालचे रूजुवातीचें कामकाज घेत जाणें म्हणोन सनद १.

इ० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. जमादिलाखर १६.

रसानगी यादी.

४६२ (५०३). बहिरजी बालकवडे तालुके कावनई याचे नांवें. सनदा.

इ० स० १७६६।६७. सबा सितैन मया व अलफ. सवाल १३.

नारो महादेव कारकून या समागमें तुह्मांकडील तालुके मजकूर येथील सालमजकूरचा नेमणूकबेहेडा होऊन चौकशी करिता हुजुरून पाठविले आहेत. तरी पंचवीस हजार रुपये आपाजी हरि कमावीसदार जागीर कावनईचे ऐवजी तुह्मांस देविले तो ऐवज वसूल करून यांचे गुजारतीनें वांटणीकरणें, बाकी ऐवज बेहेड्याचे नेमणुकीप्रमाणें, राहिला त्यास मशारनिल्हे लोकांची हजिरी घेऊन चौकशी करतील त्यास माहितगिरी करणें, शिलकझाडे व तसलमातझाडे यांस समजावणें, व दास्तानची मोजदाद करतील त्यास करूं देणें, ह्मणोन, मशार निल्हेचे नांवें.

सनद १.

तुह्मांकडील तालुके मजकूर येथील बेहेडा सालमजकुरीं करून दिला आहे, तो आलाहिदा तुम्हांकडे पाठविला आहे, त्याप्रमाणें ऐवज खर्च करावयाचा नव्हे तो रुपये.—

१९६४॥ सुभावैवाटीमुळें सन तिसांत जाजती खर्च झालातो सालमजकुरीं बेहेड्यांत (बाद) न केला. रुपये.

१५०५।= रूसकत लोक सन सितांत करावयाची नेमणूक त्याची चाकरी घेतली त्याचे रुपये चाकरीप्रमाणें दिले आणि बेहेड्यास तीन रोजमरे नेमले होते सबब जाजती.

---

461. Naro Krishna was informed that Hari Narayan was appointed on a salary of Rs. 40 for 1½ months to inquire into the over-payments by Kamavisdar and the accounts of Mahals in Khandesh and Guzerath.

A. D. 1764-65.

462. Naro Mahadeo Karkun was sent with the sanctioned estimate of expenditure of taluka Kawanai. The officer of the taluka, Bahirji Balkavade, was directed to make payments in his presence, to show him the balance sheet and register of advances, to give him any information he might require and te allow him to inspect the dead-stock articles.

A. D. 1766-67.

४५९८= रूसकत लोक बेहेडा केला तेव्हां करावे त्याचे रोजमरे अखेर सालपर्यंत चाकरी घेऊन दिले सबब.

१९६४॥-

३६४ अर्जबाब रुपये १००० एकहजार नेमले आहेत. त्यास वरकड शिरस्त्याचे भर रोजमरे नेमिले आहेत याजकरितां शाई शिरस्ता असामी ३१८ तीनशें अठरा आहेत, त्यास मात्र रुपये साहाशें छत्तीस द्यावें बाकी कमी रुपये.

२३२८॥.

एकूण तेविशेंसाडेअठ्ठावीस रुपये सालमजकुरचे बेहेड्यास कमी केले असेत, तरी खर्ची न लिहिणें लिहिल्यास मजुरा पडणार नाहींत म्हणोन मशारनिल्हे यांस. सनद १.

दोन सनदा रसानगी यादी.

४६३ (५०४). शहर बऱ्हाणपूर येथील नारोकृष्ण यांचे कारकीर्दीची रुजुवात चिंतामण हरि व विठ्ठल मोरेश्वर यांस सांगितली आहे, त्यांजबरोबर जासूद पाठविले आहेत. त्यांस रोजमरा रुपये.

इ० स० १७६६।६७ सबा सितैन मया व अलफ. सवाल १९.

१२ जथे बजाजी नाईक. छ. १४ सवालचा रोजमरा हुजूर पावला आहे रुपये.
६ मलोजी बापुजी.
६ हरजी नागोजी.

१२.

463. Chintaman Hari and Vithal Moreshwar were deputed to Barhanpur to examine the accounts of Naro Krishna's administration. 4 attendants were sent with them, and their salary amounting to Rs. 24--8 a month was ordered to be paid out of the revenues of the city.

A. D. 1766-67.

१२॥ जथे बयाजी गणजी नाईक.
६॥ रायभानजी तावजी छ. १५ रमजानचा पावला.
६ मावजी येसाजी छ. १० रमजानचा पावला.
१२॥.
२४॥.

एकूण साडेचोवीस सदरहू तेरखांपासून दीड महिनियानें रोजमरा रुजुवातीचें काम होईतोंपावेतों शहर मजकूरचे ऐवजी देत जाणें म्हणोन, त्रिंबक नारायण कमावीसदार शहर मजकूर यांस. सनद १.

परवानगी रूबरू.

४६४ (६४६). धोंडो हरि कारकून यांस तुम्हांकडील वगैरे महालांत रोजीनदार वगैरे यांचे चौकशीस पाठविले आहेत, त्यांस रोजमरा दुमाही रुपये ४० चाळीस देविले असेत, तरी छ. १ साबानचा रोजमरा हुजूर पावला असे. पुढें दोन महिने जाहल्यावर सदरहूप्रमाणें रोजमरा चौकशीस राहतील तोंपर्यंत देत जाणे; याखेरीज जासूद जथे बजाजी नाईक बरोबर आहेत, त्यांस रोजमरा दीडमाही रुपये.

इ० स० १७६९।७० सबैन मया व अलफ. साबान १४.

६ रणकोजी मलोजी छ. १४ रजब.
६ कान्होजी माणकोजी छ. २९ रजब.

एकूण बारा रुपये रोजमरा सदरहू तेरखांचा हुजूर पावला असे, पुढें दीड महिना जाल्यावर सदरहूप्रमाणें रोजमरा देत जाणे म्हणोन, नारो बाबाजी कमावीसदार परगणे पारनेर यांस. सनद १.

रसानगीयाद.

बाळाजी जगन्नाथ कारकून यांस तुम्हांकडील वगैरे महालांत रोजीनदार वगैरे यांचे चौकशीस पाठविले आहेत; त्यांस रोजमरा दुमाही २५ पंचवीस रुपये देविले असेत, तरी छ. २१ रजबचा रोजमरा हुजूर पावला असे. पुढें दोन महिने जाहल्यावर सदरहूप्रमाणें रोजमरा चौकशीस राहतील तोंपर्यंत देत जाणें याखेरीज जासूद जथे लिंगोजी नाईक बरोबर आहेत त्यांस रोजमरा दीड माही. रुपये.

६ कासोजी आवजी छ. १७ रजब.
६ हरजी गोमाजी छ. ४ साबान.
१२.

एकूण बारा रुपये रोजमरा सदरहु तेरखांचा हुजूर पावला असे पुढें दीड महिना जाहल्यावर सदरहू प्रमाणें रोजमरा देत जाणें ह्मणोन, गोपाळ केशव कमावीसदार बाबती प्रांत बालाघाट यांस. सनद १.

रसानगीयादी.

464. Karkuns were deputed to the pargana of Parner and prant Balaghat to audit the payments of daily allowances.
A. D. 1766-67.

धोंडो हरि कारकून शिलेदार यास तुम्हांकडील वगैरे महालांत रोजीनदार वगैरे यांचे चौकशीस पाठविले आहेत, त्याजबरोवर हुजूर हशम पैकीं असामी २ दिल्या आहेत. त्यांस रोजमरा दुमाही. रुपये.

७॥ रंगनाथ दिमत अबदुल रहिमान.
७ रायाजी दिमत गुलमहमद.

१४॥-

एकूण साडेचौदा रुपये देविले असेत. तारीख १ रमजानचा रोजमरा हुजूर पावला असे दोन महिनें जाहल्यावर सदरहू प्रमाणें रोजमरा चौकशीस राहतील तोंपर्यंत देत जाणें ह्मणोन, नारो बाबाजी कमावीसदार परगणे पारनेर यांस. सनद १.

रसानगीयादी.

४६५ (७१७). परगणें मजकूर येथील मामलत सालगुदस्ता सदाशिव रघुनाथ घाणेकर यांजकडे होती, ते सालमजकुरीं दूर करून तुम्हास बहाल केली, त्यास सालगुदस्ताचे वसुलाचे बाकीस व सालमजकूरचे वसुलाचे रुजुवातीस आपाजी विश्वनाथ कारकून यांस हुजुरून पाठविले आहेत. यांचे विद्यमानें रुजुवात करावी त्याविशीं कलमें.

इ० स० १७७०।७१
इसन्ने सबैन मया व अलफ.
सवाल २९.

सालगुदस्तां सदाशिव रघुनाथ यांनीं वीस हजार रुपये चढ करून मामलत केली त्याची चौकशी हुजूर करितां चढाची बेरीज साधली नाहीं ऐसें जाहलें, सबब चढ खेरीज करून बाकी गांवगन्नावर त्यांनीं जमाबंदी ठरविली असेल, त्यापैकीं वसूल त्यांनीं गुदस्तां काय घेतला, व बाकी काय राहिली याची रुजुवात गांवगन्ना खरी करून घ्यावी. व सालमजकुरीं वसूल त्यांनीं किती घेतला, त्यापैकीं बाकीचे ऐवजी काय व सालमजकूरपैकीं काय व तगाई गांवगन्ना त्यांनीं दिली आहे, त्यासुध्धां कुळवार कारकून मशारनिल्हेचे विद्यमानें गांवगन्नावार रुजुवात करून तपशीलवार ताळेबंद आकारून हुजूर पाठवावा. कलम १.

उध्धो परशराम अजहत देशमुख व देशपांड्ये यानें सालगुदस्तां व साल मजकुरपैकीं गांवगन्ना पासून हक्काचे शिरस्त्याशिवाय ऐवज घेतला असेल त्याची रुजुवात करून किती ऐवज घेतला त्याची याद आकारून हुजूर पाठविणें, व त्यासही हुजूर रवाना करणें. त्याचा फडशा करणें तो हुजूरून केला जाईल. कलम १.

465. The Kamavis of pargana Gandapur was given to Naro Babaji and a karkun was sent from the Huzur to inquire into the state of the past year's balances and the current year's collections with the following instructions.

A. D. 1770-71.

(I) the auditor should ascertain the amount of revenue fixed, the collections made, and the balance for each village, both on account of land revenue and tagai, and should prepare a detailed balance sheet for submission to the Huzur;

एकूण दोन कलमें सदरी लिहिल्याप्रमाणें रुजुवातकरणें. आपाजी विश्वनाथ यांस रोजमरा एकमाही रुपये २५ पंचवीस रुपये हुजूर छ.२३ सवालाचा पावला आहे पुढें रुजुवात होय तोंपर्यंत सदरहूप्रमाणें पंचवीस रुपये दरमहा पावीत जाणें म्हणोन, नारो बाबाजी कमावीसदार परगणे गांडापूर यांस. सनद १.

रसानगीयादी.

३. मुलकी खातें.

(इ) गांवांच्या हद्दींचे तंटे.

४६६ (५९४). मौजे उरूण तर्फ वाळवें व मौजे बोरगांव परगणें शिराळें या दोन्ही गांवचे शिवेचा कजिया होता त्याचा इनसाफ पेशजी बाळाजी महादेव यांनीं पाहून देशमुख व देशपांड्ये व गोत जमा करून शिवेवर पाठवून उरूणकरांपासून श्रीकृष्णेचे दिव्य बोरगांव करांचे रजावंदीनें घेतले, तेव्हां बोरगांवकर खोटे जाहले असतां सदरहू दिव्यास बोरगांवकरांनीं दिकत घेऊन हुजूर आले, त्याजवरून पंचाइतमतें मनसुबिचा अर्थ मनास आणितां यथास्थित दिसोन आला, परंतु बोरगांवकरांचा संशय तुटेना, याजकरितां भिवजी पाटील बोरगांवकर यानें मौजे पाषाण येथें दिव्य घेतलें त्यास खोटा जाहला, सबब हरदू गांवाकडे हरकी गुन्हेगारीचा ऐवज करार केला बितपशील.

इ० स० १७६८।६९
तिसा सितैन मया व अलफ.
साबान १२.

उरूणकर खरे जाहले सबब.	बोरगांवकर खोटे जाहले सबब गुन्हेगारी.
हरकी ——— रुपये.	
१०००० सरकार.	८००० सरकार.
५०० नजर बाळाजी जनार्दन फडनीस.	५०० बाळाजी जनार्दन फडनीस नजर.
१०५००	८५००
तपशील.	तपशील.
५२५० सालमजकूर चैत्र अखेर.	४२५० सालमजकुरी चैत्र अखेर.
५२५० सन सबैनांत चैत्र अखेर.	४२५० सन सबैनांत चैत्र अखेर.
१०५००	८५००

१९००० रुपये.

एकूण एकूणीस हजार रुपये करार केले असेत बितपशील यादी.

---

(2) he should also ascertain and report the amount collected in the previous and current years by the Deshmukh and Deshpande in excess of his dues and should at the same time send him to the Huzur.

466. There being a boundary dispute between the villages of Uran in tarf Walve,

४. इतर कर.

(अ) तरी.

४६७ (३७७). सदाशिव बापूजी कमावीसदार मौजे सिन्नर परगणे कर्डे यांचें नांवें सनद कीं, मौजे मजकुरीं घोडनदीवर नाव आहे, त्याचे उताराचे डबीची कमावीस पेशजीचे कमावीसदाराकडून दूर करून साल-मजकुरापासून तुम्हांस कमावीस सांगितली आहे, तरी इमानें इतबारें वर्तोन नावेचे उताराची डबी जमा होईल ते सरकारचे हिशेबीं जमा करणें म्हणोन.

इ० स० १७६५।६६
सित सितैन मया व अलफ.
रबिलाखर. १.

सनद १.

रसानगीयादी.

४६८ (९०५). तुंगभद्रेस नावा करावयास लष्करांतून सनद सादर जाहली आहे, कारीगर सुतार या प्रांतें नाहींत, याजकरितां चांगले गुजराथी सुतार नावा करीत असे पाठवावे म्हणोन तुम्ही लिहिलें, याजवरून सुतार असामी ५पांच पाठविले आहेत. यांस रोजमरा वगैरे कलमें.

इ० स० १७६६।६७
सबा सितैन मया व अलफ.
सवाल. २१.

---

and Borgaum in pargana Sirale, an inquiry was made by
A. D. 1770-71. Balaji Mahadev in the presence of the Deshmukh and Deshpande and the villagers. The villagers of Uran agreed to go through an ordeal at the river Krishna and did so with the consent of the villagers of Borgaum. The latter were proved to be in the wrong. They were not satisfied with the decision and applied to the Huzur. At their request, they were permitted to pass through an ordeal in support of their contention. Bhiwaji Patel of Borgaum tried to do so at Pashan, but failed. The following amounts were therefore ordered to be levied from the villagers of Uran for having won the suit:—

Rs. 10,000 To Government,
500 Nazar to Balaji Janardan Fadnis.

From the villagers of Borgaum for being non-suited:—
Rs. 8000 To Government,
500 Nazar to Balaji Janardan Fadnis.

467. The Kamavis of the revenues of the ferry playing at Sirur in pargana
A. D. 1766-67. Karde was given to Sadashiv Bapuji.

468. Hari Ram and Abaji Vishwanath, Kamavisdars of tarf Gadak and Kopal, having received orders from camp to construct
A. D. 1766-67. ferries over the Tungabhadra, asked for the services of some Guzerathi carpenters from Poona : 5 carpenters on a monthly salary of Rs. 92, in addition to grain allowances, were therefore deputed for the duty.

तैनात दरमाहा रुपये.

२० गोविंद देवजी.
१९ जीवन प्रयागजी.
१९ रणसोड हिरा.
१७ राघोजी गोंदजी.
१७ मेटा वल्लद कल्याण.

९२ ५

पांच असामीस ब्याण्णव रुपये तैनात दरमाहा करार केली असे, चाकरी बरहुकूम हजिरी गैरहजिरी मनास आणून देत जाणें.

कलम १.

अडशेरी दर असामीस दरमाहे.

कैली मापें.	वजन पक्कें.
८॥१॥ तांदुळ.	८८१ तूप.
गहूं.	८८।. तमाखू.
८८१ दाळ.	८८।. सुपारी.
८८॥. मीठ.	८८१॥.
८॥॥.	

पानें विड्याचीं हिरवी दररोज १० प्रमाणें एक माही एकादशी वजा करून बाकी सुमार २८०.

एकूण पाऊण मण कैली व दीडशेर वजन पक्कें व दोनशें ऐंशी पानें.

येणें प्रमाणें दरमाहा दर असामीस द्यावयाचा करार केला असे, तरी सदरहूप्रमाणें देत जाणें.

कलम १.

आगाऊ तैनातेप्रमाणें दोन रोजमेर द्यावयाचे करार केले त्यापैकीं एक रोजमरा ब्याण्णव रुपये पोतापैकीं हुजूर दिल्हा बाकी रोजमरा एक रुपये ९२ ब्याण्णव रुपये तुह्मांकडून देविले असेत, देणें. कलम १.

नावा तयार जाहलियावर सुतारांस दूर करणें. कलम १.

चाकरीची तेरीख छ. २१ सवालापासून करार केली असे तरी तेथें चाकरी होईल ते दिवस वाटेनें जातां व येतां दिवस लागतील त्या सुद्धां कबज करावें, त्यांत एकूणतीसी वजा करून व दोन रोजमरे आगाऊ हुजूरचा सुद्धा दिले हे वजा करून बाकी कबज घेणें. कलम १.

येणेंप्रमाणें पांच कलमें करार करून दिलीं असेत. सदरहू लिहिल्याप्रमाणें चाकरी घेऊन पावतें करणें ह्मणोन, हरिराम व आबाजी विश्वनाथ कमावीसदार तर्फ गदक व कोपळ यांस.

सनद १.

रसानगी यादी.

४. इतर कर.

(ब) जकात.

नारो आपाजींच्या रोजकीर्दीपैकीं लेखांक ४६९-४७१.

४६९ (८९). महादाजी नारायण व सदाशिव रघुनाथ कमावीसदार जकात प्रांत पुणें व जुन्नर यांचे नांवें पत्र कीं, पुण्यांत वाण्याउदम्यांची अ-
इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. जिल्हेज ३०. मदानी होऊं लागली त्यांस कोणकोणापासून जकात घ्यावी न घ्यावी येविशीची आज्ञा जाहली पाहिजे ह्मणोन, मशारनिल्हेनीं लिहिलें तें विदित जहालें ऐसीयास.—

१ कोंकणांतून तांदूळ व मीठ वगैरे जिन्नस देखील किराणा येईल त्यास जकातीचा तगादा न करणें. कलम १.

यंदा दंग्यामुळें गांवगन्नाचे कुणबी लुटले, नागवले याजकरितां ते पुण्याहून दाणे मीठ नेतील, त्यांस जकातीचा तगादा न लावणें, शिवाय वाणी उदमी जिन्नस नेऊं लागल्यास जकात घ्यावयाची असेल त्याप्रमाणें घेणें. कलम १.

भुसारास जकात घ्यावयाचा पहिल्यापासून शिरस्ता नाहींच. कलम १.

शिंग सिंगोटीचा मजकूर, तरी कुणबियांची गुरें ढोरें दंगियामुळें लुटलीं गेलीं, सबब कुणबी पुणेयांत अगर हरएक गांवीं बैल टोणगे विकत घेतील त्यांस शिंगोटी मागूं नये. शिवाय वाणी उदमी घेतील त्यांची घ्यावी. कलम १.

एकूण कलमें चार दसऱ्या पावेतों सालमजकूरच्या चालवाबयाची आज्ञा केली आहे, तरी सदरहुप्रमाणें वर्तणूक करणें. दसऱ्या उपरांतीक येविशीं हुजूर विनंती करणें, आज्ञा करणें ती केली जाईल ह्मणोन चिटणीसी पत्र छ. १ जिल्काद.

---

469. The following instructions were issued to the Kamavisdar of Octroi of A. D. 1763-64. prants Poona and Junnar;—

(1) no duty to be levied on rice, salt or on groceries, brought from the Konkan;

(2) no duty to be levied on grain;

(3) no duty to be levied from cultivators carrying grain and salt from Poona, as they had lost their property during the war this year;

(4) no fee to be levied from cultivators purchasing bullocks, and buffaloes in prant Poona as they had been deprived of their cattle during the disturbance this year; traders should pay the fees.

The Kamavisdar was directed to ask for fresh instructions after the Dasara holiday.

४७० (९०). महादाजी नारायण व सदाशिव रघुनाथ कमावीसदार जकात प्रांत पुणें व जुन्नर यांचे नांवें सनद कीं, वाणी उदमी देशांतून तूप, तेल, गूळ व हळद ऐसा जिन्नस घेऊन येतात, त्यास सांप्रत या जिनसांची अमदानी जाहली पाहिजे, याजकरितां हे सनद सादर केली असे, तरी सदरहू जिनसांस दसऱ्यापर्यंत जकात सुदामत शिरस्त्यापैकीं निमे घेत जाणें, व निमे माफ करीत जाणें. दसरा जाहल्यावर हुजूर येऊन विनंती करणें, आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन मशारनिल्हे यांचे नांवें पाठविली. रुबरु छ. २९ रोज.

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. जिल्हेज ३०.

सनद १.

४७१ (१०६). श्रीमोरया वास्तव्य मौजे मोरेश्वर तर्फ करेपठार प्रांत पुणें याची यात्रा भाद्रपद शुद्ध चतुर्थीस आहे त्याजकरितां जागाजागांहून वाणी उदमी यात्रेस माल घेऊन येतील त्यास सालगुदस्तां मोगलाचें दंग्यामुळें रयत चाटली गेली आहे, आण यात्रेची अबादानी जाहली पाहिजे, याजकरितां तीन हिस्से जकात घ्यावी, चौथाई न घ्यावी, येविशींचीं पत्रें चिटणिसी एक सालीं.

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. सफर.

१ महादाजी नारायण व सदाशिव रघुनाथ कमावीसदार जकात प्रांत पुणें व जुन्नर.
१ आनंदराव तिंबक सुभेदार परगणें सुपें.
१ अभयपत्र वाणी उदमी यांस.

३

छ. ११ सफर.

४७२ (१९३). महादाजी नारायण व सदाशिव रघुनाथ यांचें नांवें सनद कीं,

---

470. In order that the supply of ghee, joggery, oil, turmeric and such other articles should be increased, the Octroi Kamavisdars of prant Poona and Junnar were directed to levy Octroi at half the usual rates on these articles brought from the country above the Ghats, till the Dasara holiday, after which fresh instructions were to be issued.

A. D. 1763-64.

471. In consideration of the loss sustained by the ryots during the Mogal disturbance of the year, the octroi to be levied on merchandize brought to the fair at Moreshwar in tarf Kare Pathar of Poona was ordered to be reduced by one-fourth.

A. D. 1763-64.

472. The farm of Octroi in prants Poona and Junnar, and in pargana Karde was given to Mahadaji Narayan and Sadasiva Raghunath for 4 years for the following sums :

A. D. 1763-64.

1st year—65001
2nd year—70001
3rd year—71001
4th year—94001

They were directed to levy no duty—on grain.

इ० स० १७६३।६४.
अर्बा सितैन मया व अलफ.
जमादिलावल २३.

जकाती प्रांत पुर्णे व जुन्नर, व परगणें कर्डे येथील मामलत साल गुदस्ता तुम्हांकडे कमावीसीनें होती. ते साल मजकुरापासून मक्ता करार सालें बितपशील रुपये.—

६५००१ सन अर्बा सालमजकूर इस्तकबील कार्तिक वद्य १ सनमजकूर तागायत कार्तिक शुद्ध पौर्णिमा एकूण सदरहू जकाती कदीम प्रांत पुर्णे व जुन्नर बाबती व सरदेशमुखी व फौजदारी व सुभा व थळभरीत व थळमोड व शिंगाशिंगोटी व बाजारबसका व आडमार्ग व उभामार्ग व किताबती पानसरे व जूप व मोगलाई व रिताड जिन्नस येईल त्याचा व पेठ कसबे पुर्णे उभामार्ग व आडमार्ग हरजिन्नस वगैरे येईल व भरून जाईल. देखील शुक्रवार हवेली महालसुद्धां कारवान देखील कुलबाब कुलकानू व प्रांत जुन्नरपैकीं मोगलाईच्या जकाती फौजदारी ठाणें आळेंबेल्हें व पिंपरखिडें व आंबेघारगांव परगणे कर्डे, आडमार्ग व निसबत मावळ जाहागिरी कडील आडमार्ग निमे महाल बेरी व चौकी आंबेघारगांव व जकात घाट मालशेज व तुंगारे मोगलाई अमल व घाट चोंढा खेरीज अमल घाट मालशेज गुलाम मोहिदीन याजकडे दिला त्याशिवाय व जकात परगणे कर्डे रांजणगांव परगणे मजकूर येथील जाहागीर व सरदेशमुखीचा अमल व पेठा कसबे पुर्णे आदितवार व बुधवार येथें बैलाचे किंमतीचे रुपयांस दर दुवल(दुपट?) प्रमाणें जाजती हसील घेतला. त्याचे आकार सुद्धां व फौजदारी अमल चाकण जुन्नर सुभ्याकडे होता त्यासुद्धां मक्ता बेरीज ६५००१ रुपये.

तपसील.

३०००१ रसद.

२२००१ शिरस्ता तिजाईबद्दल पेशजी बिनव्याजी.

८००० हप्तेबंदीपैकीं आगाव व्याजुक रुपये.

५००० पौष शुद्ध १ पैकीं.

३००० माघ शुद्ध १

९००० पैकीं.

८०००

३०००१

३५००० हप्तेबंदी रुपये.

२००० माघ शुद्ध १.
५००० फाल्गुन शुद्ध १.
५००० चैत्र शुद्ध १.
५००० वैशाख शुद्ध १.
५००० ज्येष्ठ शुद्ध १.
४५०० आषाढ शुद्ध १.
४५०० श्रावण शुद्ध १.
४००० भाद्रपद शुद्ध १.

३५०००

६९००१

यांस बयान.

३०००१ रसद बरहुकूम सदर.

३५००० हप्तेबंदीचे ऐवजास करार रुपये.

१५००० सालाबाद तूप व तांदुळ भाडें व नकासची (जकातीची?) शिबंदी, जिवाजी मरहर याजकडील वर्षासनें व महाल हप्ता उंबरेनऊलाख व भुसार कर्डेमहाल व शिंगोटीच्या वगैरे चिठ्या दरसाल माक्तियांत मजुरा पडत आल्या त्याप्रमाणें कलमें सालमजकुरीं मजुरा पडोन ऐवज राहिल्यास अखेरसालीं सरकारांत द्यावा. याप्रमाणें करार.

२०००० फाजील तुमचा ऐवज सरकारांत आहे त्या ऐवजीं रदकर्जी तुम्हांस नेमून दिला असे, घेत जाणें.

३५०००

६५००१

७०००१ सन खमस सितैन इस्तकबील कार्तिक वद्य १ सन मजकूर तागाईत कार्तिक शुद्ध पौर्णिमा सीत सितैन पेस्तरसाल एकूण.

मक्ता. रुपये.

६५००१ बरहुकूम गुदस्त.
५००० चढ जाजती.

७०००१

तपसील.

२४००१ रसद तिजाई बिनव्याजी.
४६००० हप्तेबंदी.
६००० पौष शुद्ध १.
५००० माघ शुद्ध १.
५००० फाल्गुन शुद्ध १.
६००० चैत्र शुद्ध १.
५००० वैशाख शुद्ध १.
५००० ज्येष्ठ शुद्ध १.
६००० आषाढ शुद्ध १.
५००० श्रावण शुद्ध १.
५००० भाद्रपद शुद्ध १.
४६०००

७००००१

तपसील.

३५००१ सरकारांत द्यावे.
२४००१ रसद.
११००० हप्तेबंदी पैकीं, हत्तियाचे हत्तियास द्यावे.
६००० पौषशुद्ध १.
५००० माघशुद्ध १.
११०००

३५००१

१५००० सालगुदस्तांप्रमाणें. नेहमीं खर्च व शिंगोटीचा आकार वगैरे मजुरा पडोन राहील ऐवज तो सरकारांत अखेर सालीं द्यावा.

२०००० फाजील तुमचे सरकारांतून देणें त्या ऐवजीं रदकर्जी नेमून दिले असत, घेत जाणें.

७०००१

७१००१ सित सितैन मक्का बेरीज.

७०००१ बरहुकूम गुदस्त.

१००० जाजती चढ.

७१००१

तपशील.

२४००१ रसद तिजाई बिनव्याजी.

४७००० हप्तेबंदी.

६००० पौष शुद्ध १.

६००० माघ शुद्ध १.

५००० फाल्गुन शुद्ध १.

५००० चैत्र शुद्ध १.

५००० वैशाख शुद्ध १.

५००० ज्येष्ठ शुद्ध १.

५००० आषाढ शुद्ध १.

५००० श्रावण शुद्ध १.

५००० भाद्रपद शुद्ध १.

४७०००

७१००१

तपशील.

३५००१ सरकारांत द्यावे.

२४००१ रसदपैकीं.

११००० हप्तेबंदीप्रमाणें द्यावे.

३५००१

१५००० सालगुदस्तप्रमाणें तुप वगैरे बाबतीचे ऐवजी मजुरा पडोन बाकी राहील ते अखेर सालीं द्यावें.

२०००० फाजील तुमचें सरकारां-
(२१०००)? तून देणें त्याचे रदकर्जास नेमून दिले असत, घेणें.

७१०००१

९४००१ सन सबा सितैन मक्ता बेरीज रुपये.
७१००१ बरहुकूम गुदस्त.
२३००० जाजती चढ.
९४००१
तपशील.
९३९५६ बरहुकूम मक्ता पेशजी.
४५ जाजती.
९४००१
सनसबा सितैन यांस नेमणूक.
३२००० रसद तिजाई बिनव्याजी.
६२००१ हप्तेबंदी.
७००१ पौष शुद्ध १.
६००० माघ शुद्ध १.
७००० फाल्गुन शुद्ध १.
७००० चैत्र शुद्ध १.
७००० वैशाख शुद्ध १.
७००० ज्येष्ठ शुद्ध १.
७००० आषाढ शुद्ध १.
७००० श्रावण शुद्ध १.
७००० भाद्रपद शुद्ध १.
६२००१
९४००१
तपशील.
३५००१ सरकारांत द्यावे.
३२००० रसदेपैकीं.
३००१ हप्तेबंदीपैकीं. पौष शुद्ध १ देस द्यावे.
३५००१
१५००० सालगुदस्तप्रमाणें तूप वगैरे नेहमीं शिगोटीसुद्धां दरसालचीं कलमें मजुरा पडून बाकी राहील ते अखेर सालीं द्यावे.
४४००० फाजील तुमचें सरकारांतून देणें त्याऐवजीं रदकजीं नेमून दिले असत, घेणें.
९४००१
३००००४

यास तपशील एकंदर चौसाल.

१३५००४ रसद सरकारांत सदरहूप्रमाणें.

६०००० जिन्नस वगैरे दरसाल रुपये १५००० प्रमाणें.

१०५००० फाजीलास ऐवज सदरहूप्रमाणें.

३०००४

येणेंप्रमाणें सन अर्बा सितैन सालमजकूर पासष्ट हजार एक रुपया व सन खमस सितैन सत्तर हजार एक रुपया व सन सित सितैन एकाहत्तर हजार एक रुपया व सन सबा सितैन चवऱ्याण्णव हजार एक रुपया. एकूण चौसाला मिळोन तीन लक्ष चार रुपये करार केले असेत. कराराप्रमाणें सालबसाल ऐवज देऊन अमल सुदामत प्रमाणें करीत जाणें. सदरहू मक्त्यापैकीं जिन्नस वगैरे मजुरा द्यावयाचीं कलमें साठ हजार रुपये नेमिले आहेत, त्यामध्यें मजुरा पडोन बाकी ऐवज राहील तो सरकारांत द्यावा. व फाजिलास ऐवज एक लक्ष पांच हजार नेमिले आहेत, त्यास वाजबी फाजील मखलासीमुळें (ठरेल) त्याप्रमाणें मजुरा पडोन कमी फाजील जहाले, तरी ऐवज राहील तो सरकारांत घेतला जाईल. तुमचे फाजील जाजती निघाले तरी पेस्तर सदरहू चार सालें भरलियावर पुढें मजुरा दिलें जाईल. येणेंप्रमाणें करार केला असे. सदरहू मामलतसंबंधे कलमें:—

दाण्याची जकात पेशजीपासून माफ केली असे त्याचें हशील घेऊंनये. येणेंप्रमाणें. कलम १.

दुमाले गांव आहेत तेथें शिंगशिंगोटीचा अमल सुदामत जकातीकडे आहे. त्याप्रमाणें तुम्हीं अमल करीत जाणें. हिमाईत करील त्यास ताकीद करून अमल देविला जाईल. पेशजीपासून माजीमामलेदार दुमाले गांवास शिंगशिंगोटी घेत नवतें. त्याप्रमाणें तुम्ही न घ्यावी. येणेंप्रमाणें. कलम १.

सन इसनें व सन सलास दुसाला तुम्हांकडे मामला कमावीसीनें होता. त्यास हरदूसालांत आगाव रसद कमाल सालचे बेरजे[नें] घेतली, पुढें दोन सालांत दंगा मोगलाच्या बिघाडामुळें होऊन आमदानी चालली नाहीं, आफत पडली, सबब फाजील सरकारांत ओढत आले त्यास दोहों सालची मखलाशी होऊन फाजील हिशेबामुळें तुमचे ठरेल त्यास सालमजकुरापासून मामला मुक्ति-

नकाशाचा (जकातीचा?) अमल जिवाजी नरहर यांजकडे कमावीसीनें आहे, त्याचा आकार होईल तो मशारनिल्हेनीं तुम्हांकडे रोजच्या रोज देत जावा. नकाशाकडील (जकातकिडील) खंडणी सोडतोड वगैरे कमावीस करणें ते तुमचे इतल्यानें करावी. येणेंप्रमाणें. कलम १.

तांदुळ चौशेरी बारुलें मापें खंडी.

१५० सरकारचे कोठी पुणें.

१५ राजश्री निळकंठ महादेव.

१६५

एकूण एकशें पासष्ट खंडी दास्तान पेण प्रांत कल्याणपैकीं पुण्यास आणून पोहचवावें त्यास करार बितपशील खंडी.

९० बिनभाडी तांदूळ आणून द्यावे. भाडें सरकारांतून मजुरा पडणार नाहीं.

७५ सरकारचे.

१५ राजश्री निळकंठ महादेव.

९०

यानें चौसाला करार करून दिला आहे, त्यांत फाजील ऐवज साल दरसाल नेमून दिला आहे, त्याप्रमाणें मामला निभावून नेमणूकेप्रमाणें फाजिलाचा ऐवज आदा होऊन बाकी फाजील राहिल्यास पेस्तर सन समान सितैनचे सालांत मजुरा पडेल, तुमच्या फाजिलाचा निकाल होईतोंपर्यंत मामलत तुम्हांकडून दूर होणार नाहीं. फार गुंजावीस नजरेस पडली तर सालजाब करावा लागेल. येणेंप्रमाणें. कलम १.

आफ्त फितुरत मातबर जहालिया मामलतीचा कचा हिशेब मनास आणून हिशेबाप्रमाणें विल्हे लागेल. आफ्त मातबर जहालियास मजुरा पडेल. येणेंप्रमाणें. कलम १.

मौजे अडळगांव परगणें कर्डे येथील जकात व शिंगशिंगोटी पेशजीपासून जकातीच्या मामल्याकडे चालत आली असतां अलीकडे निंबाळकरांनीं खलेल करून सदरहू अमल चालो देत नाहींत. कलम जकातीच्या अमलातील आहे. सबब ताकीद करून बंदोबस्त करून दिला जाईल. पेशजीपासून सदरहू ठिकाण मक्त्यांतील असल्यास लिहिल्याप्रमाणें फडशा होईल. येणेंप्रमाणें.

कलम १.

परगणें कर्डेरांजणगांव येथें भुसार जिनसांस हशील सरकारांतून पेशजी माफ करून त्याचा आकार दरसाल बेरीज मक्तियाचें शेवटील भरबेरजेवर रुपये ३१४१ तीनहजार एकशे एकेचाळीस मक्तियाचें बेरजेत मजुरा पडतात, त्याप्रमाणें हिसेरसीद सालोसाल वांटणी मक्तियाचे बेरजेप्रमाणें हल्लीं मक्तियाचीं बेरीज ठरली त्या हिसेरसीदप्रमाणें मजुरा पडेल. येणेंप्रमाणें. कलम १.

व्याजाचा करार रसदेस पेशजी दरसदे १। सवोत्रा बिनसूटप्रमाणें आहे, त्याप्रमाणें ७५ भाडयानें आणून सरकारांत द्यावें. भाडें मक्तियांत गुदस्ताप्रमाणें मजुरा पडेल.

१६५

येणेंप्रमाणें १६५ एकशें पासष्ठ खंडी साल दरसाल आणून पोंहचवावें. येणेंप्रमाणें. कलम १.

तर्फ हवेली व तर्फ वोतूर व फुटगांव तर्फ आळेबेल्हें येथील जकात व शिंगशिंगोटी पेशजीपासून जकातीच्या मामल्याकडे चालत आली आहे. अलीकडे शिवनेरकरांनीं खलेल करून जकात व शिंगशिंगोटीचा अमल देत नाहींत. त्यास ताकीद करून सदरहू अमल तुम्हांकडे देविला जाईल. सदरहू कलम मक्तियांत पेशजीपासून असलियास शिवनेरीकडे वसूल गेल्यास तुह्मांस मक्तियांत मजुरा पडेल येणेंप्रमाणें. कलम १.

नवीन दस्तकें सरकारांतून होणार नाहींत. सरकारचीं दस्तकें देसूरचा (देशावरचा)माल आणावयास होतात. त्याची जकात तुम्हीं घेत जाणें प्रांत पुणें व जुन्नरखेरिजकरून दस्तकें देणें तीं दिलीं जातील. कित्येक हिमाइती करून जकात द्यावयास खलेल करतील त्यांस ताकीद करून देविली जाईल. भिडेचेच आहेत त्यांस जिन्नस पाहून(जकात)घ्यावयाची नेमणूक पेशजीची आहे ती मनास आणून हल्लीं नेमणूक होईल त्यास मात्र जकात न घेणें. येणेंप्रमाणें. कलम १.

जकात व शिंगशिंगोटी व जूप (?) वगैरे अमल सुदामत ज्या गांवांचा जकातीकडे चालत होता, ते गांव अलीकडे दुमाला सरकारांतून दिले आहेत. तेथील जकातीचे

हल्लींही मजुरा पडेल. बिन व्याजीं रसदेचा करार आहे त्याखेरीज हप्तेबंदीचे ऐवजीं रसद घेतली तरी सदरहूप्रमाणें व्याज मजुरा दिलें जाईल येणेंप्रमाणें. कलम १.

जकातीच्या अमलाची इस्तकबील कार्तिक वद्य १ तागाईत कार्तिक शुद्ध १५ अखेर-साल एकूण अमल बारमाही. चौसाला मक्तियांत जे सालीं अधिकमास पडेल त्याचा ऐवज निराळा सरकारांत मागूं नये. येणेंप्रमाणें. कलम १.

आळंदीचे यात्रेचे समयीं रखवालीस राऊत व हशमी व गाडदी लोक असाम्या.

५० राऊत.
१५० हशमी व गाडदी.

२००

एकूण दोनशें असामी यात्रा अवलीपासून अखेर पावेतों साल दरसाल सरकारांतून दिले जातील येणेंप्रमाणें. कलम १.

तूप सरकारांत सालाबाद १० खंडी एकूण दहा खंडी तूप निरख दर रुपयास वजन पक्कें ८८४ चारशेरप्रमाणें पेशजीपासून किंमत मजुरा पडत आली आहे, त्याप्रमाणें तुम्हांस मक्तियांत मजुरा पडेल, येणेंप्रमाणें. कलम १.

अमलास खलेल करतील त्यांस ताकीद करून सुदामतप्रमाणें अमल देविला जाईल. ज्या गांवचा अमल मना होईल त्या गांवचा आकार मनास आणून मजुरा दिला जाईल. जकातदेखील सनद दिली असली तरी मजुरा पडेल. सनद नसतां उगाच लढा पडला, तरी कमावीसदारांनीं लागू होऊन फडशा करून घ्यावा. लागू न जाहले तरी मजुरा पडणार नाहीं. येणेंप्रमाणें. कलम १.

तुपाच्या जोड्या सुमारें १२० यांचीं दोन दस्तकें दरसालप्रमाणें इंदूर व खरगोण व वसमत प्रांतीची द्यावयाचा करार आहे, त्याप्रमाणें साल दरसाल दस्तकें दोन व ताकीदपत्रें देविलीं जातील. येणेंप्रमाणें. कलम १.

महादाजी नारायण कमावीसदार यांची सालगुदस्त नेमणूक सरकारांतून करून दिली त्याप्रमाणें.

दरसाल मोईन आफ्तागिरा व दिवट्या असाम्या २ मिळोन १०० शंभर रुपये करार केले असत. साल दरसाल मजुरा पडतील.

आफ्तागिरास सामान रुपये ३५ पस्तीस रुपये सालगुदस्त पावले आहेत. पेस्तर-सालीं पावतील, व पुढेंही एक सालाआड पावतील.

एकूण सदरहूप्रमाणें मक्तियांत मजुरा पडतील. येणेंप्रमाणें. कलम १.

सरकारचे कारकुनाचे हातें लिहिण्याचें प्रयोजन घेत जाणें. येणेंप्रमाणें. कलम १.

एकूण अठरा कलमें करार केलीं असेत. सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें म्हणोन.

सनद १.

रसानगीयादी.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दी पैकीं.

४७३ (१९४). बाळाजी कृष्ण कमावीसदार जकाती प्रांत कल्याण भिवंडी यांचे नांवें सनद कीं, आंबडेकर वगैरे यांजकडे जकाती प्रांत कल्याण भिवंडीची मामलत इजरीयानें होती, त्यास सन तिसांत कोळ्यांचा दंगा जाहाला, सबब मामलतीस तोटा आला ह्मणोन सरकारांत समजावून साठ हजार रुपये सूट खर्च घेतला; त्यास तुह्मांस जकातीची माहितगारी होती ह्मणोन तुम्ही सरकारांत विनंति केली कीं, तोटा साठ हजार रुपये मजुरा घेतला आहे तो कचे हिशेब माजी मामलेदाराचे पाहोन लटका करून देऊं ह्मणोन विनंती केली. त्याजवरून सन इहिदे सितैनांत आंबडेकर वगैरे यांजकडून मामलत दूर करून तुह्मांस सांगितली आणि तोट्याचे रुजुवातीस सहा महिन्यांची मुदत ठरवून तुह्मांपासून तोट्याचे रुपये साठ हजार माघ शुद्ध प्रतिपदेस शके १६८२ सन इहिदे सितैनांत घेतले. त्यास सहा महिन्यांमध्यें सरकारांतून आंबडेकर वगैरे यांस कचे हिशेबाविशीं निकड करून तोटा चाळीस पंचेचाळीस पन्नास हजार रुपयेपर्यंत आंगीं तुम्हीं लावून दिल्यास तुमचे साठ हजार रुपये सरकारांतून व्याजासुद्धां द्यावे, याप्रमाणें करार करून ऐवज घेतला, त्यास सहा महिन्यामध्यें आंबडेकर वगैरे यांस सरकारांतून नेटबाजी होऊन रुजुवात व्हावी ती तीन वर्षें जाहाली तथापि न जाहाली. तुम्ही दरसाल रुजुवातीकरितां येत गेलेत आणि आंबडेकर वगैरे यांणीं घालघसरीखालीं घातलें याजकरितां तुमचा ऐवज कराराप्रमाणें व्याजसुद्धां द्यावा तो—

इ० स० १७६३।६४.
अर्बा सितैन मया व अलफ.
रमजान २९.

६०००० ऐन मुद्दल.
१६०२५ व्याज तिहीं सालचें एकोत्रा १ शिरस्तेप्रमाणें जाहालें तें.

७६०२५

एकूण शहात्तर हजार पंचवीस रुपये यासी किस्तबंदि सालें बितपशील रुपये.

३०००० सन खमासांत द्यावे.
२३००० सन सितांत द्यावे.
२३०२५ सन सबांत द्यावे.

७६०२५

---

473. The Octroi farmers of prant Kalyan Bhiwandi on representing that they had suffered loss of revenue in consequence of the kolis disturbance in A. D. 1759-60 had obtained a remission from Government of Rs. 60,000. Balaji Krishna Kamavisdar of Octroi of the same province informed the Peshwa that the representation made by the farmers was false, and that he was ready to prove this from the detailed account of the farmers. The management of octroi was therefore in 1760-61 taken from the farmers and given to Balaji Krishna and he was allowed a period of six months to establish his allegations. Rupees 60,000, the amount remitted, were taken from Balaji, who was promised that, if he proved his case, the amount with interest at Rupee 1 per month would be repaid to him. Detailed accounts were however not produced by the previous farmers for that period nor for 3 years before. The amount of Rs. 60000 with interest was consequently ordered to be refunded to Balaji Krishna.

A. D. 1763-64.

एकूण शाहात्तर हजार पंचवीस रुपये पैकीं सन खमसांत तीस हजार व सन तिसांत तेवीस हजार व सन सबांत तेवीस हजार पंचवीस रुपये. येणेप्रमाणें मुद्दल तिहीं सालांत रसदेचे ऐवजीं द्यावयाचे करार केले असत, तरी दरसाल सदरहूप्रमाणें तिहीं सालांत रसदेचे हंगामीं ऐवज घेत जाणें, तुम्हांस मजुरा पडेल. व्याज व मुद्दल ऐवज सदरहू ठरला तो तिहीं सालांत उसना घेणें ह्मणोन छ. ६ रमजान. सनद १.

४७४ (२१६). हरिदास वल्लद बिरदास वाणी हुंडेकरी वस्ती पेठ शुक्रवार कसबें पुणें यानें हुजूर येऊन अर्ज केला कीं, बंदर पेण व पनवेल प्रांत कल्याण भिवंडी येथें वाणी उदमी वगैरे हरजिन्नस भरून नेतील व आणतील त्यांचा हशील आपले मार्फतीनें चुकवावा व बैलाचें भाडें आपले गुजारतीनें करावें व उदमीयांपासून कांहीं पानसुपारी येणेप्रमाणें आपल्यास सरकारांतून करार करून देऊन जीवन माफक नजर घेतली पाहिजे ह्मणोन त्याजवरून त्याजवळून सरकारांत नजर घेऊन बंदरमजकुरीं सदरहुप्रमाणें करार करून दिलें असें, तरी सदरहू बंदरीं वाणी उदमी वगैरे हरजिन्नस भरून नेतील व आणतील त्याचा हशील याचे मार्फतीनें चुकवीत जाणें, व बैलाचें भाडें याचे मार्फतीनें करीत जाणें, व वाणी उदमी वगैरे रजावंदीनें वाणी मजकुरास पानसुपारी देतील ती घेऊं देणें, ह्मणोन, बाळाजी कृष्ण कमाविसदार जकात प्रांत मजकूर यांस. सनद १.

इ० स० १७६४।६५.
खमस सितैन मया व अलफ.
जिल्हेज ८.

वाणी मजकुराचे नांवें सनद कीं, तुजजवळून रुपये २०० दोनशें नजर घेऊन सदरहूप्रमाणें करार करून दिलें असें, तरी वाणी उदमी वगैरे हरजिन्नस भरून नेतील व आणतील त्याचा हशील तूं आपलें मार्फतीनें चुकवीत जाणें व बैलाचें भाडें आपले गुजारतीनें करीत जाणें, व तुजला वाणी उदमी वगैरे रजावंदीनें पानसुपारी देतील ती घेत जाणें ह्मणोन.

सनद १.
२

रसानगीयादी सालगुदस्ताची.

४७५ (३९७). विसाजी वासुदेव व रघुनाथ नारायण यांचे नांवें सनद कीं, प्रांत कल्याण भिवंडी वगैरे येथील जकातीची मामलत पेशजीचे अमलदाराकडून दूर करून सालमजकुरापासून तुह्मांकडे करार जकाती ठाणें.

इ० स० १७६५।६६.
सित सितैन मया व अलफ.
जमादिलावल १५.

---

474. At the request of Haridas walad Birdas wani of Shukrawar Peth Poona, the farm of collecting duty on imports and exports at the ports Pen and Panwel in prant Kalyan Bhivandi, and of hiring bullocks for carrying merchandize was given to him. The Octroi Kamavisdar of the province was directed to instruct the traders to pay the duty and hire bullocks through him and to permit him to receive from them such presents as they might willingly give him. A Nazar of Rs. 200 was taken from Haridas for the grant of the privilege.

A. D. 1764-65.

475. The farm of octroi in prant Kalyan Bhiwandi was given for 5 years for

प्रांत कल्याण भिवंडी.

कर्दाम अमलाचीं ठिकाणें.

७ वरघाटी.

१ बोरघाट उंबरे व कुरवंडा.
१ घाट सावा.
१ घाट गाढवलोट.
१ घाट आउपा.
१ घाट नाणा.
१ घाट मालसेज व साखरे.
१ चौत्रा नऊलाखउंबरें.

७

६ तळघाट.

१ सावळा.
१ कोळंब.
१ खोपवली तर्फ बोरेटी.
१ डोईफोडी तर्फ देहर.
१ घाट रणसील.
१ राजमाची.

६

४ बंदरें.

१ पेणवासी.
१ सोमवळी.
१ कल्याण.
१ भिवंडी.

४

१४ महाल चौक्या.

१ पथक चौकी तर्फ वनखल.
१ शहापूर व वासिंद.
१ चौकी धामटणें तर्फ तकटें.
१ चौकी चिखलोली तर्फ चोण.

जकात बरहुकूम आगरे ठिकाणें बितपशील.

२ बदरें.

१ पेणवासी.
१ पनवेली.

२

७ घाट पाई अमल.

१ नाणा.
१ चोंढावळवेल.
१ कोळंब.
१ बोरघाट खोपवली.
१ आउपा.
१ रणसील.
१ सावला कुसूर.

७

१४ कित्ता महाल चौक्या.

१ चौकी चीखलोली.
१ चौकी धामटणें.
१ चौकी कांबे तर्फ बाग्हे.
१ चौकी शहापूर.
१ चौकी नेवलपाड व डोईफोडी तर्फ गोरे.
१ चौकी मुरमाड.
१ चौकी वासुंदरी.
१ चौकी सोनाले.
१ चौकी गोरसई.
१ टोकर विहिरा मापोली.
१ चौकी पडघें.
१ चौकी अंबरजें.
१ पामशेत पाशाणें व मेरळ तर्फ बरेडी.

A. D. 1765-66.

Rs. 3,00,001. The names of the ghants and places, 85 in number where duty was to be levied, are noted in the Sanad.

१ चौकी कांबें तर्फ बोरेटी.
१ चौकी बासुंदरी.
१ चौकी पडघें तर्फ राहुरी.
१ चौकी दाभाडपाल तर्फ कुंदे.
१ जकात टोकर विहिरा.
१ चौकी गोरसई.
१ चौकी अंबरजे.
१ चौकी चोंढा तर्फ कोरकडा देखील जवळे.
१ चौकी बुरबाड.
१ चौकी सोनाळे.

१४

१ पथक चौक तर्फ वनखल तर्फ माणिकगड बरहुकूम अमल अंगारक.

३२

१ पथक चौक तर्फ वनखल.

१४

२३

कित्ता कदीम मामल्यापैकीं चौक्या व महाल.

४ तर्फ बहिरवगड व रतनगड.
३ घाट.
१ मालसेज.
१ नाणा.
१ चोंढामेंढा.

३

१ जकात साला रोज परगणे आकोलें.

४

४ तर्फ कावनई.
१ टाकें घोडी.
१ बोरखेड.
१ घाट चोंढा.
१ उरूस पिंपरी व बदर (६) दीन.

४

८

एकूण ठिकाणें त्रेसष्ट बमय कोठ्या सरकारदरूणीमहाल मिळोन कलम १.

तालुके माहुली ठिकाणें बरहुकूम मुदस्त.

कित्ता.

१ घाट मालसेज.
१ घाट चोंढा.
१ बोरघाट नजीक तळघाट.
१ कसबे अर्धे.

४

कित्ता.

१ खर्डी देखील जवारचा अमल सुदामत असेल तो.
१ गौरापूर देखील जवारचा अमल सुदामत असेल तो.
१ चौकी देहरजे.

३

एकूण ठिकाणें सात मिळोन. कलम १.

कित्ता ठिकाणें सुदामत चालत असतील त्याप्रमाणें अमल करावा.

४ बरहुकूम नागोठणें व पालचौत्रा वगैरे.

१ बंदर नागोठणें.
१ महाल पालचौत्रा.
२ तळघाट.
१ सावा.
१ कुरवंडा.
२
४

५ प्रांत बेलापूर सुदामत ठिकाणें असतील तीं.

१ बंदर बेलापूर.
१ बंदर कोळंबें.
१ बंदर परसीक.
२ महाल.
१ तळोजे.
१ देसई.
२
५

१ तालुके मामले कोहज सुदामत ठिकाणीं अमल चालत आला असेल त्याप्रमाणें.

१ जकात मासळी बंदर देसई तर्फ बेलापूर.
१ चौकी पाथर घाट चोंढा तर्फ किल्ले कलोलगड (कमलगड)?
१ हुजुरांत महाल जकात फौजदारी तर्फ कसबे नाणें सुदामत प्रमाणें.
१ जकात परगणे उरण बंदर व ठिकाणें सुदामत प्रमाणें.
१ जकात तालुके कर्नाळा सुदामत प्रमाणें ठिकाणें चालत आलीं असतील त्याप्रमाणें अमल.
१९

एकूण पंधरा कलमें मिळोन कलम १.

एकूण पंच्यायशीं ठिकाणें घाट व बंदरें चौक्या व महाल व कोठ्या व जलमार्ग व उभामार्ग व खुटवा व वतनभाग व यात्रा व जत्रा व शिंगशिंगोटी व थलमोड व थळभरीत पेशजी सुदामत अमल चालत आला असेल त्याप्रमाणें करार करून मक्ता सालें बितपशील रुपये.

३०००० सित सितैन सालमजकूर इस्तकबील कार्तिक शुद्ध १ तागाईत आश्विनवद्य ३० सन सबा सितैन माहे १२ एकूण मक्ता. रुपये.

२९०४२१ बरहुकूम गुदस्त रुपये.

१२००६५ बरहुकूम कदीम मामलती प्रांत कल्याण.

९९००१ ऐन.

९७६३ दरुणीमहालच्या कोठ्या दोन एकूण बैलसर.

१५०० थोरली देवढी.

९०० धाकटी देवढी.

२४०० मक्ता दुतर्फा.

५१०० कोठी सरकार.

४९०० ऐनकोठी.

२००महादाजी अंबाजी

५१००

४४०१ ताल्लुके रतनगड व बहिरवगड.

१५०० तर्फ कावनई.

३०० तर्फ माणिकगड.

१२००६५

५२१५० निसबत आंगरे देखील सरकार कोठीचें मीठ पेण बंदराहून तहत कोलास प्रांत जू खंडी ४००

८१०१ जकात पालचौल व बंदर नागोठणें.

४०१ जकात मासळीबंदर वसई.

२९० जकात पाजर घाट चोंढा तर्फ कलोगड.

९९०१ जकात ताल्लुके प्रांत बेलापूर सरकारचें भात फरोक्त होईल त्याखेरीज.

१३५०१ जकात प्रांत उरण देखील भात सरकारचें फरोक्त होईल त्यासुद्धां.

९३०० जकात मामले कोहज.

७००० तर्फ माहुली.

२०९० तर्फ कर्नाळा.

२२५१ फौजदारी कसबे नाणें.

१०० जकात परगणें उरण निळकंठ महादेव यांचे जिनसा बरहुकूम.
३९० जाजती पेशजी चढ आहे त्याप्रमाणें.
३०० मामले कोहज.
९० तर्फ कर्नाळा.
३९०

६५००१ जाजती चढ.
२९०४२१

१०००० जाजती चढ पेशजी बापट. (?)
३००४२१

तीन लक्ष चारशें एकवीस रुपये पेशजीचा मक्ता पैकीं हल्लीं करार मक्ता. रुपये.
१००००० रसद बिनव्याजी मुदत, रुपये.
१९०५०१ हप्तेबंदी.

२२३०० मार्गशीर्ष वद्य १.
२२३०० पौष वद्य १.
२२३०० माघ वद्य १.
२२३०० फाल्गुन वद्य १.
२२३०० चैत्र वद्य १.
२२३०० वैशाख वद्य १.
२२३०० ज्येष्ठ वद्य १.
२२३०० आषाढ वद्य १.
१२१०१ श्रावण वद्य १.
१९०५०१

९५०० कापड.
३००००१

३००००१ सन सबा सितैन बरहुकूम गुदस्त.
३००००१ सन समान बरहुकूम गुदस्त.
३००००१ सन तिसा बरहुकूम गुदस्त.
३००००१ सन सितैन बरहुकूम गुदस्त.
१९०००००५

येणेंप्रमाणें पांच साला पंधरा लक्ष पांच रुपये पैकीं दरसाल तीन लक्ष एक रुपया एकूण सालमजकुरापासून सदरहूप्रमाणें पांच सालां मक्ता करार केला असे. कराराप्रमाणें ऐवज सरकारांत पावता करून पावलियाचे जाब घेत जाणें; तेणेंप्रमाणें मजुरा पडेल. सदरहू मामलतसंबंधें कलमें.

कसबें नाणें येथील फौजदारीचे जकातीची कमावीस सदाशिव बल्लाळ यास सांगावी कच्चा हिशेब मशारनिल्हेनीं तुम्हांस द्यावा त्यापैकीं.

५०० मक्तियाशिवाय-
२०० मक्तियापैकीं द्यावे.

७००

येणेंप्रमाणें सातशें रुपये दरसाल कच्चा हिशेब घेऊन देत जावे. येणेंप्रमाणें. कलम १.

सुदामत दस्तकें चालत असतील त्याप्रमाणें चालवावीं. नवीन जाजती जरूराती कार्याकारण होतील तीं चालवावीं. फार नवीन होणार नाहींत. येणेंप्रमाणें. कलम १.

कल्याण सुभ्यास तांदुळाची नेमणूक किल्ल्याची होईल, यास माघ शुद्ध अलीकडे मामलेदारांनीं माप घालावें, भरबैल किल्ल्याखालीं जेथवर जात असेल तेथें किल्लेकरी यांनीं पेशजीप्रमाणें माप घ्यावें. येणेंप्रमाणें. कलम १.

बंदर कल्याण भिवंडी वगैरे येथें सावकारी गलबतें येतात त्यांची परवानगी तुम्हांकडे. सुभ्यास सरकारची वेठ मात्र लागेल ते तुम्हांजवळ मामलेदारांनीं मागावें. त्याप्रमाणें तुम्ही द्यावें. येणेंप्रमाणें. कलम. १.

सान्या मामल्याची इस्तकबिल कार्तिक शुद्ध प्रतिपदा तागाईत आश्विन वद्य ३० माहे बारा. ज्या सालास अधिक माहा पडेल त्यासुध्धां अमल करावा. येणेंप्रमाणें. कलम १.

आफ्त फितूर मातबर जालिया मुलूख शिरस्तेप्रमाणें मजुरा पडेल. येणेंप्रमाणें. कलम १.

माजी कमावीसदाराची बाकी रुजुवातीमुळें होईल त्याप्रमाणें वसूल करून द्यावी. येणेंप्रमाणें. कलम १.

भाड्याखेरीज तांदुळ खंडी ४०० चारशें सालाबादप्रमाणें कल्याण सुभापैकीं. पुण्याचे कोठीस आणून देत जावें. सदरहूचें भाडें मजुरा पडणार नाहीं. येणेंप्रमाणें. कलम १.

सरकारांतून दहा अधोल्या द्याव्या. त्या अधोल्यांनीं वाण्याचे पदरीं सरकारचे तांदुळाचें माप घालावें. त्यांनीं त्याच अधोल्यांनीं किल्ल्यास माप द्यावे. येणेंप्रमाणें. कलम १.

कोठीस व किल्ल्यास तांदुळ सालाबादप्रमाणें येतात ते कल्याणकर मामलेदारांनीं गांवोगांव न द्यावे ठोक दहा पांच जागीं दास्तानें करून द्यावे किरकोळ देऊंनये. येणेंप्रमाणें. कलम १.

सरकारचें भात व जिन्नस विकेल त्याची जकात पेशजीप्रमाणें सावकारांनीं द्यावी. येणेंप्रमाणें. कलम १.

वर्षासन वगैरे किल्ल्याचे तनखे व हकदार सालाबाद मजुरा पडत असेल त्याप्रमाणें मजुरा पडेल. किल्ल्याचा तनखा आकाराप्रमामें मक्तियांत मजुरा पडेल. कलम १.

हमीदार साल दरसाल सावकार देऊन अमल करीत जाणें. येणेंप्रमाणें कलम १.

महाल मजकुरीं मक्तियापैकीं नेमणूक रुपये.

२००० कमावीसदार.

१६०० पालखा.

८०० राघो नारायण.

८०० विश्वनाथ वासुदेव.

१६००

४०० आफ्तागिरे ४ व दिवटे ४

२००० एकूण रुपये.

१२५ दिनानाथ अनंत मजमदार.

१०० फडनीस.

७५ धोंडो रघुनाथ कारकून.

१६० शिरपाव.

२४६०

२०० जाजती चिमणाजी हरि दफ्तरदार.

२१६०

एकूण दोन हजार साहाशें साठ रुपये करार केले असत. मक्त्यापैकीं घेऊन खर्च करीत जाणें. हप्तेबंदीचे ऐवजीं मक्तियांत मजुरा पडतील. येणेप्रमाणें. कलम १.

मजमदार, फडनीस यांचे हातें लिहिण्याचें कामकाज घेत जाणें. येणेप्रमाणें. कलम १.

वाणी खंडाळ्यास राहतात, त्यांस चौकी मातबर असावी, त्यास लोक पेशजीप्रमाणें व जाजती दहा नेमून द्यावे; त्यांस ऐवज पावेल तो तुह्मांस मजुरा पडेल. येणेप्रमाणें. कलम १.

व्याजुक एक लक्ष रुपये रसद करार केली त्यास व्याज एकोत्रा बिनसूट प्रमाणें सरकारांतून मजुरा द्यावें. येणेप्रमाणें कलम १.

रसदेस व्याज जाजती कमावीसदारस पसदरहूप्रमाणें सालाबाद अमल चालत आला असेल त्याप्रमाणें करावा. जाजती बोभाट आलियास कार्यास येणार नाहीं. तूर्त रसद रुपये.

१००००० बिनव्याजी रसद सालाबाद कार्तिक शुद्ध १ आहे त्यास हल्लीं रदबदलीमुळें कार्तिक अखेर.

१००००० व्याजू अगाव ऐवज हप्तेबंदीपैकीं द्यावयाचा करार मुदत मार्गशीर्ष अखेर द्यावयाचा करार.

२००००

एकूण दोन लक्ष सरकारांत द्यावे. येणेप्रमाणें करार केला असे. भरणा करून जाब घेणें. येणेप्रमाणें. कलम १.

मशारनिल्हेचें कर्ज सरकारांत फाजिलाबद्दल आहे, त्यापैकीं दरसाल पंधरा हजार रुपये रदकर्ज मक्तियांत, यापैकीं अखेर फाल्गुनपैकीं देत जावें. येणेप्रमाणें. सालमजकुरीं मात्र अडीच हजार जाजती एकूण साडे सत्रा हजार रुपये सालमजकुरीं द्यावे. पेस्तरसालापासून दरसाल पंधरा हजार देत जावे. येणेप्रमाणें. कलम १.

शिबंदी मक्तियाशिवाय सालाबादप्रमाणें खर्च करीत जाणें. शिबंदीचा ऐवज मक्तियांत मजुरा पडणार नाहीं. येणेप्रमाणें. कलम १.

नेहमीं नेमणुकीचा ऐवज आहे. त्याच्या सनदा सादर होतील, तो ऐवज वजा होऊन बाकी ऐवज रहील तो हप्तेबंदीप्रमाणें सरकारांत द्यावा. येणेप्रमाणें. कलम १.

डते सवोत्रा बिनसूटप्रमाणें त्यापैकीं एकोत्राप्रमाणें सरकारांतून घ्यावें जाजती पडेल तें वणजारी यांजपासून जाजती अमल साधून कमावीसदारांनीं घ्यावें येणेप्रमाणें पेशजी बापटाप्रमाणें घ्यावें. कलम १.

पांचसाला मामलत तुह्मांकडे येणेंप्रमाणें करार केली असे.मध्यें घालमेल होणार नाहीं. जर घालमेल केली तर कच्चा हिशेब पाहून कच्ची जमा धरून कच्चा खर्च वाजबी मजुरा दिला जाईल. या अन्वयें वाजबी तोटा आला तरी मजुरा पडेल. कांहीं लढा न पडतां तोटा आला तरी मजुरा पडणार नाहीं. येणेप्रमाणें. कलम १.

सरकारच्या कोठ्या नेमणुकेप्रमाणें सनदेबरहुकूम वारपार चालतात, त्याप्रमाणें चालवावें. येणेप्रमाणें. कलम १.

यादवराव रघुनाथ भागवत यांस कर्जाचे ऐवजी पेस्तरसालापासून पांचहजार द्यावयाची नेमणूक करार केली असे, तरी दरसाल हुजुरून वरात होईल, त्याप्रमाणें देत जाणें. येणेप्रमाणें. कलम १.

तुम्ही मामलत केली यांत सालमजकुरीं मात्र आंबडेकराकडील आकरा असामीपैकीं कोणासही सामील अंतस्थ देखील करून घेऊं नये, व बापटाकडीलही करूं नये. येणेप्रमाणें. कलम १.

वसईचे बंदरीं वाणी व चारण रजावंदीनें जातात त्यांस जोरावारीनें दुसरीकडे नेतात. ते न न्यावे. येणेप्रमाणें. कलम १.

भाड्यानें तांदुळ कोठीस व किल्लचास पेशजीप्रमाणें पोंचवीत जावे त्याचें भाडें पेशजीप्रमाणें मजुरा पडेल. येणेंप्रमाणें. कलम १.

एकूण एकूणतीस कलमें करार केलीं असेत. सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें म्हणोन, सनद १.

येविशीं देशमुख व देशपांडे यांस चिटाणिसी पत्रें.

१ बंदर आबटें.

१ घाट सावला व कोनब (कोळंब).

२

४७६ (६३१). रयान पांडीये शहर आमदाबाद प्रांत गुजराथ यांचे नांवें कौल, तुम्हीं हुजूर येऊन अर्ज केला कीं, सायरचा हाशील पूर्वी आपाजी गणेश यांचे कारकीर्दीस गल्ला हराजिन्नस गांडा चौबैली एक यास दीड रुपया व गूळ वजन पक्कें एक मण यास आठ आणे

इ० स० १७६७।६८. समान सितैन मयाव अलफ. जमादिलाखर ५.

476. The people of Ahmadabad having represented that the rates of octroi had been increased by Mamlatdar Gopalrao Ganesh and that the increase had led to depression of trade in that city, the following reduced rates were fixed:—

A. D. 1767-68.

व तीळ पक्के एक मण यास दोन आणेप्रमाणें चालत होते, त्यास गोपाळराव गणेश यांजकडे मामलत जाहालियावर त्यांनीं पहिल्या शिरस्त्यावर जाजती दर गाड्यास आठ आणे व गूळ मण यास चार आणे व तिळास एक आणा याप्रमाणें जाजती शिरस्ता करून हाशील घेतला; त्याचप्रमाणें हल्लीं आपाजी गणेश व गायकवाडाकडील अमलदार हाशील मागतात, याकरितां बेपारी यांस उदीम करावयासी ताकद राहिली नाहीं. शहरची अमदानी कमी जाहालीयामुळें आपण खराब होऊन नातवानीस आलों. ऐशास साहेबीं रयतेवर कृपाळू होऊन पेस्तर शहरचे आबादीवर नजर देऊन गोपाळराव गणेश यांनीं जाजती हाशील केला आहे, तो दूर केला पाहिजे; व आपाजी गणेश यांचे कारकीर्दीचा शिरस्ता आहे त्यापैकीं कांहीं माफ करावें आणि सरकारांतून हाशीलाचा करार करून दिला पाहिजे म्हणोन, त्याजवरून मनास आणून जाजती शिरस्तयामुळें तुम्ही खराब होऊन अमदानी कमी जाहाली जाणोन तुम्हांवर कृपाळू होऊन गोपाळराव गणेश यांनीं आपल्या कारकीर्दीस जाजती हांसील घ्यावयाचा शिरस्ता केला होता तो तुम्हांस माफ केला असे. व आपाजी गणेश याचे कारकीर्दीचा शिरस्ता आहे त्यांपैकीं कांहीं सोड देऊन हल्लीं सायराघर हांशील घ्यावयाचा शिरस्ता केलेला बितपशील.

३ पेशजी आपाजी गणेश यांचे कारकीर्दीत शिरस्ता चालत होता त्याप्रमाणें हल्लीं करार.

१ गाडा एक चार बैली साळी व तुरी यांस—

-॥= महसूल.

-।।।= महाजनी.

१॥-

दीड रुपया करार कलम.

१ गूळ वजन पक्कें एकमण यास रुपये -॥- अर्धा रुपया करार कलम.

१ तीळ पक्के एक मण यास रुपये ८२ दोनआणेप्रमाणें कलम.

३

Rs.	As.	
0	10	octroi
0	14	mahajani.
1	8	per one 4 bullock-cart of unbushed rice and pulse.
0	8	per maund of joggery.
0	2	„ „ sesaman.
0	6	octroi.
1	0	mahajani.
1	6	per 4 bullock-cart of other grain.

१ गाडा एक चार बैली हरजिन्नस गल्ला यासी कारकीर्द आपाजी गणेश पैकीं कमी दोन आणे करून बाकी.

-।= महसूल.

१ माहाजनी पेशजी १८= पैकीं वजा कमी माफ ८= बाकी एक रुपया प्रमाणें करार.

१।=

एक रुपया साहाआणे प्रमाणें. कलम १.

४

येणेंप्रमाणें चार कलमें हाशीलाची करार करून देऊन हें अभयपत्र सादर केलें असे, तरी सदरहू शिरस्तेप्रमाणें हाशील देत जाणें, आणि शहरमजकुरीं उदीम व्यवसाय करून सुखरूप राहणें म्हणोन. ——— कौल १.

चिटणिशी ——— पत्रें २.

३

१ दमाजी गायकवाड.

१ आपाजी गणेश कमावीसदार.

२

रसानगीयादी.

---

४. इतर कर.

—:०:—

(क). घरपट्टी व म्हैसपट्टी.

४७७ (३१४). रामाजी महादेव यांचे नांवें सनद कीं, बहिरो अनंत फडनीस पागा दिमत मानसिंग खलाटे यांनीं कसबे कल्याण येथें घर बांधावयासी जागा खरिदी केली आहे, त्याचे शिरस्तेप्रमाणें आकार होईल तो यांचे नांवें बद्दलमुशाहिरा खर्च लिहिणें. चौथाईचा तगादा न करणें. याखेरीज घर बांधावयास लांकडें हरकोठून आणितील त्याची दस्तुरी यांस माफ केली असे. घराचे लांकडांची दस्तुरी न घेणें म्हणून. सनद १.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. सवाल ६.

रसानगीयादी.

---

477. Bahiro Anant Fadnis, attached to the cavalry under Mansing Khalate having purchased a building site at Kalyan, the duty on it, calculated at the usual rate of one-fourth should be adjusted in the accounts as paid to him as part of his salary. Wood purchased by him for the same purpose should also be exempted from taxation.

A. D. 1764-65.

४. इतर कर.

—:०:—

(ड). मासेधरण्याचा मक्ता (मच्छिमारी).

नारो आपाजींचे रोजकीर्दीपैकीं.

४७८ (१२४). रामाजी महादेव यांस पत्र कीं, राजश्री नारो हरि मुतालिक देशमुख कसबे भिवंडी प्रांत कल्याण यांनीं हुजूर विनंति केली कीं, कसबे मजकुरीं गोडे पाण्याचीं पांच सात तळीं आहेत. त्यास चाळीस पन्नास रुपये मक्ता करून घेऊन तळ्यांतील माशांस मेण घालून मासे मारितात. त्यास इतर जागा जेथें जेथें तळीं आहेत त्यांतील मासे कोणी मारीतहीं नाहीं. व मामलेदारही कोणास देत नाहीं. येवढें जागा मात्र मारितात तेणेंकरून पाणी नासतें. माणसांच्या, गुरांच्या उपयोगीं पडत नाहीं. आणि हिंसा बहुत होते. याजकरितां चाळीस पन्नास रुपये जमाबंदी होते ते माफ करून मासे मारावयाचे मना करावें. याविशीं सुभा- पत्र दिलें पाहिजे ह्मणोन; त्याजवरून मनास आणून हें पत्र तुह्मांस सादर केलें असें. तर चाळीस पन्नास रुपये जमेकरितां तळ्यांतील मासे यांची परवानगी देऊन मासे मारितात यामुळें पाणी नासतें ब्राह्मणांस व गुरांस पाणी उपयोगीं पडत नाहीं, तरी याउपरीं मासे मारावयाचे मना करणें म्हणोन छ. १९ रबिलावल पत्र १.

इ० स० १७६३।६४ अर्बा सितैन मया व अलफ. रबिलावल.

रसानगीयादी.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

४७९ (१७२). भिकन नाईक भोई काहार पुणेंवाला यास कौल लेहून दिला कीं, रोहे-

---

478. There were five or seven fresh water tanks in Kasba Bhiwandi. The farm of fishing in these tanks was sold every year and brought in from 40 to 50 Rs. to Government. Naro Hari Mutalik Deshmukh represented that the practice of fishing in tanks was not allowed in other places, that it rendered the water of the Bhiwandi tanks unfit for drinking by Brahmans and cattle, and led to considerable loss of animal life, and prayed that the practise might be stopped. His prayer was granted.

A. D. 1763-64.

479. Bhikan Naik, a fisherman of Poona, used to get dried salt fish from the ports of Roha, Ashtmi, Pen, Panwel, Nagotane, Kalyan etc. and sell them in the country above the ghats. In the preceding year, Narotam Kahar, by misrepresentating, facts, obtained permission from Government to purchase and sell fish on condition of paying to Government Rupees 3 for every bullock load. Bhikan represented that Narotam got his fish carried by Mahars. Narotam was therefore prevented from dealing in fish, and the right was conferred on Bhikan who was directed to pay the usual revenue to Government and to have his fish carried by Kolis, Kahars and Kharkodes.

A. D. 1763-64.

इ० स० १७६३।६४ अर्बा सितैन मया व अलफ. रजब.

अष्टमी व पेण, व पनवेल व नागोठणें, व कल्याण वगैरे बंदरें येथून खारेमासे व बोंबिल खरेदी करून काहार व खारकोड व कोळी देशीं आणून विकीत असतात त्यास नरोत्तम काहार चिंचवडकर यानें गुदस्ता नाईकी करून सरकारांत गैरवाका समजाऊन, महार गांवगन्नाचे मेळऊन दरबैली तीन रुपये करार करून देशीं मासे व बोंबिल आणून विकूं लागला. कोंकण प्रांतीचे मामलेदार यांची हिमाईत करितो, म्हणोन विनंती केली, त्याजवरून मनास आणून नरोत्तम मजकूर महाराकडून मासे बोंबिल आणवितो, हें कार्याचें नाहीं हें जाणून नरोत्तम मजकूर यानें मासे बोंबिल आणूनये. आणूं लागल्यास पारिपत्य करावें. म्हणोन कमावीसदार प्रांत कोंकण यांस पत्रें आलाहिदा सादर करून हें अभयपत्र तुजला सादर केलें असे. तरी तुवां काहार व खारकोड व कोळी यांजपासून सदरहू बंदरांहून मासे वगैरे खरेदी करून सुदामत प्रमाणें सरकारचा हक्क महसूल देऊन देशीं आणून फरोक्त करून सुखरूप राहाणें म्हणोन. छ. १९ रजब चिटणिसी कौल १.

४. इतर कर.

—:०:—

(इ). घराचे विक्रीवरील कर.

४८० (२४९). महिपतराव जगन्नाथ कमावीसदार परगणें नाशिक यांसी सनद कीं, मुकुंदराव रंगनाथ मुनसी दिमत राजश्री नारोशंकर यांनीं नाशिकांत घर विकत घेतलें आहे, त्यास सरदेशमुखीच्या शेल्याबद्दल रुपये २५० अडीचशें होतात, त्यास सदरहू ऐवज मशारनिल्हेस बक्षीस केला असे. तरी तुम्ही तगादा न करणें आणि कागदावर मोहोर करून देणें म्हणून

इ० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. रविलाखर १५.

सनद १.
रसानगी याद.

४. इतर कर.

—:०:—

(फ). कर्जपट्टी.

४८१ (१८). रामाजी महादेव यांस पत्र कीं, तुमचे तालुक्यांतील दरकदार असा-

480. Mukundrao Raghunath Munsi in the employ of Naro Shankar purchased a house in Nasik. The Sardeshmukhi fees on the transaction amounted to Rupees 250. The Kamavisdar of Nasik was informed that the amount was remitted and was directed to put the necessary seal on the deed of purchase.

A. D. 1764-65.

481. The darakdars in the taluka of Ramaji Mahadev had been subjected to a levy of Rs. 60000 in the previous year and it had been ordered that the amount to be levied from each darakdar should be fixed in proportion to his means. It was

A. D. 1762-63.

इ० स० १७६२।६३ सलास सितैन मया व अलफ. रजब १४.

म्या आहेत त्यांजवर सरकारांतून रसद रुपये साळगुदस्ताचे साठ हजार करार केले, त्यांची वांटणी सुभाहून जीवनमाफक करावी ह्मणोन आज्ञा, त्यास जीवनमाफिक वांटणी कारखानीस किल्ले-हायचे यांजवर जाहली नाहीं. सुभ्यांच्या वगैरे असाम्या मातबर दरक्यांच्या, तेथील वांटणी कमी पडली. सबब तुह्मी वांटणी केली. ते दखलबाद बितपशील.

कित्ता.		कित्ता.	
१०००	कोट ठाणें.	७००	येशवंतगड.
३००	द्रोणागिरी.	२००	(फाटले आहे. कोठी आरमार साष्टी असावें).
५००	कर्नाळा.	५००	माणिकगड.
९००	विकटगड.	२००	गंभीरगड.
७००	सुवर्णदुर्ग.	५००	गोंवा.
३००	आरमार सुवर्णदुर्ग.	१००	आरमार साष्टी.
५००	मंडणगड.	५००	रसाळगड.
२००	सुमारगड.	२७००	
४०००			

रुपये.

	६७००
येसाजी त्रिंबक चिटणीस.	१०००
	७७००

पैकीं जीवनमाफक सुभा वांटणी जाहली नाहीं, सबब सूट दिली रुपये.

कित्ता.		कित्ता.	
१००	येशवंतगड.	१००	उरण.
२००	द्रोणागिरी.	२००	कर्नाळा.
१००	ठाणें.	१००	गंभीरगड.
५५०	सुवर्णदुर्ग.	१००	कोठी आरमार साष्टी.
१००	कोठी आरमार सुवर्णदुर्ग.	२००	गोवें.
१००	सुमारगड.	७५	रसाळगड.
२००	माणिकगड.	७५	मंडणगड
१३५०		३००	चिटणीस कल्याण.
		११५०	

रुपये.

२५००

found however that in the arrangement made, the karkhanis of the several forts were over-assessed and the officers of the subha under-assessed. The assessments were therefore set aside and new assessments were made.

बाकी रुपये ५२०० बावनशें हरदू असाम्यांपासून घ्यावे. अडीच हजार रुपये सूट घातली. हा ऐवज मातबर दरकदार सुभ्याचे वगैरे यांजवर बेरीज कमी पडली तेथें वांटणी दामाशाईप्रमाणें घालावी. अडीच हजार रुपये उगवणें म्हणोन सनद.

४८२ (१९६). प्रांत खानदेश व गुजराथ येथील जमीदारांचा हक्क एक साला कर्जपटींत घ्यावयाचा करार सन इहिदेंत जाहलेला आहे, त्याचा वसूल सालमजकुरीं घ्यावयाची आज्ञा नारोकृष्ण यांस केली असे, तरी हक्काचा वसूल सुरळीत देणें म्हणून चिटणिसी. पत्रें.

इ० स० १७६३।६४
अर्बा सितैन मया व अलफ.
सवाल ३.

---

४. इतर कर.

(ग). घांसदाणा.

४८३ (६१). जमीनदार परगणे फुलंबरी यांस सनद कीं, खासा स्वारीचा मुक्काम मौजे पालोद परगणे उंडणगांव येथें जाहला आहे, त्यास परगणे मजकूरचा घांसदाणियाचा करार मदार जाहला पाहिजे, तरी देखत आज्ञापत्र परगणे मजकूरपैकीं घांसदाणियाचे ऐवजीं तूर्त रुपये २५००० पंचवीस हजार घेऊन हुजूर येणें म्हणोन. सनद १.

इ० स० १७६२।६३.
सलास सितैन मया व अलफ.
रमजान १०.

४८४ (७६). फुकरडी देसाई बिरादर परगणे कलपगुर यांचें नांवें जाब लेहून दिला कीं, खासा स्वारी या प्रांतें जाहली, त्यास पेठ संगारडी परगणे मजकूर येथील खंडणी व घांसदाणा रुपये १०५००० एक लक्ष पांच हजार रुपये करार केले त्यांचा भरणा सरकारांत.

इ० स० १७६२।६३.
सलास सितैन मया व अलफ.
जिल्काद ७.

रुपये.

६४८५० छ. २१ सवाल जमापोतां. गुजारत भास्कर
४०१५० परभारे महादशेट बीरकर यांजकडे दिले ते रुपये.
१०५०००

एकूण एक लक्ष पांच हजार रुपये सदरहूप्रमाणें सरकारांत जमा असत म्हणोन.
जाब १.

---

482. A sum equal to one year's emoluments was ordered to be levied from the Jamidars of Gujerath and Khandesh as Karjapati (tax to pay Government debts).

A. D. 1763-64.

483. The Peshwa's camp being at Palod in pargana Undangaum, the jamidars of pargana Fulambari were directed to repair to the camp in order that the amount of Ghasdana might be fixed, and to bring with them Rs. 25,000.

A. D. 1762-63.

484. A contribution and Ghasdana amounting to Rs. 10,5000 was levied from Fukardi Desai brother of pargana Kalapgur on account of Peth Sangardi in the said pargana.

A. D. 1762-63.

४८५ (७९). मलणा हवाले जमीदार किल्ले अंदोल परगणे कलपगुर सरकार मेदला यांचे नांवें जाब लेहून दिला कीं, खासा स्वारी या प्रांतें जाहली, त्यास किल्ले मजकूरची खंडणी रुपये ५००० पांच हजार करार केली, त्यापैकीं जमा गुजारत नरसो पोमाजी कुळकर्णी मौजे चौटकूर परगणे मजकूर. रुपये.

इ० स० १७६२।६३.
सलास सितैन मया व अलफ.
जिल्काद १६.

३४०२ जमापोतां.
२२४५ ऐन नक्त.
५९७॥ रुपें रुपया भार एकूण रुपये.
९४७॥ सोनें वजन तोळे ३२८=॥ दर १७.
१२ होन धारवाडी नाणें ४ दर ३.
३४०२

२२३ जमा जामदारखाना कापड सनगें एकूण रुपये.
३२ तिवटें ८ दर ४.
६० पितांबर जनानी २ दर ३०.
२० धटी जनानी १.
१०२ पितांबर मर्दानी ६ दर १७.
९ लुगडें १.
२२३

१३०० घोडीं मादवाना रास २ एकूण किंमत रुपये.
१००० प्रत रास १
३०० प्रत रास १
१३००

४९२५

---

485. A contribution of Rupees 5000 was imposed on Malana Hawala Jamidar of fort Andola in pargana Kalapgur in Sirkar Medla,
A. D. 1762-63. the Peshwa having visited the province, and was levied as under:—

2245 Cash.
597-8 Silver weighing 597 1/2 tolas.
547-8 Gold weighing 32 tolas and 2½ masas at Rs. 17 per tola.
12 4 Hons Dharwadi,
223 Clothes, turbans, silkclothes etc.
1300 Mares 2—one Rs. 1000 and the other Rs. 300.

एकूण चार हजार नऊशें पंचवीस रुपये सदरहूप्रमाणें जमा असत ह्मणोन मशारनिल्हे याचे नांवें पाठविला जाब १.

४८६ (९३). मोकदम कसबे आष्टी व मौजे आष्टें परगणे आष्टी यांचे नांवें अभयपत्र कीं, खासा स्वारी या प्रांतें आली, त्यास कसबे मजकूरचा घांसदाणा करार. रुपये.

इ० स० १७६३।६४ अर्वा सितैन मया व अलफ. मोहरम २०.

२००० कसबे आष्टी.
१५०० मौजे आष्टें.

३५००

पस्तीसशें रुपये राजश्री बाबुराव सदाशिव यांजकडे देविले असत, तरी सदरहू पावते करून सुखरूप राहाणें अभय असें ह्मणोन. पत्रें २.

चिटनीसी.

---

४. इतर कर.

—०:*:०—

(ह). किरकोळ.

४८७ (५). चिमाजी माणकर नामजाद तालुके अंजनवेल यांचें नांवें सनद कीं, वेदमूर्ति रामकृष्णभट उपनाव खरे वास्तव्य कसबे गोहागर प्रांत दाभोळ यांनीं हुजूर कसबे पुण्याचे मुकामीं येऊन विदित केलें कीं, कसबे मजकुरीं आपले खाजगत आगर पैकीं, निमे शामलाचे तर्फेनें व निमे आंगारकाचे तर्फेनें एकूण दुतर्फा मिळोन सत्तावीसशें नारळ धर्मास्तव बहुतकाळ पावत होते तेव्हां काथा आपल्यापासून दुतर्फा दिवाणांत घेतला नाहीं. पुढें शामल आपले तर्फेचे निमे नारळ वसूल घेऊं लागला. तेव्हां निमे काथाही घेऊं लागला निमे आंगारकाकडील साडेतेराशें नारळ व तीन मण कच्चे काथा आह्मापासून घेतला नाहीं. पुढें तुळाजी आंगरे यानीं अंजनवेल शामलापासून घेतल्यावर चारसाले पेस-

इ० स० १७६२।६३ सलास सितैन मया व अलफ. रविलावल ३.

---

486. The Peshwa having visited the pargana of Ashti, the following amount was imposed as Ghasdana:—

A. D. 1763-64.

Rs.	
2000	Kasba Ashti.
1500	Mouze Ashti.

487. Ramkrishnabhat Khare of Gohagar in prant Dabhol represented that he formerly used to receive with the sanction of the Siddhi and the Angria. 2700 cocoanuts grown in his own field, and that no demand for coir was then made upon

A. D. 1762-63.

जीप्रमाणें चालत होते मध्यें एकसाल पुरंधर नारायण कारभारी जाहले त्यांनीं नारळ मात्र माफ पहिल्याप्रमाणें करून काथा वसूल घेतला, त्यापासून वसूल देतो हल्लीं नारळ धर्मादाव पावतात. काथ्याचा वसूल सराकरांत घेतात तो न घ्यावा. ह्मणोन त्याजवरून थोडक्याचा विषय, पहिला वसूल घेत नवते. सदरहू काथ्याचे नारळ धर्मादाव खर्च पडतच आहेत. असें जाणोन काथा वजन कच्चे ८३ तीन मण माफ करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदरहू तीन मण काथा दर साल भटजीचें नांवें. धर्मादाव खर्च लिहित जाणें वसूल न घेणें ह्मणोन. सनद १.

रसानगीह्मादी.

४८८ (१३). मेंढाराचीं खिलारें सरकारचे दस्तकाशिवाय आहेत, त्यांची चौकशी तुह्मांस सांगितली असे. माहाल.—

इ० स० १७६२।६३
सलास सितैन मया व अलफ.
रबिलाखर २३.

१ परगणे शेवगांव.
१ तर्फ मानूर.
१ परगणें अकोलें.
१ परगणे कोतूळ.
१ प्रांत जुन्नर.
१ प्रांत पारनेर.
१ सरकार संगमनेर.
१ परगणे कडेवळीत.
१ परगणे बारागांव नांदूर.
१ परगणे नेवासें.

१०

एकूण दहा महाल वगैरे जागा मिळून चौकशी सांगितली असे, त्यास वनचराई घ्यावयाचा शिरस्ता.

---

him by either authority, The Siddhi afterwards discontinued the concession, so far as his share was concerned and levied from Ramkrishnabhat half the above number of cocoanuts with their coir. Anjanwel was subsequently taken from the Siddhi by Tulaji Angria, and Ramkrishnabhat though permitted to remove the cocoanuts, was required by the Angria to pay the usual quantity of coir. Ramkrishna bhat prayed that the levy might be discontinued. His request was granted and Chimnaji Mankar, officer of Anjanwel, was instructed aecordingly.

488. The duty of levying fees from owners of flocks of sheep grazing unauthorizedly in prants Junnar, Parner, Sangamner and other parganas was given to Tukoji Naik Gaikwad. He was directed to levy the following fees:—annas 4 for each

A. D. 1762-63,

खिलारें मोजून सरकारचें दस्तक असेल तें वजा करून गैरदस्तकीं असतील त्यांस वनचराई दर मेंढरास रुपये -।- पाव रुपया प्रमाणें घेणें; उणें न घेणें, जाजती साधल्यास साधेल तें घेत जाणें. कलम १.

गैरदस्तकीं मेंढरांस दरसदे दोन प्रमाणें घ्यावीं.

१ सरकारांत घ्यावें.
१ तुम्ही घेत जाणें.
२

एकूण दोन मेंढरें सदरहूप्रमाणें घेत जाणें. कलम १.

तुम्हांस चौकशीची मामलत सांगितली असे, त्यास तुम्ही खासा व कारकून लिहिणार व प्यादे चौकशीस लागतील ते ठेवणें, त्यांस मोघम दोन चार महिने चौकशीस लागतील सबब मोघम खर्चास रुपये २०० करार करून दिले असत. सदरहू ऐवजीं घेत जाणें कलम १.

वनचराई व मेंढरें घ्यावयाचा करार करून दिला असे, त्याप्रमाणें अमल चौकशीनें इमानें इतबारें करून कच्चा हिशेब सरकारांत समजावणें. कलम १.

येणेंप्रमाणें चार कलमें करार करून दिलीं असत. याप्रमाणें करणें म्हणोन, तुकोजी नाईक गायकवाड यास सनद १.

रसानगीयादी.

४८९ (७५). गोवर्धनदास व देवजी व केशोमदन व समस्तसावकार साकीन कारवानपुरा बुलंदे हैद्राबाद यांचे नांवें अभय पत्र कीं, तुमचेविशीं राजश्री महादशेट बीरकर यांनीं हुजूर विनंति केली, त्याजवरून तुम्हांकडे रुपये ४०००१ चाळीसहजार एक रुपया करार करून अभयपत्र सादर केलें असें, तरी तुम्हीं सदरहूचा वसूल सरकारांत देऊन आबाद राहाणें. कोणेविशीं वसवसा न धरणें. जाजती उपसर्ग लागणार नाहीं. अभय असें सदरहू कराराप्रमाणें रुपये सरकारांत पावते केलियास कोणेविशीं उपद्रव लागणार नाहीं. अभय असें म्हणून चिटणिसी पत्र १.

इ० स० १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. जिल्काद ७.

नारो आपाजींच्या रोजकीर्दीपैकीं.

४९० (१२३ अ). निजामअल्ली यांचे ऐवजाची पट्टी कुलारग केली त्याचा जमा-

---

sheep and two sheep per hundred, one for Government and one for himself. A fixed sum of Rs. 200 was sanctioded on account of his pay and that of his establishment and he was directed to deduct the sum from the amount collected by him, and to remit the balance together with a detailed account to Government.

489. At the intercession of Mahadset Virkar, a letter of assurance was issued to Govardhandas, Dewji and Keso Madan and other merchants of Karwanpura in Haidarabad, promising them immunity from harm on their paying to Government Rs. 40,001.

A. D. 1762-63.

490. An amount of Rs. 6230 was raised by contribution from some residents

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. रबिलावल ३०. खर्च वसूलबाकीचा करारमदाराचा गुमास्ता महिपतराव जिवाजी कारकून सुभा पुणें बरहुकूम हिशेब.

	ऐन करार. रुपये.	वसूल.	बाकी रुपये.
कचोजी मिसाळ.	१५	१५	०
टिकाराम हलवाई.	९५	९५	०
नाना शंकर फडकरी.	२००	२००	०
निंबाजी कवडे.	६०	६०	०
फकिरा दाळवाला.	२०	२०	०
दामोदरदास.	२५	२५	०
मूळचंद.	२०	२०	०
गुंडाबा नाईक.	५०	५०	०
हरि तांबट.	४०	४०	०
मोरेशेट वाळेकर.	७५	७५	०
वेंकाजी पारनाईक.	४०	४०	०
अंतोबा माचवे.	७५	७५	०
बाळोबा वैद्य.	११५	११५	०
आजोबा वाणी.	१२	१२	०
नारोबा गोगले.	५०	५०	०
निळकंठ बणगर.	२५	२५	०
केसोबा मुंगी.	१००	१००	०
बंकाजी नेवासकर.	१५	१५	०
भवानी दाळवाला.	२३	२३	०
नाना कोटकर.	२०	२०	०
सटवाजी धनगर.	२५	२५	०
खाटीक असामी ४.	६०	६०	०
काबू असामी ४.	४५	४५	०
धुळोजी लोणारी.	३०	३०	०
नारोबा तांबोळी.	४५	४५	०
आपाजी सोनार.	१२५	१२५	०
धोंडजी सोनार पेडगांवकर.	५०	५०	०
पिंजारी असामी २.	२०	२०	०
खंडू नगर.	१०	१०	०

A. D. 1763-64. of Poona in connection with some payments to be made to Nizam Ali. Their names and the amount contributed by them appear in the Sanad.

देवजी सोनार.	३०	३०	०
नालदास गौडा.	१००	१००	०
राणोजी भगत.	५	९	०
नानु कासारीण.	९	५	०
बाबु शिंपी.	२९	२९	०
रघु राजमान्या.	१०	१०	०
कृष्णाजी सरड्या.	५	५	०
आपाजी तोडकरी.	१९	१९	०
राणोजी पाटेकर.	५	९	०
बाजी नाईक.	९०	५०	०
येसोबा हळदे.	९	५	०
गंगा हमाल.	५	५	०
उमाशंकर.	९	५	०
बाळु बणगर.	१९	१९	०
शिवराम शिंपी.	९	५	०
गणोबा सोनार.	५०	५०	०
नागोबा सोनार.	१५	१९	०
तंबाखुवाले.	९०	९०	०
बाबु बेलदार.	१५	१५	०
गोविंदा सोनार.	२०	२०	०
नारायणदास.	५	५	०
नथु हलवाई.	५	९	०
रामाणा सराफ.	२०	२०	०
गंगापा बणगर.	३५	३५	०
आसाराम बागवान.	९	९	०
मोहन बांगडीवाला.	५	९	०
रामा भुमकर.	२०	२०	०
आत्माराम सोनार.	३०	३०	०
भिवजी तेली.	४	४	०
राजबा गंजकर.	१०	१०	०
जिऊबा गंजकर.	१५	१५	०
मक्या.	१५	१५	०
राणोजी भोई.	२५	२९	०
पेठ गुरुवार.	५०	३९॥.	१०॥.
तिमणा गौळी.	२१९	१४०	७५
मकरंद बेलदार.	२२	२२	०

दयाराम बेलदार.	२२	२२	०
मानसिंग बेलदार.	२२	२२	०
मान्या बेलदार.	९	९	०
खुशाल गुजराथी.	५	५	०
सुलतानजी वारघोडा.	१०	१०	०
संतु गुरव कसबेकर.	२५	२५	०
गंगाराम आगरवाला.	८०	६९	११
सूर्याजी गौळी.	१२०	११६॥≡	३।-
केदरू सोनार.	१५	१५	०
तुकोजी पवार.	७	७	०
तुळाजी पवार.	७	७	०
पिराजी मान्या.	४	४	०
पेंढारी.	७५	६८	७
आपाजी सांडू.	१२५	१२२	३
आपाजी गुळवा.	८०	८०	०
रामजी चौगुला.	४०	४०	०
चांभार कसबेकर.	२५	२५	०
जिनगर कसबेकर.	३५	३५	०
बेलदार.	७५०	७५०	०
गुणाजी सोनार.	५॥	५॥	०
बढई सुतार.	१००	१००	०
महादु सोनार.	५	५	०
खंडु शिंपी.	५	५	०
येशी तांबटीण.	१५	१५	०
विठोजी सोनार.	९	९	०
पेठ बुधवार.	८६०	८५८॥	१॥
शिवा बागजकर.	१०	१०	०
(किवांते)? वगैरे गुजारत गोविंद कृष्ण.	५६५	५६५	०
किन सुरतीवाला.	५	५	०
धुधला माळी.	४	४	०
तुळशी सातारकर.	५०	५०	०
उत्तमचंद.	२५	२५	०
मैकी.	२०	२०	०
कसबे शिवापूर.	४५०	५०	४००

शेटी गौळी.	१९५	१९५	०
भवानी चांभार.	१०	१०	०
	६२३०॥	५७१९८॥	५११।-

येणेंप्रमाणें वसूल बाकी जाहली असे. सदरहूचा मखलासीचा हिशेब अलाहिदा आहे. त्याप्रमाणें जमाखर्च हल्लीं छ. २९ रबिलावली केला असे.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

४९१ (१७४). समस्त साहुकार व रयत शहर अमदानगर यांस सनद कीं, तुम्ही सालगुदस्तां मोगलाचे दंग्यांत गणेश विठ्ठल यांजपाशीं करार केला कीं, दंग्यामुळें आमचीं मुलें माणसें व वस्तभाव किल्ले नगरांत व किल्ल्याचे पाळीस उतरो द्यावीं, आणि आमचा बचाव करावा. म्हणजे आम्ही आपले सुखें एका रोजमरयाचा ऐवज रुपये १०००० दहा हजार तुमचे शिबंदी खर्चास देऊं. याप्रमाणें करार केला, तो ऐवज अद्याप मशारनिल्हेस तुम्हीं दिला नाहीं. सबब हल्लीं हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी कराराप्रमाणें सदरहू दहा हजार रुपये गणेश विठ्ठल यांजकडे वसूल देणें म्हणोन. सनद १.

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. रजब १४.

येविशीं. सनदा २.

१ गणेश विठ्ठल तालुके अमदानगर यांस कीं, तुम्हीं कराराप्रमाणें सदरहू दहा हजार रुपये वसूल करून घेऊन सरकारचे हिशेबीं जमा धरणें म्हणोन.

१ देशमुख व देशपांडिये तालुके अमदानगर यांस कीं, साहुकार व रयत शहरमजकूरचे यांनीं करार केला असतां अद्याप ऐवज वसूल देत नाहींत. तरी तुम्ही ताकीद करून सदरहू दहा हजार रुपये गणेश विठ्ठल याजकडे देणें म्हणोन. छ. १४ रजब.

२ ३

४९२ (२६०). वेदमूर्ति विनायकभट व परशरामभट गणपुले यांनीं हुजूर विदित केलें कीं तालुके अंजनवेल वगैरे तालुके येथील ब्राह्मणांचे दर घरास दर ८॥ प्रमाणें व कुणबियांचे दर घरास ८- एक आणा प्रमाणें तीन आणे श्रीपरशराम वास्तव्य मौजे पेढें तर्फ चिपळोण

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. रबिलाखर १२.

---

491. The merchants and ryots of Ahmadnagar promised Ganesh Vithal, at the time of the Mogal disturbance last year, to pay Government Rs. 10,000 if their families and property were allowed to be kept in the fort. The amount was ordered to be recovered.

A. D. 1763-64.

492. A tax fixed at two annas on every Brahmin's house and one anna on

सुभा दाभोळ येथील इमारतीस व अन्नछत्रास सरकार जमेशिवाय रयत निसबतीनें सरकारांतून नूतन नेमणूक करून देऊन सनद सादर केली असे, तरी याविशीं पेशजी रामाजी महादेव यांचे नांवें(सनद)ः सादर आहे, त्याप्रमाणें सन सबापासून चालत आहे, त्यास हल्लींचे मामलेदार दिकत करितात. तर याविशीं आज्ञा जाहली पाहिजे. म्हणोन पेशजी करार करून देऊन सनदा सुभा सादर आहेत, त्याप्रमाणें तालुके मजकूरचे रयतीस ताकीद करून वेदमूर्तीकडे चालवणें म्हणोन चिटणिसी. पत्रें.

१ रामाजी महादेव तालुके सुवर्णदुर्ग यांस.
१ कृष्णाजी विश्वनाथ तालुके अंजनवेल यांस.
१ मोराजी शिंदे तालुके रत्नागिरी यांस.
१ कृष्णाजी विश्वनाथ तालुके विजयदुर्ग यांस.
४

दादासाहेबांच्या रोजकीर्दीपैकीं.

४९३ (३३८). सन सलासांत मोगलाची फौज आली ते समयीं शहर अमदानगर येथील रयत वाणी, उदमी, सावकार वगैरे यांजकडे मोगलाची खंडणी रुपये. २०००० वीस हजार शिवराम राम कडेकर याचे मार्फतीनें करार होऊन शिवराम यासी दरम्यान देऊन मशारनिल्हेचे नांवें रोखा लिहून दिला. पुढें मोगलास ऐवज पावावा त्यास सरकारांतून मोगलाचे फौजेचें पारपत्य जाहलें त्यामुळें ऐवज पावला नाहीं. पट्टीपैकीं वसूल जाहला तो सरकारांत घेतला. बाकी ऐवज राहिला त्यास शिवराम याजकडे तुमचा रोखा राहिला. याजकरितां ऐवजाचा वसूल द्यावयास नवदिगर करितां म्हणोन विदित जाहलें. त्याजवरून खंडणीचे करारापैकीं बाकी राहिली आहे तो ऐवज किल्ले अमदानगर येथील लोकांचे बेगमीस राजश्री गणेश विठ्ठल यांजकडे बेहड्यास नेमणूक करून दिली असे, तर बाकी पट्टीपैकीं राहिली असेल त्याचा वसूल मशारनिल्हेकडे देऊन पावलीयाचें कबज घेणें म्हणोन तालुके नगर व हवेली येथील देशमुख व देशपांडे यांचे नांवें. सनद १.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. जिल्हेज १३.

---

every Kunbi's house was formerly imposed on the inhabitants of taluka Anjanwel and other talukas, to provide for the expences of repairing the temple of Shri Parashram of Mouze Pedhe in tarf Chiplun and of keeping up a poor-house. The continuance of the tax was sanctioned.

A. D. 1764-65.

493. The traders and merchants of Ahmadnagar promised a tribute of Rs 20,000 to the Mogal on the approach of his army in A. D. 1762-63 and asked one of them, Siwaram Ram Kadekar, to pay the amount. They gave Siwaram a bond for the repayment of the amount. Before the amount was delivered, the Mogal army was dispersed by the Peshwa. Tbe amount was consequently taken by the latter.

A. D. 1764-65.

सदरहू प्रमाणें तर्फ हवेली व शहर अमदानगर येथील शेटे व महाजन व समस्त सावकार व रयत यांचे नांवें. सनद १.

२

रसानगी यादी छ. १४ जमादिलावल.

इ० स० १७६७।६८. समान सितैन मया व अलफ. रबज.

४९४ (५३८). मेंढरें खिलारें यांचे चौकशीस पेशजी तुम्हांस सरकारांतून पाठविले होते त्यास रयतेच्या देखील मेंढरांची वनचराई तुम्ही घेतली ह्मणोन बोभाट आला. त्यावरून मनास आणितां रयतेपासून वनचराई घ्यावयाचा पेशजीपासून शिरस्ता नाहीं. असें असतां तुम्हीं रयतेच्या मेंढरांची वनचराई घेतली त्यामुळें रयतेस जलेल होते. त्याजवरून रयतेच्या मेंढरांची वनचराई घेऊंनये. याप्रमाणें करार केला असे. तरी रयतेखेरीज मेंढरें असतील त्यांची चौकशी करून सरकारच्या दस्तकाप्रमाणें खिलारी असतील ते वजा करून बाकी मेंढरें दस्तकाच्या खिलाराबरोबर मेंढरें बाळगून गावगन्ना रयतेस उपद्रव देऊन चारणी करितात, तें पाहून दस्तकाशिवाय जाजती असतील त्यांची चौकशीनें मोजणी त्यांचे गुजारतीनें करून त्यांजपासून वनचराई दर शेंकडा रूपये ६ सहा प्रमाणें घ्यावयाचा करार केला असे. तरी सदरहूप्रमाणें चौकशी करून वर्तणूक करणें; वनचराईबद्दल ऐवज आकारेल तो सरकारांत पावता करून जाब घेत जाणें. रयत धनगर व कुणबी यांचीं मेंढरें असतील त्यांस एकंदर वनचराईचा उपद्रव न देणें म्हणोन बापूराव यशवंत याचे नांवें.

सनद १.

रसानगीयादी.

इ० स० १७६७।६८. समान सितैन मया व अलफ. जिल्हेज ३.

४९५ (५९७). कृष्णाजी हरि तालुके रत्नागिरी यांस सनद कीं, भिकाजी नाईक सरदेसाई तर्फ खिलणा व देसाई तर्फ देवळे प्रांत राजापूर तर्फ मजकूर यांनीं हुजूर येऊन विदित केलें कीं, प्रांत मजकुरीं व प्रांत दाभोळ येथें शामलाकडील चोरटे येऊन गांवगन्ना चोरपट्टी क-

---

494. Baburao Yeshwant was deputed to levy grazing fees from owners of flocks of sheep. He levied the tax on sheep belonging to the ryots also. A complaint was therefore made to the Peahwa by the people. Baburao Yeshwant was informed that it was not usual, and he must not levy grazing fees fram agriculturists whether Dhangars or Kunbis, but only from those professional graziers whose sheep were not covered by Government passes. The fee was to be levied at the rate of Rs. 6 per 100 sheep. A. D. 1767-68.

495. Certain robbers from Janjira territory levied a tax called chorpatti (robber's tax) from prants Rajapur and Dabhol. A portion of the tax remained unrecovered from tarf Devale and for this they took a bond from the Sir Desai Bhikaji Naik. This becoming known at the Subha, the Sir Desai was called and the amount for which he had passed a bond was recovered from him. The robbers A. D. 1767-68.

रून वसूल घेतला, त्यास तर्फ देवळें येथील पट्टीपैकीं वसूल करून बाकी रुपये दोनशेंचार राहिले, त्याचा कतबा आपला घेऊन गेले हें वर्तमान सुभा विदित जाहलें, तेव्हां सुभा आपणांस बोलाऊन नेऊन चौकशीकरितां सदरहू रुपये तर्फमजकुरीं बाकी राहिली तो ऐवज आपणापासून सुभा घेतल्यावर मागती चोरटे माघारी येऊन कतब्याप्रमाणें वसूल घेतला, त्याजवर आपण सुभा जाऊन वर्तमान सांगितलें कीं, दोनशेंचार रुपये दुबारां आपणांस पडले. हे माघारे देवावे, त्याजवरून सदरहू ऐवज माघारा द्यावा असा करार जाहला. उपरांत मामलेदार हुजूर आले ऐवज आपणास देविला नाहीं. आम्ही गरीब रयत दुबार रुपये पडले आहेत तरी स्वामींनीं कृपाळू होऊन सुभा आज्ञा करून रुपये माघारे देविले पाहिजेत. ऐशियास चोरट्याबाबद दोनशेंचार रुपये बाकी राहिले ते सन खमस सितैनांत भिकाजी नाईक सरदेसाई यांजपासून मामलेदार यांनीं सुभा वसूल घेतला असतां चोरटे यांनीं तेच दोनशेंचार रुपये यांजपासून घेतले. एकून यांस दुबारा पडले म्हणोन तुम्हांस हे पत्र सादर केलें असें, तरी याची चौकशी करून वाजवी दुबारा पडले असले तरी यांचा ऐवज सुभा घेतला असेल तो माघारा देणें म्हणोन. पत्र चिटणीसी.

४९६ (९८३). राघोजी आंगरे वजारतमहा सरखेल यांनीं हुजूर येऊन विनंति केली कीं, फिरंगाण तालुक्याचे कोळी डोलकर यांजवर जंजिरेंतून कबिल्याचा महसूल होता, त्याप्रमाणें प्रतिवर्षी वसूल आणून देत असतां संपूर्ण फिरंगाणतालुका सरकारांत आल्यावर सुदामत प्रमाणें कांहींएक वर्षें महसूल देत आले. अलीकडे देत नाहींत. कुलाबा तालुकियाचे वरसोळकर कोळी डोलकर उंदेरी शामलाकडे असतां दोनशें रुपये दरसाल शामलास देत आले. हल्लीं उंदेरी सरकारांत आली. तत्राप सुदामत प्रमाणें वसूल देतात, त्यास कुलाबियाची आरमारची भिस्त कोळी यांजवर याजकरितां जंजिरे मजकूरचे तरुणोपायावरी नजर देऊन उंदेरी तर्फेचे दोनशें रुपये महसूल आम्हांस बक्षीस केला पाहिजे. म्हणून, त्याजवरून यांजवर नजर देऊन वरसोळकर कोळी डोलकर याचा महसूल उंदेरी तर्फेचा रुपये २०० दोनशें सरकारांत येत होता तो हल्लीं सालमजकुरापासून मशारनिल्हेचे नांवें दरसाल खेरीज मोईन त्याहावयाचा करार करून देऊन हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदरहू दोनशें रुपये यांचे नांवें खेरीज मोईन खर्च लिहीत जाणें, वसुलाचा तगादा न लावणें ह्मणोन रामाजी महादेव याचे नांवें. सनद १.

इ० स० १७६८-६९.
तिसा सितैन मया व अलफ.
जमादिलाखर १२.

रसानगीयादी.

---

subsequently compelled him to pay up again the amount of the bond. He complained to the Peshwa, and the officer of Ratnagiri was directed to refund the amount levied from him.

496. The Kolis of Warsoli in taluka Kolaba used to pay to the Siddhi a tax of Rs. 200 on account of Underi, which was in his possession. The place having come into the hands of the Peshwa the above tax was received by him. It was now remitted at the request of Raghoji Angria Wajarat Maha Sarkhel.

A. D. 1768-69.

४९७ (७१९). शिरवळप्रांतीं मेंढरांचीं खिलारें शेताशिवारास उपद्रव करीत होतीं, सबब त्यांची जप्ती सरकारांतून तुम्हांकडे सांगितली होती, त्यास तुह्मी खिलारांची टीप नांवानिशीवार घेऊन पाठविली ती येऊन पावली. त्याची चौकशी हुजूर मनास आणितां रामचंद्र गणेश यांजकडील सखोजी नाल्या खिलारी याजपाशीं सरकारचें दस्तक आहे. व बाजी मोट्या यानें आनंदराव जिवाजी यांजकडील दस्तक तीन हजार मेंढरांचें नेलें आहे, सबब सदरहू टिपेपैकीं रामचंद्र गणेश यांजकडील मेंढरें दस्तकपैकीं आठशेंवीस व आनंदराव जिवाजी याच्या दस्तकाबद्दल तीनहजार व त्यांची उपज कोंकरीं जालीं तीं साडेआठशें एकूण चारहजार साहाशेंसत्तर मेंढरें वजा करून बाकी तूर्त सरकारांत लावावीं. याप्रमाणें ठराव होऊन हुजुरून नारो आपाजी याजकडील निळो रघुनाथ कारकून पाठविले आहेत, तरी नांवनिशीवार टिपेप्रमाणें मोजदाद करून सारीं मेंढरें यांचे हवालीं करणें हे करारप्रमाणें ज्यांचीं त्यांजकडे देतील. बाकी राहतील त्यांचा फडशा होणें तो हुजुरून होईल. त्याशिवाय मौजे मांडकी येथें दहा हजार पावेतों मेंढरें आहेत. म्हणोन लिहिलें येविशीं निळो रघुनाथ यांस आज्ञा केली आहे. त्याप्रमाणें हे त्या खिलारीयांस ताकीद करून काढून देतील म्हणोन रंगो गोविंद यांस चिटणिसीं. पत्र १.

इ० स० १७७०।७१. इसन्ने सबैन मया व अलफ. सवाल २१.

(५). गांवचे व महालचे वतनदार.

४९८ (१८०). महमदयासीन वल्लद महमदसैद याचा आजा काजी महमद वल्लद काजी अल्ली याजकडे तर्फ गोवलें येथील काजीपणा व मौजे मेढें तर्फ हवेली मामले तळें येथें भात कैली खंडी चार व दर खंडीस रुपये सवादोनप्रमाणें रुपये नऊ व मौजे मजकूरची करनाळेवाडीची खोती येणेंप्रमाणें पेशजीपासून चालत होते, त्यास काजी महमद मयत जाहला, त्यास अवलाद कोणी नाहीं. महमदयासीन अफलाद आहे. आफलादाकडे चालवावयाचा शिरस्ता आहे, याजकरितां तर्फ मजकूरचा काजीपणा व मौजे मेढें पैकीं भात कैली खंडी ४ चार व पट्टी दर खंडीस रुपये २। सवादोनें प्रमाणें चहूंखंडीचे रुपये ९ नऊ व करनाळेवाडी मौजे मजकूरची येथील खोती येणेंप्रमाणें सरकारांतून करार करून देऊन पेशजीपासून चालत आल्याचा भोगवटा मनास आणून चालत आल्याप्रमाणें महमदयासीन यास व त्याचे पुस्तदरपुस्त सदरहू लिहिल्याप्रमाणें चालवणें, दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें. या सनदेची नक्कल लिहून घेऊन हे असल सनद भोगवटीयास परतोन देणें म्हणोन कमावीसदार वर्तमान व भावी प्रांत राजपुरी यांस. सनद १.

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. साबान ९.

---

497. Several flocks of sheep which had injured the crops in Sirwal, prant Medhe, were ordered to be attached excepting those for which Government permits had already been isstued.

A. D. 1770-71.

498. The watan of Kazi and the grain allowance, enjoyed by Kazi Mahamed wd Kazi ali was on his death without a son continued according to custom to a descendant of his daughter.

A. D. 1763-64.

गोविंदराव व चिमाजी माणकर यांस सनद कीं, मौजे मजकूर पैकीं भात चार खंडी व नऊ रुपये दरसाल खर्च राजपुरी पैकीं काजीचे नांवें लिहिणें व काजीपणा व खोती चालविणें दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें म्हणोन. सनद १.

१

रसानगीयादी.

४९९ (२५२). काजी महमद तकी वल्लद हशमदुल्लाखान यांस प्रांत पुणें देखील पेठा व पुरें वगैरे येथील मोतसबी व सकालात व मुफ्तीगिरी एकूण तीन खिजमती हजरत अलमगीर सानी पातशहा यांनीं करार करून देऊन फर्मान करून दिलें, त्याप्रमाणें सरकारची सनद भोगवटीयास करून दिली पाहिजे म्हणोन विनंती केली, त्यावरून प्रांत मजकूर देखील पेठा व पुरे येथील मोतसबी व सकालात व मुफ्तीगिरी एकूण तीन खिजमती पातशाही फर्मानाप्रमाणें करार करून दिल्या असत. तरी तुह्मी मुसलमानी कामकाज महजबाप्रमाणें बिलाहरकत करून हक्क लवाजिमा बिदाती आसाम्या वगैरे वरकड जागाचे शिरस्तेप्रमाणें बापूरजदा घेत जाऊन दुवा करून सुखरूप राहणें म्हणोन. सनद १.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. रबिलाखर ४.

रसानगीयादी.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

९०० (३०८). दत्ताजी ठाकूर व संताजी ठाकूर पाटील कसबे मुकवें परगणें उंबरखेड सरकार माहूर यांचे नांवें पत्र कीं, कसबे मजकूर येथील निमे पाटीलकी शहाजी पाटील याची होती, त्यास तो मयत जाहला असतां त्याचे कलावंतीणीचा लेक संताजी ठाकूर आहे, तो सरकारचे आज्ञेशिवाय पाटीलकी खातो. म्हणोन कृष्णाजी आनंत पांड्या कसबे मजकूर यानें हुजूर अर्ज केला; त्याजवरून कसबे मजकूरची दरोबस्त तुह्मां हरदु जणांची मोकदमी सरकारांत जप्त केली होती. ऐशियास हल्लीं तुह्मांवर मेहेरबान होऊन तुमचे दरोबस्त मोकदमीचें वतन मोकळें करून हें अभयपत्र सादर केलें असे, तरी तुम्ही सुदामत प्रमाणें कसबे मजकूरचे मोकदमीचें कामकाज करून हक्क लवाजिमा मामूल चालत आल्याबरहुकूम अनुभऊन सुखरूप राहणें म्हणोन छ. १३ रोज चिटणिसी पत्र १.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. साबान ३०.

---

499. The watans of Motasbi, Sakalat and Muftigiri of prant Poona, including Peths, and suburbs—were conferred on Kazi Mahamed Taki wd Hasham Dulakhan by Hazrat Alamgir Sani Emperor. The watans were now confirmed to them by the Peshwa and they were directed to carry on their duties according to Mahamedan usage.

A. D. 1764-65.

500. Shahaji Patel of Mukawe in pargana Umbarkhed in Sirkar Mahur, died leaving a son named Santaji Thakur by his concubine. Shahaji's half share in the watan was allowed to be continued to Santaji.

A. D. 1764-65.

येविशीं पत्रें कीं, सुदामत प्रमाणें मोकदमीचें कामकाज हरदूजणापासून घेऊन हकदक चालत आल्याप्रमाणें चालवणें ह्मणोन. पत्रें २.

१ महिपतराव कवडे यांस.
१ परगणे मजकूरचे जमीदारांस.
२

सदाशिव गणेश जफ्तीचे कमावीसदार यांस कीं, पाटीलकी हरदूजणाकडे मोकळी केली असे तरी तुम्ही जप्ती उठवणें ह्मणोन. १.
४

एकूण चार पत्रें चिटणिसी दीड हजार रुपये सरकारची नजर घेऊन दिलीं असत.

५०१ (३६१). गणेश विठ्ठल यांचे नांवें पत्र कीं, राघोजी पठारा व लक्ष्मण पठारा यांनीं मौजे वरीयें तर्फ सातारा येथील चौथाई पाटीलकी विकत घेतली आहे, त्यांस पाटीलकीचीं राजपत्रें करून द्यावयाविशीं व्यंकाजी माणकेश्वर यांस पत्र सादर केलें होतें, व हल्लीं हें पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी यांजवळ चौथाई पाटीलकीचें खरेदीखत आहे, तें मनास आणून राजश्री स्वामीस विनंति करून यांस राजपत्रें करून देवणें ह्मणोन चिटणिसी पत्रें.

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. रबिलावल १.

५०२ (३६४). लक्ष्मण सोनार पोतदार परगणे नेवासे यानें हुजूर विदित केलें कीं, परगणे मजकूरची पोतदारी पुरातन आपली आहे.त्यास सरकारांतून जमेशिवाय दरमहा रुपये ४ व याखेरीज परभारे परगणे मजकुरीं दर गांवास थोर गांवास रुपये २ दोन व लहान गांवास रुपया १ येणेंप्रमाणें पावत आलें आहे, तरी त्याप्रमाणें सुरळीत चालें तें केलें पाहिजे ह्मणोन; ऐशियास परगणे मजकूरची पोतदारी लक्ष्मण सोनार याची कदीम आहे, त्यास सरकारांतून इतलाख रोजमरा व परभारें गांवगन्ना पैकीं पावत आहे, त्या बमोजिब हल्लीं करार करून हें पत्र सादर केलें असे, तरी सुदामत प्रमाणें सोनार मजकूर याजपासोन कामकाज घेऊन पोतदारीचा मुशाहिरा पूर्ववत्प्रमाणें पाववीत जाणें म्हणोन, व्यंबकराव लक्ष्मण कमावीसदार परगणे मजकूर यांस चिटणिसी. पत्र १.

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. रबिलावल २.

५०३ (३९४). आपाजी बिन हेगोजी मैराळ व येसाजी बिन रामजी बाबर व

---

501. Raghoji Pathara and Laxman Pathara having purchased a fourth share of the patilki watan of Wariye in tarf Satara, Ganesh Vithal was directed to request the Raja (of Satara) to grant a royal sanad confirming the purchase.

A. D. 1765-66.

502. Laxman Sonar, potdar of pargana Newase, was given an allowance of Rs. 4 per month from Government and also Rs. 2 from every large village, and Re. 1 from every small village.

A. D. 1765-66.

503. The duty which the Pansare was allowed to levy at the following passes

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. जमादिलावल १४. समस्त पानसरे चौत्रा उंबरेंनवलाखाचें प्रांत जुन्नर यांनीं हुजूर कसबें पुणें येथील मुक्कामीं येऊन अर्ज केला कीं, बोरघाट व कुरवंडा व सावळा व कोळंब व कुसूर व गाढवलोट व सावा येथील सात घाटचें पानसरेपणाचें वतन आपलें पुरातन होतें, त्यापैकीं पेशजी निमे वतनाचा हक्क साहेबास देऊन निमे वतन आपण ठेविलें, त्यास दरोबस्त वतनाचा हक्क सुदामत प्रमाणें तांदुळ व मीठ व हरजिन्नस मिळोन दरबैली दुतर्फा समाईक रुके तीन व किराण्याचे बैलास रुके नऊ याजप्रमाणें चालत आहे त्यास निमे वतन सरकारांत ठेवून निमे वतन आपणाकडे करार करून देऊन पत्रें सरकारांतून करून दिलीं होतीं तीं सन सलास सितैनांत मोगलाचे दंग्यांत गेलीं त्यास साहेबी वतन चालत आल्याचा भोगवटा मनास आणून त्याजप्रमाणें भोगवटियास पत्रें करून दिलीं पाहिजेत म्हणून; त्याजवरून मनास आणितां निमे वतन पानसरेपणाचें तुह्मांकडे चालत आहे व निमे वतन सरकारांत आहे. त्याचा दाखला मनास आणून पानसरेपणाचें वतनाचीं पत्रें सरकारांतून करून दिलीं होतीं. तीं सन सलास सितैनांत मोगलाचे दंग्यांत गेलीं. निमे वतन तुह्मांकडे चालत आहे. हें जाणोन तुह्मावरी कृपाळू होऊन पानसरेपणाचे वतनाचे घाट बोरघाट व कुरवंडा व सावळा व कोळंब व कुसूर व गाढवलोट व सावा येथील सात घाटचे दरोबस्त वतनाचा हक्क दुतर्फा समाईक तांदूळ व मीठ व हरजिन्नस दरबैली रुके ८३ तीन व किराण्याचे दरबैली रुके ८९ नऊ सुदामत चालत आहे, त्याजपैकीं निमे सरकार तक्षिमेचा हक्क सरकारांत ठेऊन निमे वतन तुह्मांकडे करार करून दिलें असे तरी वतनाची सेवा करून सदरहूप्रमाणें निमे पानसरेपणाचे वतनाचा हक्क सुदामत चालत आल्याप्रमाणें घेऊन तुह्मी व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम अनुभवून सुखरूप राहणें म्हणून नांवाची. सनद १.

चिटणिसी. २

१ देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी प्रांत जुन्नर.

१ देशमुख व देशपांडे व घाटपांडे तर्फ नाणेमावळ व पौडखोरें वगैरे मावळे प्रांत जुन्नर.

२

रसानगीयादी.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

५०४ (४१७). पीरमहमद वल्लद नूरमहमद रंगरेज वस्ती कसबे पुणें याचे नांवें पत्र कीं, तुम्हीं हुजूर येऊन अर्ज केला कीं, कसबे मजकूरचे रंगरेजांचे सेटेपण आपलें, बाहेरून कुंसुंबा विकावयास येतो तो मी निरख करून द्यावा, वरकड रंगरेजांस घेणें तरी माझे मार्फतीनें

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. जमादिलाखर ३०.

---

viz:—Borghant, Kurwanda, Sawla, Kolumba, Kusur Gadhavlot, and Sawa, was Rukes 3 for every bullock-load of rice, salt and other grain, and Rukes 9 for every bullock load of groceries.

A. D. 1765-66.

504. The watan of the Shetya of dyers, whose privilege it was to fix the

ध्यावा. सरकारचें कामकाज पडेल तें मी करावें. येविशीं सरकारचीं पत्रें पहिली आपणाजवळ होतीं तीं सिंहगडच्या दंग्यांत लुटलो गेलो त्यांत गेलीं यास्तव साहेबी नवीं पत्रें करून द्यावीं म्हणोन. त्याजवरून हें आज्ञापत्र सादर केलें असे, तरी शहरमजकुरीं तुझें सेटेपण सुदामतपासून चालत आलें असेल त्याप्रमाणें [करार असे] म्हणोन नांवाचें.———पत्र १.

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. जिल्काद ७.

५०५ (४३९). मोकदम व कुळकर्णी व शेटेमहाजन व समस्त पांढर कसबें पुणें यांचे नांवें पत्र कीं, हुसेन व ताजमोहमद वल्लद इब्राम मुलाणा कसबे मजकूर यानें हुजूर अर्ज केला कीं, कसबे मजकूरचे मुलाणेपणाचें वतन कदीम आम्हांकडे चालत आहे. येविशीं हुजूरची सनद भोगवटियास आपले जवळ होती. ते सन सलासांत मोगलाचा दंगा जाहला. ते वेळेस गळाटली. याजकरितां साहेबी मेहेरबान होऊन भोगवटियास सनद करून दिली पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणितां कसबे मजकूरचे मुलाणेपणाचें वतन कदीम यांचे व यांजवळ सरकारची सनद होती. ती पेशजी गमावली हें जाणोन हें आज्ञापत्र सादर केलें असें; तरी कसबे पुणें येथील मुलाणेपणाचें वतन हरदू मुलाणे मजकूर यांजकडे सुदामत चालत आल्या बमोजीब पुस्तदरपुस्त सुरळीत चालवणें. या पत्राची तालीक लेहून घेऊन हें अस्सल पत्र भोगवटियास यांजवळ परतोन देणें म्हणोन चिटणिसी. पत्र १.

इ० स० १७६६।६७. सबा सितैन मया व अलफ. मोहरम २१.

५०६ (४९१ अ). मिठेखान काजी परगणें चाळीसगांव याचे बायकोनें हुजूर येऊन अर्ज केला कीं, आपले पोटीं अवलाद अफलाद नाहीं. सदरहू काजीपणाचें वतन आपलें आपणाकडे चाललें पाहिजे याजकरितां जमालमहमद हा मिठेखान याचे बहिणीचा लेक आपला भाचा यांस फरजंद लुतफी लेक घेतला याचे हातें काजीपणाचें व वतनाचें कामकाज चाललें पाहिजे यास्तव साहेबीं मेहरबान होऊन जमालमहमद याचे नांवें परगणे मजकूरचें पेशजीप्रमाणें काजीपणाचें वतन करार करून देऊन भोगवटियास पत्रें करून दिलीं पाहिजेत. म्हणून त्याजवरून मिठेखान याचे बायकोनें तुजला फरजंद लुतफी लेक घेतला हें जाणोन तुजवरी मेहरबान होऊन पेशजीप्रमाणें परगणे चाळीसगांव येथील काजीपणा करार करून देऊन पत्रें करून दिलीं असत, तरी काजीपणा व काजीपणाचें वतन संबंधें हक्क आदाव व

A. D. 1765-66. price of all dyeing materials brought to Poona from outside and to arrange for their sale to other dyers and to do all dyeing work for Government, belonged to Pir Mahamed wallad Nur Mahamed. His former sanad having been lost during the Sinhgarh disturbance, a new one was now issued.

A. D. 1765-66. 505. The watan of Mullana of Kasbe Poona belonged to Husen and Taj Mahamed wallad Ibraham. A fresh Sanad regarding the watan was given to them.

A. D. 1766-67. 506. The adoption of a son by the widow of Mitekhan Kazi of pargana Chalisgaum was sanctioned and he was permitted to succeed to the Kazi watan of the pargana.

इनाम वगैरे सुदामत भोगवटा चालत आला असेल त्याप्रमाणें घेऊन वतनाची चाकरी करणें म्हणोन. पत्रें.

२ फडणिसी.
१ नांवाचें.
१ मोकदम देहेहाय परगणे चाळीसगांव.
२

२ चिटणिसी.
१ देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी.
१ देशमुख व देशपांडे.
२

४

रसानगीयादी.

इ० स० १७६८।६९. तिसा सितैन मया व अलफ. मोहरम २१.

५०७ (५६६). गिरमाबाई कोम कृष्णाजी हरि देशपांडे सरकार जुन्नर हिनें हुजूर विदित केलें कीं, आपल्या वंशी चार पांच पुरूष पावेतो वंशवृद्धि होत नाहीं. याजमुळें दत्तपुत्र घेऊन दसकतांत बायकोचे व जो दत्तपुत्र घेतला त्याचें नांव घालून कामकाज चालत आलें आहे, त्यास आपला भ्रतार शांत झाल्यावर भगवंतराव यांस आपण पुत्र घेतले ते वेळेस त्यांनीं आपल्यास पत्र लेहून दिलें आहे कीं, आपण कामकाज दरबारीं व खाजगी व गुमास्तयाची तगीरी बहाली व वतनाची खरीदी फरोक्त तुमच्या इतल्यानें करीत जाऊं व तुमच्या आज्ञेंत राहूं. अमर्यादा करणार नाहीं. व हरएक कामकाज तुमच्या इतल्याशिवाय करणार नाहीं. दसकतांत तुमचें व आपलें नांव चालवूं येणेंप्रमाणें लेहून दिलें आहे. तेवेळेस आपली सासू मातुश्री सखुबाई होती याजमुळें सदरहू लेहून दिल्याप्रमाणें कामकाज व दसकतांत नांव आपलें सासूचें व भगवंतराव आपलें घालीत होते. आपली सासू मेल्यास पंधरा वर्षें जाहलीं तेव्हांपासून भगवंतराव यानें कांहीं ममतेंत व कांहीं रेटाईनें करून आपलें नांव दसकतांत लिहित होते, त्यांस साळगुदस्त भगवंतराव शांत जाहले त्यांचा मूल अमृतराव पांचा साता-

---

507. Girmabai, widow of Krishnaji Hari Deshpande, represented that there had been no lineal descendant in her family for 4 or
A. D. 1768-69. 5 generations and that it was therefore usual in the family for the widow to adopt a son and to have the watan continued in her and her adopted son's name, that her adopted son had agreed to enter her name along with his, but that he had failed to do so. She further represented that her adopted son was dead and that his agents objected to obey her authority. Orders were therefore issued to enter the watan in her name, jointly with that of a minor son left by her adopted son and to carry on the duties with her consent. A Nazar of Rs. 2500 was levied.

वर्षांचा आहे. त्यास जागाजागा गुमास्ते आहेत ते वडिलांचे चालीप्रमाणें आपल्यासी रुजू होत नाहींत. ते आपल्यासी रुजू होऊन दसकतांत नांव चालावें, आपल्या इत्तल्यानें आपले वडील परंपरागत चालले आहेत, त्याप्रमाणें चालेसें करावें. म्हणोन, त्याजवरून मनास आणितां देशपांडे मजकूर यांची चार पांच पुरूष वंशवृद्धि नाहीं. याजकरितां दत्तपुत्र घेतात. त्याचे नांव व बायकोचे नांव दसकतांत घालून दसकत करतात याप्रमाणें चाल चालत आली आहे, व भगवंतराव यांस यांनीं दत्तपुत्र घेतलें. ते समयीं त्यांनीं यांस पुरातन चालीप्रमाणें तुमच्या आज्ञेंत राहून वर्तणूक करूं व दसकतांत नांव गिरमाबाईचें व आपलें लिहीत जाऊं, वतनाची वगैरे खरीदी फरोक्त तुमच्याविचाराखेरीज करणार नाहीं. याप्रमाणें पत्र लिहून दिलें तें पाहून हें पत्र तुम्हांस सादर केलें असें, तरी परंपरागत यांची चाल चालत आली आहे, त्याप्रमाणें दसकतांत, गिरमाबाई व अमृतराव भगवंतरावाचे पुत्र याचें नांव घालून गुमास्ते दसकत करीत व यांचे रजातलबेंत राहून वतनाचा कारभार सालाचेसालास यांस हिशेब समजवित व गुमास्ते यांची तगीर बहाली गिरमाबाईच्या इतल्याखेरीज न करीत तें करणें. पहिले गुमास्ते कोण्ही यांसी तगरी बहाली करिता नवदीगर करतील तरी यांचे साहित्य करून त्यांस ताकीद करीत जाणें. या पत्राची प्रत लेहून घेऊन हें पत्र परतोन गिरमाबाईजवळ देणें, देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी सरकार जुन्नर यांस चिटणीसी पत्र १.

सदरहू वतनासंबंधे सरकारची नजर एकसाल रुपये २९०० अडीच हजार करार केले आहेत, त्यांच्या वसूलास सदाशिव त्रिंबक कारकून शिलेदार पाठविले आहेत.

५०८ (६९०). गणशेट वल्लद महादशेट व बाबशेट वल्लद बापूशेट दांडेकर सोनार यांनीं हुजूर कसबे पुणें येथील मुक्कामीं येऊन अर्ज केला कीं, तर्फ केळसी सुभा दाभोळ तालुके सुवर्णदुर्ग येथें पुरातन वतनदार पोतदार नाहीं. आपण तर्फ मजकुरीं बहुत दिवस राहतो कुटुंबी आहों यास्तव साहेबीं मेहेरबान होऊन पोतदारीचें वतन नूतन करार करून दिलें पाहिजे. ह्मणोन. त्याजवरून मनास आणितां तर्फ मजकुरीं वतनी पोतदार नाहीं. हे बहुत दिवस तेथें राहतात. कुटुंबी आहेत हें जाणोन यांजवरी कृपाळू होऊन तर्फ मजकूरचे पोतदारीचें वतन यांस नूतन करार करून देऊन वतनसंबंधे हक्क वगैरे करार. कलमें.

इ० स० १७७०।७१. इहिदे सबैन मया व अलफ. सफर १९.

---

508. The watan of potdar in tarf Kelshi of Subha Dabhol was granted to Ganesh Shet wallad Mahad Shet and Baba Shet wallad Bapu Shet Dandekar goldsmiths. They were in virtue of the office exempted from house-tax and town duties and were entitled to levy 3/4th of a Rukka for every rupee of the revenue.

A. D. 1770-71.

पोतदारीचा हक्क दर रुपयास रुक्के ८।।।. पाऊणरुक्का करार केला असे. कलम १.

घरपट्टी व वण म्हैस एक व मोहतर्फा येणेंप्रमाणें पाळ करार करून दिला असे. कलम १.

सदरहूशिवाय तर्फ मजकुरीं पोतदारीचा हक्क सुदामत असेल त्याप्रमाणें करार. कलम १.

एकूण तीन कलमें करार करून देऊन हे सनद सादर केली असे, तरी तर्फ मजकूरचे पोतदारीचें कामकाज यांचें होते घेऊन यांस व यांचे पिढीदरपिढी वतन चालवणें दरसाल ताजेसनदेचा ऊजूर न करणें या सनदेची नकल लिहून घेऊन हे सनद सोनार मजकूर यांजवळ भोगवटीयास परतोन देणें म्हणोन सनदा. पत्रें.

२ सनदा.
१ नांवाची.
१ मुकादम देहेहाय तर्फ मजकूर.

२ चिटणिसी पत्रें.
१ देशमुख देशपांडे तर्फ मजकुर.
१ देशाधिकारी लेखक वर्तमानभावी.

१ रामाजी महादेव मामलेदार यांस अलाहिदा सनदाप्रमाणें चालवणें म्हणोन.

—
५

रसानगीयादी.

सदरहू वतन करार करून देऊन शंभर रुपये नजर सरकारांत घेतली असे.

इ० स० १७७२।७३
सलास सबैन मया व अलफ.
जिल्काद २४.

५०९ (७४८) अमृतराव भगवंत देशपांडे सरकार जुन्नर यांनीं हुजूर विदित केलें कीं, आपली आजी गिरमाबाई इनें सन समान सितैनांत सरकारांत निवेदन केलें कीं आपले वंशीं चार पांच पुरुष वंशवृद्धि होत नाहीं याजकरितां दत्तक पुत्र घेऊन दसकतांत बायकोचे व जो दत्तपुत्र घेतला त्याचें नांव घालून कामकाज चालत आलें असतां भगवंतराव माझें नांव चालवीत नव्हते, त्यास भगवंतराव मृत्यु पावले. त्याचा पुत्र अमृतराव आहे, त्यास व जागां जागां गुमास्ते आहेत त्यास वडिलांचे चालीप्रमाणें आपल्यासी रुजू होऊन दसखतांत, नांव चालवावयासी आज्ञा जाहली पाहिजे, येविशीं सरकार मजकूरचे कमाविसदारांस पत्रें देऊन आपलें व अमृतराव यांचें नांव दसखतांस चालतें करावें; त्याजवरून

---

509. Previously orders had been issued for the continuance of the Deshpande watan of Junnar in the name of Girmabai and her adopted grand-son Amrutrao. The latter having represented the inconvenience of this arrangement, it was decided by the Panch that the watan should be continued in the lady's name during her life as this had been sanctioned previously btn that the management of the watan should vest in Amrutrao and that in future no watan should be continued in the name of a female.

A. D. 1772-73,

सरकारांतून पत्रें गिरमाबाईस सदरहूप्रमाणें दिलीं त्याजवर तीनें वडिलांचे वेळचे माहितगार गुमास्ते होते ते दूर करून नवे गुमास्ते गैरमाहित ठेविले. त्यांजकडून वतनाचा बंदोबस्त होत नाहीं. कानू कायदा बुडाला व गिरमाबाईनें आपलें व माझें नांव कतब्यावर व वतनी कागदांवर आपले हातें घालून दसकतें करून कर्ज घेऊन मनस्वी वर्तणूक करितात. आपल्यास दखलगिरी देत नाहीं. ऐशास हिचें नांव चालल्यास पुढें दुसऱ्या बायका आमची सापत्न माता वगैरे आहेत. त्या आपलें नांव चालवावयासी बखेडा करतील यास्तव सोहबीं कृपाळू होऊन वृत्तीचा बंदोबस्त होय, तें केलें पाहिजे. यावरून पंचाईतमतें मनास आणतां अमृतराव भगवंत यांनीं वतनाचा बंदोबस्त राखून गुमास्ते नवे ठेवणें अथवा दूर करणें तें यांनीं करावें. गिरमाबाईचे आग्रहावरून पेशजी सरकारचीं पत्रें मामलेदारांस हिचें नांव दसकतांत चालवणेंविषयीं दिलीं याजकरितां तिचें नांव ती जिवंत आहे तोंपर्यंत दसकतांत चालवावें. पुढें बायकांचीं नांवें दसकतांत चालवूं नये येणेंप्रमाणें सिद्धांत होऊन हें आज्ञापत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी गिरमाबाईचें स्वरूपाप्रमाणें तिचे अन्नवस्त्राची बेगमी करून देत जाणें आणि वतनाचा बंदोबस्त तुम्ही राखून हक्कवेरा वगैरे जें वतनसंबंधें सुदामत चालत आलें असेल त्याप्रमाणें घेत जाणें. दरम्यान गिरमाबाईस कारभार करण्याचा संबंध नाहीं. व गुमास्त्याची तहगिरी व बहाली करावयास प्रयोजन नाहीं. सदरहूसंबंधें तुम्हांकडे नजर रुपये ४०० चारशें करार केले ते सरकारांत जमा असत म्हणोन अमृतराव देशपांडे यांचे नांवें. पत्र १.

सदरहूअन्वयें कमावीसदारांस वगैरे पत्रें. १०.

८ सरकार जुन्नर येथील कमावीसदारांस पत्रें कीं, अमृतराव भगवंत देशपांडे यांचे हातून देशपांडेपणाचें कामकाज घेऊन हक्कवेरा वगैरे जें वतनसंबंधें असेल तें यांजकडे सुरळीत चालविणें म्हणोन.

१ रघुनाथ हरि यांस प्रांत जुन्नराविशीं.
१ उद्धो वीरेश्वर यांसी तालुके शिवनेरीविशीं.
१ निळकंठराव रामचंद्र यांस तालुके चासेविशीं.
१ बाबूराव माणकेश्वर यांस परगणे कर्डे रांजणगांवाविशीं.
१ नारो बाबाजी यांस परगणे पारनेराविशीं.
१ रामचंद्र शामराज दिमत आनंदराव भिकाजी यांस परगणे कर्डे येथील फुटगांवाविशीं.
१ रामचंद्र शिवाजी यांस कसबे ओतूरवगैरे गांवांविशीं.
१ विसाजी कृष्ण यांजकडे परगणे कर्डे रांजणगांव वगैरे गांव आहेत त्यांविशीं.

८

१ गिरमाबाईचे नांवें पत्र कीं, सरकार मजकुरचे देशपांडेपणाचें कामकाज अमृतराव करतील व गुमास्तयांची

तहगिरी व बहाली करणें तें हेच करतील. दरम्यान तुह्मांस कामकाज करावयासी व गुमास्तयांची तहगिरी व बहाली करावयास तुह्मांस संबंध नाहीं, तुमचे अन्नवस्त्राचे खर्चाची बेगमी करतील व तुम्ही जिवंत आहां तोंपर्यंत तुमचें नांव दसकतांत चालवतील ह्मणून.

१ कारकून. ——————— असामी.

१ बाबाजी अनंत.
१ रणसोड गोपाळ.
१ गणेश अनंत सभारंजक.
१ वेंकाजी कृष्ण.
१ गणेश अनंत.
१ जनार्दन निळकंठ.
१ महादाजी त्रिंबक.
१ नामाजी जयराम.
१ हरि नारायण.

९

नऊ असामीस पत्रें कीं, गुमास्त्याची तहगिरी बहाली करणें तें अमृतराव करतील यांचे सांगितल्याशिवाय दरम्यान तुह्मांस कामकाजाची दखलगिरी करावयास प्रयोजन नसे ह्मणोन. १

१०

११

एकूण अकरा पत्रें चिटणिसी दिलीं असत, देशपांडे मजकूर यांचे नांवाचे पत्राची नक्कल दप्तरीं करून ठेविली असे.

(६). इतर मुलकी नोकर.

५१० (३६). हरि दामोदर यांचे नांवें सनद कीं, किल्ले चाकण कृष्णराव बापूजी पारसनीस यांचे तसलमातीस मुलें माणसें ठेवण्यासी दिला असे. तरी किल्ला मशारनिल्हेचे हवाली करून पावलियाचें कबज घेणें. पेशजीची नेमणूक किल्लयाची आहे, त्याप्रमाणें तुह्मी देणें. पुढें पेस्तर बेहेडा होईल तेव्हां नेमणूक होईल ह्मणोन. सनद १.

इ० स० १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. साबान ७.

५११ (६०). राणोजी बलकवडे यांचे नांवें सनद कीं, राजश्री आबाजी महादेव कारकून सरकार याचें घर कसबें नागोठणें येथें आहे. त्यास त्याप्रांतीं शामलाचा वगैरे दंगा फार आहे. त्यास मशार निल्हेचे घरीं चौकी पहारे यांस नेहमीं तुम्हांकडून शिपाई असामी आठ

इ० स० १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. रमजान ८.

510. The fort of Chakan was given to Krishnarao Bapuji Parasnis for the A. D. 1762-63. residence of his family.

511. Abaji Mahadev, a karkun in the service of Government, had his house

देविले असत. तरी सदरहू आठ शिपाई नेहमीं रोजमरा अडीशेरीची बेगमी करून मशारनिल्हेचे बंधु राजश्री सदाशिव महादेव यांजकडे पाठवून देणें म्हणोन. सनद १.

५१२ (६८). माधवराव व चत्रसिंग व राणोजी कदम यांचे नांवें पत्रें कीं, तुमचे सरदारीची फडनिशी आबाजी अनंत यांस सांगितली होती. त्यास तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब यांनीं अहिरवाडियांत ठाणीं हवाली करून तुमचे पथक ठेविलें होतें. त्यास इकडून पाणीपताहून (पाणीपतास?)तीर्थस्वरूपाकडे खजीना रवाना केला,त्याजबरोबर तुमचे पथकाची नेमणूक केली.ऐशियास खेचीवाड्यांत खेच्याची व तुमचे पथकाची लढाई जाहली तेव्हां मशारनिल्हेनीं शर्त करून सरकारचा खजिना वांचविला. शेवटीं आपण स्वामीकार्यास आले. याजकरितां त्यांचे मागें त्यांचे मुलांमाणसांचें चालवणें जरूर. जाणून त्यांचे भाऊ राजश्री जनार्दन अनंत यांजकडे तुमची फडनिशी पूर्ववत्प्रमाणें करार करून देऊन हें पत्र तुम्हांस सादर केलें असें, तरी यांचे हातून लिहिण्याचें काम सरंजामाचे व फौजेचे कुल घेत जाणें. व सन इसन्नें व सन सलास दुसाला वेतन यांस दिलें नाहीं तें पावतें करणें, व पेस्तरसालापासून वेतनाचे ऐवजीं परगणे नंदूरबार व सुलतानपूर येथें तुमचा सरंजाम आहे त्यापैकीं वेतनांत ५०० पांचशें रुपयांचे गांव यांस लावून देणें हरएकविशीं मशारनिल्हेचें साहित्य करणें म्हणोन त्रिवर्गास.

इ० स० १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. रमजान २९.

पत्रें ३.

येविशीं साहित्यपत्रें कीं मशारनिल्हेचा ऐवज वेतनाचा दुसाला राहिला आहे तो परगणे सुलतानपूर येथील मोकासबाबीचे ऐवजी जनार्दन अनंत यांस पावतां करणें म्हणोन.

२.

१ मल्हारजी होळकर यांस.
१ बाबाजी प्रल्हाद यांस.
२ ५

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

५१३ (१७५) कारकून निसबत दफ्तर यांचे तांदुळ खंडी एकूण बैलसर खरेदी

---

in Nagotane. There being serious disturbances by the Siddhi in that province. Ranoji Balkawde was directed to depute 8 sepoys to guard Abaji's house.

A. D. 1762-63.

512. Abaji Anant held the office of Fadnis to Sirdar Madhavrao, Chatarsing and Ranoji Kadam who with their detachments were located in Ahirwada. These detachments were escorting treasure sent by the Peshwa to Sadashiv Bhau at Panipat. On the way in Khechiwada, they were attacked by the khechis and a fight ensued in which Abaji Anant with the utmost bravery saved the Government treasure, but lost his life in the fight. The office of fadnis was therefore conferred on his brother, Janardan Anant, and its salary was fixed at Rs. 500 per annum. The Sirdars were directed to assign to him villages yielding that revenue from their saranjam in parganas Nandurbar and Sultanpur.

A. D. 1762-63.

513. This is a list of karkuns in the Daftar at Poona, who were allowed to bring rice from Konkan for their use, free of octroi.

A. D. 1763-64.

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. रजब.

फिरंगाण कोंकणातून हरएक जागांहून खरेदी करून एक खेप पुणियास आणतील त्यास आणूं देणें म्हणोन सालगुदस्तांप्रमाणें सालमजकूर जकातीविशीं— दस्तकें.

	तांदुळ खंडी	बैलसर सुमार.
बाळाजी हरि दफ्तरदार १.	५	५०
गोपाळ महादेव दफ्तरदार १.	५	५०
गोविंद बाळा गुरूजी १.	९	५०
नारो गंगाधर २.	१०	१००
५० प्रत दस्तक ५.		
५० प्रत दस्तक ५.		
१०० १०		
बापूजी बल्लाळ फडके ३.	१८	१८०
९० प्रत ५.		
३० प्रत मावळाहून ३.		
१०० प्रत देशाहून १०.		
१८० १८		
कृष्णाजी महादेव १.	१०	१००
बाबूराव नारायण १.	२	२०
गोपाळ अनंत अभ्यंकर १.	२॥	२५
बाळाजी महादेव काळे १.	१	१०
रामचंद्र शंकर १.	१	१०
भिकाजी गोविंद १.	१	१०
चिमणाजी महादेव १.	१	१०
गोविंदराव आपटे १.	२	२०
बाबुराव वामन यास होतें. तें सालमजकुरीं मशारनिल्हेचे नावें करार करून.		
रामचंद्र हरि देवधर १.	३	३०
कृष्णाजी हरि देसाई १.	१	१०
गोपाळ कृष्ण बिवलकर १.	२	२०
अंताजी शिवदेव परांजपे १.	१	१०
दिनकर नारायण करंदीकर १.	१	१०
रामाजी बल्लाळ जोशी १.	१	१०
सदाशिव रंगनाथ १.	१	१०
बाबुराव जनार्दन गोडबोले १.	१	१०

नारो कृष्ण ओक १.	१	१०
हरि बाबाजी करंदीकर १.	२॥	२५
बाळाजी गणेश कोल्हटकर १.	१	१०
सदाशिव अनंत अभ्यंकर १.	१	१०
धोंडो बल्लाळ लेले १.	१	१०
खंडोराम बापट १.	१	१०
जगन्नाथ बल्लाळ गानू १.	१	१०
बाबुराव बल्लाळ फडके १.	१	१०
त्रिंबक महादेव जोशी १.	१	१०
दादो बल्लाळ आचवल १.	१	१०
विसाजी नारायण लिमये १.	१	१०
महादाजी विष्णु गपचुप १.	१॥	१५
कृष्णाजी महादेव दाभोळकर १.	१॥	१५
लक्ष्मण केशव वैद्य १.	२	२०
रामचंद्र हरि ढवळे १.	३	३०
मल्हारराम बापट १.	३	३०
२० बरहुकूम गुदस्त २.		
१० जाजती सालमजकूर करार १.		
३० ३.		
नारो महादेव गोडबोले १.	२	२०
आबाजी महादेव लवाटे १.	१॥	१५
याचें दस्तक लक्ष्मण केशव ठाकूर यांस करार.		
महादाजी नारायण जोशी १.	१	१०
विसाजी गणेश दातार १.	१	१०
सदाशिव महादेव शेवडे १.	१	१०
बाबाजी अनंत आपटे १.	१	१०
नारो अनंत परचुरे १.	२॥	२५
महादाजी केशब ढवळे १-	१	१०
माणको चिंतामण १.	२	२०
बाळाजीराम लेले १.	२	२०
जगन्नाथ निळकंठ बर्वे १.	१	१०
सदाशिव रघुनाथ खाडिलकर १.	१॥	१५
बाजी गोविंद जोशी १.	२	२०
भास्कर बल्लाळ जोशी १.	१	१०

महादाजी नारायण परचुरे १.	१॥	१५
गोविंद महादेव जोशी १.	१	१०
महादाजी नारायण अभ्यंकर १.	१	१०
बाबाजी महादेव १.	१॥	१५
हरि बल्लाळ फडके १.	३	३०
खंडो कृष्ण साठे १.	१	१०
पेशजी रामचंद्र आपाजी नातु यांस होतें तें हल्लीं दूर करून सालमजकुरीं मशारनिल्हेचे नांवें करार १.		
नागो व्यंकटेश १.	१	१०
सदाशिव बापूजी जोगळेकर १.	१	१०
रंगो नारायण करमरकर १.	१	१०
बाजी रघुनाथ भावे १.	१	१०
गोविंद हरि देवधर १.	१	१०
रामचंद्र अनंत परचुरे १.	१	१०
नारो कृष्ण भातखंडे १.	-॥-	५
कृष्णाजी तुकदेव गोडबोले १.	२	२०
गंगाधर बाबाजी जोशी १.	२	२०
बाबुराव केशव १.	३	३०
बाळाजी नारायण शेवडे नारो महादेव शेवडे यांचे पुत्र १.	१॥	१५
लक्ष्मण नारायण सिधये १.	३	३०
पांडुरंग नारायण ठकार १.	२	२०
सदाशिव नारायण यांचे बंधु रुद्राजी नारायण निसबत जामदारखाना जमा १.	२	२०
बाबुराव अनंत निसबत जिन्नस रवाना १.	२	२०
केसो विश्वनाथ टकला १.	२	२०
आपाजी चिमणाजी १.	२	२०
रामाजी नारायण आगाशे १.	२	२०
गणेश विश्वनाथ बेहेरे १.	२	२०
विनायक मोरेश्वर १.	२॥-	२५
त्रिंबक शंकर १.	१॥-	१५

गणेश हरि १.		७	७०
भास्कर विश्वनाथ सोहनी		५॥	५५
असामी ८२	दस्तक १.	१७६	१७६०
	८५		

छ. ३० रजब ——————————— दस्तकें.

८३	ऐन कोंकणचीं	१६३	११३०
१	मावळचे खंडी	३ एकूण	३०
१	देशचे खंडी	१० एकूण	१००
८५		१७६	१७६०

५१४ (१८६). बाजी जगन्नाथ यांस तर्फ नांदगांव मुरूड प्रांत राजपुरी येथील हवाला पेशजीपासून होता, त्यास हवाल्याचे असामीवरी रसद रुपये १०० एकशें घातले, ते मशारनिल्हेस द्यावयासि ताकत नाहीं. सबब हवाला दूर केला होता. ऐशास हल्ली शंभर रुपयांचा विषय थोडका मशारनिल्हे गरीब, सबब पूर्ववत् तर्फ मजकूरचा हवाला यांजकडे करार केला असे तरी हवाल्याचें कामकाज यांचें हातें घेऊन पेशजीचे नेमणुकेप्रमाणें वेतन पावतीत जाणें. रसदेचा तगादा न लावणें, हवाल्याचें कामकाज यांचे हातें घेणें म्हणोन, गोविंदराव व चिमणाजी मानकर यांस. सनद १.

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. सावान १८.

रसानगीयादी.

५१५ (१९९). रामाजी महादेव प्रांत कल्याण भिवंडी यांस सनद कीं, तर्फ बोरटी प्रांत मजकूर येथील फडनिशी राजश्री त्रिंबक रुद्र वर्तक यांस पेशजीपासून आहे, त्यास सालमजकुरीं तुम्ही साडेतीनशें रुपये रसद घेऊन दुसऱ्यास फडनिशी सांगितली आहे म्हणोन मशारनिल्हेनीं हुजूर विदित केलें, त्यास तर्फ मजकूर येथील फडनिशी मशारनिल्हेकडे बहुत दिवस आहे, सबब साडेतीनशें रुपये रसदेपैकीं निमे पावणेदोनशें रुपये रसद मशारनिल्हेकडे करार करून फडनिसी यांजकडे पूर्ववतप्रमाणें करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे. तरी पावणेदोनशें रुपये रसदेचा वसूल यांजपासून घेऊन फडनिशीचें कामकाज याचे हातें घेऊन पेशजीचे नेमणुकीप्रमाणें पावीत जाणें म्हणोन. सनद १.

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. सवाल १.

रसानगी यादी.

---

514. Balaji Jagannath, a havaldar of tarf Nandgaum Murud in prant Rajpuri, was unable to advance a sum of Rs. 100 to Government as directed: he was therefore removed from his appointment. Having regard to his poor circumstances, however the office was afterwards ordered to be continued to him.

A. D. 1763 64.

515. Ramaji Mahadeo, officer of prant Kalyan Bhivandi, removed Trimbak Rudra Wartak from the post of Fadnis, which he had held for a long time, and appointed another man in his place taking from him an advance of Rs. 350 for Govern-

A. D. 1763-64.

दादासाहेबांच्या रोजकीर्दीपैकीं.

५१६ (२२७). कृष्णाजी गंगाधर यांसी पेशजीपासून शहर अमदाबाद येथील महाल, शहर व कोट यांची वजनकशी सांगोन वेतन रुपये १०० शंभर करार केले आहेत. त्याप्रमाणें वजनकशीची सेवा मशारनिल्हे करीत होते म्हणोन हुजूर विदित जाहलें, त्याजवरून हें पत्र तुह्मांस लिहिलें असें, तरी पेशजी आपाजी गणेश यांचे अमलांत असामी चालत असेल त्याप्रमाणें व सरकारचे सनदेप्रमाणें वेतन पावत असेल त्याप्रमाणें मनास आणून सुदामत चालत आल्याप्रमाणें चालवणें म्हणोन, गोपाळराव गणेश यांचे नांवें चिठणिसी.

इ० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. मोहरम ५.

पत्र १.

५१७-(२५५) मामले तळें प्रांत राजपुरी निसबत गोविंदराव व चिमाजी माणकर येथील अमीनी पेशजीचे अमीनाकडून दूर करून साल मजकुरापासून राजश्री गोविंद बल्लाळ यांस अमीनी सांगोन पाठविले असत. तरी यांजपासून मामलेमजकूर येथील अमीनीचा कुलकारभार घेतजाणें, अमीनीसंबंधी कलमें.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. रबिलाखर २०.

मशार निल्हेस अमीनीची तैनांत सालीना रुपये ५०० पांचशें करार केले असेत. मामले मजकूरचे ऐवजी पावीत जाणें कलम १. तालुके रत्नागिरी येथील अमीनी पेशजी दादोकृष्ण गोडबोले यांस सांगितली होती, त्या प्रमाणें मशारनिल्हेनी अमीनीचें कामकाज

---

ment. It was ordered that as Trimbak Rudra had held the office for a long time, he should be continued in it, on his advancing Rs. 175 only.

516. Krishnaji Gangadhar who held the office of inspector of weights in Ahmadabad was allowed to continue in his appointment. The remuneration of the office was Rs. 100.

A. D. 1764-65.

517. The office of Amin of Mamle Tale in prant Rajpuri was given to Govind Ballal, and the following orders were issued:—

A. D. 1764-65.

(1) Govind Ballal should be paid Rs. 500 annually as his salary;

(2) he should be supplied with oil for his torch as usual;

(3) he should pay an advance of Rs. 20,000 to Government at the usual rate of interest;

(4) should any other person offer a larger advance, the sum payable by Govind should be increased accordingly;

(5) he should, without oppressing the ryots, manage to realize for Government Rs. 5000 per annum; if this was not done, the amount should be debited against the advance paid by him to Government;

(6) the old Amin should be paid his salary as before;

(7) the servants at the Subha and at the fort should be inspected and such of them as were found unfit for service should be removed, their places being filled by competent men: should his duties be carried on honestly and diligently Govind Ballal would not be deprived of his office;

दिवटीस तेल शिरस्तेप्रमाणें द्यावयाचा करार असे; देत जाणें. कलम १.

अमीनीसंबंधें तूर्त रसद ध्यावयाचा करार. रुपये.

१५००० कित्ता.
५००० जाजती.

२००००

एकूण वीस हजार रुपये करार करून पुण्यास भरणा करावा येणेंप्रमाणें करार केला असे. रसदेस व्याज शिरस्तेप्रमाणें करार केलें असे. वरकड महालकरी यांची जशी रसद उगवेल त्याप्रमाणें मशारनिल्हेचा ऐवज उगवेल. येणेंप्रमाणें करार. कलम १.

सुभेकरी व किल्लेकरी लोक यांची हजिरी घेऊन कदीम नसल्यास, गैरकामी सरकार उपयोगीं नसल्यास दूर करावे, त्यांचे ऐवजीं माणूस चांगले सरकार चाकरीस उपयोगीं पडेसे ठेवावे, आणि उत्तम प्रकारें बंदोबस्त राखावा. इमानें इतबारें चौकशीनें वर्तल्यास अमीनी दूर होणार नाहीं. येणेंप्रमाणें करार. कलम १.

महालचे मजमदार व फडनीस व हवालदार यांजपासून जीवनमाफिक रसद ध्यावी. येणेंप्रमाणें करार. कलम १.

करीत जाणें. कलम १.

कदाचित् यांपेक्षां दुसरा कोणी (जासती)रसद देईल, त्याप्रमाणें यांजपासून घेऊन अमीनी यांजकडे बहालच राखावी. कलम १.

मशारनिल्हेनीं रयतेवर जुलूमजाजती न करितां दरसाल पांच हजार रुपये सरकारांत साधीत जावे याप्रमाणें करार केला असे. त्याप्रमाणें साधावे. कदाचित् न साधिले तर वीस हजार रुपये रसद करार केली आहे, त्यांत रदकर्ज सदरहू पांचहजार रुपये लिहीत जावे येणेंप्रमाणें. कलम १.

जुना अमीन मामलेमजकुरीं आहे. त्याचें वेतन पेशजीचे करार असेल त्याप्रमाणें हल्लीं वेतन मात्र देत जावें. येणेंप्रमाणें कलम १.

किल्लेकरी सबनीस व फडनीस व कारखाननीस व कारखाननिसीकडील फडनीस यांतून ज्यास सामर्थ्य असेल आणि जो रसद देईल त्याजपासून ध्यावी, जुलुमजाजती कोणावर करूं नये. येणेंप्रमाणें कलम १.

येणेंप्रमाणें दहा कलमें करार करून मशारनिल्हेस तुम्हांकडे पाठविले आहेत. लिहिल्याप्रमाणें यांजकडे अमीनी सांगोन सर्व बंदोबस्त करून देणें. आणि रसदेचा भरणा यांजकडून पुण्यास लवकर करवणें म्हणून विसाजी केशव यास. सदन १.

रसानगीयादी.

---

the advance to be taken from the muzamdar, fadnis, and havaldar of the Mahal, should be moderate;

(8) as regards Sabnis, Fadnis, Karkhanis and Karkhanis' Fadnis, serving at the fort, advances should be taken only from those who might be willing and able to pay: No compulsion should be used in the matter.

दादासाहेबांच्या रोजकीर्दीपैकीं.

५१८ (२६२). बाळाजी महादेव मांडोगणे यांस महालानिहायचा बंदोबस्त सांगितला. मशारनिल्हे गांवगन्ना महलानिहाय येथील सरकार अमलाची मोकाशी व दुमाले व सरंजामी व इनामदार व शेतसनेद कुलजमेचा व शिबंदीचा वगैरे बंदोबस्त मनास आणून करून देतील. याप्रमाणें योग्यायोग्य मजकूर लेहून येविशीं पत्रें.

इ० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. रबिलाखर १५.

प्रांत कऱ्हड वगैरे महाल खटाव देखील तालुके येसाजी कुसाजी भोसले.

१ प्रतिनिधी
१ सदाशिव रघुनाथ.
१ रघुनाथ बावा मंत्री.
१ परगणे खटाव जप्ती देशमुखी.
१ खेडराव नागनाथ.
१ भगवंतराव त्रिंबक.
१ जमीदार.
१ गोपाळजी भोसले.
१ शिवाजी थोरात.
१ धारराव पाटणकर.
१ दुमाले.

११

व्यंकाजी माणकेश्वर कारभारी सातारा यांस पत्र कीं, मशारनिल्हेस बंदोबस्ताविशीं सरकारांतून आज्ञा करून पाठविले आहे. सरकार कामाविशी तुम्हांस लिहितील त्याप्रमाणें स्वार प्यादे देऊन साहित्य करीत जाणें म्हणून पत्र.

प्रांत जुन्नर.

१ हरि दामोदर सुभेदार.
१ दुमाले.
१ जमीदार.

३

प्रांत मिरज.

१ गोविंद हरि मशारनिल्हेचा सरंजाम खेरीज

प्रांत वाई वगैरे महाल तालुके शामराव अंबाजी.

१ शामराव अंबाजी.
१ आनंदराव भिकाजी रास्ते हवेली संमत.
१ दुमाले.
१ किल्ले चंदनगड.
१ किल्ले वंदनगड.
१ किल्ले नांदगिरी.
१ किल्ले वैराटगड.
१ किल्ले परळी.
१ किल्ले प्रतापगड.
६ जमीदार.
१ प्रांत वाई.
१ तर्फ कुडाळ.
१ तर्फ मेढें.
१ तर्फ वंदन.
१ तर्फ सातारा.
१ + + +

६

१५

प्रांत कडेवळीत.

१ महाराव निंबाळकर.
१ बाबूराव माणकेश्वर.
१ मोरो नारायण.
१ दुमाले.
१ जमीदार.

518. Balaji Ganesh Mandogane was entrusted with the duty of inquiring into and settling the various alienations (Dumala, Saranjam, Inam, Shet--Sanadi, Sibandi establishment etc.) in the provinces of Karad, Wai, Junnar etc.

A. D. 1764-65.

करून दुमाल्याची चौकशी.
१ दुमाले.
१ जमीदार.
३

१ मानाजी शिंदे
१ गणेश विठ्ठल तालुके अमदानगर.
७

तालुके चास.

१ माधवराव सदाशिव कमावीसदार.
१ जमीदार.
१ दुमाले.
३

प्रांत सुपें.

१ आनंदराव त्रिंबक.
१ दुमाले.
१ जमीदार.
३

एकूण	पत्रें.
बापूजी आनंदराव कमावीसदार	४६
कसबे पुणें.	१
	४७

५१९ (२६५). गोपाळराव गणेश यांचे नांवें पत्र कीं, मोरो गोपाळ गोळे यांसी शहर अमदाबाद प्रांत गुजराथ येथील पेशजीपासून मजमू सरकारांतून आहे. त्यास यांचे हातें मुलकी कामकाज व शिबंदीचें कामकाज घेऊं म्हणतां, पथक पागा याचें कामकाज तुम्ही आपलें सरदारीचे जुने मजमदाराकडून घेऊं म्हणतां, म्हणून विदित जाहलें. त्यास पथक व सुभा निराळा आहे ऐसें नाहीं, तरी सरकारी पागा खेरीज करून वरकड झाडून शिबंदी पायदळ व घोडेस्वार व नालीकारभार(?) यांचें कामकाज मजमूचें मशारनिल्हेच्या हातें घेत जाणें. येविशीं फिरोन बोभाट येऊं न देणें म्हणोन. पत्र १.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. रबिलाखर २५.

५२० (२७१). मोराजी शिंदे नामजाद तालुके रत्नागिरी यांस सनद कीं, तालुके मजकूर येथील जमेनिशी राजश्री धोंडो रामचंद्र यांजकडे आहे त्याविशीं कलमें येणेंप्रमाणें.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. जमादिलावल १२.

---

519. Moro Gopal Gole held the office of Majmu of Ahmedabad city. The officer of the Subha took from him only the revenue and the sibandi business; the work connected with the cavalry being taken from a previous Majamdar. He was told to make no such division and to take the whole work from Moro Gopal.

A. D. 1764-65.

520. A Sanad to Moraji Sinde, officer of taluka Ratnagiri. The office of Jamenishi is entrusted to Balkrishna Hari and the following insrtuctions are issued in regard to his duties;—

A. D. 1764-65.

१ मुलकी जमाबंदी करणें ती जिरायत व बागाईत वगैरे यांचे पाहणीखर्डे पाहणदारांनीं आणून जमेनीसास समजावावें, जमेनिसानें कमजाजती चौकशी करून जमा ठरावून कारभारी यांस समजाऊन विल्हे करीत जावी. कलम १.

१ मुलकी हिशेब घेणें ते जमेनिसानें घेऊन हिशेबाची तोडमोड वसूलबाकीची करून दप्तरीं विल्हेस लावावे. कलम १.

१ गांवगन्ना चढ घालणें व गांवची नातवानी पाहून सूट देऊन इस्तावा बांधून देणें तो जमेनिसानें करून द्यावा. कलम.

१ गांवगन्ना वसूल बाकीचे रोखे व कारसाई व फडफर्मास वगैरे शिस्तीरोखे करणें ते जमेनिसानें लेहून द्यावे. कलम.

१ मुलकी इस्ताव्याचे कौल जिराईत, बागाईत वगैरे जमेनिसानीं लिहून द्यावे. कलम.

१ गांवगन्नाची खतावणी वसूल बाकीची कुल फडनिसांचे कीर्दीवरून जमेनिसानें घालावी. कलम.

६

एकूण सहा कलमें करार करून दिलीं असेत तरी मुलकी जमाबंदी व पाहणीचा आकार, वसूल बाकी, कुल रोखें पत्रें व तोडमोड करणें ते जमेनिसाच्या हातें करीत जावी. मुलकी काम यांच्या दाखल्याशिवाय एकंदर करूं नये. जमेनिसाच्या हाताखालीं कारकून आहेत ते मशारनिल्हेच्या इतल्यांत वर्तत नाहींत त्यांस रगडून ताकीद करून यांच्या हाताखालें वर्तवून सरकारकाम यथास्थित चालें तें करणें. कदाचित् जुने कारकून यांच्या इतल्यांत न राहत तरी त्यांस दुसरें ठिकाणीं हरएक जागा सेवा सांगोन यांच्या उपयोगी लिहिणार हे सांगतील ते कारकून यांजकडे नेमून देणें. सदरहू कलमाप्रमाणें जमेनिसीचें प्रयोजन राजश्री बाळकृष्ण

(1) the recoads of the inspection of Jirayet and Bagayet lands by the inspecting officers, should be laid by them before the Jamenis, whose duty it will then be to fix the revenue demand after such inquiry as he may think necessary and to report the fact to the karbhari;

(2) the Jamenis should receive all revenue accounts and watch the closing of the accounts and see that the collections and arrears are correctly noted;

(3) the Jamenis has authority to increase the revenue of a village or to grant remissions or to reduce the revenue for a term of years;

(4) orders for the recovery of arrears from villages should be issued by the Jamenis;

(5) Kowls for the abatement of revenue should be issued by the Jamenis,

(6) a ledger showing the amount received and the amount due from each village, should be prepared by the Jamenis from the day-book of the Fadnis;

हरि यांच्या हातें घेत जाणें. मुलकी कामकाज कुल जमेनिसाचे दाखल्याखेरीज कार्यास येणार नाहीं. म्हणोन. सनद १.

५२१ (२७२). भिकाजी विश्वनाथ यांस सनद कीं, तर्फ खेड व तर्फ चाकण प्रांत जुन्नर येथील हवाला पेशजीपासून तुम्हांकडे आहे, त्यास सालमजकुरीं हवाल्यावर दुसरा नजर पांच हजार रुपये द्यावयासी उभा राहिला, त्यास तुम्हीं पदरचे, बहुत दिवसांचा हवाला, ऐसें जाणून तुम्हांकडे नजर रुपये ४००० चार हजार करार करून पूर्ववत्प्रमाणें हवाला करार केला असे. तरी इमानें इतबारें वर्तोन तर्फ मजकूरचा अमल चौकशीनें करीत जाणें, व नजरेच्या ऐवजाचा भरणा सरकारांत करून पावलीयाचा जाब घेणें म्हणोन. सनद १.

इ० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. जमादिलावल २४.

येविशीं हरि दामोदर यांचे नांवें सनद कीं, मशारनिल्हेचे हातें पूर्ववत्प्रमाणें कामकाज तर्फ मजकूरचे हवाल्याचें घेत जाणें म्हणून. सनद १.

२.

रसानगीयादी.

५२२ (२८४). व्यंकटराव नारायण यांचें नांवें सनद कीं, तुह्मांकडे तालुक्याची

---

(7) every kind of revenue-business should be conducted through him. The Karkuns serving in his office should be strictly enjoined to obey his instructions. If any old karkun refuses to do so, he should be transferred.

521. The office of hawala of tarfs Khed and Chakan was held by Bhikaji Vishwanath. Another person offered a nazar of Rs. 5000 for the office. As Bhikaji was an old hawaldar and loyal to Government, he was directed to pay a nazar of Rs. 4000 and the office was continued to him.

A.D. 1764-65.

522. Ragho Gangadhar was appointed to the office of Majmu of the taluka with the forts and troops attached there to, under Vyankatrao Narayan, and the following instructions were issued in regard to his duties:—

A. D. 1764-65.

(1) he should see that the day-book is balanced every day;

(2) he should authenticate every letter and account prepared by the Fadnis or Chitnis;

(3) he should see that the salary registers of sowars and soldiers newly employed is correctly totalled. He should muster every month the sowars and soldiers already in service;

(4) he should prepare estimates of receipts and expenditure in regard to the portion of the taluka proposed to be entrusted to a Sub-Mamlatdar, and the detailed account to be taken from the Mamlatdar should be received through the Muzamdar;

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. जमादिलाखर ४.

देखील किल्लेकोट व ठाणीं व पथक आदिकरून कुलडौलाची मजमू राघो गंगाधर यांजकडे पेशजीपासून आहे, त्याप्रमाणें करार असे. त्यास मजमूचे कानू कायदे येणेप्रमाणें.—

रोजकीर्दीवर एकूणांत रोजच्यारोज करवून कीर्द विल्हेस लावीत जाणें. कलम १.

राऊत व हशम जदीद ठेवणें, त्यांचे तैनातजाबते यांवर एकुणात करवीत जाणें व कदीम राऊतांची व हशमांची हजिरी महिनेमाहा घेणें तें याचे दाखल्यानें घेत जाणें. कलम १.

मामलेदार नवे जुने करणें ते यांच्या दाखल्याशिवाय करूं नये. कलम १.

मामलेदार खाजगीकडून सरकारच्या हिशेबीं कर्ज जमा धरून जमाखर्च करितात. त्याचा झाडा फडनीस कीर्दीस लागू करितात तो मजमदाराच्या दाखल्यानें एकूणातीशिवाय लागू करूं नये. कलम १.

फडनिसी व चिटणिसी पत्रें देखील पोतें जामदारखाना परभारें कुल कागदपत्रांवर मजमूचें निशाण करवीत जाणें. कलम १.

पोटचे मामलेदार यांस मामलत सांगतेसमयीं बेहडे करून द्यावे. अखेरीस हिशेब घेणें तो मजमदाराचे दाखल्यानें घेत जाणें. कलम १.

मामलतीचा जमाबंदीचा ठराव अवलीस करणें व अखेरीस कचा हिशेब घेणें तो याचे दाखल्यानें घेत जावा. कलम १.

मामलतसंबंधें राऊत हशम वगैरे कुल कारभार करणें तो याच्या दाखल्यानें करीत जावा. व कुल कागदपत्रांवर निशाण करवीत जाणें. कलम १.

याच्या निसबतीस माणसें फडनिसाप्रमाणें नेमून देणें. कलम १.

एकूण नऊ कलमें करार करून देऊन हे सनद खास सादर केली आहे तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें कुल कामकाज मशारनिल्हेकडील गोपाळ अनंत यांचे हातें घेत जाणें ह्मणोन. सनद १.

कित्ता सनद फडनिसाचे दिवटीस दररोज तेल पावत असेल त्याप्रमाणें मशारनिल्हेस धारवाड वगैरे महालपैकीं देत जाणें ह्मणोन. सनद १.

२

रसानगीयादी.

५२३ (२८७). व्यंकटराव नारायण याचे नांवें सनद कीं, विठ्ठल उद्धव यांसी

---

(5) change of Mamlatdars should not be made without his knowledge.

523. Vithal Udhav was Daftardar of Dharwar and other mahals in Karnatic under Vyankatrao Narayan. He complained that all the duties of his office were not entrusted to him. The following instructions were therefore issued:—

A. D. 1764-65.

(I) the day-book should be written by the Fadnis and the ledger should be prepared from it by the Daftardar,

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. जमादिलाखर २४.

तालुका धारवाड वगैरे महाल प्रांत कर्नाटक तुह्मांकडील व परगणे कोपल निसबत विसाजी नारायण येथील दफ्तरदारी पेशजीपासून आहे, त्यास दफ्तरदारीचे लिहिण्याचे कायदे यथास्थित यांचे हातून घेत नाहीं. यांजकरितां हल्लीं यांजपासून लिहिण्याचें कामकाज घ्यावें. दफ्तरदारी संबंधें कायदे कलम.

१ कीर्द फडनिसानें तयार करून द्यावी. तिची खतावणी जमा व खर्चाची तयार करावी.

१ महालाचे ताळेबंद बेहेडे करावे. अखेर सालीं हिशेब कमावीसदार आणितील ते दफ्तरीं रुजू सुरू करून सनदी व गैरसनदी निवडून तयार करावे.

१ कर्ज रदकर्ज वगैरे कुल हिशेब रुजू सुरू पाहून करावे.

१ महालसंबंधें शिबंदीचे स्वार असतील त्यांचे हिशेब तैनातप्रमाणें आदा रुजू सुरू पाहून करावे.

१ बाजेलोक व बाजेहशम यांचे हिशेब हशमनीस तयार करून देतील व फाजिलाचे आणितील ते यांनीं सुरू रुजू पहावें.

६

येणेंप्रमाणें पांच कलमें करार करून दिलीं असत. सदरहूप्रमाणें लिहिणें यांचे हातें कायद्यानें घेत जाणें. लिहिल्याप्रमाणें यांनीं कागदपत्र तयार करून ज्याचा प्रसंग पडेल तो फडनिसास समजावीत जावा. फडनीस व यांनीं मिळून उभयतांनीं खावंदास समजावीत जावे. फडनीस आपले मतेंच कारकून निराळे ठेवून दफ्तरदाराशिवाय परभारे त्यांजकडून लिहिवितील तर कार्याचें नाहीं. फडनिसानें जें सांगणें तें यासच सांगावें. मदतनवीस कारकून असतील त्यांस यांनीं सांगावे त्याचप्रमाणें त्यांनीं लिहित जावें. मदतनिसास परभारें फडनिसांनीं लिहिण्याचें काम सांगोनये, व त्यांनींहि दफ्तरदाराशिवाय परभारे एकंदर लिहूंनये. कीर्दवगैरेकडचें लिहिणें फडनिसास न उरकेसें जाहल्यास दफ्तरदारास बोलावून दोघांनीं मिळून करावें. फडनीस हजीर नसल्यास सर्व लिहिणें दफ्तरदार यांजपासून घ्यावें. येणेप्रमाणें करार करून दिले असे. याप्रमाणें यांजपासून लिहिण्याचा कायदा घेत जाणे म्हणून.

सनद १.

रसानगीयादी.

---

(2) the annual estimates of receipts and expenditure should be prepared by the Daftardar; the detailed accounts submitted by the Kamavisdars at the end of the year should be examined by him with reference to the records,

(3) he should inquire into loans advanced and their recoveries;

(4) he should examine the accounts relating to the sowars entertained from the Mahal;

(5) he should explain every matter to the Fadnis, and they both to the officer Vyankatrao Narayan. Orders to subordinates should not be issued by the Fadnis direct but

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दी पैकीं.

५२४ (३०१). कारकून निसबत दफ्तर यांचें तांदूळ खरेदी फिरंगाण कोंकणातून हरएक जागाहून खरेदी करून एक खेप पुण्यास आणितील त्यास आणूं देणें जकातीचा तगादा न करणें ह्मणोन सालगुदस्त प्रमाणें सालमजकुरीं दस्तकें.

इ० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. रजब ४.

	तांदुळखंडी	बैलसर.
बाळाजी हरि दफ्तरदार १.	५	५०
गोपाळ महादेव दफ्तरदार १.	५	५०
नारो गंगाधर पाळंदे २.	१०	१००
५० प्रत खंडी ५ एकूण.		
५० प्रत खंडी ५ एकूण		
१०० १०		
बापुजी बल्लाळ फडके ३	१८	१८०
५० प्रतसरखंडी ५ एकूण		
३० मावळांतून खंडी ३ एकूण		
१०० देशांतून हरजिन्नस गल्ला खंडी १० एकूण.		
१८० १८		
कृष्णाजी महादेव १.	१०	१००
महादाजी बाबुराव १.	२	२०
नारो आनंत परचुरे १.	२॥	२५
रामचंद्र अनत परचुरे १.	१	१०
बाबुराव केशव १.	३	३०
गोविंदराम आपटे १.	२	२०
महादाजी विष्णु १.	१॥	१५
मल्हारराम १.	३	३०
विसाजीगणेश १.	१	१०
बाजी गोविंद जोशी १.	२	२०
कृष्णाजी तुकदेव १.	२	२०
सदाशिव महादेव १.	१	१०
हरि बल्लाळ फडके १.	३	३०
कृष्णाजी महादेव दाभोळकर १.	१॥	१५

through the Daftardar. During the Fadnis' absence his work should be done by the Daftardar.

524. The document gives a list of the karkuns in the Daftar at Poona, who were permitted to bring rice from Konkan and other places for their use; free of octroi.

A. D. 1764-65.

आपाजी चिमणाजी १.	२	२०
खंडोराम बापट १.	१	१०
सदाशिव अनंत १.	१	१०
लक्ष्मण केशव वैद्य १.	२	२०
धोंडो बल्लाळ लेले १.	१	१०
रामचंद्र हरि १.	३	३०
नारो महादेव १.	२	२०
लक्ष्मण केशव ठाकूर १.	१॥	१५
बाबाजी अनंत आपटे १.	१	१०
बाळाजी हरि ढवळे १.	१	१०
सदाशिव रघुनाथ १.	१॥	१५
महादाजी नारायण परचुरे १.	१॥	१५
बाबाजी महादेव १.	१॥	१५
बाळाजी नारायण शेवडे १.	१॥	१५
पांडुरंग नारायण १.	२	२०
रुद्राजी नारायण १.	२	२०
भास्कर विश्वनाथ १.	१	१०
कृष्णाजी गणेश १.	५	५०
४५ तांदुळ बैल.		
५ मीठ बैल.		
५०		
विनायक मोरेश्वर १.	२॥	२५
बापूराव अनंत १.	२	२०
रामाजी नारायण १.	१॥	१५
गणेश हरि १.	७	७०
चिमणाजी जिवाजी १.	१	१०
गोविंद बल्लाल दफ्तरदार १.	५	५०
रामचंद्र गोपाळ १.	३	३०
बाळाजी महादेव काळे १.	१	१०
बाबाजी भिकाजी फडके १.	१	१०
रामचंद्र हरि देवधर १.	३	३०
कृष्णाजी हरि १.	१	१०
गोपाळ कृष्ण १.	२	२०
दिनकर नारायण १.	१	१०
नारो कृष्ण ओक १.	१	१०
हरि बाबाजी १.	२॥	२५

बाळाजी गणेश १.	१	१०
जगन्नाथ बल्लाळ १.	१	१०
त्रिंबक महादेव १.	१	१०
गोविंद महादेव १.	१	१०
महादाजी नारायण १.	१	१०
रंगो नारायण १.	१	१०
बाजी रघुनाथ १.	१	१०
गोविंद हरि १.	१	१०
राघो विश्वनाथ दफ्तरदार १.	१॥	१५
गोपाळ अनंत १.	२॥	२५
सदाशिव बल्लाळ भिडे १.	२	२०
११		

एकूण सासष्ट दस्ते (दस्तकें) सदरहूप्रमाणें दिलीं असत छ. ४ रजब.

५२५ (३२०). शेख घुंडण वल्लद बापूजी व शेख बाबू वल्लद दाऊ (द?) यांनीं हुजूर विदित केलें कीं, कसबे पुणें येथें तीन असाम्यांनीं चावडीस चाकरी करावी. दर असामीस दरमहा खुर्दा टक्के ५ पांच येणेंप्रमाणें श्रीमंत कैलासवासी थोरले राव यांनीं करार करून सनदा करून दिल्या त्याप्रमाणें बहुत दिवस चालले, त्याजवरी आपणाजवळील सनद हरवली होती याजमुळें कांहीं दिवस चालले नाहीं. सांप्रत सनद सांपडली. तरी आपले बाप दडयेपणाची(?) चाकरी करून रोजमरा घेत होते, त्याप्रमाणें आम्हां दोघांच्या हातें सेवा घेऊन सनदेप्रमाणें रोजमरा द्यावयाची आज्ञा जाहली पाहिजे म्हणोन; त्याजवरून तुह्मांस हें पत्र सादर केलें असें. तरी शेख घुंडण व शेख बाबू यांच्या बापाचें नांवें दडयेपणाच्या सनदा पेशजी तीर्थरूप कैलासवासी थोरले राव यांनीं सनदा करून दिल्या आहेत, त्या मनास आणून पेशजीचे सनदेप्रमाणें यांजपासून दडयेपणाची सेवा घेऊन नेमणुकेप्रमाणें दोनअसाम्यांचा दरमहा पावीत जाणें म्हणोन, महादाजी नारायण कमावीसदार जकात प्रांत पुणें व जुन्नर यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. जिल्काद. २८.

५२६ (३४६). बाबूराव नारायण कारकून निसबत राजश्री सखाराम भगवंत

---

525. Shek Ghundan walad Bapuji and Shek Babu walad Dau represented that their family for a long time served at the chawdi in Kasbe Poona. Three members of the family were required for service at a time and each received copper coin worth takke 5 a month. A sanad to this effect given by the deceased Peshwa which was mislaid, was found by the two persons in question and was produced. The office was therefore ordered to be continued to them and instructions to that effect were issued to the Kamavisdar of octroi of prant Junnar and Poona.

A. D. 1764-65.

526. Baburao Narayan was appointed to the office of Killikhana at Ahmedabad on Rs. 300 a year.

A. D. 1765-66.

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. जिल्हेज २९.

यांस शहर अमदाबाद येथील किल्लीखान्याची असामी पेशजीपासून आहे, त्यास सांप्रत तुम्हांकडे अमल जाहल्यावर सुदामत असामी चालत नाहीं, ह्मणोन हुजूर विदित जाहलें, त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी पेशजीप्रमाणें किल्लीखान्याचें कामकाज मशारनिल्हेपासून घेऊन वेतन सालिना रुपये ३०० तीनशें पेशजीपासून पावत आहे, त्याप्रमाणें वेतन पावबीत जाणें ह्मणोन, गोपाळराव गणेश यांस. सनद १.

रसानगीयादी.

५२७ (३९२). मोराजी शिंदे नामजाद तालुके रत्नागिरी यांचे नांवें सनद कीं,

इ० स० १७६५।६६ सित सितैन मया व अलफ. मोहरम २२.

तालुके मजकूर येथील जमेनिशीची असामी बाळाजी रामचंद्र यांस होती, त्यास ते मृत्यु पावले, सबब हल्लीं त्यांचे भाऊ (पुत्र ?) गोविंद बल्लाळ यांचे नांवें जमेनिशीची असामी पेशजीप्रमाणें करार करून देऊन हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी कुलजमेनिशीचें कामकाज बाळकृष्ण हरि यांचे हातें घेऊन वेतन पेशजीप्रमाणें पावबीत जाणें म्हणोन. सनद १.

रसानगीयादी.

५२८ (३९९). बाबूराव बल्लाळ काणे यांजकडे तालुके विजयदुर्ग येथील हशमनिसी पेशजीपासून आहे, त्यास मशारनिल्हेस मोईन सालीना रुपये.

इ० स० १७६५।६६ सित सितैन मया व अलफ. रबिलावल ३.

२९८ पेशजी मोईन आहे.
२५० खुद्द.
४८ दिवट्या बारमाही.
२९८
१०० जाजती इजाफा व अफ्तागिरा व पोरगा मिळोन सालीना सालमजकुरापासून.
३९८

एकूण तीनशें अठ्याण्णव पैकीं पेशजीची तैनात दोनशें अठ्याण्णव व हल्लीं सालमजकुरापासून जाजती शंभर एकूण सदरहू तीनशें अठ्याण्णव रुपये पावबीत जाणें ह्मणोन कृष्णाजी विश्वनाथ यांस. सनद १.

रसानगीयादी.

---

527. Balaji Ramchandra held the office of Jamenishi in taluka Ratnagiri.

A. D. 1765 66. On his death, the appointment was continued to his brother Govind Ballal.

528. Baburao Ballal Kane, Hashamnis of taluka Vijayadurga, was given a

A. D. 1765-66. Salary of Rs. 250 per annum with allowance of Rs. 148 for a torch-bearer, a boy and an Aftagira.

५२९ (३६६). नारो हरि कारकून निसबत वेदमूर्ति राजश्री मंगलमूर्ति बावा यांस श्रीक्षेत्र पंढरपूर येथील मजमू सालमजकुरापासून सांगोन वेतन सालिना रुपये १५० दीडशें रुपये करार केले असे, तरी यांचे हातून क्षेत्रमजकूरचे मजमूचें कामकाज घेऊन वेतन पाववीत जाणें म्हणोन, परशराम रामचंद्र यांचे नांवें. सनद १.

इ० स० १७६५।६६ सित सितैन मया व अलफ. रबिलावल ४.

रसानगीयादी.

---

(७). न्यायखातें.

(अ) दिवाणी.

५३० (१४). हरिराम व विसाजी नारायण यांस पत्र कीं, जानोजी धुळप यांनीं हुजूर विदित केलें कीं, आमचें कर्ज आपले निसबतीस पूर्णासिंग रजपूत याजकडे येणें आहे, त्यास रजपूतमजकुराचें कर्ज गोकाक येथें कुळांकडे येणें तपशील.

इ० स० १७६२।६३ सलास सितैन मया व अलफ. रजब १.

१ नागापा देशकुळकर्णी.	१ अनंतापा नावारी.
१ रुद्रापा पतकी खोत.	१ गोविंद नाईक मिसरीकोटकर वस्ती सोंदी.
२	२

येणेंप्रमाणें चहूं असामींकडे कर्ज येणें आहे, तो ऐवज त्यांनीं आह्मांस कर्जाचे ऐवजीं देविला आहे, तरी येविशीं ताकीद होऊन ऐवज वसूल करवून पैकीं सरकारांत पांचवा हिस्सा घेऊन बाकी ऐवज आपणास देवावा म्हणून; त्याजवरून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे, तरी सदरहू असामीकडे रजपूत याचें कर्ज येणें असेल तें वाजवी खताप्रमाणें वसूल करून पैकीं पांचवा हिस्सा सरकारांत घेऊन बाकी ऐवज मशारनिल्हेस देणें म्हणून चिटणिसी.

पत्र १.

---

529. Naro Hari was appointed to the office of Majmu of the sacred place of Pandharpur on an annual Salary of Rs. 150.

A. D. 1765-66.

530. Janoji Dhulap requested Government to recover certain debts due to him from Nagapa Desh-Kulkarni and others of Gokak, on the condition that one-fifth of the amount recovered was to be taken by Government. His prayer was granted.

A. D. 1762-63.

५३१ (२३). नागोराम यांचें नांवें सनद कीं, नबाब सलाबतजंग यांचा मुक्काम परगणे चितापूर येथें लष्करचा न होय तें करणें, याजबद्दल दरबार खर्च जाहला तरी करून पायमली परगणे मजकूरची न होय तें करणें, म्हणोन तुह्मीं राजश्री बळवंत बाबूराव यांसी सांगितलें, त्याप्रमाणें मशारनिल्हेनीं नबाबाचा मुक्काम परगणें मजकूरीं होऊं दिला नाहीं, त्यास तुम्हांस दरबार खर्च मशारनिल्हेनीं रुपये ४४०६ चारहजार चारशें सहा केला तो मागों लागले; तो तुम्हीं मशारनिल्हेस ऐवज दिला नाहीं, सबब मशारनिल्हेनीं हुजूर विनंती केली, त्याजवरून तुम्हांकडील राजश्री मल्हार जगन्नाथ कारकून यांसी हुजूर आणून दरबारखर्चाची पुरसीस केली, त्यास वाजवी दरबारखर्च द्यावा म्हणून मशारनिल्हेनीं सांगितलें, त्याजवरून मशारनिल्हेस सदरहू दरबारखर्चाबद्दल ऐवज द्यावयाचा करार करून तुम्हांस सनद सादर केली असे, तरी सदरहू चारहजार चारशेंसहा रुपये दरबार खर्च मशारनिल्हेस देणें.

इ० स० १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. रजब २५.

नारो आपाजींच्या रोजकीर्दीपैकीं.

५३२ (१२२). निवाडपत्र शिवाजी वलद तान्हाजी व विसाजी वलद मलजी व दारकोजी वलद मल्हारजी व निंबाजी वलद शिवाजी चौधरी सुतार लोहार मौजे खोडद तर्फ नारायणगांव प्रांत जुन्नर यांनीं हुजूर येऊन विदित केलें कीं, मौजे मजकूरचें लोहारकीचें वतन आपलें आहे. त्यास आमचा व सटवाजी वलद भिकाजी लोहार याचा लोहारकीच्या वतनाचा कजिया होता, सबब आपण राजश्री बाळाजी महादेव कमावीसदार मौजे मजकूर यांजवळ

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. रबिलावल १९.

---

531. Nago Ram asked Balvant Baburao to arrange that Nawab Salabatjung and his army should not encamp in pargana Chitapur and thus to save the province from devastation and promised to bear any expenses that might be incurred for that purpose. Balwant Baburao accordingly did not allow the Nawab to encamp in the pargana. He had to spend Rs. 4,406 for the purpose and requested Nago to pay up the amount. The latter however refused and the matter having been reported to the Peshwa, orders were issued to him to pay the amount.

A. D. 1762-63.

532. Shiwaji wd Tanaji and others on the one side and Satwaji on the other had a dispute in regard to the carpenter's and iron-smith's watans of Khodad in tarf Narayangaon. Shiwaji took the matter to Balaji Mahadev Kamavisdar of the village, who after taking down the statements of the parties and their witnesses gave a decision against Satwaji. Shiwaji and others then applied to the Peshwa for an order confirming the decision. The papers were then brought from the Kamavisdar and perused, and the decision was confirmed. A present of Rs. 200 was levied from Shiwaji. (The papers of the inquiry are copied in detail in this Sanad).

A. D. 1763-64.

फिर्याद जाऊन कजियाचें वर्तमान सांगितलें, त्यावरून त्यांनीं सटवाजी मजकूर यासी बोलावून आणून आपल्यास व त्यास वर्तमान पुसोन आपल्यापासून व त्याजपासून तकरीरा व जामीन कतबे व राजीनामे लेहून घेऊन मनसुबी केली. सटवाजी लोहार खोटा जाहला, आपण खरे जाहलों. याचे मनसुबीचे कागदपत्र अवघे मशारनिल्हेजवळ आहेत. ते साहबीं मनास आणून आपल्यास सरकारचें निवाडपत्र करून दिलें पाहिजे म्हणोन; त्यावरून मनसुबीचे कागद मशारनिल्हेजवळ होते ते मनास आणिले बितपशील.

तकरीरा हरदु जणांच्या.

तकरीर कर्दे बेशमे दारकोजी वलद मल्हारजी व विसाजी वलद मलजी व निंबाजी वलद शिवाजी सुतार मौजे मजकूर सन ११७० कारणें तकरीर लेहून दिली ऐसिजे. मौजे मजकूरचें सुतारकीचें व लोहारकीचें वतन आपलें. आपले वडील पिढी दरपिढी करीत आले. दरम्यान दारकोजीचा चुलता काशी सुतार लोहारकी करीत होता. ते वेळेस साबाजी कुचिला मौजे मजकूर यांनीं काशीजवळ आपली कुऱ्हाड घडावयासी दिली होती ते त्याजपासून गहाळ जाहली, सबब साबाजी कुचिला यांनीं नाईकजी कडू मुकासी मौजेमजकूर याकडे फिर्याद केली त्यावरून आपला चुलता काशीसुतार यास नेऊन मारहाण केली. व डोईवर धोंडी देऊन गुन्हेगारी घेतली. या रागें दिलगीर होऊन लोहारकीचें काम टाकून कसबे नारायणगांव तर्फ मजकूर येथें येऊन राहिला, त्यावर एक दोन वेळां त्याचे समजाविसीस गांवकरी आले परंतु आपली अब्रू गेली ह्मणोन तो गांवावर गेला नाहीं. मग गांवकरी यांनीं सटवाजी लोहार मौजे कळम तर्फ महाळुंगे येथें वस्तीस राहत होता त्यास अलीकडे मुलकास कौल जहालीयावर आणून लोहारकीचें काम त्याचे हातें घेऊं लागले; साल दरसाल आपण कजिया करीत गेलों व पहिल्यानें सटवाजीस गांवावर आणिले तेव्हां दारकोजीचा चुलता मलजी यानें

तकरीर कर्दे बेशमे सटवाजी लोहार मौजे खोडद तर्फ नारायणगांव प्रांत जुन्नर सन ११७० कारणें तकरीर लेहून दिली ऐसीजे मौजे मजकूरचें लोहारकीचें वतन आपले वडील करीत आले, आपला पणजा रंगोजी आजा हिरोजी पावेतों भोगवटा चालिला. आपला बाप भिकाजी, दुकाळामुळें, लहान होता, तेव्हां परागंदा जाहला. तो परगणे चांदवड येथें जाऊन राहिला. तो तिकडेच मेला. आपला उपज तिकडेच जाहला. मागें पांढरीचें काम खंडोजी जिनगर नारायण गांवकर चालवीत होता. आपण थोर पंधरा वर्षांचा जाहलों तेव्हां थोरले नानाचे कौलाचे समयीं देशास आलों तो मौजे कळंब तर्फ महाळुंगे येथें आपली बहीण होती, तिचे घरीं राहिलों, त्याजवर आपलें वर्तमान खोडदकरास कळलियावर दोघे चौघे कारभारी आपणास वतनदार ह्मणोन गांवावर घेऊन आले, त्यापासून आपण आजपर्यंत लोहारकीचें काम करीत आलों. दरम्यान श्रीमंतानीं मौजे मजकूरची मुकदमी घेतली, त्याचे महजरावरी व गाईकवाड पाटील याच्या निवाड पत्रावर साक्षी घातल्या तेव्हां सुतार हि रूबरू होते परंतु आपल्याशीं कोणी कजिया केला नाहीं. त्यावर सालपैवस्ता गावच्या हणमंताजवळ महाराचे गळ लाविलें ते समयीं सुतार मुजाहीम जाहला कीं लोहारकी आपली आहे त्यावरून त्याचा व आपला कजिया होऊन

कजिया केला, व रघोजी लोहार पिंपळवंडीकर आणून सरकतीस लोहारकीवर ठेविला; तेव्हां गांवकरी म्हणों लागले कीं, सटवाजीनें दोन तीन महिने लोहारकीचें काम केलें आहे. येवढें साल करूं देणें. पुढें तुमची तुम्ही लोहारकी करणें, याप्रमाणें समजाऊन सांगितलें मग पुढें करावी त्यास नारायणगांवचे लोहारकीचे कजियाचा कसाला जाहला म्हणोन अंतर पडलें. यावर श्रीमंतानीं मौजे मजकूरची पाटिलकी घेतली. तेव्हां दारकोजीचा बाप मल्हारजी जवळ होता. त्यानें कजिया सांगितला. शिरपावाचे वेळेस कजिया केला, तेव्हां गांवकरी एक दोघे यांनीं सांगितलें कीं येथें कजिया करूं नको गांवास गेल्यावर तुझें काम तुझे हातें घेऊं. त्यावर गांवास आलियावर पाटील आजचें उद्यावर घालीत गेले, गुदस्तां महाराचे बायकोनें गांवीं हणमंताजवळ बगाड लाविलें तेव्हां त्याचा गळ लोहार टोंचूं लागला, त्यास आपण द्वाही दिली. कजिया केला. कमावीसदारास वर्तमान सांगितलें, त्यांनीं करिणें लेहून घेतले आहेत. लोहारकीचें वतन आपलें आहे. शाबूत करून देऊं. हे तकरीर लेहून दिली सही.

द्वाही दुराही जाहली. सुतार गावांत कमावीसदाराकडे फिर्याद गेले. कमावीसदारांनीं सुतारास सांगितलें कीं, दोनशें रुपये नजर देऊन आपले लोहारकीचें काम चालेव. पुढें इनसाफ करूं ते गोष्ट ते कबूल न करीत. त्यावर त्यांनीं आपल्यास बोलावून सांगितलें कीं तूं नजर देऊन लोहारकी चालवणें मग आपण कबूल होऊन घरची बटीक विकून रुपये १०० शंभर नजर दिली आणि काम चालवूं लागलों. याप्रमाणें आपली हकीकत आहे. तकरीर लेहून दिली सही.

जामीन कतबे.

सुतारास जामीन भवानजी व आवजी व सुभानजी सुतार मौजे अर्वी तर्फ नारायणगांव १.

सटवाजी लोहार यास जामीन मकाजी लोहार मौजे मंचर तर्फ माहाळुंगें, १.

राजिनामे.

सुताराचा १. सटवाजी लोहार याचा १.

सदरहूप्रमाणें दोघांनीं राजीनामे लेहून दिले कीं, समाकूळ पांढर मेळवून तिचे माथां सत्य सुकृत घालून पुसावें. पांढर सांगेल त्याप्रमाणें तर्तणूक करूं. पांढरीचे मुखें खरें न जाहलों तरी आपण खोटे. याप्रमाणें राजिनामे लेहून देऊन पांढरीची नांवनिशी लेहून दिली. सदरहूप्रमाणें तकरिरा व राजिनामे व जामीनकतबे लेहून घेऊन पांढर जमा केली. त्यांचे

माथां नांवनिशीवार बेलभंडार घालून एकेकास निरनिराळे बोलावून आणून लोहारकीचें वतनाची साक्ष पुसली. त्यांनीं येणेंप्रमाणें दिली.

कित्ता असामीनीं साक्ष दिली.	कित्ता असामीनीं साक्ष दिली.
१ खंडोजी पाटील वलद सुभानजी गाईकवाड उमर वर्षें ४५.	१ जावजी वलद गंगाजी पाटील थोरात उमर वर्षें ३४.
१ बहिरजी वलद राणोजी कुचिला उमर वर्षें ३४.	१ सखोजी वलद सटवाजी मुळे उमर वर्षें ३४.
१ रामजी वलद पदाजी खरमळा उमर वर्षें ६०.	१ खंडोजी वलद शेटयाजी मुळे उमर वर्षें ६०.
१ कचु वलद खंडोजी गाईकवाड उमर वर्षें ३५.	१ गुंडाजी वलद पिलाजी पाटील धेटे उमर वर्षें ३९.
१ महादजी वलद हरजी येरंडा उमर वर्षें ५०.	१ हंगोजी वलद मालजी घंगाळे उमर वर्षें ७०.
१ गोंदजी वलद राणोजी राऊत उमर ५५.	१ चाहू वलद महादजी परीट उमर ३५.
१ निंबाजी वलद येसाजी कुंभार उमर वर्षें ६०.	१ आमन वलद लक्ष्मण माळी उमर वर्षें ५५.
१ मल्हारजी वलद उमाजी कोळी उमर वर्षें ३५.	१ नागोजी वलद मुक्ताजी मुळे उमर ३९.
१ हरि वलद गंगाजी डावरा उमर वर्षें ६०.	१ जन्या वलद नामा मांग उमर वर्षें २९.
१ लोखा वलद आमाजी चांभार उमर वर्षें ५०.	१ निंबाजी पाणमन उमर ३० व त्याची आई रखमाई उमर वर्षें ६९.
१ येसाजी वलद तान्हाजी महार उमर वर्षें ६९.	१०
१ उमा वलद पंगनाक महार उमर वर्षें ३५.	सदरहू असामीनीं साक्ष दिली कीं, पहिला लोहार कोण होता हें आपल्यास ठाऊक नाहीं. सटवा लोहार हा वतनदार होय न होय, हेंही आपणांस ठाऊक नाहीं. व सुताराची लोहारकी होय कीं नाहीं हेंही आपणांस ठाऊक नाहीं. आपल्या देखतां सटवा लोहार लोहारकी करीत आहे सुतार सुतारकी करितात. लोहारकीचें बलुतें लोहार घेतो. व कागद पत्रांवर साक्ष घालणें ते सटवा लोहार
१ पेमनाक वलद येसनाक महार उमर वर्षें ६०.	
१ जावज्या वलद सटवा महार उमर वर्षें २९.	
१ लुमा वलद हेमा महार उमर वर्षें ६०.	
१५	
सदरहू पंधरा असामीस वेगळ्या साक्षी	लोहार म्हणून घालितो. व सुतार सुतार-

पुसिल्या त्यांनीं लेहून दिलें, त्यांत खुलासा मजकूर. पहिला लोहार लोहारकी करीत होता, त्याचें बुडालें. त्याउपर गांवकरी यांनीं हल्लीं सुतार आहेत त्यांचे पणज्याचे हवालां लोहारकी केली. त्यापासून पणज्यानें लोहारकी केली, व आज्यानें केली, व याचा चुलता संतु सुतार यानेंही केली. संता व काशी सुतार लोहारकी करीत असतां साबाजी कुचिला याची कुऱ्हाड त्याजवळ घडावयासी टाकिली होती. ते गहाळ जाहली. त्यावरून नायकजी कडू याजवळ फिर्याद करून कुऱ्हाडबद्दल मारहाण करवून गुन्हेगारी घेतली. या रागें दिलगीर होऊन नारायणगांवास गेला. फिरोन लोहारकीचें काम त्यानें केलें नाहीं. गांवकरी यांनींही एकदोन वेळां परत बोलाविलें;परंतु त्यानें गांवावर लोहारकीचें दुकान आणिलें नाहीं. गांवचे लोहारावीण काम पडों लागलें याजकरितां गांवचे पाटील वगैरे कारभारी यांनीं मौजे कळंब तर्फ महाळुंगे येथें सटवा लोहार उपरी राहत होता, त्यास आणून लोहारकीचें काम चालतें केलें. त्याजवर वर्षा दोहोवर्षीं किलीजखानाची धामधूम जाहली तेव्हांपासून लोहारकीचें कामकाज तोच करितो व बलुतें घेतो. गांवांत कोठें कागद पत्रहि जाहलें, त्यांजवरही त्यानें साक्षी लोहार म्हणोन घातल्या, परंतु हा लोहार वतनदार नाहीं. याचा आजा पणजा गांवावर नांदला नाहीं. व यास वतनदार म्हणोन गांवावर आणिला नाहीं. यांजमध्यें एकादोघांनीं सांगितलें जें श्रीमंताचे मुकदमीचे वेळेस लोहारकीचें साक्षीविशी सुतारांनीं कुरकूर केली होती त्यांस गांवकरी यांनीं समजावून सांगून कजिया करूं दिला नाहीं. ऐसीही साक्ष एकादोघांनीं सांगितली. व पहिला सुतार लोहार बुडाला त्याचेच हे म्हणोन लोहारकी त्याचें हवाला केली ऐसीही साक्ष गुदरली. कित्येकांनीं साक्षी दिली कीं, कीची साक्ष घालितो. लोहारकीचे वतनांत याचा त्यांचा कजिया कधींही जाहला नाहीं. यांजमध्यें कित्येकांनीं सांगितलें कीं पहिले सुतार लोहारकीचें काम करीत होता. त्यास साबाजी कुचला यानें त्याजवळ कुऱ्हाड घडावयासी टाकिली ते त्याजपासून गहाळ जाहली, म्हणोन साबाजीनें हकीमापाशीं फिर्याद करून त्यास मारहाण केली. व गुन्हेगारी घेतली. तेव्हांपासून सुतारानें लोहारकीचें काम रागें रागें टाकिलें. त्याउपर किलीजखानाचे धामधुमीपूर्वी एक दोन वर्षें सटवा लोहार गांवावरी आणिला तो वतनदार म्हणोन आणिला किंवा गैरवतनी म्हणोन आणिला हें आपल्यास कांहीं ठाऊकें नाहीं. येणेंप्रमाणें साक्ष दिली.

सटवा लोहार यांस गांवांत वतनाचा वाडाही
नाहीं हा सोनाराचे घरावर राहात आहे ऐशा
साक्षी गुदरल्या.

सदरहूप्रमाणें सर्वांनीं साक्षी दिल्या त्या उपर उभयतांची पंचाईती परगणे आकोले येथील जमीनदार देशमुख देशपांडे व मातबरगांवचे पाटील यांजवर सोपविली त्यांनीं निवाडा करून सांगितला कीं, सटवा लोहार हा वतनदार लोहार ऐशी गोष्ट साक्षीमध्यें एकंदर नाहीं व मागें याचा बाप आजा पणजा यांचाही दाखला पुरत नाहीं. किलीजखानाचे धामधुमीपासून अलीकडे मात्र याचा भोगवटा उपरीपणाचा जाहला. लोहारकीचें कामकाज करून बलुतें घेतलें व कागदपत्रांवर साक्षी घातल्या, त्या लोहारकीचें काम करीत होता ह्मणोन घातल्या. सुतारांनीं कजिया करावा तरी ते दिलगीर व कित्येकांस लोहाराचा पक्ष यामुळें त्यांनीं उघड कजिया केला नाहीं, यास्तव लोहारानें तीस बत्तीस वर्षें भोगवटा घेतला. परंतु त्यास वतनाशीं संबंध नाहीं. सुताराचा चुलता, आजा, पणजा तीन डोया दाखला पुरला व पांढरीमध्यें एका दोघांनीं सांगितलें कीं, बुडाल्या लोहाराचा सुतार, याजवरून सुतार लोहाराचे वतनास पोहोंचतो लोहारास तालुका नाहीं. याप्रमाणें पंचाईतांनीं निवाडा करून सांगितलें त्याउपर त्यांनीं सटवा लोहार यांस पुरसीस केली कीं, आपले लोहारकीचें वतन हें खरें ऐसें समाकुळ पांढरीचे मुखें खरें करून देईन ह्मणोन तकरीर लिहून दिली आहेस. आणि पांढरीचे मुखें तुझा दाखला पुरत नाहीं याची वाट काय? तेव्हां त्यानें काहील होऊन जाबसाल केला कीं आपल्याच्यानें दाखला पुरवून देवत नाहीं. पांढरीचे मुखें आपला दाखला पुरला नाहीं तेव्हां आपण खोटा जाहलों ऐसें बोलोन सरकारांत कतबा लेहून दिला बितपशील.

दस्तकतबा सटवाजी वलद भिकाजी लोहार वस्ती मौजे खोडद तर्फ नारायणगांव प्रांत जुन्नर सन ११७० कारणें लेहून दिल्हे ऐसीजे दारकोजी वलद मल्हारजी व बिसाजी वलद मलजी व निंबाजी वलद शिवाजी सुतार यांचा व आपला मौजे मजकूरचे लोहारकीचा कजिया होता त्यावरून आपण सेवेसी लेहून दिल्हें आहे कीं, आपली लोहारकी मौजे मजकूरची पुरातन खरी आहे. पिढीदरपिढी वतन खात आलों आहों. तपशील आपला आजा हिरोजी व पणजा रंगोजी नांदत होता. हें आपण पांढरीच्यामुखें शाबूत करून देऊं. त्यांस पांढरीच्यामुखें कलमें शाबूत न जाहली त्याजवरून आपण खोटा जाहलों असे; कलमें बितपशील.

१ आपला आजा हिरोजी याची नांदणूक कोणी सांगितली नाहीं.

१ पणजा रंगोजी याचीही नांदणूक कोणी सांगितली नाहीं.

१ घरठाणाहि पूर्वीपासोन आपला वतनी नाहीं.

१ आपल्यास आलियास व गांवची लोहारकी करितो यास चौतीस पस्तीस वर्षें मात्र जाहली. मागें आपला दाखला कांहीं निघत नाहीं.

१ आपल्यास वृत्तीचा कागदपत्र व पुरातन दाखलादुखला असेल तो काढणें ह्मणोन म्हटलें त्यास आपल्याजवळ कागदपत्र पुरातन वृत्तीचा दाखलादुखला व साक्षीही कोणी नाहीं. कालकल्हा कागदपत्र व दाखलादुखला काढूं तरी बातील असे.

९

एकूण पांच कलमें आपल्यानें शाबूत झालीं नाहींत. यावरून आपण खोटा झालों असे. गांवचे लोहारकीसी आपल्यास तालुका नाहीं. कालकल्हा नवदिगर गोष्ट सांगूं तरी सरकारचे गुन्हेगार हें लिहिलें सही. निशाणी सांडस. बिकलम राजाराम त्रिंबक चिटणीस व कुळकर्णी मौजे मजकूर छ. २३ रजब.

गोही.

चंद्रराव देशमुख परगणे अकोलें १.
आबाजी सदाशिव देशपांडे परगणे मजकूर १.
नेवजी पाटील मुकदम मौजे कळस बुदरूक परगणे मजकूर १.
शहाजी पाटील मुकदम मौजे ताभोलें परगणे मजकूर १.
कृष्णाजी देशमुख परगणे अकोलें १.
रामाजी उद्धव देशपांडे परगणें मजकूर १.
उमाजी पाटील मुकदम मौजे जगर्दनी परगणें मजकूर १.
काशी पाटील मुकदम मौजे पंचाळें तर्फ देपूर.

येणेंप्रमाणें खोटपत्र व साक्षीचे कागद व पंचाइतांचा ठराव वगैरे कागद आमचे मनास आणितां लोहारास वतनाचा दाखला पोंहचत नाहीं. तुमचे लोहारकीचे वतनाचा दाखला पुरवून खरे झाले. त्यावरून हें निवाडपत्र सादर केलें असे तरी मौजे मजकूरचें लोहारकीचें वतन तुम्हीं पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनभवून वतनाचा भोगवटा घेत जाणें. सटवा लोहार खोटा जाहला, त्याजला तुम्हांसी काजियाकथला करावयासी प्रयोजन नसे. सदरहू वतनसंबंधें तुमचे माथा हरकी रुपये २०० दोनशें करार केले ते बाळाजी महादेव यांजकडील झडतीस जमा जाहले असेत ह्मणोन निवाडपत्र १.

छ.१९ रबिलावल.

५३३ (१४०). कृष्णाजी जिवाजी यास पत्र कीं, मल्हारजी उगले यांनीं हुजूर विदित केलें कीं, मौजे पिंपरी परगणे सिन्नर येथील पाटिलकी पूर्वीपासून सात आठ पिढ्या आमची आम्हांकडे चालत आली आहे, असें असतां हल्लीं दोन चार वर्षें बहिरजी वलद चवरा,कानडा

इ० स० १७६३।६४.
अर्बा सितैन मया व अलफ.
जमादिलावल १२.

---

533. There being a dispute in regard to the patilki watan of Pimpri in pargana Sinnar between Malharji Ugalya and Bahirji Kanada, its settlement was entrusted to the kamavisdar of the province. Bahirji however absconded and the matter was subsequently reffered for inquiry to Jiwaji Ganesh. Bahirji again absented himself. Some time afterwards he (Bahirji) obtained an order from the Peshwa referring the matter for inquiry to Krishnaji Jiwaji. Krishnaji therefore imposed a process fee of Rs. 300 on Malharji's uncle, Krishnaji Patil, of

A. D. 1763-64.

नवीन पाटिलकीविशीं कजिया करितो, त्यास येविशींची मनसुबी तिगस्तां परगणे मजकूरच्या कमावीसदाराकडे सरकारांतून दिली; तेथून वाद्या पळून गेला. त्याजउपरी जिवाजी गणेश यांसी मनास आणावयाची आज्ञा जाहली, तेथूनही वाद्या गैरहजर जाहला. खोटा होत असतां हल्लीं सरकारांतून मनसुबीविशीं कृष्णाजी जिवाजी यांस पत्र घेऊन त्यांजकडे फिर्याद जाहला. त्यांनीं आपला चुलता कृष्णाजी पाटील यास तीनशें रुपये मसाला करून पैकीं दीडशें रुपये घेतले आणि त्यासही धरून नेलें आहे, तरी येविशीं आज्ञा होऊन सदरहू मसाला माघारा देऊन मनसुबी हुजूर करविली पाहिजे म्हणोन; ऐसीयास हरदूजणांची मनसुबी तेथें विल्हेस लागणार नाहीं, याजकरितां हें पत्र सादर केलें असे, तरी उगले मजकूर याजपासून दीडशें रुपये मसाला घेतला असेल त्यापैकीं पंचवीस रुपये मसाला ठेवून बाकीचे रुपये माघारे देणें, आणि हरदूवाद्यांसही हुजूर रवाना करणें. जाजती उपसर्ग न करणें, हरदूजणांची मनसुबी हुजूरच मनास आणिली जाईल म्हणोन ताकीद. पत्र १.

५३४ (१७७). बाळाजी केशव बेडेकर यानीं विदित केलें कीं, मौजे करंजगांव तर्फ पंचनदी तालुके सुवर्णदुर्ग येथील खोती महाजनकी हें वतन प्राचीन आपलें त्यास बाळाजी महादेव दाबका व दामोदर कृष्ण करमरकर कजिया पहिला सांगत होते त्याचा इनसाफ हबशी सिद्दीसात यांनीं केला तेव्हां इनसाफाचेरुईनें ते खोटे जाहले, आपण खरा झालों; सबब त्यांनीं खरेपणाचा महजर आपणास करून दिला, आपण वतन अनुभवीत असतां तुळाजी अंग्रे यांचे कारकीर्दीत त्यांनीं इनसाफ न करितां गांवचा इजारा वाद्यास दिला तदोत्तर ते प्रांतींचा अमल सरकारांत आल्यावर रामाजी महादेव यांनीं न्याय केला. ते दाबके करमरकर खोटे जाहले आपण खरा जाहलों, तेव्हां गांव आपले दुमाला करून खरेपणाचें पत्र मजला त्यांनीं करून दिलें. त्याजवर वादी श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांसी फिर्याद जाहले, पहिल्या मनसब्या जाहल्या होत्या त्या व भोगवटे मनास आणून खोती महाजनकी आमची वतनी असें खरें जाहलें. रामाजी महादेव यांस निवाडपत्र करून द्यावयाची आज्ञा जाहली. निवाडपत्र करून द्यावें तों ते साष्टीस गेले यामुळें न जाहले येविशींची खबर सुभाची आहे. याजवर मागती वादे हुजूर येऊन गैरवाका समजावून वतन अमानत करविलें, आणि सुभाहून बाळाजी महादेव

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. साबान २.

---

which he levied Rs. 150, and also took Krishnaji away prisoner. Malharji requested that the case should be transferred and tried at the Huzur and that the process fee levied be returned to him. Krishnaji was ordered to refund the amount and to send the case and the parties to the Huzur for trial.

534. This Sanad relates to a dispute regarding a khoti watan and refers to the fact that the village of Karanjgaon in tarf Panchnadi in taluka Suwarnadurga was first under the rule of Siddhi, then under the Angria, and afterwards under the rule of the Peshwa.

A. D. 1768-69.

करमरकर चाकर दिमत कुळकर्णी कसबे मुरूड याचें नांवें इजारा करून कागद घेऊन गांवचा कारभार वादी करितात. शेतें व चउत्रें बांधितात आगर नेमावणी व श्रीगणपतीचें तळें प्राचीन होतें तें काढून शेत करितात. दाबके करमरकर यांचें शेत ठिकाण गांवांत व रानीं नसतां भोगवटा करितात, बाळाजी महादेव करमरकर मुरूडचा नवाच वाद्यांनीं आणून तो आपला करमरकर ऐसें साधक समजोन दामोदर कृष्ण करमरकर आपणासी वाद सांगतात. इजाऱ्याचा चढ धारेकरी रयातापासून मुलूक शिरस्तियाखेरीज जाजती घेतात. याची फिर्याद सुभा केली परंतु ते अमलांत आणित नाहींत. तर स्वामींनीं येविशीची ताकीद करावी म्हणोन; त्यास सदरहूप्रमाणें यांचा मजकूर खरा असला तर पेशजीप्रमाणें गांव बेडेकराकडे चालवणें. करमरकर दाबके यांचीं वतनी ठिकाणें असतील तीं त्यांजकडे चालविणें, त्यांचे ठिकाणाखेरीज दुसरीयाचे ठिकाणीं त्यांस लागवड करूं न देणें म्हणून, रामाजी महादेव यांचें नांवें चिटणिसी. पत्र १.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. साबान ३.

५३५ (१८७). खंडो शामराज व लक्ष्मण राम व बापू बाजी बेलसरे जोशी कुलकर्णी मौजे जेजुरी व साकुर्डे व मौजे राजेवाडी व जोशी मौजे आंबळें तर्फ कन्हेपठार प्रांत पुणें यांचा व मोरो बाबाजी बेलसरे जोशी कुलकर्णी देहाय मजकूर यांचा एकजथी भाऊपणाचा कजिया लागोन मनसबी हुजूर पडली, त्यास हे त्रिवर्ग म्हणत कीं मोरो बाबाजी व आम्ही एकजथी भाऊ वतनाचें निमे विभागी व मोरो बाबाजी म्हणत कीं हे त्रिवर्ग आमचे हाडभाऊ नव्हत पाठराखे आडनांवाचे बेलसरे आहेत, याप्रमाणें कज्या होता म्हणोन मौजे जेजूरीचें वतन अमानत करून हरदूवाद्यांस बहिष्कृत केलें होते, त्यास पंचाईत मतें निवाडा होऊन हे त्रिवर्ग मोरो बाबाजीचे एकजथी भाऊ निमे वतनाचे विभागी ऐसें खरें जाहलें. मोरो बाबाजी खोटे पडले. त्यानें त्रिवर्गास यजितखत लेहून दिलें. सरकारचे हरकी गुन्हेगारीची निशा जाहली. सबब मौजे जेजूरीचें ज्योतिष व कुळकर्ण मोकळें केलें असे तरी मौजे मजकूरचें ज्योतिष व कुळकर्ण खाड्याचें निमें वजा करून बाकी निमेंत एकसाल खंडो शामराज व लक्ष्मण राम व बापू बाजी व एक साल मोरो बाबाजी याप्रमाणें अनभवितील. हल्लीं साल खंडो शामराज याचें हवाला करणें. कुलकर्ण हे त्रिवर्ग चालवून उत्पन्न घेतील. ज्योतिष हे प्रायश्चित घेत तोंवर गुमास्ता ठेवून चालवितील म्हणोन, निळकंठ महादेव प्रांत पुणें यांस चिटणीसी छ. ३ साबान. पत्र.

---

535. There being a dispute regarding the Joshi Kulkarni watan of Jejuri and other villages, the watan had been attached, and both parties had been excommunicated (by order of the Huzer.) When the dispute was decided, a present and a fine were levied from the successful and unsuccessful parties respectively. It was also ordered that till the parties performed a penance, and got themselves admitted into the caste a substitute should perform the duties.

A. D. 1763-64.

५३६(१९२). शंकराजी नारायण भागवत यांनीं हुजूर विदित केलें कीं, मौजे खेडें-राहटगर कर्यात नेवरे येथें आपलीं वतनी ठिकाणें तीन आहेत, त्यास आपले वडील परागंदा जाहले, त्याजवर गांवकरी ठिकाणें चालवीत होते, अलीकडे फाटक व आगाशे आमचीं गयाळी ठिकाणें चालवितात. त्यास तुळाजी आंग्रे यांचे कारकीर्दीस नेमावणी करावयाची ताकीद जाहली त्याजवरून ठिकाणांचे कागदपत्र होऊं लागले, तेसमयीं परशराम कृष्ण यांजकडे एक ठिकाण भागवताचें होतें त्या ठिकाणास नवाच शब्द उत्पन्न करून भागवताचें ठिकाण आपणविकत घेतलें म्हणोन बोलले. तेव्हां आपले दाईज मायदेव याचा व फाटकाचा ठिकाणाविशीं कीजया जाहला. त्याजवर सरकारांत अमल आलियावर नवी कीर्द करावयासी पाहणदार आले त्यांनीं ठिकाणांचे वतनदार मनास आणून ठिकाणझाडे करूं लागले. तेव्हां फाटकाचा व आपले दाईज यांचा कजिया होऊन मायदेव देशमुख देशपांडे यांजवळ गेले; आणि पाहणदारास चिठी आणिली कीं ठिकाण भागवताचें आहे, भागवताचें नांवें चालवणें. तेव्हां हरदूजणांचा कजिया होऊन सुभा फिर्याद गेले. त्याजवरून सुभाहून सदरहूची पंचाईत अमानत खोताकडे नेमून दिली. तेव्हां फाटकांनीं करीना लिहून दिला कीं ठिकाण भागवताचें खरें परंतु आमचे वडिलांनीं विकत घेतलें आहे. वरील शेतमात्र घेतलें नाहीं. म्हणून करिन्यांत लेहून दिलें त्याजवरून मनास आणितां फाटकाजवळ खेरदीखत नाहीं व साक्षभोजेही पुरत नासे जाहलें. तेव्हां सुभाहून ठिकाण अमानत केलें. त्यावरून फाटक हुजूर येऊन पत्र घेऊन गेला कीं, हरदूजणांचा इनसाफ करून विल्हे करणें, त्यास आमचा इनसाफ बारकाईनें शोध जाहला पाहिजे म्हणोन; त्याजवरून हरदूजणांचा इनसाफ राजेश्री रामशास्त्री यांजकडे नेमून देऊन सदरहू ठिकाण व ठिकाणावरील शेत इनसाफ होई तोंपावेतों सरकारांत अमानत करून हे सनद सादर केली असे, तरी सहरहू ठिकाण व शेत अमानत ठेवून मौजे मजकूरचे अमानत खोताकडे कमावीस सांगोन ठिकाणाचा व शेताचा आकार होईल तो सरकार हिशेबीं जमा करणें. हरदूवादी यांस मनसुफीस हुजूर रवाना करणें म्हणोन येविशीं. पत्रें.

इ० स० १७६३।६४
अर्बा सितैन मया व अलफ.
रमजान २०.

२ फडनिसी ——————————— सनदा.

१ मोराजी शिंदे तालुके रत्नागिरी यांस सदरहूप्रमाणें.

१ हरी गणेश कमावीसदार अमानत खोत यांसी.

२

१ रामशास्त्री यांस कीं, वाजबी मनसुफी करून विल्हे करणें म्हणून.

३

536. A dispute regarding land in Khede Rahatgar in Karyat Neware was referred to Ramshastri for decision. The land was, pending decision, ordered to be attached.

A. D. 1763 64.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

५३६ (अ) वेदमूर्ति राजश्री आपण्णा भट ज्योतिषी कसबे तेरदळ व परगणे मजकूर पैकीं देहाय १२ बारा एकूण तेरा गांव यांनीं हुजूर विदित केलें कीं कसबे मजकुरीं ब्राम्हणांचेघरीं व सर्व यातीचेघरीं आमचे सर्व कायदे आहेत, त्यास वेदमूर्ति श्रीपत भट ग्रामउपाध्ये कसबें मजकूर याचे ग्रामउपाध्यायपण ब्राम्हणांचेघरचें असतां म्हणतात कीं, कसबे मजकुरी ब्राम्हणांचे व इतर यातीचे घरीं आपले पांच कायदे आहेत, सबब एतद्विषयीं त्यांचा आपला कजिया लागला यास्तव राजश्री नारायणराव वेंकटेश यांनीं उभयतां वाद्यांस क्षेत्र कऱ्हाड येथें मनसबी बदल पाठविले, तेथें आम्हां उभयतां वाद्यांजवळून क्षेत्रस्थानीं करीने लेहून घेतले तेसमयीं श्रीपतभट यानीं आमचे पांच कायदे लेहून दिले.

इ० स० १७६३।६४ अर्बा सितैन मया व अलफ. जिल्काद २२

१ गणपती पूजन.	१ घर. (?)
१ घटिका स्थापन.	१ आवधरण.
१ नवग्रह.	२
३	

येणेंप्रमाणें पांच कायदे आपण्णा भटाचे आहेत ह्मणून लेहून दिले ते आमचे चालतातच, व त्यांनीं आपले कायदे म्हणून लेहून दिले बितपशील.

कित्ता.	कित्ता.
१ कलश पूजा पुण्याहवाचन.	१ सुवर्णाभिषेक.
१ विशेषान्न.	१ दुसरा कलश.
१ ऐरणी.	२
३	

एकूण पांच कायदे ब्राह्मणांचे व इतर यातीचे घरीं कसबियांत आहेत, व याप्रमाणें पांच कायदे इतर गांवांत परगणे मजकुरीं ब्राह्मणांचे व इतर जातीचे घरीं आहेत. ह्मणून श्रीपतभट यांनीं लेहून दिलें, त्यावरून क्षेत्रस्थांनीं न्याय मनास आणून श्रीपतभटास विचारिलें, त्यास त्याजवळ त्या गोष्टीचे कागदपत्र अस्सल नाहीं, नकल मात्र आहे, ते दाखविली. भोगवटा मनांस

---

536. (a) A dispute relating to the rights of priest-hood arose between Appana bhat and Shripat bhat of Terdal. Narayanrao Venkatesha, the officer of the prant, reffered the matter for settlement to the Brahmin community of the holy place Karhad. The community decided in favour of Appana bhat and letters were sent accordingly. Some time afterwards, Shripat bhat brought some forged letters to show that the matter was decided in his favour. His claim was rejected and Naaayan Venkatesh was directed to record the forged letters and to continue to appana bhat the rights to which he was entitled.

A. D. 1763-64.

आणितां तोही नाहीं व साक्षमोजे हीं न पुरत असें भटजीचे मुखें जाहलें. परगणे मजकुरीं तिघे जोशी; त्यांत तेरा गांवचे आम्हीं, व चवदा गांवचा एक, व सहा गांवचा एक; एकूण दोघे जोशी राहिले त्यांचे साक्षीस उभयता वादे राजी होऊन मान्यपत्रें लेहून दिलीं. त्या-वरून त्या दोघांस क्षेत्रमजकुरीं आणून पुरसीस केली. त्यांनीं सांगितलें कीं, आमच्या विसा गांवांत ग्रामउपाध्यायाचा दाखला नाहीं. त्यावरूनही श्रीपतभटाच्या सर्व गोष्टी अप्रमाण जाणून क्षेत्रस्थ समस्त ब्राह्मण व देशमुख देशपांडे यांनीं नारायणराव व्यंकटेश यांचे नांवें पत्र लेहून त्यांजकडे मनुष्याबरोबर पाठविलें त्या पत्राची मखलासी त्यांजकडील बापूजी विठ्ठल फडनीस यांनीं करून तेरदळांत मशारनिल्हेकडील मल्हार नारायण कमावीसदार आहेत, त्यांस पत्र द्यावयाचा सिद्धांत केला. ऐसें असतां श्रीपतभट मार्गे कऱ्हाडांत राहून मधिलेमध्यें बाळबोध अक्षराचें पत्र घेऊन गोकाकास आले. त्या पत्राची चौकशी बापूजी विठ्ठल यांनीं मनास आणितां तें पत्र निर्जीव लटकें असें जाणून आमच्या मखलासीच्या पत्रांत लिहिलें आहे. इतकें जाहलें असतां आपणांस पत्र देऊन वृत्तीचा उपभोग चालवित नाहीं. तरी येविशीं आज्ञा जाहली पाहिजे. ह्मणोन विनंति केली. व कऱ्हाडकरांनीं तुह्मांस पत्र दिलें आहे त्याची नक्कल व बापूजी विठ्ठल याचें दस्तुरचें मखलासीचें पत्र ऐसी आणून दाखविलीं तीं मनास आणून राजश्री कृष्णाजी त्र्यंबक यांस विचारिलें, त्यांनीं विनंति केली कीं, उभयतां भटजींचा न्याय आह्मां देखत क्षेत्र मजकुरीं जाहला आहे अपण्णाभटांनीं नक्कल आणिली आहे त्याप्रमाणेंच असल पत्र देशपांडे यांचे दस्तूरचें आहे, त्याजवरी आह्मीं विनंति केली कीं दुसरें पत्र श्रीपतभटांनीं नेलें आहे तें आह्मांस दखल नाहीं. त्यांस आपण्णा भटाची वृत्ति चालें तें केलें पाहिजे ह्मणून, ऐशियास याप्रमाणें मजकूर असतां त्याची वृत्ति न चालवावयास कारण काय ? हल्लीं हें पत्र तुह्मांस लिहिलें आहे. तरी तेरदळांत तुह्मांकडील कमावीसदार आहे त्यास येविशीं पत्र देऊन अपण्णाभटाची वृत्ति अपण्णाभटाकडे वाजबी चाले ते गोष्ट करावी. श्रीपतभटांनीं तुह्मांस दुसरें बाळबोध पत्र आणिलें आहे तें निर्जीव लटकें असल्यास त्याजला न देणें, दफ्तरीं रद्द करून ठेवणें. याशिवाय प्रांत मजकुरीं अपण्णाभट याचे इनाम गांवगन्ना वाजबी असेल तें तुम्हीं आपलें दफ्तरीं रुजू पाहून वाजवी असिल्यास याचें याजकडे चालवणे. श्रीपतभट याजकडे अप्रमाणता आली, सबब त्याचें यजितपत्र घेऊन याजपाशीं द्यावें. वाजवी असेल तें करावें. पुन्हां बोभाट येविषयींचा येऊं देऊं नये. या पत्राची नक्कल करून घेऊन हें पत्र भटजीजवळ परतोन भोगवटीयास देणें ह्मणोन, नारायणराव व्यंकटेश यांचें नांवें चिटणिशी. पत्र १.

छ. २२ जिल्काद.

दादासाहेबांच्या रोजकीर्दीपैकीं.

५३७ (२२८). गोविंद संभाजी गोगले वस्ती अमदानगर यांनीं हुजूर विदित

537. Govind Sambhaji Gogale of Ahmadnagar complained that his cousin had taken all the family property and asked that it may be devided between them. Ganesh Vithal of Ahmadnagar was therefore directed to pay Govind his share, recovering

A. D. 1763-64.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. मोहोरम २९.

केलें कीं, भवानी रघुनाथ गोगले आपले चुलत बंधू व आपले तीर्थरूप एकेठायीं नांदत होते, त्यास आपले तीर्थरूप निवर्तले. तदोत्तर भवानी रघुनाथ विभक्त जाहले. घरचे वित्तविषय वस्तवानी सर्व त्यांनीं घेतली आहे, आपल्यास वांटा देत नाहीं. याजकरितां ताकीद जाहली पाहिजे म्हणोन; त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तरी याचें त्याचें वर्तमान वाजबी मनास आणून गोविंद संभाजी याचा विभाग जो पोहोंचेल तो देणें, आणि तीनशें रुपयेपर्यंत वांटा आला तर सरकारांत कांहीं न घेणें जाजती वांटा आल्यास वांट्यांपैकीं दहक घेऊन सरकार हिशेबीं जमा करणें म्हणोन, गणेश विठ्ठल तर्फ अमदानगर यांचे नांवें चिटणिशी पत्र १.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

५३८ (२४०). राघो विश्वनाथ गणपुले कारकून दिमत श्रीभार्गवराम यांनीं पिलाजी बिन आत्माजी अंबरे व संभाजी बिन कृष्णाजी अंबरे खोत मौजे चिरणी तर्फ खेड तालुके सुवर्णदुर्ग यांचा कजिया आहे, त्याची मनसबी श्रीसंनिध यांनीं पंचाईत वगैरे मिळोन मध्येंच केली आणि श्रीचे नांवाचे शिक्के करून हरदू खोत मजकुरांस कागदपत्र करून दिलें सबब सुभास, यांचे भाऊ सदाशिवभट गणपुले यांस नेऊन गुन्हेगारी लाविली आहे. तर येविशीं आज्ञा झाली पाहिजे म्हणोन; त्याजवरून हें पत्र लिहिलें आहे तरी यांनीं तुमचे तालुक्यांतील मनसबी करूंनये ते गोष्ट यांजपासून घडून चुकली. सबब यांस अन्याय माफ करून यांचे भावास निरोप देणें, आणि हरदूजणांची मनसबी वाजबी मनास आणून करणें म्हणोन, रामाजी महादेव यांस चिटणिसी पत्र १.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. सफर १७.

छ. १७ सफर.

दादासाहेबांच्या रोजकीर्दीपैकीं.

५३९ (२४२) नारो कृष्ण यांचे नांवें पत्र कीं, मंगु जाट यानें हुजूर येऊन विदित

---

from him, in case his share was worth more than Rs. 300, one-tenth of it for Government. In case the share was of less value no recovery was to be made for Government.

538. A dispute between Pilaji bin Atmaji Ambare, and Sambhaji bin Krishnaji Ambare, in regard to the Khoti of Chirani in tarf Khed of Taluka Suvarnadurga was, without authority decided with the aid of panch by Ragho Vishwanath Ganpule, a karkun attached to the temple of Shri Bhargavram, and a document bearing the seal of the deity was issued by him. His brother was therefore taken to the subha and was called upon to account for Ragho's conduct. The matter having reached the Peshwa, a pardon was given to Ragho, and his brother was ordered to be released.

A. D. 1764-65.

539. Dhira bhara, a Jat of Badapur had three daughters, who with their

इ. स. १७६४-६५ खमस सितैन मया व अलफ रबिलावल १७.

केलें कीं, आपला सासरा धीरा भारा जाट वस्ती बडापूर याचे पोटी तिघी लेकी; तिघांस दिल्या; वडील हिरी, मधील सुजान व धाकटी मजला दिली, आणि तिघां जावयांस घरीं ठेविलें. सासरा होता तों आम्हीं तिघे साडू एकजागीं सासऱ्याचें घरीं धंदा करून भोजनखर्च वांटणीप्रमाणें देऊन ज्यास जो पोटखर्चाशिवाय खर्च लागेल तो घ्यावा बाकी अखेरसालीं कमज्यादा पावतीचा हिशेब करून बरोबर एकशी पावती करावी, याप्रमाणें चालत होतें. त्याजउपर हिरा जाट मयत जाहला, त्यावर कांहीं दिवस चालत होतें. असें असतां आपल्या बायकोनें त्या उभयतां मेहुण्यांस म्हटलें कीं, आपला हिशेब करून घेणें तेव्हां त्यानीं कजिया केला. म्हणोन आपल्या बायकोनें जीव दिला उपरांतिक या दोघांनीं आपला जांवई मारिला. दोन खून जाहले. त्यांनीं केले. त्यांचा माझा कज्या भारी झाला. दोहों चौ ठिकाणीं पंचाईत जाहली. वांटा देतों ह्मणून करार केला असून फिरोन कज्या करितात. येविशीं ताकीद जाहली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी यांचें वर्तमान वाजबी मनास आणून वाजबी असेल तें करणें. हिरी व सुजान दोघीजणी मंगु मजकुराचे वादे जहानाबादेंत आहेत, तेथील अंमल राजश्री माधवराव शिवदेव यांजकडे आहे, सबब राजश्री त्रिंबकराव शिवदेव यांसही पत्र सादर केलें आहे, तरी ते व तुह्मीं वाजबी न्याय करून तुह्मीं व त्यांनीं कोणाची रुरयात एकंदर न करितां रास्ती करून यथाविभागें वाटा करून ज्याचा त्यास देणें, आणि सरकारांत चौथाई घेऊन हिशेबीं जमा करणें. कोणाचा पक्ष कोणी परिच्छिन्न न करणें म्हणोन चिटणिसी. पत्र १.

येविशीं त्रिंबकराव शिवदेव याचे नांवें यांचा कजिया मनास आणून वाजबी असेल तें करणें म्हणून. १.
२

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

५४० (२९०). कोंडो जिवाजी गाडगीळ यांनीं विदित केलें कीं, राजश्री सदा-

---

A. D. 1764-65.

husbands lived with him. The expenses were shared by all. On Dhira's death one of his daughters asked for a division of the property This led to a dispute between her and the husbands of her sisters as a consequence, she comitted suicide and her sister's husbands killed her son-in-law. The husband of the deceased daughter complained at several places but he could not succeed in getting from his opponents a share in his father-in-law's property. He complained to the Peshwa and Naro Krishna and Trimbakrao Siwadev who had charge of Jahanabad, where the parties were living, were directed to inquire into the matter and to decide it justly and impartially.

540. Kondo Jiwaji complained that certain amounts due to him from Sada-

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. जमादिलाखर.

शिव पंडित सचीव यांजकडे आपलें कर्ज येणें आहे, त्यास फार दिवस जाहले असतां निकाल करीत नाहींत आणि आपण तों लोकांचें कर्ज देणें त्या पेंचांत बहूत आलों आहों, तरी कृपाळू होऊन कर्ज उगवें तें केलें पाहिजे म्हणोन; त्याजवरून पंडित मशारनिल्हे यांचा साहोत्रियाचा अमल आहे त्याचा ऐवज सरकारांतून कारकून पाठविले आहेत त्यांचे गुजारतीनें कोंडो जिवाजी यांजकडे कर्जाचे ऐवजांत पावता करून पावल्याचे जाब घेणें म्हणोन कमावीसदारांस चिटणिसी. पत्रें.

२ परशराम रामचंद्र यांस.

१ कसबें पुणतांबें येथील अमलाविशीं.

१ परगणे मंगळवेढें येथील अमलाविशीं.

२

१ परगणे पैठण निसबत अवधूतराव रघुनाथ यांस.

१ परगणे करकंब निसबत गोविंद हरि यांस.

१ परगणे जालनापूर निसबत आनंदराव भिकाजी यांजकडील आपाजी गणेश यांस.

१ परगणे सुपें निसबत आनंदराव त्रिंबक यांस साहोत्रियाचा अमल व बाबतीचा येविशीं.

६

येणेंप्रमाणें सहा पत्रें दिलीं असेत छ. १९ जमादिलाखर.

बरहुकूम पत्र स्वारी राजश्री दादा, याशिवाय सदरहू परगण्याचे जमीनदारांस सहा पत्रें चिटणिसी दिलीं असेत.

५४१ (२९६). चिंतामणभट गाडगीळ महाजन मौजे अणसुरे कर्यात मिठगव्हाण याचें गाउलीकी ठिकाण आहे, त्याचा दीडशें वर्षें उपभोग चालत असतां हल्लीं नारमहाजनी गाडगीळ बळजोरीनें कजिया करून पांच सात वर्षें शेताचा उपभोग करीत आहेत, तरी येवि-

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. रजब १६.

A. D. 1764-65. shiv Pandit Sachiv had long remained in arrears and prayed for their recovery. Orders were issued to the various Kamavisdars to collect the amount due, out of the Sahotra Amal payable to the Sachiv.

A. D. 1764-65. 541. Visaji Keshav was directed to decide a dispute between ChintamanBhat Gadgil, Mahajan of Ansure in Karyat Mitgavan and Nar Mahajani, regarding a plot of ground, with the assistance of the Khots, Kulkarnis and Mokadams of the neighbouring villages. If the dispute could not be settled by him, Visoji was to send the parties to Ram Shastri Poona.

शींची मनसुबी तुम्ही हरदू वाघांस व भोंवरगांवचे खोत कुळकर्णी व मोकदम सुभा नेऊन कोणाची रुरयात न धरितां वाजबी करणें. इनसाफामुळें खोटा होईल त्याजपासून गुन्हेगारी घेणें. तेथें इनसाफ न होय तरी पुण्यास रामशास्त्री यांजकडे हरदू वाघांस पाठवणें म्हणोन,

विसाजी केशव यांस चिटणिसी. पत्र १.
कृष्णाजी विश्वनाथ यांस. १.
२

५४२ (२९७). सणापा नाईक धारवाडकर याचें कर्ज धारवाड तालुक्यांत वगैरे लोकांकडे येणें आहे, त्याचीं पत्रें अलाहिदा सादर आहेत, व हल्लीं हुजुरून ढालाईत ही पाठविले आहेत, व आणखी राऊत व ढालाईत तुम्हीं आपल्याकडील देऊन मशारनिल्हेचें कर्ज वाजबी खताप्रमाणें वसूल करून देवणें, आणि जो ऐवज वसूल होईल त्याचा सहावा हिस्सा सरकारांत घेऊन हिशेबी जमा करणें म्हणोन,

इ० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. रजब २४.

व्यंकटराव नारायण यांस. सनद १.
विसाजी नारायण यांस. १.
२

रसानगी यादी.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं लेखांक ५४३।५४४.

५४३ (३०७). ५० कमावीस हरकीबाबत रघोजी व फिरंगोजी बिन मल्हारजी शेटे कासार कसबे तळेगांव तर्फ पाबळ प्रांत जुन्नर यांचा व शिदोजी बिन खंडोजी शेटे कासार कसबे मजकूर याचा वतनी वाद्याकरितां कजिया होता, त्याची मनसुबी हुजूर मनास आणितां शिदोजी खोटा जाहला. रघोजी व फिरंगोजी खरा जाहला, सबब यांस सरकारचें निवाड पत्र करून देऊन हरकी करार केली ते जमा गुजारत बाळाजी धोंडदेव कारकून दिमत रामशास्त्री हस्तें राणोजी सांगळा दिमत शास्त्रीबावा. गंजी कोटी छ २३ रोज. रुपये.

इ० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. साबान ३०.

---

542. Orders were issued to recover debts due to Sanappa Naik in the Dharwar district, and to credit to Government a sixth part of the amount so recovered.

A.D. 1764-65.

543. A nazar of Rs. 50 was taken from Raghoji and Firangoji Kasars of Talegaum in tarf Pabal for having own a suit regarding a house pertaining to their watan. The amount is credited as received from Balaji Dhondadeo, a karkun under Ram-Shastri, by the hands of Ranoji Sagla employed under the said Shastri.

A. D. 1764-65.

५४४ (३२३). घनशेट व वेलाशेट व येसशेट करंजे सावकार या त्रिवर्गाचा भाऊपण्याचा कजिया होता, त्याचा इनसाफ सरकारांत मनास आणून फडशा केला, सबब त्रिवर्गीकडे नजरेचा ऐवज करार केला तो; बरहुकूम यादी छ० १८ जिल्हेज सालमजकूर शके १६८६ तारणनाम संवत्सरे रुपये.

इ० स० १७६४।६५
खमस सितैन मया व अलफ.
जिलकाद २३.

१२५०० तूर्त रोख घ्यावे.
१२५०० खंडेराव पवार, यशवंतराव पवार यांचे पुत्र यांजकडे मशारनिल्हे यांचा ऐवज येणें त्यापैकीं, सरकारांत वसूल करून घ्यावे.

२५०००

एकूण पंचवीस हजार रुपये यासी वाटणी नांवनिशी.

घनशेट करंजे. ———— रुपये.

३१२५ तूर्त रोख घ्यावे ते मशार निल्हेचे रद्द कर्जी त्याहावे.
३१२५ खंडेराव पवार याजपासून घ्यावे.

६२५०

वेलाशेट करंजे. ———— रुपये.

६२५० तूर्त रोख घ्यावे.
६२५० खंडेराव पवार याजपासून घ्यावे.

१२५००

येसशेट करंजे. ———— रुपये.

३१२५ तूर्त रोख घ्यावे.
३१२५ खंडेराव पवार यांजपासून घ्यावे.

६२५०

येणेंप्रमाणें पंचवीसहजार रुपयांची वांटणी जाहली. त्यापैकीं निमे तूर्त वांटणी बरहुकूम घ्यावे ते सरकारांत वसूल जाहले. बाकी निमे राहिले, तेही खंडेराव पवार यांजपासून वांटणी बरहुकूम वसूल करून घ्यावे येणेंप्रमाणें करार असे. कलम १.

छ० २३ रोज.

५४५ (३४१). विष्णु गौडा बिन खान गौडा देसाई कर्यात तडकोड सरकार मजकूर येथील देशमुखीचें वतन आपले वडील करीत आले. दरम्यान तेगुरकर मुष्टगीर जबरदस्त प्यादे व स्वार बाळगून भोंवतालचे परगणियाचा दिवाणी अमल करून होते, त्यांनीं

इ० स० १७६४।६५
खमस सितैन मया व अलफ.
जिल्हेज १३.

---

544. A despute among Ghanshet, Welashet and Yesashet Karanje of Poona having been settled by Government, a nazar of Rupees 25000 was levied from these persons.

A. D. 1764-65.

545, A dispute regarding the Deshmukhi watan of Karyat Tadkod arose

आपले वडिलांस धुडावून जबरदस्तीनें वतन अनुभवूं लागले. तीन चार डोया देसगत केली, आपले वडिलांनीं कजिये केले परंतु उपाय चालला नाहीं. रायापा नाईक मुष्टगिर मृत्यु पावला. त्याचे पोटीं संतान नाहीं एक स्त्री चौदा वर्षांची राहिली, ते समयीं सावनूरकर नबाब यांजकडे आपण जाऊन आपलें पूर्वतर वर्तमान सांगितलें, त्यांनीं मनास आणून आमचें वतन पूर्ववतप्रमाणें आपले दुमाला करून पत्र करून दिलें. त्याप्रमाणें करवीरवासी महाराज व हिंदुराव घोरपडे व सरकारचे तर्फेचे राजश्री नारायणराव व्यंकटेश यांचीं पत्रें घेऊन वतन अनुभवीत आहों. चाळीस पंचेचाळीस वर्षें जाहलीं. हल्लीं श्रीनिवास नाईक मुष्टगिर रायापा नाईकाचे बायकोनें आपले बहिणीचा लेक पोसणा घेतला, तो कसबेमजकूरचे छावणीचे मुक्कामीं हुजूर येऊन पुरातन आपली देशमुखी सादर बळेंच करीत आहेत, तरी साहेबीं इनसाफ मनास आणून वतन आपलें आपणास द्यावें ह्मणून फिर्याद केली; त्यावरून साहेबीं आह्मास हुजूर आणून तकरीरा व जामीन घेऊन मनसुबी पंचाइताकडे नेमिली. पंचांनीं लिखित भुक्त साक्ष मनास आणून पांढरीच्या साक्षीवर ठराव केला. आम्ही उभयतां राजी होऊन कतबे राजीनामे देऊन पांढरीवर गेलों. तेथील वदणुकाचा व कागदपत्रांतील अर्थ पंचाईतांनीं ध्यानांत आणतां पुरातनवृत्ती सादरांची, तेगुरकर मुष्टगिरांनींजबरदस्तीनें वतन अनुभवलें, त्यास वतनाशीं संबंध नाहीं. असा निश्चय झाला तेव्हां श्रीनिवास यानें दिकत घेतली कीं, पूर्वील वतन जैन सादराचें त्याचे वंशीचे हल्लीं विष्णु गौडा वगैरे सादर देशमुखी करितात, हे नव्हेत, हे आपण दिव्य करून खरें करीन ऐसें बोलोन कतबा दिला आम्हीही त्याच्या दिव्यास राजी होऊन कतबा दिला. त्याजवरून बरोबर सरकारचे कारकून व शास्त्री देऊन कसबे मजकुरीं श्रीवीरभद्र देवासंनिध तप्तकटाह दिव्य नेमून साहेबीं रवानगी केली. पांढरीवर भोंवताले परगणेयाचे जमीदार व भोंवरगांवचे पाटील समाकूळ पांढर मेळवून दिव्य केलें. श्रीनिवास मुष्टगिर याचा उजवा हात मध (ध्य) पर्वपर्यंत बोटें जळोन खोटा जाहला ते समयीं जाहल्या करीन्याचें पत्र समस्त जमीदार व पांढर यांचे साक्षीचें हुजूर आलें त्यांतील वगैरे मनसुबीचा अर्थ ध्यानांत आणून श्रीनिवासापासून यजितपत्र तेगुरचे देशमुखीचा

A. D. 1764-65. between Vishnu Gouda bin Khangonda Desai and Shriniwas Mushtagir, and was referred to the Panch. After going through the written documents, the Panch heard the evidence of the residents of the pargana, and decided in Vishnu Gouda's favour. Shriniwas objected and offered to prove his claims by under going an ordeal. The Peshwa accepted his offer and the parties were sent to the village, incharge of Government Karkuns and a Shastri with orders for a fire ordeal at the temple of Virbhadra. The Jamidars, ryots and patels of the neighbourhood were assembled and in their presence Shriniwas went through the ordeal; but his right hand up to middle joint of the fingers was burnt and he was proved wrong. He accepted his defeat; and the watan was ordered to be continued to Vishnu Gouda. A nazar of Rs. 11,001 was levied from the successful party.

शिक्का वर करून साहेबीं करून देविलें, तें ध्यानास आणून आपल्यास भोगवटियास पत्र करून द्यावें म्हणोन; त्याजवरून मनास आणितां विष्णु गौडा देसाई याचे वतनासी श्रीनिवास नाईक तेगुरकर भांडत होता, तो इनसाफाचे रुईनें व दिव्यास खोटा जाहला, त्यानें यजितपत्र दिलें तें मनास आणून विष्णु गौडा यांचें देशमुखीचें वतन कर्यात मजकूरचें खरें हें जाणून यास निवाडपत्र करून देऊन हें पत्र तुम्हांस सादर केलें असें, तरी कसबे मजकूरचें देशमुखींचें वतन, हक्क, उत्पन्न, मानपान, इनाम वगैरे सुदामत चालत आल्याप्रमाणें यास व यांचें पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवणें. या पत्राची प्रत लेहून घेऊन अस्सल पत्र भोगवटियास याजवळ परतोन देणें म्हणोन देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी सरकार तोरगळ सुभे विजापूर यांस चिटणिसी. पत्रें १.

नाडगीर देशपांडे कसबे मजकूर यांस. १.

विसाजी नारायण यांस पत्र कीं, सरकारांतून निवाडपत्र करून दिलें असे, तरी तुम्हीं भोंवरगांवचे गोत जमा करून यांस गोतमहजर करून देणें म्हणोन पत्र. १.

विष्णु गौडा यांचें नांवें निवाडपत्र त्यांत यजितपत्राचा मजकूर लिहिला असे. १.

४

चार पत्रांच्या नकला तपशीलवार करून दफ्तरीं ठेविल्या आहेत. येणेंप्रमाणें निवाडपत्र करून देऊन सरकारची नजर करार रुपये.

१०००१ ऐन सरकार.

१००० सखाराम भगवंत यांचें.

११००१

एकूण अकरा हजार एक रुपया करार करून विसाजी नारायण याचा हवाला घेतला असे. रसानगीयादी.

५४६ (३४२) लक्ष्मण सोनार वलद विश्वनाथ सोनार लाड आडनांव मैड मौजे लोणीबुद्रुक व मौजे लोणीखुर्द व मौजे हसनापूर तर्फ हवेली संगमनेर यानें हुजूर मौजे चावडस परगणें नाशिक गंगातीर येथील मुक्कामीं येऊन अर्जे केला कीं, देहाय मजकूरचें सोनारकीचें वतन आपलें पुरातन आहे, त्यास आपण कांहीं कसाल्यामुळें गांवावरून परागंदा जाहलों. येमाजी सोनार आपला आप्तविषयी यानें देहायचें कामकाज चालविलें, त्याजवर मौजे लोणीखुर्द येथील गांवकरी यांनीं उपरी सोनार दुसरा आणून त्याचे हातें सोनारकीचें काम कांहीं दिवस

इं० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. जिल्हेज १३.

546. Laxman Sonar walad Vishwanath Sonar of Loni Budruk in Sangamner had a dispute with Sadashiv walad Malhari Sonar respecting the Goldsmith's watan at the said village, and succeeded in obtaining from the latter a document in

A. D. 1764-65.

घेतलें. मग सदाशिव वल्लद मल्हारी सोनार मौजे वाडेगव्हाण परगणे कर्डे याचा बाजा सिदु सोनार वाडेगव्हाणाहून मौजे लोणीखुर्द येथें येऊन राहिला. सोनारकीचे बलुतें खाऊन गांवची चाकरी केली, त्याजवर सदाशिवाचे बापानेंही चालविलें व सदाशिवही चालवीत आला. त्याजवर आपणही वतनावर येऊन लोणीबुद्रुक व हसनापूर येथील वतन अनुभवूं लागलों; आणि लोणीखुर्द येथील सोनारकीचें वतन पूर्ववतप्रमाणें करावें तों सदाशिव मजकूर कजियास उभा राहिला, आणि त्यानें घटाई करून आपलें चालों न दिल्हें, परंतु आपण वतनाचा वारसा करीतच आलों, त्यास अलीकडे कैलासवासी श्रीमंत नानासाहेब यांजपाशीं फिर्याद जाहलों, ते वेळेस सरकारांतून मनसुबी राजश्री नारोबाबाजी यांजवर नेमून दिली, त्यांनीं मनास आणून निवाडा केला. आपण खरा जाहलों, सदाशिव मजकूर खोटा जाहला. तेव्हां त्यानें नारो बाबाजी याचे विद्यमानें सन ११६६ मध्यें यजितखत लिहून दिलें त्या उपर सरकारचें निवाडपत्र करून घ्यावें तरी आपली नातवानी बहुत, निवाडपत्र सरकारांतून करून घ्यावयासी मवसर नाहीं याजमुळें राहिलें. मग वतनावर जाऊन लोणीखुर्द येथील सोनारकीचें कामकाज करूं लागलों, त्याजपासून आपण वतन अनुभवित आलों. ऐसें असतां साल गुदस्तां सदाशिव सोनार सरकारांत फिर्याद जाहला, त्याजवरून सरकारांतून राजश्री बाळाजी महादेव याजकडे मनसबीविशीं पत्र दिल्हें त्यांनीं आपल्यास मसाला करून आणिले, आणि आपलें व त्याचें वर्तमान पेशजी सदाशिव यानें येजितखत नारोबाबाजी यांचे विद्यमानें करून दिलें तें मनास आणितां आपण खरा जाहलों. सदाशिव खोटा जाहला. वतन आपल्याकडे चालत आहे. ऐसेयास साहेबीं कृपाळू होऊन यजितखत आपल्याजवळ आहे तें पाहून निवाडपत्र भोगवटीयांस करून दिलें पाहिजे ह्मणोन विनंती केली, व यजितखत आणून दाखविलें त्याचा मजकूर बितपशील.

यजितपत्र शके १६७९ ईश्वरनाम संवत्सरे चैत्र वद्य १३ ते दिवशीं लक्ष्मण सोमार वल्लद विसाजी सोनार ईबन रामजी सोनार मौजे लोणीबुद्रुक व मौजे लोणीखुर्द व मौजे हसनापूर तर्फ हवेली संगमनेर यांसी सदाशिव सोनार वल्लद मल्हारी सोनार ईबन सिदू सोनार मौजे वाडेगव्हाण तर्फ कर्डे सुरू सन ११६६ कारणें यजितपत्र लेहून दिलें ऐसीजे आमचा व तुमचा कजिया लोणीखुर्दच्या सोनारकीबद्दल होता, सबब तुझे पुरातन वतन लोणीबुद्रुक एक गांव होता, तेव्हांपासून आहे, त्याजवर एक्या गांवची जमीन तोडून लोणीखुर्द व हसनापूर जाहले ते वेळेस तुमचा पूर्वज

---

which his claims were recognized. The Peshwa there-upon issued a Sanad to Laxman. The facts of the case, the evidence recorded and the decision arrived at are given in detail in this document.

सेव्याजी सोनार पणजा मयत जाहला त्याचे बायकोनें दुसरा घरोबा भेरडपुरच्या सोनाराशीं केला. तुमचा आजा रामशेट लहान होता तो पोटाखालीं भेरडपुरास गेला. मागें गांव चालवावयासी कोणी नाहीं. तेव्हां लोणीखुर्द येथील पाटलानीं पाथरकर सोनार दहा वीस वर्षें कामावर लाविला. त्याजवर चारणकर सोनार कामास लाविला. त्यानें काम दोन तीन वर्षें लोणीखुर्दचें केलें. त्याजउपरांतिक आपला आजा सिदूजी सोनार वाडेगव्हाणाहून लोणीखुर्द येथें आला, गांवची चाकरी करून सोनारकी बलुतें खाऊन राहिला, त्यामागें मल्हार सोनार आपला बाप यानें सोनारकीचें काम चालविलें, त्याजवर अलीकडे आपणही चालवित आलों, तुम्ही वतनाचा वारसा करीतच गेलेत परंतु निवाडपत्र करून कोणा हकमाशीं जाऊन निवाडा केला नव्हता. अलीकडे तुम्ही राजश्री नरहरपंत कमावीसदार परगणे संगमनेर याजपाशीं फिर्याद गेला, त्याजवर त्यांनीं निर्मळपिंपरीचें गोत नेमून दिलें. मग निर्मळपिंपरीकरांनीं तुम्हांस व आपणांस जामीन फर्माविलें. ते समयीं आपण पंधरा रोजांचा वायदा करून गैरहाजिर होऊन पुणियास गेलों. राजश्री बाबूराव दीक्षिताचा हुकूम नरहरपंत कमावीसदारास आणिला, आणि नरहरपंतांनीं लोणीखुर्दची पांढरी समाकूळ संगमनेरास नेऊन तहकीकांत करितां तुमचें वतन ऐसें जाणोन तुमचे हवालां केलें, त्याजवरून आपण माणसें घेऊन राळेगव्हाणास गेलों, मग आपण श्रीमंत पंतप्रधान स्वामी याशीं फिर्याद जाऊन हुजूरचा हुकूम मनसुबी करावयाविशीं राजश्री नारोपंत सुभेदार यांजवर आणिला, मग सुभेदारसाहेबांनीं तुम्हांस व आपणांस जामीन व तकरीरा फर्माविल्या, त्याजवरून आपण व तुम्हीं तकरीरा दिल्या. बितपशील.—

तकरीर कर्दे बेशमी

लक्ष्मण सोनार वलद विसाजी सोनार ईबन रामजी सोनार मैड मौजे लोणी परगणे संगमनेर सन ११६६ कारणें साहेबांचे सेवेशी तकरीर लेहून दिली ऐसेजे, सदाशिव वलद मल्हारी सोनार मिसाळ याचा व आपला मौजे लोणीखुर्द परगणे संगमनेर येथील सोनारकीच्या वतनाचा कजिया लागला आहे, त्याबद्दल उभयतांची मनसुबी हुजूर साहेबाकडे सांगितली. साहेबीं आपल्यास काम्हूरच्या मुक्कामीं पुरसीस केली कीं सदाशिव मजकूर म्हणतो कीं, वतन सोनारकीचें मौजे लोणीखुर्द येथील पूर्वीपासून आपलें आहे, आपण वतन अनभवीत असतां दीड वर्ष

तकरीर कर्दे बेशमी

सदाशिव वलद मल्हारी सोनार ईबन शिदू सोनार मिसाळ मौजे लोणीखुर्द परगणे हवेली संगमनेर सुरू सन ११६६ कारणें. साहेबांचे सेवेशीं तकरीर लेहून दिली ऐसीजे, लक्ष्मण सोनार मौजे लोणीबुद्रुक परगणे मजकूर हा राजश्री नरहरपंत कमावीसदार परगणे मजकूर यांजपाशी फिर्याद होऊन रुपये १६ सोळा मसाला करून आपलें वतन मौजे मजकूरचें सोनारकीचें वतन आपलें आपण पूर्वीपासून करीत असतां आपणांस सोनारकी वतनापासून बेदखल केले. आणि वतन सोनारकीचें लक्ष्मण मजकूर वर्ष दीडवर्ष जाहलें (अनुभवितो) याजकरितां आपण फिर्याद हुजूर

जाहलें लक्ष्मण मजकूर हा राजश्री नरहरपंत कमावीसदार परगणें मजकूर यांजपाशीं फिर्याद होऊन त्यांजकडून आपणांस रुपये सोळा १६ मसाला करून वतनापासून बेदखल करविलें, आणि लक्ष्मण मजकूर मौजे मजकूरचें वतन सोनारकी करीत आहे म्हणोन सदाशिव मजकूर म्हणतो आणि तुम्ही मौजे मजकूर सोनारकी वतन आपलें म्हणोन म्हणता तर येविशीं काय हकीकत आहे ते बयादवार लेहून देणें म्हणोन आज्ञा केली, त्यास मौजे मजकूरचें वतन सोनारकी आपलें पूर्वीपासून आहे, मौजे लोणी हा गांव पूर्वी एकच होता, त्यास शिवाजी पद्मनाभ याचे अमलांत एक लोणी होता, त्याचा मौजा तुटून दोन लोण्या लोणीबुद्रुक व लोणीखुर्द दोन गांव जाहले, त्याजवर लोणी बुद्रुक येथील फिरोन दुसरा मौजा तुटून हसनापुरगांव जाहला, एकूण एक्या लोणीचे तीन गांव जाहले. मौजे तुटले तेसमयीं आपला पणजा शेव्या सोनार होता, त्यानें तिनही गांवचें वतन सोनारकी केली, त्याजवर शेटयाजी मजकूर मयत जाहला, त्याचा पुत्र आपला आजा रामजी सोनार लहान होता, त्यास आपली पणजी रखमाई इनें मौजे भेरडपूर परगणे मजकूर येथील सोनारासी दुसरा घरोबा केला तिच्या पोटाखालीं रामजी मजकूर गेला. गांवचे सोनारकीचें काम काज चालवावयासी कोणी नाहीं याजवर यमाजी सोनार मौजे पाथरें परगणे मजकूर हा आपला शरीरसंबंधी होता, सबब त्यानें तीन गांव चालविलें, त्याजवर यमाजी मेलियावर त्याचा पुत्र काळोजीनें तिन्ही गांव चालविलें. सदाशिव मजकूर याचा आजा शिदू सोनार वाडेगव्हाणकर हा मौजे लोणीखुर्द येथें आला. गांवकरी यमाजी मजकूर जाहलों त्याजवरून उभयतांची मनसुबी करावयासी साहेबांकडे सांगितली. साहेबीं आपणांस पुरसीस केली कीं, मौजे मजकूरचें वतन सोनारकी कशी आहे, भोगवटा कसा आहे व तुजपाशीं वतनाबद्दल कागदपत्र काय आहेत ते बयादवार लेहून देणें म्हणून आज्ञा केली. त्यास मौजे मजकूर व लोणीबुद्रुक हा एक गांव होता दीडशें वर्षें जाहलीं, शिवाजी पद्मनाभ ब्राह्मण होता त्यानें तीनशें धनवटचें गांव होते त्याचे मौजे आलाहिदा करून साठ गांव जाजती केले, त्यासमयीं लोणीबुद्रुक या गांवचा तनखा तोडून लोणी बुद्रुक व लोणीखुर्द केले. लोणीबुद्रुक विखराची, व लोणीखुर्द अहिराची व घोगऱ्याची. जेसमयीं लोणीखुर्द दुसरा जाहला त्यासमयीं जागाजागांचे कुणबी व बलुतें येऊन मौजे मजकूरची वस्ती केली. तेव्हां वतनी मिरास भाऊ होऊन अनुभवतात. येणेंप्रमाणें बितपशील.

१ लोणीखुर्दचे पाटील अहिर निमे व घोगरे निमे त्यास अहिर मौजे आपटे येथून आले व घोगरे दाडचणे गांवचे तेथून आले, आणि मौजे मजकूरचें वतन अनुभवितात.

१ तळेगांवाहून दिघा कुळकर्णी आला आहे, आपल्या घराशेजारीं आहे तो वतन अनुभवित आहे.

१ परीट हेल्हाऊन आला आहे तो परीटकीचें वतन अनुभवितो.

१ न्हावी सिंगार्वेनजीक पारगांव तर्फ अवसरी येथून आला आहे.

१ सुतार मौजे आरवी पिंपळगांव तर्फ नारायणगांव येथून आला आहे.

१ चांभार हा राजुरीमहमदपुरीहून आला आहे.

पाथरकरास म्हणाले कीं, तूं लोणीबुद्रक येथें रहातोस. आणि गांवचा बोभाट होतो येथें हमेशा असले पाहिजे.हें आपल्यास पुरवत नाहीं आतां शिदू सोनार वाडेगव्हाणकर कामकाज चालविल. ह्मणोन शिदू सोनार मजकूर यांस मौजे लोणीखुर्द येथें गांवकरी यांनीं ठेविलें मग यमाजी सोनार पाथरकर यानें आपला आजा रामजी सोनार यास भेरडपुरी सांगोन पाठविलें वाडेगव्हानकर सोनार आला आहे तो लोणीखुर्द येथील सोनारकीचें कामकाज चालवितो, तर तुम्ही गांवावर येऊन आपलें वतन करणें, त्याजवरून आपले आजानें आपला चुलता मोरशेट यास व आपणांस मौजे मजकूरास पाठविलें. आपला बाप रामजी सोनारापाशीं भेरडपुरीं राहिला. मोरशेट व आपण गांवावर येऊन वतन चालविलें. सदाशिव मजकूर याचा आजा शिदू सोनार येथून पिटोन काढून आचलगांवीं लाविला तो तेथेंच राहिला. मोरशेट व आपण लोणीखुर्द लोणीबुद्रुक व हसनापूर या तीन्ही गांवचे वतन सोनारकीचें कामकाज करूं लागलों. चुलत्यानें व अपण पांच सात वर्षें चालविलें त्याजवर नन्होजी सोनार वासदेकर लोणीखुर्द येथें येऊन राहिला. नन्होजी मजकूर बखतवार होता लोणीस येऊन मळेदळे करूं लागला त्याच्या आंगे शिदूजीचा पुत्र व शिदूजी दोघे येऊन लोणीखुर्द येथें जबरदस्तीनें सोनारकीचें वतन करूं लागले. त्याजमुळें आपण पुण्यास फिर्याद व्हावें, त्यांस शंकरराव देशमुख यांनीं गांवकरी यांस पत्र लिहिलें कीं, लक्ष्मण मजकूर मसाला रुपये २०० दोनशें करीत होता, आपण फिरावून तुम्हांकडे लाविला. तर याचें वतन याजला देणें ह्मणो-

१ तेली मौजे महमदपूर येथून आला आहे तो हें वतन अनुभवितो.

७

सदरहू सातजण जागाजागांहून येऊन मौजे मजकूरची वतनें अनुभवून आपलाली सदरहू लिहिल्याप्रमाणें पाटील कुळकर्णी व बलुते मौजे मजकूर मौजे तुटला आहे तेव्हांपासून अनुभवतात. तेसमयीं आपला आजा शिदूजी सोनार वाडेगव्हाणाहून मौजे मजकूर वस्तीचे वेळेस दखल जाहला, मग आपल्या आपण गेला कीं, गांवकरी यांनीं नेला हें आपणांस कळलें नाहीं. शिदूजी सोनार आपला आजा, त्यापासून वतन अनुभवितो शिदोजी सोनार याचा पुत्र मल्हारी सोनार त्याचे पुत्र आपण वतन करीत आलों. परंतु लक्ष्मण सोनारानें पेशजी कधीं सोनारकीबद्दल कजिया केला नाहीं. गतवर्षापासून आपला बाप मेला म्हणून कजिया केला. मौजे मजकुरीं लक्ष्मण सोनाराचें घर व खोंपट कांहीं नाहीं. मौजे लोणीबुद्रुक येथें राहतो. साहेबीं कागदाची हकीगत पुसिली त्यास मौजे मजकूर गांव बाकीदार जाहला याबद्दल हाकमाजवळ लोणीखुर्दकरांनीं जामीन सदाशिव मियाजी पाटील मौजे हसनापूर परगणे मजकूर यांस जामीन देऊन गांव परागंदा जाहला. हसनापूरकर यांनीं मौजे मजकुरचीं घरें उकळून नेऊन नगरामध्यें विकून बाकी वारिली, तेव्हां आपले घरामध्यें कागद होते ते गेले ते सावकाराचे गेले कीं कोणते गेले हें आपणास कळलें नाहीं. परंतु आपले बापानें सांगितलें होतें कीं, कागदांचें सिंगट होतें तें घरें उकळून नेलीं तेव्हां गेलें. महमदपुरीं मिर्जाबेग होता, त्याची बाकी गांवावर रुपये ३०० तीनशें होती, त्याजवर मौजे मजकूरची पाटिलकी मिर्जानें गाहाण

न पत्र दिलें तें पत्र बजिन्नस आपल्या जवळ आहे, त्या पत्रास गांवकरी यांनीं मनास आणिलें नाहीं, त्याजवर राजश्री नरहरपंत कमावीसदार यांजपाशीं आपण फिर्याद जाहलों, त्यांनीं सदाशिव मजकूरास मसाला रुपये १५ पंधरा केला व राउतास रुपया १ एकूण रुपये सोळा घेऊन कमावीसदाराजवळ आणिले त्यांनीं आपलें वतन आपले हवाला केलें त्यास वर्षदीडवर्ष जाहले. त्याजवर रामजी सोनार पाथरकर याजला माझ्या वतीं घातलें. तो दरम्यान पडला कीं सोळा रुपये हकमांनीं घेतले ते फिराऊन सदाशिवास देणें आणि सदाशिव मजकूर तुम्हांस लिहून देतो कीं, आपण आजपावेतों तुमचें वतन जतन केलें आणि हल्लीं तुमचे हवाला केलें असे, तुम्हीं वतन सुखें घेणें म्हणोन, सदाशिव मजकूराचे करारावरून रामजी दरम्यान पडोन तुकोपंत कुळकर्णी यांचे घरीं कागद त्याहावयासी सदाशिव, त्याचा भाऊ सुलबाजी व सोनार पाथरकर असे गेले. तुकोपंत म्हणाला कीं आपण पारावर कागद लिहूं तूं जेऊन येणें. म्हणोन जेवावयासीं आपले घरास गेला आणि सदाशिव पळोन गेला. तुकोपंताचे घरास कागद लिहावयासी गेला हें तुकोपंत कुळकर्णी व रामजी सोनार पाथरकर हल्लीं वर्तमान आहेत यांच्या मुखें खरें करून देऊं न करूं तर खोटें. याजवर राजश्री बाबूराव दीक्षिताकडे उभयतां गेलों त्यानीं मौजे निर्मळपिंपरी परगणें मजकूर येथें(पत्र?) दिलें. तेथें आपण उभयतां जाऊन आपलाली हकीकत जाहीर केली. बापुजी पाटील पिंपरीकर म्हणाला कीं, तुजजवळ कागदपत्र नाहीं तर पांढरी बलुतें यांस बलावून आणूं त्यांच्या माथां मसीदीची उदी घालून मिरासदार सोनार असल्यास पांढरी हातीं धरील येविशीं ठेविली. त्या बाकीचे रुपयाबद्दल आपला आजा शिदोजीनें रुपये १०० शंभर दिले व बाळोजी परटानें रुपये शंभर दिले व रामजी यानें शंभर रुपये दिले. येकूण रुपये तीनशें देऊन मिर्जापासून पाटीलकी सोडविली येणेप्रमाणें आपले वडिलांनीं गांवासंबधानें रुपये भरले. आपलें वतन मौजे मजकूरची सोनारकी आहे, यावर तीन वर्षें जाहलीं काशिबा व खंडोजी सोनार मलठणकर यांचे मार्फतीनें मलठणीं लक्ष्मण सोनार आपणांस ह्मणाला कीं, तुजला दोनशें रुपये आपण देतो वतन आपणांस देणें, त्यांस आपण लक्ष्मणांस वतन न देऊं. याजकरितां गतवर्षीपासून आपणाशीं कजिया करितो. सदरहूप्रमाणें मौजे मजकूरचें वतन सोनारकी आपली आहे. आपले आजापासून आपण अनुभवीत आलों आहों हें जमीदार व भवरगांव व पांढरीच्या मुखें शाबूत खरें करूं. खरें न करूं तर सरकारचे गुन्हेगार व खोटें हे तकरीर लेहून दिली सही,

निशाणी हातोडा.

बिकलम विसाजी महादेव चिटणीस सरकार जुन्नर तेरीख छ. ६ रबिलावल.

उभयतांही जामीन देणें मग आपण सातल येथील जामीन नेला. सदाशिव जामीन आणावयासी गेला तो गैरहाजीर जाहला, त्याजवर राजश्री नरसिंगराव पागा हुजूर राजश्री बाबुराव दीक्षित याजकडे गेलें. त्यांनीं पुणतांबे येथील गोत दिले. गोतांनीं उभयतांचे जामीन व तकरीरा घेऊन करार केला कीं, याजपाशीं कागद नाहीं पांढरी बलुतें बोलावून आणून श्रीगंगेंत घालून पांढरी सोनार मिरासदार असेल तो हातीं धरील. याजवर सदाशिव मजकूर म्हणाला कीं, लेंकास बरें वाटत नाहीं. म्हणोन गोताजवळ सांगोन घरास गेला. मागें पांढरी गोताचे सेवेशी गेले, त्यास सदाशिव सोनार नाहीं, याजबद्दल पांढरी गोतास रजा मागून घरास गेले. सदाशिव सोनार यास ताहाराबादेस आपण सांपडवून गोताजवळ नेले. गोतानें पांढरीस आणावयासी पत्र देऊन उभयतांस पाठविलें. गांवास गेलियावर सदाशिव गैरहाजर जाहला. याजवर साहेबीं पुरसीस केली कीं, उभयतां गोतांतील हाजिर गैरहाजीर म्हणून कागद आहे कीं काय त्यांस पिंपरीचे गोताचा कागद सदाशिव गैरहाजीर जाहला म्हणून आहे पुणतांब्याचा कागद नाहीं. सदाशिव सोनाराचा वडील जबरदस्तीनें वतन खात होता म्हणोन पूर्वीही त्यास भांडत आले. आतांची मनसुबी साहेबाकडे आणली आहे. मौजे लोणीखुर्द व लोणीबुद्रुक व हसनापूर तीन्ही गांवांस कुळकर्णी व भट व लोहार कुंभार व महार व मांग येणेंप्रमाणें येकंदरच बलुते मिरासदार कदीम आहेत तीन्ही गांवचे पांढरीचे मुखें खरें करून देऊं. खरें न करूं तर दिवाणचे गुन्हे-

गार व गोताचे खोटे हे तकरीर लेहून दिली सही.

निशाणी हातोडा.

बिकलम विसाजी महादेव चिटणीस सरकार जुन्नर.

तेरीख छ. ६ रबिलावल.

सदरहूप्रमाणें तुम्ही व आम्ही तकरीरा लेहून दिल्या त्यावर वर्तणुकीचे जामीन मागविले; मग आपण तिमाजी दाबले मौजे राजुरी परगणे संगमनेर यास जामीन दिले तुम्ही कृष्णाजी सोनार मौजे वणकुटें परगणे पारनेर यास जामीन दिले. ऐसें उभयतांनीं जामीन दिले. यावर राजश्री सुभेदार साहेबांनीं मौजे लोणीबुद्रुक व लोणीखुर्द व मौजे हसनापूर या तिहीं गांवचे पाटील व कुळकर्णी व बलुते कसबे शिन्नरचे मुक्कामीं आणिले. बितपशील.

मौजे लोणीबुद्रुक.

१ भवानजी पाटील व सुलतानजी पाटील.
१ लालशेट वाणी.
१ जोगोजी म्हसके.
१ देवजी म्हसके.
१ येसू परीट.
१ केसोजी भोर.
१ आबाजी तेली.
१ देवाजी चांभार.

२ मौजे हसनापूर.
१ सिदोजी पाटील.
१ दावलजी पाटील.

२
१ तुको गोविंद कुळकर्णी.
१ कोन्हेर अंबादास कुळकर्णी.
१ गोविंद केशवभट.
१ जनार्दन गोविंदभट.
१ सटवा वल्लद जिजू लोहार.
१ जावजी व राणु कुंभार.

११

मौजे लोणीखुर्द.

१ रघोजी पाटील व गोंदजी पाटील अहीर.
१ सटवाजी पाटील घोगरे.
१ साखरोजी घोगरे.
१ रघु अहिर चौगुला.
१ म्हाळू अहिर चौगुला.
१ विश्वनाथ भगवंत.
१ संभाजी दिघे.
१ कचोजी अहीर.
१ देवजी परीट.
१ विठा वल्लद खंडू न्हावी.
१ तुळा चांभार.

३ समस्त माहार लोणीबुद्रुक व लोणीखुर्द व हसनापूर.
१ राया खंडू माहार.
१ लक्षु वल्लद भिका.
१ विठा वल्लद नारू.

३

येणेंप्रमाणें आणून सर्वांस राजश्री सुभेदार साहेबीं नरककुंड ओढून हातीं बेलभंडार देऊन पुरसीस केली कीं, लक्ष्मण सोनार व सदाशिव सोनार लोणीखुर्दच्या सोनारकीबाबत भांडतात, यांत पुरातन मिरासदार कोण म्हणून पुशिलें त्याजवरून सर्वांनीं तकरीर लिहून दिली. बितपशील.

तकरीर कर्दे बेशमी भवानजी पाटील वल्लद रघोजी पाटील विवे मौजे लोणीबुद्रुक परगणे संगमनेर सन ११६६ कारणें तकरीर लिहून दिली ऐसीजेः—साहेबीं हुजूर बलावून पुरसीस केली कीं लक्ष्मण सोनार व सदाशिव सोनार हे लोणीखुर्दचे सोनारकीबद्दल भांडतात, त्यास पुरातन सोनार मिरासदार कोण म्हणून पुसिलें, त्यास लोणीबुद्रुक एक गांव होता तेव्हां लक्ष्मण सोनाराचा वडील सोनारकी करीत होता, त्याजवर लोणीबुद्रुक येथील मौजे तुटोन मौजे लोणीखुर्द व हसनापूर ऐसे तीन गांव जाहले. तेसमयीं लक्ष्मण सोनाराचे वडिलांनीं तिन्ही गांवची सोनारकीचें वतन कामकाज दहावीस वर्षे केलें मग तो मयत जाहला त्याचे बायकोनें भेरडपूरचा सोनार भर्तार केला तेव्हां लक्ष्मण सोनाराचा आजा लहान होता तो पोटाखालीं गेला. भेरडपुरास गेली मग मागें दोन्ही गांवची सोनारकी पाथरचा सोनार करीत होता. त्याजवर लोणीखुर्दकरांनीं दुसरा सोनार चारणाहून आला होता, तो दोन वर्षे गांवांत ठेऊन त्याचे हातें सोनारकीचें कामकाज घेतलें. मग शिदू सोनार वाडेगव्हाण येथील पळोन इकडे आला तेव्हां लोणीखुर्दकरांस भेटोन तेथेंच राहिला. तो शिदू सोनार आपण पाहिला होता. त्याचा पुत्र मल्हारी सोनार त्याचा पुत्र सदाशिव सोनार त्याजवर आपले सोनार मोठाले वडील सोनार घेऊन

तकरीर कर्दे बेशमी रघोजी वल्लद राणोजी पाटील व गोंदजी वलद रघोजी पाटील अहीर, सटवोजी पाटील वल्लद विठोजी पाटील घोगरे मौजे लोणीखुर्द परगणे संगमनेर सन ११६६ कारणें तकरीर लेहून दिली ऐसीजे. लक्ष्मण सोनार लोणीखुर्दचे सोनारकीबद्दल भांडतात. त्यास मिरासदार पुरातन सोनार कोण याची हकीकत कशी आहे, तें सांगणें म्हणून पुरसीस केली. त्यास लोणीबुद्रुक पैकीं लोणी खुर्द नवें गांव जाहलें तेव्हां पाथरकर सोनार यानें लोणीखुर्दची सोनारकी दहावीस वर्षे केली. लक्ष्मण सोनाराचा वडील लोणीबुद्रुक येथें होता. व तो मेला तेव्हां त्याचे बायकोनें दादीया भेरडपूरचा सोनार केला. तीजबरोबर लक्ष्मण सोनाराचा वडील (आजा) होता तो पोटाखालीं गेला. याजकरितां पाथरकर सोनारानें लोणीखुर्दचें कामकाज केलें, मग चारणकर सोनार आला. त्यानेंही दोन तीन वर्षे आपले गांवची सोनारकी केली, याजवर वाडेगव्हाणाहून शिदू सोनार आला. लोणीखुर्द येथें राहिला. शिदू सोनाराचा पुत्र मल्हारी सोनार त्याचा पुत्र सदाशिव सोनार यांस म्हटलें कीं, आमच्या वडिलाचे हातचें कांहीं लिहिलें असेल तें काढणें. त्यानें त्याचा जबाब केला कीं, पुरातन मिरासदार सोनार तगादा करतो, त्यास सोनारकी देणें ऐसें दोन वर्षे सांगतो. त्यास सदाशिव सोनारानें आपलीं मुलेंमाणसें वाडेगव्हाणीं नेलीं, आणि वाद सांगत फिरतो, त्यास लक्ष्मण सोनार

भेरडपुरीहून लोणीबुद्रुक येथें आले, तों पाथरकर सोनार सोनारकीचें कामकाज करीत होता. मग पाथरकर आपले गांवास गेला. लोणीबुद्रुक येथील सोनारकी लक्ष्मणाचा बाप विसाजी सोनार व चुलता मोरशेट सोनार करूं लागले. लोणीखुर्द येथील सोनारकीबद्दल खटपट करीत होता. परंतु गांवकरी यांनीं दिलें नाहीं. त्यास विसाजीचा पुत्र लक्ष्मण सोनार व मोरशेटीचा नातू रघू सोनार हे लक्ष्मण व राघो सोनार आपले पुरातन मिरासदार वतनी खरे हे तकरीर लिहीली सही.

तकरीर कर्दे बेशमी सदोजी वल्लद बाजी पाटील व दावलजी वल्लद मलीकजी पाटील मौजे हसनापूर परगणे संगमनेर सन ११६६ साहेबांचे सेवेसी तकरीर लेहून दिली ऐसेजे साहेबीं रूबरू बोलावून पुरसीस केली कीं, लक्ष्मण सोनार व सदाशिव सोनार हे लोणीखुर्दचे सोनारकीबद्दल भांडतात. तर यांची हकीगत कशी आहे ते सांगणें. त्यास लक्ष्मण सोनार आपला पुरातन मिरासदार वतन भाऊ खरा आहे सदाशिव सोनार लोणीखुर्दच्या पाटलांनीं नवा केला, तो कसा केला आपणास ठाउका नाहीं. लक्ष्मण सोनाराचा वडील एका गांवचे तीन गांव जाहले तेव्हां पोटाखालीं भेरडपुरास गेला. तेथून विसाजी सोनार व मोरशेट सोनार लोणीबुद्रुक येथें आले मग आपणास भेटले आमच्या वडिलांनीं सांगितलें कीं, हे मिरासदार वतन भाऊ खरे म्हणून आमचे गांवचेही सोनारकीचें कामकाज करावयासी लागले. सदरहू लक्ष्मण सोनार पुरातन मिरासदार खरा. हें शाबूत करून देऊं. न देऊं तरी दिवाणाचे गुन्हेगार. पुरातन मिरासदार खरा; सदाशिव नवा उपरी खरा. हें खरें करूनदेऊं. हे तकरीर सही.

तकरीर कर्दे बेशमी साकरोजी वल्लद म्हारजी घोगरे पाटील मौजे लोणीखुर्द परगणे संगमनेर सन ११६६ कारणें लेहून दिले ऐसीजे. साहेबीं रुबरू बोलावून पुरसीस केली कीं, लक्ष्मण सोनार व सदाशिव सोनार लोणीखुर्दचे सोनारकीबद्दल भांडतात याची हकीकत कशी आहे ती सांगणें म्हणून पुशिलें, त्यांस लक्ष्मण सोनाराचा वडील एका गांवचे तीन गांव जाहले तेव्हां लोणीखुर्दच्या कामास न ये; मग पाथरच्या सोनारानें सोनारकी दहापांच वर्षें चालविली त्यामागें चारणांतील सोनार आला. त्यानें दोन तीन वर्षें सोनारकी केली, त्यावर सदाशिव सोनाराचा आजा शिदू सोनार वाडेगव्हाणीहून आला. त्यांस गांवकरी समस्तांनीं गांवाचे कामास ठेविला. तो सोनारकी करूं लागला. बलुतें खाऊन चाकरी केली. त्यावर आपला चुलता कानोजी घोगरा यानें आपलें घर व दळें व घरठाण शिदू सोनारास विकिला किंमत रुपये किती हें ठाउकें नाहीं. सोनारानें राहून दरवाजा लाविला. मग पेठियाहून स्वारी आली. त्यांनीं बांध धरून गेलें त्याची खंडणी करून पट्टी गांवांत करून रुपये घेतले, किती हें आपणास ठाऊक नाहीं. त्याजबद्दल सोनारापासून रुपये घेतले. त्याजवर कुराडा हाकीम संगमनेरांत होता. त्यानें खंडणी भारी केली. तेव्हां गांवकरी यांनीं हसनापूर पाटिलास जामीन देऊन गांवास आले; आपण पळोन गेलों, गांव बेचिराख जाहला, मग हसनापूरक-

रांनीं कान्होरचें गाडेभाडें करून गांवांतील घरें साईलीं होतीं तीं उकलून अमदानगरीं विकावयासी नेलीं तेव्हां सोनाराची पडसाळही नेली. त्याजवर आपाजी देशपांडे व तुकोपंत टेकाडे देशमुख यांचा वकील यांनीं गांव इजारा केला. जमाबंदी भारी केली, त्याजमुळें गांवास तोटा आला. तेव्हां गांवांत बंदीखान कौलाजी अहिराच्या वाड्यांत केले, मग तमाम लोकांस मार दिले आणि घरास खाणत्या लाविल्या. परिटाच्या घरांत खाणतां रुपयाचा गोल्या लागला. ते रुपये ५०० पांचशें होते ते हकीमानीं घेतले. वरकडांनींही रुपये दिले. त्यासमयीं सोनारापासून रुपये वीस घेतले. त्याजवर गांवची बाकी रुपये तीनशें राहिले होते तेव्हां सोनारापासून रुपये ५० पन्नास घेतले त्याजवर मखमाल (?) आल्यावर फिर्याद गांवचा पाटील गेला. तो धरून आणून किल्ले शिवनेरीवर बंदीस दिला. तेथें नागवण पडली; त्याची पटी गांवांत करून त्याची उंबरपटी उंबरे तीन दर उंबऱ्यास रुपये १२ बारा प्रमाणें रुपये ३६ छत्तीस सोनारापासून घेतले. हें खरें करून देऊं, न देऊं तर दिवाणाचे गुन्हेगार व गोताचे खोटे. सदरहू लक्ष्मण सोनार मिरासदार पुरातन वतनी खरा व सदाशिव सोनार नवा उपरी खरा; सदाशिव सोनारास गांवमिरास करून दिल्हा हें आपणास ठाऊक नाहीं. हे तकरीर लेहून दिली सही.

येणेंप्रमाणें पाटलानीं तकरीरा लेहून दिल्या, त्याजवर बलुत्यास व कुळकर्णीयांस पुरसीस केली त्यांचीं नांवें बितपशील.

१ कुळकर्णी तुको गोविंद आंबादास.
१ गोविंद केशवभट व जनार्दन केशवभट.
१ लालशेट वाणी व कुसाजी वाणी.
१ येसू परीट वल्लद अंताजी.
१ सटवा लोहार वल्लद जिवा.
१ जावजी कुंभार वल्लद राणू.

१ नागोजी व देवजी म्हसके.
१ विश्वनाथ भगवंत.

५

१ म्हाळोजी वल्लद त्रिंबकजी अहिर चौगुले व नागू वल्लद कान्होजी.
१ रामा माहार वल्लद लक्षू व विठा माहार मौजे लोणीखुर्द व बुद्रुक व हसनापूर.

५

सदरहू दहाजणांनीं तकरीर लेहून दिली ऐसीजे साहेबीं रूबरू पुरसीस केली कीं, लक्ष्मण सोनार व सदाशिव सोनार लोणीखुर्दच्या सोनारकीबद्दल भांडतात, त्यास मिरासदार कोण हें सांगणें. त्यास लक्ष्मण सोनाराची हकीकत लोणीबुद्रक एक जागा होता, तेव्हां पासून पुरातन मिरासदार खरा, त्याजवर लोणीखुर्द मोजा तुटल्यावर लक्षुमणाचा वडील मृत्यु पावला, त्याचे पोटीं पुत्र एक लहान होता. मग त्याचे बायकोनें भेरडपुरच्या सोनाराशीं घरोबा केला तिच्या पोटाखालीं लक्ष्मण सोनाराचा वडील भेरडपुरास गेला, त्याजमागें लोणीखुर्द सोनारकीचें काम पाथरकरानें सोनारकी काम दहावीस वर्षें चालविलें, त्याजवर शिदू सोनार वाडेगव्हाणीहून लोणीखुर्द येथें येऊन राहिला, तो सोनारकीचें काजकाम गांवचें करूं लागला. बलुतें खाऊं लागला. त्याचा पुत्र मल्हारी त्याचा लेक सदाशिव सोनार याप्रमाणें नवा उपरी येऊन राहिला. त्यास मिरासीचा कागदपत्र करून दिला नाहीं आणि लक्षुमण सोनार पुरातन मिरासदार वतनीं खरा हे तकरीर लेहून दिली सही.

सदरहूप्रमाणें तकरीरा सर्वांनीं लिहून निरनिराळ्या दिधल्या. तिन्ही पांढरीयाच्यामुखें पुरातन मिरासदार तुम्ही व तुमचें वतन शाबूत जाहलें. ज्याप्रमाणें लोणीबुद्रुक व हसनापुरचें वतन खात आला त्याप्रमाणें लोणीखुर्दचें वतन तुम्ही खाणें. आपण तकरीर दिली होती कीं पांढरीच्या मुखें आपलें वतन लोणी खुर्दचें खरें करून देऊं, त्यास आपण पांढरीच्या मुखें खोटें जाहलों आपण व आपले भाऊबंद अगर आपले वंशीचा कोणी लोणीखुर्दच्या सोनारकीबद्दल दावा करतील तर बातल असे, आपणास वतनासीं संबंध नाहीं, तुम्ही तिन्ही गांवचें वतन खाणें याउपर नौदिगर करून वतनाचा दावा करूं तर हकमाचे गुन्हेगार व गोताचें खोटे. सदाशिव वल्लद मल्हारी इबन सिदूजी सोनार वर लिहिले सही.

निशाणी हातोडा+

गोही.

दावलजीराव देशमुख व मोकदम माने कसबे मजकूर.

दत्ताजी येशवंत देशपांडे व कुलकर्णी कसबे सिन्नर परगणे मजकुर.

कृष्णाजी वल्लद जिवाजी पाटील व महादजी वल्लद नागोजी पाटील उगले मोकदम व राघो आबाजी कुळकर्णी मौजे पिंपरी परगणे शिन्नर.

भिकाजी देशमुख परगणे सिन्नर व मोकदम परगणे मजकूर.

वेंकाजी विश्वनाथ देशपांडे व कुलकर्णी परगणें सिन्नर.

आबाजी अनाजी देशपांडे व कुलकर्णी परगणे सिन्नर.

खंडोजी वल्लद दावजी पाटील सोनवणी मौजे मनेगाडी सिन्नर.

हरजी वल्लद केरोजी पाटील व सटवाजी पाटील मौजे विहीरगोली परगणे शिन्नर.

मुकुंद भास्कर देशपांडे व कुळकर्णी परगणे शिन्नर.

कान्होजी वल्लद तुकोजी पाटील खोडके, बचाजी वल्लद चापाजी पाटील खोडके मौजे जांबगांव परगणें शिन्नर.

भागोजी वल्लद मोल्याजी पाटील अलवड सदू वल्लद यमाजी पाटील अलवड मौजे पाष्टे परगणे सिन्नर.

येणेंप्रमाणें यजितखताचा मजमून आहे तो मनास आणितां मौजे लोणीखुर्द येथील सोनारकीचें वतन तुझें खरें आहे. सदाशिव मजकूर खोटा हें जाणून तुजवर कृपाळु होऊन हें निवाडपत्र करून दिलेंअसें; तर देहायचें वतन आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनभवून गांवचे बलुतें खाऊन सुखरूप राहणें म्हणोन निवाडपत्र १.

छ० २९ जमादिलावल

५४७ (३५८). धोंडो शंकर साठे वास्तव्य कसबे खेड यांनीं हुजूर विदित केलें कीं, आमचा व आमचे पुतणे रामाजी बल्लाळ याचा घरवाडयाचा कलह आहे, तरी विल्हेस लावावयाची आज्ञा जाहली पाहिजे म्हणोन, त्याजवरून हें पत्र सादर केलें असें तरी उभयतांची वाजबी वांटणी करून देऊन पैकीं सरकारची चौथाई घेऊन सरकारांत हिशेबीं जमा करणें म्हणोन, भिकाजी बाजी कमावीसदार कसबे मजकूर यांस चिटणिसी. पत्र १.

इ० स० १७६५।६६
तित सितैन मया व अलफ.
सफर २१.

५४८ (३६८). बहिरजी आतार यानें हुजूर विदित केलें कीं, आपण अमदानगरांत राहतों त्यास मोंगलाच्या दंग्यांत सोन्याचे व रुप्याचे दागिने शिवाजी वाणी अमदानगरकर याजजवळ ठेवावयास दिले व आणखीही कित्येक लोकांनीं दिले होते. मी आपले दागिने दंगा वारल्यावर मागों लागलों, देतो म्हणोन बोलत असतां आठा चहूं रोजांनीं दागिने गेले म्हणोन बोलला, त्यास ग्वाहीदार व मुदई त्यास म्हणतात कीं, दागिने तुजपाशीं आहेत ते दे, नाहीं तर सरकारांत चल, तें न ऐकतां जबरदस्तीच्या गोष्टी सांगतो, तरी येविशीं ताकीद

इ० स० १७६५।६६.
सित सितैन मया व अलफ.
रबिलावल ६.

---

547. Dhondo Shankar Sathe of Kasbe Khed represented that there was a dispute between him and his nephew regarding the partition of the family property and prayed that it might be settled. Orders were issued to the Kamavisdar to devide the property and to levy one-fourth of it for Government.

A. D. 1765-66.

548. Bahirji Attar of Ahmednagar represented that during the invasion of the city by the Mogal he deposited his silver and Gold ornaments with Siwaji wani Ahmednagarkar, that the man now refused to return them alleging that they had been stolen. The officer of Ahmednagar was ordered to inquire tnto the matter, to punish the offender and to remit one-fourth of the amount recovered to Government.

A. D. 1765-66.

केली पाहिजे म्हणोन, त्याजवरून हें पत्र सादर केलें असे, तरी तुम्ही हरदूजणांचे वाजबी वर्तमान मनास आणून लबाडी करीतअसेल त्याचें पारिपत्य करणें आणि वसूल होईल त्याची चवथाई सरकारांत घेणें म्हणोन, गणेश विठ्ठल यांस चिटणिसी पत्र १.

५४९ (३८९). खंडो विठ्ठल बेंदरे जोशी कसबे रांजणगांव मशादीचें यांनीं हुजूर विदित केलें कीं, आपले घरवाडे दोन कसबे मजकुरीं आहेत त्यांपैकीं एक घरवाडियांत आपण सुखवस्तीस शंकराजीराम यांस राहण्यास जागा दिली, त्यास ते वीस पंचवीस वर्षे राहतात. हल्लीं आपण आपलें घर खालीं करून मागत असतां देत नाहीं. कजिया करितो. दोन्ही घरें त्यानें आटोपून मजला परागंदा केले आहे. मनसबीस उभा राहत नाहीं म्हणोन, त्यावरून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी येविशींचा इनसाफ होई तोंपावेतों दोन्ही घरवाडे अमानत ठेवणें. शंकराजीराम याची माणसें वस्तभावसुद्धां त्या वाड्यांतून काढून देणें, आणि तोडा करून दोन माहार नेहमीं चौकीस ठेवणें. पेस्तर इनसाफ झाल्यावर आज्ञा करणें ते केली जाईल म्हणोन, मोकदम कसबे मजकूर यांस सनद १.

इ० स० १७६५।६६.
सित सितैन मया व अलफ.
जमादिलावल ३.

शाबाजी वांदल जहागिरदार कसबे मजकूर यांस सदरहू मजकुराची सनद १.

२

रसानगीयादी.

५५० (३९२). निळो त्रिंबक कुलकर्णी मौजे दहीगांव परगणे नेवासें यांनीं हुजूर विदित केलें कीं, आपणाशीं जिवाजी दामोदर कुळकर्णाविशीं कजिया करित होता; त्याचा इनसाफ पेशजी राघो गोविंद यांनीं केला, त्यास जिवाजी दामोदर खोटा जाहला. वतन सुदामतप्रमाणें आपणाकडे चालतें जाहलें असतां मागती जिवाजी दामोदर हुजूर

इ० स० १७६५।६६.
सित सितैन मया व अलफ.
जमादिलावल १२.

---

549. Kondo Vithal Bendare Joshi of Ranjangaon Masidiche represented that he allowed Shankaraji Keshav to occupy one of his houses as a residence, and that Shankaraji now refused to restore it to him. Orders were issued to evict Shankaraji and to keep the house under attachment pending inquiry.

A. D, 1765-66.

550. A dispute regarding a kulkarni watan between Nilo Trimbak and Jiwaji Damodhar of Dahigaum in pargana Newase was decided by Ragho Govind and Jiwaji's claims were rejected. Jiwaji applied to the Huzur and the watan was ordered to be attached. At Nilo's request, hawever, the attachment was removed as a review of the previous judgment would necessitate the summoning of the ryots in Poona, and this, owing to its being the sowing season, it was not proper to do.

A. D. 1765-66.

फिर्याद जाहाला; त्याजवरून वतनाची जप्ती जाहली आहे. याजकरितां येविशीं आज्ञा जाहली पाहिजे म्हणोन, ऐशीयास पेशजी मनसबी जाहली त्याचा शोध मनास आणावा तरी तूर्त लावणीचा हंगाम सबब पांढर आणतां नये, यास्तव कुलकर्णाची जप्ती मोकळी करून हें पत्र सादर केलें आहे, तरी निळो त्रिंबक याचे हातें कुळकर्णाचें कामकाज सुदामत प्रमाणें घेत जाणें म्हणोन, सदाशिव गंगाधर यांस चिटणिसी. पत्र १.

मोकदमास पत्र १.

१

दोन पत्रें चिटणिसी दिलीं असत.

दादासाहेबांचे रोजकीर्दीपैकीं.

५५१ (४०३). शिवाजी बल्लाळ याचे नांवें सनद कीं, वेदमूर्ति राजश्री आबाभट कानसकर याचा व त्रिंबक मुकुंद याचा सावकारी कजिया आहे. असें असतां त्रिंबक मुकुंद पांच सहा वर्षें अमदाबाजेस जाऊन बसला आहे. पत्रें गेलीं असतां अद्याप येऊन फडशा

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. जमादिलावल २९.

वेदमूर्तिचा कजियाचा करीत नाहीं, सबब मशारनिल्हेचें घर कसबे नाशिक येथें आहे. तें जप्त करावयास पत्र सादर केलें असे, तरी मशारनिल्हेचें घर सरकारांत जप्त करून ठेवणें. उभयतांचा इनसाफ करावयास राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ यांस आज्ञा केली आहे, ते उभयतांचा इनसाफ मनास आणतील. तुम्ही घराची जप्ती मात्र करणें म्हणोन. सनद १.

रसानगीयादी चिटणिसाकडे आहे.

छ. २७ जमादिलावल.

५५२ (४३०). रामचंद्र महादेव व अंताजी राम व हरि राम देसाई तर्फ लांजे सुभा प्रांत राजापूर यांनीं विदित केलें कीं, तर्फ मजकूर येथील खोत पूर्वी परागंदा होऊन गांव गयाळी पडले, तेव्हां आपले वडिलांनीं गांवची लागवड करून उगवणी करीत आले. पुढें

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. रमजान ७.

---

551. There was a dispute between Ababhat Kanaskar and Trimbak Mukund, in regard to certain money-transactions. Trimbak went to Ahmedabad and would not come to settle the dispute though repeatedly asked to do so. His house at Nasik was therefore ordered to be attached.

A. D. 1765-66.

552. This refers to a dispute regarding khoti in prant Rajapur. The dispute was referred to Ramshastri and the villages were kept under attachment. One of the parties complained that the matter had been under adjudication for 6 or 7 years and prayed that the villages might be freed from attachment. His request was granted. Khoti is referred to as being of two kind—watani and gayali.

A. D. 1765-66.

कान्होजी अंगरे सरखेल याचे कारकीर्दीस त्रिंबक बापूजी देशपांडे तर्फ मजकूर सरखेलीकडे जाऊन गयाळीगांवचा चढ करून आदावतीनें

* * * *

येणेंप्रमाणें चार गांव आपणांकडे करून घेतले. तेसमयीं आपले वडील नरसो महादेव देसाई कुलाबियास सरखेलीकडे गेले, तेथें इनसाफ न करितां देशपांडे यांनीं नानाप्रकारच्या आदावती सांगोन मार देवविला. तेव्हांच ते मृत्यु पावले. आपले कोणी जाबसाल करावयासारखा नाहीं. पुढें संभाजी अंगरे सरखेल यांचे कारकीर्दीत आपले वडील महादाजी नरसी उभे राहिले. इनसाफ व्हावा तों सरखेल मृत्यु पावले. याउपरी तुळाजी अंगरे यांचे कारकीर्दीत मनसुबी होऊन आपणापासून हारकी घेऊन कागदपत्र करून देऊन गांव आपले जिमेस केले. गांवचा उपयोग आपण करीत असतां सरकारचा अमल जाहल्यावर कांहीं दिवस चालिलें. त्यावर शिवराम कृष्ण देशपांडे तर्फ मजकूर यांनीं सुभां जाऊन सदरहू चार गांव अमानत करविले. मागती दोन चार महिन्यांनीं सुभाची चिठी घेऊन सदरहू चार गांव चालवावयासी आले. तेव्हां महादाजी नरसी देसाई सुभा रत्नागिरीस गेले तेथें आपलें वर्तमान सांगितलें, परंतु कांहीं झालें नाहीं. तेव्हां कानोजी अंगरेयांचे कारकीर्दीत चार गांवचा कजिया याचा व आपला लागल, होता ते व सरकारचे अमलांत दोन गांव पूर्वी गयाळी पडलेयापासून आपल्या वडिलांकडे होते तेही सुभाहून देशपांडेयें यानीं करून घेतले. त्याजवर आपण हुजूर पुणियासी येऊन सदरहू सहा गांव अमानत करविले. त्यावर शिवराम कृष्ण देशपांडे यांनीं सरकारांत वाकामालुमांत समजावून आमचे वतनी खोतीचे गांव × × × × ×

याशीं देशपांडे यांस संबंध नसतां नाहक अमानत करविले. तेव्हां ते व आपण हुजूर आलों. मनसुबी वेदशास्त्र संपन्न राजश्री रामशास्त्री याजकडे नेमून दिली. त्यास सहा सात वर्षें होत आली, इनसाफ शेवटास जात नाहीं. शिवरामकृष्ण जबरदस्त, याजकरितां आपली फिर्याद कोठें लागो देत नाहीं, सालमजकुरी वाद्यास पुण्याचें मुक्कामीं द्वाही दिली, ते मानली नाहीं. मोडून गेला म्हणून; तरी पेशजी कान्होजी अंगरे यांचे कारकीर्दीपासून याचा त्याचा गांवच्या खोतीचा कजिया असतां दुसरे दहा गांव पूर्वीपासून यांजकडे खोती चालत होते, ते वाद्यानें अमानत करविले तें ठीक नसे. त्यास सदरहू गांवांपैकीं गांव × × × × × ×

हे गांव पेशजी अमानत आहेत, त्याचप्रमाणें अमानत मनसुबी होय तोंवर असों देणें; या गांवची देखरेख सरकारचा कारकून ठेवून करवणें, हरदूवाद्यांचे निसबतीस न ठेवणें. याखेरीज गांव × × × × × ×

एकूण गांव कजिया वेगळे देशमुखाकडेस चालत होते. ते जप्तीमध्यें आले ते हल्लीं मोकळे करून त्याचे त्याजकडे चालवावे; येविशीं फिरोन बोभाट येऊं न देणें म्हणोन, मोराजी शिंदे नामजाद तालुके रत्नागिरी यांसी. पत्र १.

५५३. (४३९). त्रिंबकराव लक्ष्मण कमावीसदार परगणे नेवासे वगैरे महाल यांस पत्र कीं, गोपाळ नाईक खिस्ती अकोळनेरकर यांनीं विदित केलें कीं, आपलें कर्ज बनाजी शिवाजी याजकडे रुपये एकोणीस हजार येणें त्यास निकाल न करीत याजकरितां सरकारचें पत्र त्रिंबकराव लक्ष्मण यांस घेतलें. त्यांनीं पंचाईत पैठणीं नेमून दिली, तेथें इनसाफ जाहला. वाद्या खोटा जाहला. आमचे रुपये त्याजकडे खरे लागू जाहले. त्याजवरी तो पंचाईतास न पुसतां आपले लेकाकडे तीसगांवास पळोन गेला. आपण पंचाईताचें पत्र सदरहू मजकुराचें घेऊन येऊन त्रिंबकराव यांस दाखविलें. त्यास ते ताकिदीचा उजूर करितात. म्हणोन, ऐशियास तुह्मी येविशींचें वर्तमान वाजबी मनास आणून बनाजी शिवाजीस ताकीद करून कर्जाचा निकाल करून देणें, आणि चौथाई सरकारची घेऊन सरकारांत पावती करणें म्हणोन चिटणीसी. पत्र १.

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. सवाल १६.

नरहर लक्ष्मणराव यांस पत्र कीं तुमचे पिते बनाजी शिवाजी यांजकडे गोपाळ नाईक खिस्ती याचें कर्ज रुपये एकोणीस हजार येणें त्यास ते निकाल न करीत याजकरितां पेशजी सरकारचें पत्र त्रिंबकराव लक्ष्मण कमावीसदार परगणे नेवासें वगैरे यांस घेतले. त्यांनीं पैठणीं पंचाईत नेमून दिली, तेथें इनसाफ जाहला. आपले रुपये बनाजी शिवाजी याजकडे लागू जाहले. तेव्हां तो गैरहजर. पंचाईतास न पुसतां पळोन तुम्हांकडे गेला. त्यास हें कामाचें नाहीं. याउपरी बनाजी शिवाजी यास नेवाशियास त्रिंबकराव याजकडे पाठवून देणें. उजूर केल्यास कार्यास येणार नाहीं. म्हणोन, पत्र १.

बनाजी शिवाजी यांस पत्र कीं, तुम्ही त्रिंबकराव लक्ष्मण याजकडे नेवाशियास जाऊन नाईक मजकूर याचा गुंता वारणें म्हणोन. सनद १.

३

५५४ (५३३). भिवराव व्यंकटेश देशपांडे परगणे हुकेरी यांनीं हुजूर येऊन विनंति केली कीं, आपले आजे मुरारराव त्रिंमळ याचे चुलत बंधु तिमाजी निळकंठ व त्याचे वडील बंधूचा पुत्र निळकंठ तिमाजी हे उभयतां निपुत्रिक होते, त्यांसी तिमाजी निळकंठ यांनीं आपले कन्येचा लेक सोलापूरकर कुळकर्णी याचा घेऊं लागले. तेसमयीं त्याचा व

इ० स० १७६७।६८ समान सितैन मया व अलफ. जमादिलाखर १०.

553. Gopal Khisti of Akolner had a debt of of Rs. 19,000 to recover from Banaji Siwaji. He obtained from the Peshwa an order to the Kamavisdar of Newase and other Mahals in regard to the matter. The Kamavisdar appointed a Panchayat and they decided that the debt was justly due. Banaji then absconded to Tisgaum and the Kamavisdar refused to enforce the Panchayat's decision without the sanction of the Peshwa. Gopal having brought this to the notice of Government an order was issued to the Kamavisdar directing him to recover the amount due, and to take a fourth of it for Government.

A. D. 1765-66.

554. Certain Deshpandes of pargana Hukeri having no isse adopted persons

निळकंठ तिमाजी याचा कजिया जाहला कीं, कन्येच्या लेकासी ध्यावयासी अधिकार नाहीं. तैसाच आपले आजे यांनीं निळकंठ तिमाजी यांसी हा पुत्र ध्यावयासी अधिकार नाहीं. म्हणोन कजिया करून श्रीशंकराचार्य स्वामीस निवेदन करून आपले गांवास गेले. तदनंतर तिमाजी निळकंठ व निळकंठ तिमाजी हे आपले आपल्यांत समजोन निळकंठ तिमाजी यांनीं नारो शंकर बेहले कोडोलीकर त्यांच्या घराण्यांतील नसतां त्याचा पुत्र बाप मृत्यु पावल्यावर त्याचे आईपासून आठवर्षांचा घेतला, व तिमाजी निळकंठ यानें आपले कन्येचा पुत्र घेतला, एकूण दोघांनीं दोन पुत्र आपले भाऊबंदांचे अनुमताखेरीज अविधिपूर्वक व ग्वाही साक्षी वेगळ आपलेच विचारें घेऊन श्रीरामनवमीचे उत्साहामध्यें व्रतबंध केले तेसमयीं आपले तीर्थरूप वेंकटराव यांनीं श्रीस्वामींच्या व चिकोडीकर ब्राह्मण व ग्रामस्थ यांचे विद्यमानें कजिया केला, त्यावर कितीएक दिवशीं निळकंठ तिमाजी व तिमाजी निळकंठ मृत्यु पावले त्यापूर्वी तिमाजी निळकंठ यांनीं श्रीदेव, ब्राह्मण व गृहस्थमंडळींचे साक्षीनिशीं श्रीकृष्णातीरीं आपले वडील बंधू शामराव यांस पुत्र घेतले. त्यांनीं तिमाजी निळकंठ याचें उत्तरकार्य देशमुख व समस्त ग्रामस्थ व ब्राह्मणाचे विद्यमानें केलें. सर्वेंच इंगळीस निळकंठ तिमाजी याची सापत्न माता होती ते मृत्यु पावली. तिचेंही उत्तरकार्य केलें आणि दोघांचें हिश्शांचें वतन अनभवूं लागले. त्याउपरीं तिमाजी निळकंठ याचे बायकोनें कन्येच्या पुत्राची स्वार्थ बुद्ध धरून कन्येचा पुत्र दशरथ होनो व नारोशंकर बेहले याचा पुत्र रामजी नारायण कोडोलीकर यांस पुढें उभे करून शामराव यांस वतनास ठिकाण लागों देईना. तेव्हां आपले आजे मुरारराव त्रिंबक यांनीं करवीरक्षेत्रीं श्रीकैलासवासी महाराज छत्रपती संभाजी राजे यांजकडे जाऊन आपलें वर्तमान विदित केलें त्यावरून तेथें मनास आणून परगोत्री दशरथ होनो व रामजी नारायण यास वतनासी अधिकार नाहीं. ऐसें ठरावून वतन पूर्ववत्प्रमाणें शामराव याचे दुमाला केलें आणि देशमुखांस पत्र दिलें असतां देशमुखांनीं त्या उभयतांचा पक्ष धरून वतन आपणाकडे चालविलें नाहीं, त्याजवर गुदस्तां आपण हुजूर येऊन स्वामीजवळ विनंति केली कीं, वाजबी इनसाफ करून आमचें वतन आमचे स्वाधीन केलें पाहिजे म्हणोन; त्यावरून स्वामींनीं आमचा हरदूजणांचा इनसाफ राजश्री गोविंद हरि याजकडे मिरजेस दिला होता. त्यास तेथें मशारनिल्हे यांनीं दहा वतनदार मेळवून इनसाफ करून हुजूर लिहून पाठविलें आहे, त्याप्रमाणें वाद्यास हुजूर आणून यजितखत घेऊन आमचें वतन आमचे स्वाधीन केलें पाहिजे म्हणोन विनंति केली, त्यास मनास आणितां दशरथ होनो व रामजी नारायण यांस वतन अनुभवावयास अधिकार नसतां जबरदस्तीनें वतन खातात. हें जाणोन तिमाजी निळकंठ व निळकंठ तिमाजी यांचें हिश्शाचें देशपांडेपणाचें वतन सरकारांत सांगोन यास पाठविलें

A. D 1764-65. out-side the watan family as their sons, against the wishes of the bhaubund. Shri Shankaracharya, Raja Sambhaji of Karwir, and subseqently the Peshwa, disallowed the claims of the adopted sons to succeed to the watan. It is stated in the Sanad that the adoption of a daughter's son is unauthorized.

असेत, तरी यासी रुजू होऊन याचे वतनसंबंधें हक्कदक मानपान व इनामजमीन व शेतें व मळे व उमालीगांव (दुमाली?) वगैरे कुल असेल तें याचें दुमाला करणें. भिवराव व्यंकटेश देशपांडे याचें हिश्शांचें वतन तिमाजी निळकंठ व निळकंठ तिमाजी यांचे वेळेस चालत होतें त्याप्रमाणें भिवराव वेंकटेश याजकडे करार केलें असे. तरी पेशजीप्रमाणें चालवणें म्हणोन सनदा.

१ जमीनदार परगणें मजकूर यास.

१ शेषोनारायण दिमत मातुश्री जिजाबाई यांस.

१ × × × × × × यांस.

कीं दशरथ होनो व रामाजी नारायण हे परगोत्री जाणोन हल्लीं तिमाजी निलकंठ व निळकंठ तिमाजी यांचें हिश्शाचें वतन अनुभवीत होते, त्याची जप्ती सरकारांत करून जप्तीची कमावीस तुम्हांस सांगितली असे तरी वतन संबंधीं हक्कदक्क मानपान व शेतें व मळे व (दुमाली)गांव वगैरे कुल असेल त्याचे उत्पन्न होईल तें इमानें इतबारें सरकारांत पावतें करून पावलियाचा जाब घेणें. भिवराव व्यंकटेश देशपांडे याचे हिश्शाचें वतन तिमाजी निळकंठ व तिळकंठ तिमाजी यांच्या वेळेस चालत होतें. त्याप्रमाणें चालवणें म्हणोन.——————सनद.

३

एकूण तीन सनदा.

रसानगीयादी.

५५५ (५६०). परगणे भूम येथील देशमुख व देशपांडे व मुकदम कसबे भूम यांजकडे येसूबाई देशपांडी इचें कर्ज येणें आहे, त्या बाबत सरकारचे रोखे जाहले होते. ते माघोर टाकिले, सबब परगणे मजकूर येथील देशमुखी व देशपांडेपण व कसबे मजकूरची मुकदमीचें वतन सरकारांत जप्त करून जप्ती तुह्मांकडे सांगितली असे, तरी परगणे मजकूर येथील सदरहू वतनसंबधें इनाम व शेतें,मळे वगैरे हक्क लवाजिमा जे असेल त्याचा आकार करून ऐवज जमा होईल तो सरकारांत पावता करून पावलियाचे जाब घेत जाणें म्हणोन, बाळाजी व्यंकटेश निसबत मोरो गिरमाजी यांस सनद १.

इ० स० १७६७।६८. समान सितैन मया व अलफ. जिल्हेज ७.

येविशीं मोकदम देहाय परगणे मजकुर यांस पत्र कीं, सदरहू वतनाचे हक्काचा वगैरे वतनसंबंधें जे असेल त्याचा वसूल मशारनिल्हेकडे सुरळीत देणें म्हणोन. १.

२

रसानगी यादी.

555. The Deshmukh and Deshpande of pargana Bhum and the Mokadam of Bhum having refused to receive a summons issued by Government in a suit for debt brought against them by Esubai Deshpande, their watans were ordered to be attached.

A. D. 1767-68.

नारायणराव बल्लाळ यांच्या रोजकीर्दीपैकीं.

५५६ (९७१). नवरोजी अध्यारू, मनाजी कुकाजी कुलकर्णी परगणे पारचोल याचा जांवई यांनीं हुजूर येऊन विदित केलें कीं, मनाजी याचें कर्ज परगणें मजकुरीं गावगन्ना येणें, त्यास मनाजी मृत्यु पावले आपण त्याचा जांवई आहे त्यास कर्ज उगवून देविलें पाहिजे म्हणोन, त्यास वाजबी कर्ज असेल त्याची चौकशी करून खताप्रमाणें पावला ऐवज वजा करून बाकी ऐवज वसूल करून त्याची चौथाई ऐवज सरकारांत घेऊन हुजूर पावता करणें बाकी ऐवज मनाजी मजकूर याचे पुत्रास देवणें, म्हणोन सखाराम भगवंत यांचे नांवें. पत्र १.

इ० स० १७६८।६९
तिसा सितैन मया व अलफ.
मोहरम.

५५७ (५८४). हरि केशव नेने मक्तसर मौजे महाळुंगे तर्फ पावस तालुके रत्नागिरी यांनीं हुजूर विदित केलें कीं, मौजे मजकुरीं चिंचखरी येथें आपलें वतनीं शेत वांट्याचे पाऊण बिघा पर्यंत आहे. त्याचा भोगवटा आपण करीत असतां गणोजी कानला कुणबी मौजे मजकूर हा गांवीं असोन कधीं शेताशीं वारसा केला नाहीं. असें असतां अलीकडे आठ दहा वर्षें शेताविशीं काजिया करूं लागला तेव्हां सदरहू शेत कीर्दीस गांवचे खोताकडे चालिलें. पुढें शेताचा निवाडा चौघे गांवकरी मिळोन जाहला नसतां गणोजी मजकूर याजकडे कांहीं लचांड होतें सबब बाळाजी गणेश हशमनीस तालुके मजकूर यांस सदरहू शेत देऊं करून आपली सोडवण केली आणि गांवकरी यास कळो न देतां मध्यस्थाचे गुजारतीनें शेताचा कागद करून दिला. पुढें पहाणी सन सबा सितैनांत जाहली. तेव्हां पहाणीस सदरहू शेत बाळाजी गणेश यांजकडे लाऊं लागले. ते समयीं आम्ही आडथळा करून पहाणीस शेत काजियाचे असें लाविलें त्याजवर मशारनिल्हेनीं आम्हांस दोन वर्षें किल्यांत अटकेंत ठेऊन सिलकावण लाऊन वाजपूस न करितां व सडीसाक्ष न पाहतां शेत लिहून मागो लागले तेव्हां आपण हुजूर जातो. नाहींतरी आम्ही जुने पुरुष साक्षिदार लेहून देतो. ते आणून चौकशी करणें ऐसे कित्येक प्रकारें बोलिलों. तें सर्वही कोणी न ऐकतां आम्हांस सिलकावण लावून सदरहू शेत लेहून घेतले उपरांत आपण गांवीं येऊन कानला मज-

इ० स० १७६८।६९.
तिसा सितैन मया व अलफ.
जममादिलाखर १२.

556. Nawroji Adyaru, son-in-law of Manaji Kukaji Kulkarni of pargana Parchol, prayed for the recovery of debts due to his deceased father-in-law. His request was granted, and the amount recovered was ordered to be paid to Manaji's son, after deducting one-fourth of it for Government.

A. D. 1768-69.

557. A field measuring ¾ of a bigha at Mahalunge in tarf Pawas of taluka Ratnagiri belonged to Hari Keshav Nene. It was claimed by Ganoji Kanla and he being in trouble on one occasion relinquished his claim over it in favour of Balaji Ganesh Hasamnis. At the time of inspection of lands in A. D. 1766-67 the field in question was going to be entered in the name of Balaji Ganesh. Hari Keshav protested. He was consequently kept

A. D. 1768-69.

कूर यास चौघा गांवकरीयांचें गुजारतीनें द्वाही दिली कीं, हुजूर पुण्यास न्यायास येणें असें सांगोन आम्हीं हुजूर आलों त्यास दोन महिने जाहले. परंतु कानला अद्याप येत नाहीं, तरी सदरहू शेत अमानत करवून कानल्यास हुजूर आणून इनसाफ केला पाहिजे म्हणोन, त्याजवरून हें पत्र तुम्हांस सादर केलेंअसे तरी बाळाजी गणेश हशमनीस यांनीं सदरहू शेत जबरदस्तीनें घेतलें आहे, तें तर्फ मजकूरचे देशकाकडे कीर्दीस अमानत ठेऊन कानला कुणबी यास हुजूर पुण्यास पाठवून देणें म्हणोन, कृष्णाजी हरि तालुके रत्नागिरी यास चिटणीसी. पत्र १.

५५८ (५९२). काळी जाधवीण मौजे साष्टपिंपळगांव परगणे आंबड इनें हुजूर विदित केलें कीं, माझे लेक हिरूजी व सोयराजी यांनीं जबरदस्तीनें मजपासून मालीयत घेऊन मजला बाहेर घातले, आणि अन्न वस्त्र देत नाहींत. व ऐवज घेतला तोही देत नाहींत. तरी ताकीद जाहली पाहिजे म्हणोन, त्याजवरून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे, तरी तुम्ही सदरहूची चौकशी करून हरदूजणांनीं ऐवज घेतला असेल तो माघारा देववणें व जाधविणीचे अन्नवस्त्राची बेगमी करवणें, व हरदूजण लबाडी करितात त्यांजपासून गुन्हेगारी घेणें, येविशींचा फिरोन बोभाट येऊं न देणें म्हणोन विरेश्वर हरि यांस चिटणीसी. पत्र १.

इ० स० १७६८।६९. तिसा सितैन मया व अलफ. साबान १.

५५९ (६१६). तिमाजी बीन माणकोजी रोकडा शिंपी वस्ती पेठ रविवार शहर पुणें याचा व नरसो मल्हार केमकर याचा राजश्री मुधोजीराव भोसले यांजकडील मामलतसंबंधे कर्जाचा कजिया होता, तो पेशजी राजश्री धोंडो मल्हार पुरंदरे यांनीं मोढण्यास हरबाजी

इ० स० १७६८।६९ तिसा सितैन मया व अलफ. मोहरम २०.

---

in confinement by Balaji for 2 years and fined and compelled to execute a document regarding the field in favour of Balaji. Hari on coming to the village informed Kanala that he was going to Poona to complain about the field and asked him in the name of Government to accompany him (Hari). Kanala failed to do so. Hari represented the facts to the Peshwa and orders were issued to attach the field and to compel the attendance of Kanala at Poona.

558. Kali, a woman of the Jadhav family of Mouze Sasta Pimpalgaon in pargana Ambad, complained that her sons Hiruji and Soyaraji had deprived her of her property and had turned her out of the house and that they refused to provide for her maintenance. Orders were issued to fine the said persons and to compel them to restore their mother's property to her and to arrange for her maintenance.

A. D. 1768-69.

559. A money dispute between Timaji Mankoji Simpi and Naro Malhar of Poona, was decided against the former. He appealed to the Peshwa, and offered to pay Rs. 10,000 if he failed to prove his claim and the same amount if he succeeded.

A. D. 1768-69.

नाईक जोशी याचे गुजारतीनें मनांस आणून फडशा केला, त्याप्रमाणें तिमाजी मजकूर न वर्तोन हुजूर विदित केलें कीं, धोंडो मल्हार यानीं नरसो मल्हार यांजपासोन लांच घेऊन मनसुबी यथास्थित केली नाहीं; याजकरितां सरकारांतून पंचाईत नेमून इनसाफ करावा. आपला ऐवज नरसो मल्हार याजकडे लागू न जाहला तरी गुन्हेगारी दहा हजार रुपये देईन ऐवज लागू जाहला तरी सदरहूप्रमाणें हरकी देईन ऐसा करार मोरो विश्वनाथ भावे यांचे गुजारतीनें केला; त्याजवरून दिनकर महादेव वगैरे यांस मनसुबी मनास आणावयाशीं सरकारांतून आज्ञा केली. त्यानीं उभयतांचे हिशेब पाहून निवाडा करून समजाविला. त्यांत तिमाजीचा पैका नरसो मल्हार याजकडे फिरत नाहीं; असें जाहलें. तिमाजी खोटा जाहल असतां सरकारांत जाहिर केले कीं, पंचाईतांनीं मनसुबी यथास्थित केली नाहीं, त्याजवरून मागती राजश्री नारो आपाजी यांस मनसुबी(मनास ? आणावयाची आज्ञा केली त्यांनीं पुरता शोध केला तेव्हां तिमाजी खोटा जाहला. सबब गुन्हेगारी घेऊन पारपत्य करावयाअर्थे चौकीस बसविला, परंतु गुन्हेगारीचे ऐवजाचा निकाल करून सुटाययाची गोष्ट न बोले. पदरीं पैका नाहीं; व सावकारीत पत नाहीं. गुन्हेगारीचा ऐवज सरकारांत उगवला पाहिजे. सबब पेठ मजकुरीं शिंपी मजकूर याचें घर बुधवार पेठेचे सरदेपुढें पूर्वेस कुंजावरी बमय दुकानें होतीं तें सरकांत गुन्हेगारीचे ऐवजांत घेतलें त्यांची चतुःसिमा.

The appeal was twice inquired into and decided against him. He was therefore kept in confinement as he wss unable to pay the amount agreed upon, and his house and two shops in aditwar were attached. The measurements of the premises were as follows:—

house	$41\frac{3}{4} \times 39\frac{1}{2}$	gaj
shade	$7\frac{1}{4} \times 5$	„
shop	$4\frac{3}{4} \times 2\frac{3}{4}$	„
shop	$3 \times 2\frac{1}{2}$	„

They were afterwards sold for Rs. 7001 as follows:—

	Rs.
value of building	3474
valne of site	2833
fees for preparing sale-dead—	
kotwal's fees at 10%	631
96 karkun's „ „ 1%	63

and the necessary orders were issued to the Kotwal and the Kamavisdar of Aditwar.

घराची जागा.

लांबी पूर्व पश्चिम गज.

३९॥ गर्भी पूर्वेकडील जोत्यापासून पश्चिमेची भिंत पावेतों.

१ पश्चिमेची भिंत लांबी.

१। निमे चौत्रा पूर्वेकडील जोत्याखालीं.

४१॥।.

एकूण पावणेबेचाळीस गज पैकीं गर्भी साडेएकूणचाळीस गज व पश्चिमेकडील भिंत एक गज व निमे चौत्रा सवा गज.

रुंदी दक्षिण उत्तर गज तुकडे बितपशील.

६। जोत्यापुढील निमे चौत्र्यापासून परसांतील ओटींचें जोतें पावेतों. रुंदी एकवीस गज लांबीची रुंदी

४। गर्भी.

२ भिंती.

१ दक्षिणेकडील.

१ उत्तरेकडील.

२

६।

सवासहा गज.

५॥। पुढें पावणेतीन गज लांबीची रुंदी.

४॥। गर्भी.

१ भिंत उत्तरेकडील.

० दक्षिणेकडील भिंत आत्या पारनाईक याची.

५॥। पावणे सहा गज

६॥। साडेतीन गज लांबीची रुंदी.

५॥। गर्भी.

१ भिंत उत्तरेकडील.

० दक्षिणेकडील भिंत गंगाराम आगरवाला याची.

६॥। पावणे सात गज.

६॥।३. साडेचार गज लांबीची रुंदी.

५॥।३ गर्भी.

१ भिंत उत्तरेची.

० दक्षिणेकडील भिंत आपाजी पारनाईक याची.

६॥।३ पावणे सात गज तीन तसू.

७॥३ दोन गज लांबीची रुंदी.

५॥३ गर्भी.

२ भिंती.

१ उत्तरेकडील.

१ दक्षिणेकडील.

२

७॥३ साडेसात गज तीन तसू.

६। सात गज लांबीची रुंदी पश्चिमेकडील भिंत पावेतों.

४। गर्भी.

२ भिंती.

१ उत्तरेकडील.

१ दक्षिणेकडील. पलीकडे दुकान गंगाराम आगरवाला याचे

२

६। सवा सहा गज.

सोपा पिछवाडीयास उत्तरेकडे.

लांबी पूर्व पश्चिम गज.

४॥। गर्भी.

रुंदी दक्षिणउत्तर गज.

४॥। गर्भी.

१॥ पश्चिमेकडील भित तारतखाना भिंतीं- -॥३ उत्तरेकडील भित.
त आहे. ५४३
१ पूर्वेकडील भित. पांच गज तीन तसू.
७।
सवा सात गज.

घराचे दक्षिणेस दुकानें.

पश्चिमेची भित. घराचे पिछवाडीयाचे दक्षिणेस.

चारणें खणांचे दुकान कुंजावरी.

लांबी पूर्वपश्चिम.	रुंदी दक्षिणोतर गज	लांबी दक्षिण उत्तरगर्भी	रुंदी पूर्व पश्चिम गज. २ गर्भी
३॥ ऐन दुकान.	२॥।-	जोत्याचे कांठा-	-॥- भिंती
१। निमचौत्रा पूर्वेकडील;	पावणेतीन गज याशिवाय दक्षिणे-	पावेतों गज ३ तीन गज या	पूर्वपश्चिमनिमे दर -।- प्रमाणें
४॥। पावणेंपाच गज.	कडील निमचौत्रा सवा गज.	शिवाय दक्षिणे- कडील निमचौत्रा सवा गज.	२॥ अडीच गज.

एकूण मोजणी यासी चतुःसिमा.

दक्षिणेकडे.

६ लोकांचीं दुकानें.
१ गिरमाजी नाईक जपे यांचें.
१ गंगाराम अगरवाला.
१ आत्या पारनाईक यांचें.
१ गंगाराम आगरवाला यांचें दुसरें दुकान.
१ आपाजी पारनाईक यांचें.
१ गंगाराम आगरवाला यांचें तिसरें दुकान.पश्चिमेकडे शेवटास.
६

२ तिमाजी मजकुरांचें.
दुकानाची सदरी मोजणी.

उत्तरेकडे.

१ कोंडाजी कासारांचें घर
१ सोपा शिंपी मजकुराचा सदरी मोजणी लिहिली आहे तो. त्याचे उत्तरेस गल्ली दीडगज व पुढें तीन गज, सोप्यांतून बाहेर निघावयाचा दरवाजा गल्लीस आहे.
२

पश्चिमेस.

१ घराचे व सोप्याचे पश्चिमेस लालचंद भडभुंजा.

१ कुंजावरील दुकानाचे पश्चिमेस गिरमाजी नाईक जपे यांचें दुकान.

लिहिली आहे तीं दुकानें त्यांचे दक्षिणेस रस्ता.

१ कुंजावरील दुकान पूर्वेचें अंगे.

१ घराचे पिछवाडियाचे दक्षिणेस.

२

८

पूर्वेस.

१ घराचे व कुंजावरील दुकानाचे पूर्वेस रस्ता आदितवार.

१ सोप्याचे पूर्वेस कोंडाजी कासाराचें घर.

१ पिछवाड्याचे दक्षिणेस दुकान याचे पूर्वेस आपाजी पारनाईक याचें दुकान.

३

१ पिछवाडयाकडील दक्षिणेचे दुकानाचे पाश्चिमेस गंगाराम आगरवाला याचें दुकान.

३

घराचे परसांतून मोरी दक्षिणेकडे काढून दिली आहे ती गंगाराम आगरवाला याचे दुकानाखालून रस्त्यांतील मोरीस मिळाली आहे. कलम १.

येणेंप्रमाणें घर व सोपा व दोन दुकानें यांची किंमत गुजारत गणेश रंगनाथ कारकून दिन जनार्दन हरि कमावीसदार कोतवाली व लक्षमण गोडा चाकर सरकार. रुपये.

६३०७ इमला व जाग्याची किंमत.

३४७४ इमला अजमासें बिनाखी.

२८३३ जाग्याची किंमत कुंजावरील नाक्याची सबब.

६३०७

६९४ कवाला कोतवाली कडून करून द्यावा. त्याचा शिरस्ता ——— रुपये.

६३१ ऐन दरसदे रुपये १० प्रमाणें.

६३ कारकूनी दरसदे रुपया १ प्रमाणें.

६९४

७००१

एकून सात हजार एक रुपया पैकीं, जागा व इमल्याची किंमत सहा हजार तीनशें सात व कबाल्याचा सरकार शिरस्ता सहाशें चौऱ्याणव रुपये. सदरहूप्रमाणें करार करून तुम्हांपासून सरकारांत घेऊन सदरहू जागा इमलासुद्धां तुम्हांस सरकारांतून विकत दिली असे, तरी नांदणूक करून सुखरूप राहणें म्हणोन सदाशिव बाबूजी उपनाव घुमरे गोत्र वत्स शाखा वाजसनी यांचे नांवें. सनद १.

जनार्दन हरि कमावीसदार कोतवाली यांचे नांवें. सनद कीं, सदरहूप्रमाणें सात हजार एक रुपया घेऊन सदाशिव बाबूजी यास जागा इमल्यासुद्धां सरकारांतून विकत दिली असे. चतुःसीमापूर्वक मशारनिल्हेचे नांवें पत्र करून दिलें आहे त्याप्रमाणें कोतवालीकडील कबाला करून देणें. कबाल्याचा शिरस्ता सरकारांत घेतला असे. तुम्ही जमाखर्च करून कबाला करूनदेणें म्हणोन. १.

बाबुराव हरि व मोरो विनायक कमावीसदार पेट रविवार यांचे नांवें पत्र कीं, तिमाजी शिंपी याचें घर बमय दुकानें पेठ मजकूरीं होतें तें सरकारांत गुन्हेगारीचे ऐवजीं घेऊन सदाशिव बाबूजी घुमरे, यास सरकारांतून विकत दिलें असे. याचा सारा पट्टी तिमाजी मजकुरापासून घेत आलां त्याप्रमाणें यांजपासून घेत जाणें, जाजती हरएकविशीं तगादा न करणें म्हणोन चिटणिसी. पत्र १.

३

रसानगीयादी.

५६० (६२३). द्यानतराम अजरामरदास वस्ती किल्ले डबई हा मृत्यु पावला. त्याचे पोटीं संतान नाहीं सबब सालगुदस्त मशारनिल्हेच्या घराची जप्ती सरकारांतून करावयास तुह्मांस आज्ञा केली होती; त्याजवरून तुम्ही जप्ती करून जप्तीचा जाबता व पत्र पाठविलें तें हुजूर पावलें, त्यास द्यानतराम मजकूर याची आई व दोघी स्त्रिया आहेत. त्यांचे तर्फेनें विसाजी अनंत यांनीं हुजूर विनंति केली; त्याजवरून जप्ती मोकळी करावयाचा करार करून जप्तींत वस्तभाव व नगदी ऐवज वगैरे आले आहेत त्याचा करार येणेंप्रमाणें.

इ० स० १७६९।७०. सबैन मया व अलफ. रविलाखर १६.

कलमें. ——————————— बितपशील.

रोख ऐवज सांपडला तो रुपये.	लोकांकडे कर्ज येणें ते रुपये.
३१॥ नक्त.	२८०२।- खतें आहेत.

560. Dyanatram Ajramardas, residing at fort Dabai, died without issue. His house and property was therefore attached by Government. Dyanatram's mother and wife having complained, it was ordered that 2/5th of the cash and gold and documents, amounting in all to Rs. 4,731, should be retained by Government the rest being restored to the ladies in question.

A. D. 1769-70.

३०७९२ सोनें तोळे १९२२ दर १६ प्रमाणें.

३०७८३॥.

एकूण तीसहजार सातशें साडेत्र्यायशी रुपयांची वांटणी येणेंप्रमाणें.

रुपये.

११३१३॥ दोन हिस्से सरकारांत.
१८४७० तीन हिस्से बायकांस.

३०८३॥.

येणेंप्रमाणें बाराहजार तीनशें साडेतेरा रुपये सरकारत घ्यावयाचे व बायकांस आठराहजार चारशेंसत्तर रुपये द्यावयाचे येणेंप्रमाणें कलम १.

मशारनिल्हे याजवळ द्रव्य बहुत आहे, ह्मणोन भ्रम आहे, त्याची चौकशी तुम्हीं करावी आणि चौकशीमुळें दहा हजार रुपयेपर्यंत सांपडल्यास सरकारांत घेऊं नये. जाजती सांपडतील त्याचे दोन हिस्से बायकांस द्यावे व एक हिस्सा सरकारांत घ्यावा. येणेंप्रमाणें. कलम १.

घरें व नगनगोटी व गुरें व घोडीं व भांडीं तांब्याचीं व पितळेचीं वगैरे व कापड व लांकडी दागिने व पुस्तकें वगैरे खेरीज नगदी ठेवा व लोकांकडील कर्ज येणें तें वजा करून बाकी कुलवस्तभाव बायकांस द्यावी. येणेंप्रमाणें. कलम १.

२१०१ भुकणदास.
३३५१. सभाचंद देसाई.
२२० भुलजी गुलाबराव रुपये.
५९ मौजे इटाल येथील पाटील भाईबा.
५० मेहता पुरुषोत्तम.
४१ अनुपमराम.

२८०२।

८१४६ खतें नाहींत परंतु ऐवज साहूकारींत आहे रुपये.
६०७५ रामदास किसनदास.
१८३४ नरसीदास शंकरदास.
२३७ नारसी पारख डबईकर.

८१४६

१०९४८।.

सदरहूप्रमाणें ऐवज आहे, परंतु भावाचा असें म्हणतात म्हणोन हुजूर विदित केलें, त्यांस द्यानतरामाचे जाहल्यास घेणें.

एकूण दहाहजार नऊशें सवाआठेचाळीस रुपयांची वांटणी येणेंप्रमाणें. रुपये.

४३७९।- दोन हिस्से सरकार.
६५६९ तीन हिस्से बायकांस.

१०९४८।.

येणेंप्रमाणें तेचाळीसशें सवाएकूणऐशी रुपये सरकारांत घ्यावयाचे व सहाजार पांचशें एकूणहत्तर रुपये बायकांस द्यावयाचे येणेंप्रमाणें. कलम १.

सदरहूप्रमाणें खतें नाहींत त्याची चौकशी लिहिल्याप्रमाणें करून द्यानतरामाचें ठरल्यास वांटणी करावी. नाहींतर घेऊंनये, येणेंप्रमाणें.

येणेंप्रमाणें चार कलमें करार करून हे सनद सादर केली असे, तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें सरकारांत ऐवज घ्यावयाचा तो सरकारांत घेऊन बाकी वांटणीप्रमाणें बायकांस

ऐवज व वस्तभाव लिहिल्याप्रमाणें देणें. सरकारचा ऐवज वांटणी बरहुकूम घेऊन सरकारांत पुण्यास पावता करणें म्हणोन शिवाजीराव सुर्वे हवालदार व कारकून किल्ले डबई यांचे नांवें. सनद १.

येविशीं चिटणीशी पत्रें.

जप्तीपैकीं नगदी ऐवजाच्या वगैरे फडशाची सनद अलाहिदा सादर केली असे, तरी सरकारचा ऐवज घेऊन जप्ती मोकळी करणें व मशारनिल्हेचें घर किल्ले मजकुरीं आहे. त्याचें सुरूद (सुहृद) संबंधी वगैरे पूर्ववत्प्रमाणें त्याचे घरीं येतील त्यांस येऊं जाऊं देणें, अडथळा न करणें म्हणोन शिवाजीराव सुर्वे हवालदार व कारकून किल्ले मजकूर यांचे नांवें. पत्र १.

कृष्णाजी रुद्र व जगन्नाथ गंगाधर कमावीसदार परगणे मजकूर यांचे नांवें पत्र कीं, जप्ती मोकळी केली असे, तरी त्याचे घरीं पूर्ववत्प्रमाणें सुहृदसंबंधी वगैरे येतील त्यांस येऊं जाऊं देणें म्हणोन. पत्र १.

शामा व अंबा द्यानतराम याच्या बायका यांचे नांवें अभयपत्र कीं, जप्ती मोकळी केली असे, तरी नगदी ऐवजाची वगैरे फडशाची सनद हवालदाराचे नांवें दिली आहे, त्याप्रमाणें जप्ती मोकळी करतील.तुम्ही करारप्रमाणें ऐवज सरकारचा देऊन बाकी ऐवज व वस्तभाव तुम्ही घेऊन किल्लेमजकुरीं सुखरूप राहणें. अभय असे म्हणोन. पत्र १.

४

येणेंप्रमाणें एक सनद व तीन पत्रें. रसानगीयादी.

५६१ (६३४). बापू व्यंकटेश जोशी कसबे शेवगांव याचा व कानोराम व लक्ष्मण निमोणकर यांचा देवघेवचा कजिया आहे म्हणोन सालगुदस्त बापू व्यंकटेश यानें हुजुरून तुम्हांस पत्र नेऊन या उभयतांचीं घरें जप्त करविलीं; त्याजवरून सालमजकुरीं ज्यांचीं घरें जप्त जाहलीं ते हुजूर आले. हरदूवाद्यांहीं आपलें वृत्त निवेदन करून तेथील पंचाईतीस मान्य जाहले आहेत, याजकरितां कानोराम व लक्ष्मण निमोणकर यांचीं घरें जप्त आहेत, तीं मोकळीं करून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे, तरी सदरहू घरें मोकळीं करणें

इ० स० १७६९।७०. सबैन मया व अलफ. रजब १.

561. Bapu Vyankatesh Joshi of Kasbe Sewagaum complained that there was a dispute between him, Kano Ram and Laxmanji Nimonkar regarding some money transactions. The houses of the latter two persons were therefore attached. In the following year these persons came to the Huzur and consented to have the dispute referred to arbitration. The attachment was therefore ordered to be removed, and the Kamavisdar was instructed to nominate as Panch any residents of the place that might be selected by the parties and to get the dispute settled.

A.D. 1769-70.

आणि हरदूवादी तेथील ज्या गृहस्थास राजी होतील त्यांजकडे पंचाईत नेमून देऊन कजिया विल्हे लावणें म्हणोन बाबुराव विश्वनाथ कमावीसदार परगणे जालनापूर यांस. पत्र १.

चिटणिसी पत्र.

५६२ (६३९). विठ्ठल लक्ष्मण नाईक नगरकर याचें कर्ज गणोबा नाईक धोंगडे पारनेरकर व रंगोबानाईक तांबोळी नगरकर यांजकडे येणें तें वाजबी असेल तर कूळ दारनादार पाहून वसूल करून चौथाई सरकारांत घेऊन बाकी ऐवज यांस देणें म्हणोन, नारो बाबाजी कमावीसदार परगणे पारनेर यांस चिटणिसी. पत्र १.

इ० स० १७६९।७०. सबैन मया व अलफ. रजब १.

५६३ (६८६). मोकदम मौजे उरूण तालुके वाळवें प्रांत पन्हाळा यांचे नांवें निवाडपत्र करून दिलें ऐसाजे, तुम्ही हुजूर कसबे पुण्याचे मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, मौजे मजकुराचा व मौजे बोरगांव परगणे शिराळें सुभे मलकापूर येथील शिवेचा कजिया होता, त्यामुळें पेशजी आपण व बोरगांवचे मोकदम सरकारांत फिर्याद जाहलों, त्याजवरून साहेबीं त्यांची व आपली मनसुबी मनास आणावयाची राजश्री बाळाजी महादेव यांस आज्ञा केली, त्यांनीं आपल्याकडील बाबाजी अनंत कारकून यास शिवेवर पाठविले. ते तेथें आलियावरी मौजे मजकूर राजश्री रघुनाथबाबा मंत्री यांजकडे आहे व मौजे बोरगांव राजश्री गोविंद खंडेराव चिटणीस दिमत हुजरात यांजकडे आहे, यास्तव मनसुबीस उभयतांकडील कारकून राजश्री बळवंतराव शामरावपंत मंत्री व राजश्री आबाजी बापूजीपंत चिटणवीस, वाळवें व शिराळें येथील जमीदार व भोंवरगांव जमा होऊन आम्हां हरदूजणांपासून तकरीरा व शिवेची हिंदाणे व वर्तणूकेस जामीन व राजीनामे घेऊन दाखले भोगवटेयांची चवकशी मनास आणतां बोरगांवकरांची साक्ष पुरली नाहीं. आमची साक्ष शिवधडे यांस पुरली. त्यास बोरगांवकर गैररजावंद होऊन आमचे क्रियेस रजावंद जाहले. आणि क्रियेचे राजीनामे त्यांनीं

इ० स० १७७१।७२. इहिदे सबैन मया व अलफ. जिल्काद २०.

---

562. Ganoba Naik Dhongade of Parner and Rangoba Naik Tamboli of Nagar owed some debt to Vithal Laxman Naik of Nagar. The Kamavisdar of Parner, Naro Babaji was directed to recover the debt with due regard to the circumstances of the debtors and to credit one-fourth of the amount recovered to Government, the remainder being paid to the creditor.

A. D. 1769-70.

563. There being a dispute regarding the boundary of the villages of Uran in tarf Walve and Borgaum in pargana Sirale, Balaji Mahadeo was appointed to inquire into the matter. He sent his clerk to the spot. The evidence on both sides was taken and the matter was decided in favor of the Uran people. The other party being dissatisfied prayed that the dispute might be settled by an ordeal to be undergone by the Uran people. The Patel of Uran therefor placed a cow's hide on his head and with a pot of water from the Krishna in his right hand walked round the alleged boundary. The other party said that the pot of water seemed too heavy

A. D. 1769-70.

व आम्हीं दिले. आम्हांकडून बाजी बीन नाथाजी पाटील यानें कराराप्रमाणें मस्तकी गाईचें चर्म व श्रीकृष्णेचा चंबू भरला उजवे हातीं घेऊन शिवेनें चालून शीव खरी केली. त्यास चंबू जड जाहला व सर्प निघाला. त्याची दिकत बोरगांवकरांनीं घेतली. त्याची चौकशी शिवेवर अमीनांनीं केली. व आम्ही दोघे मुदई हुजूर आलियावरी साहेबीं पंचाईतास हुकूम करून, अर्थ मनास आणितां त्यांनीं दिकती घेतल्या; त्या खोट्या जाहल्या. तदोत्तर बोरगांवकर आग्रहास पडोन रव्याचें दिव्य करतो म्हणोन अर्ज केला. त्याजवरून साहेबीं दिव्य करण्याची आज्ञा केली आणि आह्मां हरदूजणांपासून राजीनामे घेऊन मौजे पाषाण प्रांत पुणें येथें श्रीसोमेश्वरासन्निध दिव्य करण्याची आज्ञा देऊन राजश्री नारो आपाजी कारकून सुभा प्रांत मजकूर यासी आज्ञा केली, त्यांनीं प्रांत पुणें व तालुके वाळवें येथील जमीदार व आह्मां हरदूवादियांस घेऊन गेले. तेथें श्रीसन्निध शास्त्रज्ञ थोर थोर ब्राह्मणांचें मतें भिवाजी बीन सुभानजी मोरे पाटील बोरगांवकर यांजपासून दिव्य करविलें त्यांनीं रवा काढला. हातास फोड येऊन बोरगांवकर खोटे जाहले; आम्हीं खरे जाहलों. त्याजवर आमच्या हिंदाणाप्रमाणें बोरगांवकरांनीं यजितपत्र आह्मांस लिहून दिलें आहे. तें मनास आणून सरकारचें निवाडपत्र भोगवटियास करून द्यावयाची आज्ञा करावी. म्हणून विनंति करून यजितपत्र आणून दाखविलें तें मनास आणितां बोरगांवकर खोटे जाहले. तुम्ही खरे जाहला. सबब तुम्हांस भोगवटियास हें निवाडपत्र करून दिलें असे, तरी यजितपत्रांत शिवेचीं हिंदाणें लिहिलीं आहेत, त्या बमोजिब तुम्ही मौजे मजकुराची जमीन वंशपरंपरेनें अनुभवून सुखरूप राहणें ह्मणोन नांवांचें निवाडपत्र. १.

येविशी सदरहू अन्वयें पत्रें कीं, उरूणकरांकडे जमीन लेंकरांचे लेंकरी चालविणें यजितपत्रांत हिंदाणें लिहिलीं आहेत, त्याप्रमाणें या पत्राची प्रत लिहून घेऊन हें अस्सल पत्र उरूणकर मोकदम यांजवळ भोगवटियास परतोन देणें ह्मणोन. पत्रें २.

१ देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी तर्फ बाळवें प्रांत पन्हाळा यांस.
१ देशमुख व देशपांडे तर्फ वाळवें प्रांत पन्हाळा यांस.

२

तीन पत्रें चिटणिशी पत्रें दिली असे ३

उरूणकर खरें जाहलें सबब त्यांजकडे सरकाराची हरकी करार करून निवाडपत्रांत भरून दिली आहे. ते सरकारांत जमा पेशजी ———— रुपये.

९२५० छ० १७ साबान तिसा सितैन देणें किल्लेनिहाय निसबत शामराव जगजीवन यांस बेगमीबद्दल दिले.

for the patil and that a snake was met with on the road, and that therefore the ordeal was unfavourable to the people of Uran, and they consented to go through the fire ordeal themselves. A panchayet was held at Pashan near Someshwar temple and in their presence the patil of Borgaum went through the ordeal and had his hands burnt. The Borgaon claim was therefore adjudged to be false, and a nazar of Rs. 10,500 was levied from the people of Uran.

५२५० छ. १७ सुरूसन सबैन तसलमात बाळाजी महादेव प्रांत गंगथडी येथील फाजिलापैकीं दिले.

१०९००

येणेंप्रमाणें साडेदहाहजार रुपये जमा जाहले असेत.

५६६ अ (.६९८). शिवाजीराव सुर्वे हवालदार किले डभई याचे नांवें सनद कीं

इ० स० १७७१।७२ इसन्नें सबैन मया व अलफ. जमादिलावल २४.

राजकुवर कोम दलपतराम वस्ती किले मजकूर इनें हुजूर विदित केले कीं, आपला दादला दलपतराम मृत्यु पावला. आपली सवत होती ते समागमें अग्नि प्रवेश केली. पोटीं संतान नाहीं. आपले घरीं सेवकराम व जीवनराम सवतीचे भाचे होते ते घरचा सर्व कारभार करीत होते. त्यांनीं आपले घरची सर्व वस्तभाव नगनगोटे व नक्त कापड व खतेंपत्रें व मालमालीयत होती ते कुल नेली. ती आपणांस देत नाहींत. स्वामीनीं कृपाळू होऊन देववावी; व लोकांकडे येणें आहे तेंही देववावें. आणि त्या पैकीं नगदी ऐवज ठरेल त्यापैकीं निमे ऐवज सरकारांत घेऊन बाकी निमे ऐवज वगैरे वस्तभाव मजला देववावी म्हणोन, त्याजवरून दलपतराम मृत्यु पावला त्याचे पोटीं संतान नाहीं, सबब त्याचे मालमालियतेची जप्ती करावीयाविशीं हें पत्र तुम्हांस सादर केलें असे, तरी सेवकराम व जीवनराम यांजकडे व लोकांकडे वगैरे ऐवज नक्त व कापड व वस्तभाव व नगनगोटे व खतेंपत्रें वगैरे कुल मालमालियत असेल तें सरकारचे खिजमतगार नाईकजी शितोळे दिमत तानाजी पडवळ व नाईकजी कानकाटा दिमत रायाजी संकपाळ निसबत खासजी लिंबा पाटविले आहेत. यांचे गुजारतीनें चौकशी करून जप्ती करणें आणि जाबता तपशीलवार लिहून हुजूर पाठवणें हुजुरून आज्ञा करणें ती केली जाईल म्हणोन, रसानगीयादी. सनद १.

येविशीं लक्ष्मण कृष्ण कमावीसदार परगणे डभई यांचे नांवें सनद कीं, तुम्ही व मशारनिल्हे उभयतांनीं मिळोन जप्ती करून जाबता हुजुर लेहून पाठविणें म्हणोन, १.
२

५६४ (७०३). वनमाळी शंकरदास वस्ती शहर बऱ्हाणपूर याचा पुतण्या यास

इ० स० १७७१।७२. इसन्नेसबैन मया व अलफ. सावान ५.

खुशालचंद गिरधरदास वस्ती शहर मजकूर याची कन्या सोयरीक केली. जातीभोजन होऊन चार पांच वर्षें त्याचे घरीं जात येत असे. असें असतां नथोदास किशोरदास वस्ती जैनाबाद यानें

563 (A.) Dalpatram, a resident of fort Dabai died and one of his wives burnt herself on his pyre. The property of the deceased was
A. D. 1771-72. taken away by the woman's neiphew. The surviving widow of Dalpatram brought the fact to the notice of Government and claimed the property. It was ordered to be attached pending final decision.

564. Khushalchand Girdhardas promised to give his daughter in marriage to a nephew of Wanmali Shankardas of Baranpoor. A caste
A. D. 1771-72. dinner was given in ratification of the promise and the bride used to visit the bride-groom's house for about four

नवरीचे बापास फितावून नवरी येदलाबादेस नेऊन जातींत कोणास न कळतां लग्न केलें. आमची वस्तभाव व नगनगोटी खर्चवेंच लागला आहे तो देत नाहीं. बदमामलीच्या गोष्टी सांगतो म्हणोन हुजूर विदित जाहलें; त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तरी तुम्ही या गोष्टीची चौकशी करून सदरहूप्रमाणें लबाडी जाहली असल्यास नवरीच्या बापापासून व नथोदास किशोरदास याजपासून मातबर गुन्हेगारी घेऊन हुजूर पाठवणें, आणि वनमाळीदास यांस खर्चवेंच जो लागला असेल तो चौकशी करून त्यांस देणें म्हणोन, कमलाकर भास्कर कमावीसदार यांस चिटणीशी. ——————————पत्र १.

५६५ (७११). रुद्रमण ब्रह्मचारी वस्ती कसबे जुन्नर यांनीं हुजूर विदित केलें कीं, निवारसी परदेशी मृत्यु पावेतो, त्याची मालमवेसी जे असते ती त्याच्या क्रियेस खर्च होऊन बाकी राहते ती अमानत त्याचा गुरू ब्रह्मचारी अगर बैरागी याजवळ ठेवितात. सरकारांत घेत नाहींत. त्याचा कोणी वारसदार आला तर त्याच्या हवालीं करितात. न आला तर भंडारा अगर दानधर्म करितात. असें असतां भगवंतसिंग व दयाराम व नेवाजी वगैरे परदेशी निवारसी मृत्यु पावले त्यांचा गुरू आपण याजकरितां त्यांची वस्तभाव गुरें, ढोरें, खर्तेपत्रें मालमवेसी आपल्याजवळ राहिली; असें असोन राजश्री उधो वीरेश्वर यांनीं सदरहू असामींचा बैतन माल आपणापासून घेऊन जप्त केला आहे, येविशीं ताकीद होऊन सदरहू असामींची मालमवेसी देविली पाहिजे म्हणोन; ऐशास निवारसी परदेशी याची माल मवेशी असेल ती त्याच्या क्रियेस खर्च होऊन बाकी राहील त्याचा दानधर्म करावा, सरकारांत घेऊं नये, असें असतां तुम्हीं सदरहू असामींची मालमालीयत वगैरे ब्रह्मचारी याजवळून घेतली असेल ती माघारी देणें म्हणोन, उधो वीरेश्वर यांस चिटणिसी. पत्र १.

इ० स० १७७१।७२. इसन्ने सबैन मया व अलफ. सवाल ८.

५६६ (७१२). संताजी बिन तानाजी कडु मोकदम मौजे वाकी बुद्रूक तर्फ चाकण प्रांत जुन्नर यासी मकाजी तानाजी कडु याचे पाटाचे बायकोचा पुत्र संताजी पेक्षां वडील, सबब वडीलपणास भांडत होता, त्यास संताजी धाकटा परंतु लग्नाचे बायकोचा सबब त्या-

इ० स० १७७१।७२. इसन्ने सबैन मया व अलफ. जिल्हेज २८.

---

or five years. Nathodas Kishordas of Jainabad, however, induced Khushalchand to give him the girl in marriage, and took her to Edlabad and married her without the knowledge of the caste people. The matter having been brought to the notice of the Peshwa, orders were issued to impose heavy fines on the bride's father and Nathodas Kishordas, and to recover from them and pay to Wanmali the expenses incurred by the latter.

565. Rudraman Brahmchari of Junnar represented that when a Perdeshi died heirless, his property vested, according to custom, in his Guru, whether a Brahmachari or a Bairagi, and that not-with-standing this custom, the Kamavisder had attached certain property belonging to his pardeshi desciples who had died without heir. The Kamavisdar was ordered to restore the property.

A. D 1771-72.

566. Makaji bin Tanaji Kadu, a son of Tanaji by a Pat wife claimed the

जकडे मुकादमी सांगोन सरकारची नजर करार रुपये १२०० बाराशें करार करून छ० ४ जिल्हेजपासून एक महिन्यानें ऐवज घ्यावा येणेंप्रमाणें करार. रसानगीयादी निवाड-पत्राची. कलम १.

५६७ (७९३). पाद्री फरेल पाद्र यांनीं हुजूर विदित केलें कीं, कसबे ठाणें साष्टी येथें फिरंग्याचे देवळास आपले तर्फेनें फरासीस प्रेल गुमास्ता ठेविला आहे, तो तेथें ठेविल्यापासून गुमास्तगिरीचा हिशेब आणोन आपणास देत नाहीं. मामलेदाराची हिमायत करून आह्मांस मानीत नाहीं, येविशीं ताकीद जाहली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून हें पत्र सादर केलें असे, तरी पाद्रीचा गुमास्ता फरासीस प्रेल याजपासोन मसाला रुपये १०० शंभर घेऊन मसाल्याचे रुपये व गुमस्ता तुम्ही आपले माणसाबराबर हुजूर पाठवून देणें ह्मणोन, आनंदराव राम यांस चिटणिसी. पत्र १.

इ० स० १७७१।७२. इसने सबैन मया व अलफ. जिल्हेज ११.

५६८ (७६६). त्रिंबकराव बल्लाल पाटील व चंदा व बधु वल्लद जानमहमद पाटील मौजे जापी परगणें सोनगीर सरकार आशेर प्रांत खानदेश यांनीं हूजर कसबें पुणें येथील मुक्कामीं येऊन विदित केलें कीं, मौजे मजकूर व मौजे निंबखेड परगणे मजकूर या हरदू गांवीं पांझर नदीचें पाण्याचा पाट पेशजीपासून येत आहे, त्याचें पाणी इस्तकबिल मृगापासून मार्गशीर्ष शुद्ध पंचमी पावेतों निंबखेडकरांकडे व मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीपासून अखेर रोहिणी नक्षत्रपर्यंत आठरोज आह्मांकडे व ४ रोज निंबखेडकराकडे याप्रमाणें चालत असतां दरम्यान निंबखेडकरानें पाण्यास खलेल करून पाणी बंद केलें. सबब मनसुबी करावयाविषयीं आपण सरकारचे पत्र सुभा चिंतामण हरि यांस नेलें त्याजवरून त्यांनीं निंबखेडकरांस आणून त्यांजपासून व आपल्यापासून जामीन व तकरीरा व राजिनामे घेऊन उभयतांचें रजावंदीनें साक्षीदारांस जमा केलें, त्यांनीं श्रीएकवीराभवानी वास्तव्य मौजे देवपूर परगणे लालिंग येथील तीर्थस्नानें करून देवालयांत शिरोन श्रीचा अंगारा लाऊन सत्योत्तरें साक्षी लेहून दिल्या कीं, पाटाचें पाण्याचे वांटणीचा भोगवटा सुदामत चालत आला. तो येणेंप्रमाणें.

इ० स० १७७२।७३. सलास सबैन मया व अलफ. रबिलावल ११.

A. D. 1771-72. right of elder-ship in the patilki watan of Waki Budruk in tarf Chakan of prant Junnar, on the ground that he was older than Santaji, another son of Tanaji by his first wife. His claim was disallowed and the right of eldership was conferred on Santaji, and a Nazar of Rupees 1200 was levied from him.

A. D. 1771-72. 567. A Christian padre complained that the agent at his church in Salsettee refuses to render him account of his agency. Orders were issued to leavy a process-fee of Rs. 100 from the agent and to send him to the Huzur.

A. D. 1772-73. 568. There being a dispute about the use of a canal from the river Panjra, between the villages of Japi and Nimb-Khede in pargana Songir in Sirkar Asher of prant Khandesh, the dispute was referred to arbitration by the Subha, and it was decided

इस्तकबील मृगसालापासून तागाईत मार्गशीर्ष शु० ५ पंचमी नागदिवाळीपर्यंत दरोबस्त पाणी निंबखेडकराकडे कलम १.

इस्तकबील मार्गशीर्ष शु० ६ षष्ठीपासून तागाईत मृगसाला पावेतों

आठदिवस पाणी आम्ही भरावें कलम १.

चारदिवस पाणी निंबखेडकरानीं भरावें कलम १.

सदरहूप्रमाणें पाण्याची वांटणी पूर्वीपासून चालत आल्याच्या साक्षी पुरल्या, त्याजवरून व पंचाईतमतें इनसाफाचे रुईनें निंबखेडकर पाटाचे पाण्याचे भांडण भांडत होतें ते खोटे जाहले. आपण खरे जाहलों. सबब निंबखेडकरांनीं आह्मांस यजितखत लेहून दिलें. त्यावरून सुभा आपल्यापासून हरकी रुपये ५०१ पांचशें एक रुपये घेऊन सुभाचें निवाडपत्र आम्हांस करून दिलें आहे, त्यास सरकारचीं पत्रें भोगवट्यास असावीं याजकरितां सुभाचे निवाडपत्र व निंबखेडकराचें यजितपत्र साहेबीं मनास आणून आम्हांवरी कृपाळू होऊन सरकारची पत्रें भोगवटीयास करून दिलीं पाहिजेत. म्हणोन विनंति केली. सुभाचें निवाडपत्र व निंबखेडकराचें यजितपत्र आणून दाखविलें. ऐशीं दोन्हीं पत्रें पाहून त्यांतील अर्थ हुजूर मनास आणून निंबखेडकर जापीकराशीं पाटाचें पाण्याविषयीं कजिया सांगत होते ते साक्षी मोज्यावरून इनसाफाचे रुईनें खोटे जाहले. जापीकर खरे जाहले. हें जाणोन जापीकरांवरी कृपाळू होऊन जापीकरांस सरकारचीं पत्रें भोगवटीयास करून दिलीं असेत तरी सरसुभ्याहून पूर्ववत्प्रमाणें सदरहू पाण्याची वांटणी दिवसाची येणेंप्रमाणें.

इस्तकबील मृगसालापासून तागाइत मार्गशीर्ष शुद्ध ५ पंचमी नागदिवाळीपर्यंत दरोबस्त पाणी निंबखेडकरांकडे. कलम १.

इस्तकबील मार्गशीर्ष शु० ६ पासून तागाईत मृगसाल पावेतों वाटणी दिवसांची.

आठ दिवस पाणी आम्ही भरावें. कलम १.

चार दिवस पाणी निमखेडकरांनीं भरावें. कलम १.

सदरहूप्रमाणें पाटाचे पाण्याची वांटणी जापीकरांकडे पुरातन चालत आली त्याप्रमाणें करार असे, तरी वांटणी बरहुकूम पाण्याचा भोगवटा चालत आल्याप्रमाणें यांजकडे व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालविणें. पाटास मरामत लागलागवड व बंधारा फुटला तरी नीट करावयासी खर्च लागेल तो यथाविभागें दोन्ही गांवाकडून करवीत जाणें आणि कीर्द महामुरी करणें. या पत्राची प्रति लेहून घेऊन अस्सल पत्रें जापीकरांजवळ भोगवटियास परतोन देणें. म्हणोन चिटणिसी. पत्रें ३.

१ त्रिंबकराव बल्लाळ पाटील व चंदा व बधु वलद जानमहमद पाटील

---

that from the beginning of the Mrigsal, to the 5th of Margashirsha Shudha, the canal water should be used exclusively by the villagers of Nimkhede and during the remaining period for 8 days by the Japi villagers and for 4 days by the villagers of Nimkhede, in turn. A nazar of Rupees 501 was levied from the villagers of Japi. A sanad containing the decision was also issued by the Peshwa at the request of the patil of the village.

मौजे जापी परगणें सोनगीर यांचे नांवें निवाडपत्र त्यांत सरसुभाचे निवाडपत्र व निंबखेडकराचें यजितपत्र अशीं दोन्ही पत्रें तपशीलवार लिहिलीं आहेत सबब निवाडपत्राची निवड करून आलाहिदा दप्तरीं ठेविलें असे.

२ सदरहूप्रमाणें. ——— पत्रें.

१ चिंतामण हरि सरसुभा प्रांत खानदेश यांस.

१ देशमुख व देशपांड्ये परगणे सोनगीर प्रांत खानदेश.

२

३

तीन पत्रें चिटणिशीं दिलीं आहेत.

---

७. न्यायखातें.

(ब) फौजदारी. (अ) गुन्हे.

(१) फंदफितुरी व राजद्रोह.

५६९ (६२). कृष्णाजी जिवाजी यांचे नांवें सनद कीं, भिकाजी बाबूराव शिलेदार लष्करांतून निरोप घेऊन घरास गेले, तेथोन मोगलाईत गेले म्हणोन कळलें, ऐशास ते मोगलाईत गेलेअसिले तरी चौकशी करून त्यांजकडे मौजे डुबेर परगणे अकोलें हा गांव आहे तो वगैरे जे असेल त्याची जप्ती करणें म्हणून पत्र १.

इ० स० १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. रमजान ११.

परवानगी, राजेश्री दादा रुबरू.

५७० (६६). लक्ष्मण खंडेराव यांचे नांवें सनद कीं, परगणे कागल वगैरे येथें नरसिंगराव घायगुडे यांचे गांव आहेत. त्यास ते मोगलाईत गेले. यास्तव त्यांचे गांव असतील त्यांची जप्ती करावयाविशीं तुम्हांस सनद सादर केली असे. तरी तुम्ही त्यांकडील गांव वगैरे जें असेल त्याची चौकशी करून जप्ती करणें आणि वसूल घेणें म्हणून मशारनिल्हे यांचे नांवें सनद १.

इ० स० १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. रमजान २९.

५७१ (८०). गणपतराव रामचंद्र याचे नांवें पत्र कीं, परगणे तालिकोट व

---

569. Bhikaji Baburav a Siledar, went home on leave. The Peshwa was informed that he had thence proceeded into Mogal territory. Krishnaji Jiwaji was ordered, if the information proved to be true, to attach the village of Dubare and others belonging to Bhikaji.

A. D. 1762-63.

570. Narsingrav Dhaygude having joined the Mogals, his villages in parA. D. 1762-63. gana Kagal and others were ordered to be attached.

571. The Moglai amal of parganas Talikot, Nalwad, Hunsangi and Kodkal

इ० स० १७६२।६३ सलास सितैन मया व अलफ. जिल्काद २१.

नालवाड व हुणसंगी व कोडकल येथील मोगलाई अमल मोगलअल्लीकडे दिला होता, त्यास ते निजामअल्लीकडे गेले याजकरितां तो अमल जप्त करून जप्ती तुम्हांस सांगितली होती, त्यास तुम्ही अद्यापि सदरहूची जप्ती करून तालिकोटचें ठाणें घेतलें नाहीं ह्मणून विदित जाहलें. ऐशास सदरहू ठाणें लक्ष्मण वासुदेव यांजकडे साध्य व्हावयाचें राजकारण आहे, याजकरितां तुम्हांकडून सदरहू महालचा मोगलाई अमल दूर करून हल्लीं पेस्तरसालापासून ठाणेंसुद्धां परगणेहायची कमावीस मशारनिल्हेस सांगितली असे, त्यास तुम्ही तालिकोटचें ठाणें घेतलें-असलें तरी अमल तुम्हांकडे चालेल. ठाणें नसलें घेतलें तरी मझारनिल्हे ठाणें घेऊन अमल करतील तुम्ही मुजाहीम न होणें. जप्ती मोकळी करणें ह्मणून चिटणिशी. पत्र १.

५७२ (९२). जमीदार परगणें वैजापूर यांचे नांवे सनद कीं, जीवनराव केशव याचे वतन परगणें मजकूरचें देशपांडेपण, कुळकर्णाचे गांव, इनाम आहेत, त्यास ते मोगलाईंत जाऊन सरकारचे कमावीसदार यांजवरी छापा घालून घोडीं नेलीं, आणि अमल चालों देत नाहींत सबब मशारनिल्हेचें वतन देशपांडेपण व कुळकर्णाचें गांव व इनाम जे असतील त्यांची जप्ती करून कमावीस राजश्री महादाजी हरि दिमत त्रिंबकराव लक्ष्मण यांस सांगितली असे, तरी तुम्ही मशारनिल्हेकडे रुजू होऊन वतनाचे हकदक व इनामगांवचा वसूल मशारनिल्हेकडे देणें म्हणोन. सनद १.

इ० स० १७६३।६४ अर्बा सितैन मया व अलफ. मोहरम. १२

रसानगीयाद.

५७३ (१२६). संताजी राजे भोसले यांचीं पाटिलकीचीं वतनें व मुकासाबाबती सरदेशमुखीचा अमल पेशजीपासून आहे, त्याप्रमाणें करार असे, त्यास हे गुदस्तां मोगलाईंत गेले, याजकरितां सदरहूची जप्ती केली होती, त्यास हल्लीं स्वराज्यांत आले, सबब सदरहू वतनाची व अमलाची जप्ती मोकळी केली असे, तरी मुकदमी व अमल सुदामतप्रमाणें यांजकडे चालवणें म्हणोन. येविशीं पत्रें.

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. रबिलाखर १४.

---

was granted to Mogal Ali. He however joined Nizam Ali. Ganpatrao Ramchandra was ordered to attach the amal and to obtain possession of the thana of Talikot. He failed to do so. Laxman Wasudeo was therefore directed to carry out the order.

A. D. 1762-63.

572. Jiwanrao Keshav, Deshpande of pargana Vaijapur, joined the Mogal, attacked the Government kamavisdar and carried off his horses. Jiwanraw's watans of Deshpade and Kulkarni were therefore ordered to be attached.

A. D. 1766-67.

573. Santaji Raje Bhosle having gone over to the Mogals in the previous year, his watans were attached. He returned to the Peshwa in the current year. The attachment was, therefore, removed.

A. D. 1763 64.

२ कसबे जिंती तर्फ चांभारगोंदे येथील मुकदमी दरोबस्त वतन व जागीर व मोकासा व बाबती व सरदेशमुखी कुलबाब कुलकानू येविशीं.

१ जमीदारांस.
१ मोकदमास.
२

३ मौजे पिंपळगांवपिसा परगणे पारनेर येथील निमे मुकदमी वतन व मोकासा व बाबती सरदेशमुखी येविशीं.

१ नारो बाबाजी कमावीसदार.
१ जमीदारांस.
१ गांवास.
३

४ मौजे घारगांव तर्फ कर्डे येथील निमे मुकदमी वतन व मोकासा व बाबती व सरदेशमुखी येविशीं.

१ बाबूराव माणकेश्वर.
१ मल्हारराव भिकाजी.
१ जमीदार.
१ गांवास.
४

३ मौजे पेडगांवखुर्द तर्फ पाटस प्रांत पुणें येथील निमे मुकदमी वतन व मोकासा व बाबती व सरदेशमुखी येविशीं.

१ निळकंठ महादेव.
१ जमीदारांस.
१ गांवास.
३

१२ चिटणिशी पत्रें.

५७४ (१६४). गणेश विठ्ठल यांचे नांवें सनद कीं, तुम्हांकडील कलमें.

इ० स० १७६३।६४.
आर्बा सितैन मया व अलफ.
रजब १२.
कित्ता.

१ चवरी नवी.
१ हुद्दा.
१ रुमाल.
३

कसबे नगर येथें तुम्हांस घर बांधावयाबद्दल लांकडें.
१३ तुळया.
१०० गोल.
११३

574. On the occasion of the invasion of Ahmadnagar by the Mogals, the

तीन दाागिनें नवे करून दिले असत तालुके नगरपैकीं तयार करून घेणें. कलम १.

किल्ले मजकुरचे लोक असामी—

२५ हवालदार.
२५ सरनोबत.
१५१ कित्ता.

१०१

एकूण दोनशेंएक माणूस हल्लीं दूर करून बाकी राहिल्या लोकानशीं किल्ल्याचा बंदोबस्त करणें. कलम १.

किल्ले मजकूरचे लोकांचे नवादे समेत कापड सन सितैनापासून देणें राहिलें आहे अजमासे आकार. रुपये १४९८.

सदरहू ऐवज देणें आहे; परंतु साल मजकुरीं सरकारांत ऐवजाची वोढ बहुत आहे, सबब येविशींची आज्ञा करणें ते पेस्तर केली जाईल. कलम १.

एकूण एकशें तेरा लांकडें मध्यम प्रतीचीं देविलीं असेत. किल्लेमजकुरीं लांकडें आहेत, त्यांपैकीं घेऊन बक्षीस खर्च लिहिणें. कलम १.

कसबे भिंगार येथील जमीदारांनीं सालगुदस्तां मोगल नगरास आला त्यासमयीं मुलें माणसें किल्ल्याखालीं ठेवून आपलीं घरें वांचविण्याबद्दल सरकारांत न कळवितां मोगलाकडे जाऊन खंडणी करून घरें वांचविलीं. त्यानिमित्त जमीदारांस व मोकदमांस किल्लेमजकुरीं आणून गुन्हेगारीचा तगादा लाविला; त्याजवरून जमीदारांनीं गुन्हेगारी कबूल केली आहे; म्हणून विदित जाहलें. ऐशास त्या हंगामी जमीदारांनीं मोगलास खंडणी देऊन गांव वांचविला, त्यास गुन्हेगारीचा तगादा लाविल्यानें पुढें लावणी होऊन आबादी होणार नाहीं. सालोसाल नुकसानी होईल हें जाणून जमीदारांस गुन्हेगारी माफ केली असे, तुम्ही जमीदारांस दिलदिलासा देऊन गांव भरबेरजेस आणून आबादी करणें म्हणोन. कलम १.

येणेंप्रमाणें पांच कलमें करार केलीं असत. सदरहू लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें म्हणोन. सनद १.

रसानगीयादी.

A. D. 1763-64. Jamidars of Kasbe Bhingar, kept their families under the protection of the fort and without the knowledge of Government promised a subsidy to the Mogals to save their houses. They and the Mokadam were therefore brought to the fort, and a fine was imposed on them by the fort-keeper for their conduct. The fort-keeper was informed that the Jamidar paid the subsidy in order to protect their village on a critical occasion, and that to take them to task on that account, would only retard cultivation. The fine imposed was therefare remitted.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

५७५ (२२०). किल्ले पुरंधर जुन्या लोकांनीं दंगा करून घेतला. त्यास राजश्री धोंडो मल्हार पुरंधरे यांजकडील कारकून किल्ल्यावर चढला आहे. किल्ल्याचे राजकारणांत मशारनिल्हे आहेत, सबब यांचा सरंजाम सरकारांत जप्त करून जप्तीची कमावीस राजाराम गोविंद यांस सांगितली असे, तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन अमल सुरळीत देणें म्हणोन मोकदम यांचे नांवें. सनदा.

इ० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. जिल्हेज.

१ मौजे पारगांव तर्फ करेपठार प्रांत पुणें दरोबस्त.

× × × ×

३३

येणेंप्रमाणें तेहेतीस सनदा दिल्या असेत, बरहुकूम पत्र राजश्री दादा छ. १९ जिल्हेज.

५७६ (२४४). हैबतराव बंडगर दिमत राजश्री शहाजी भोसले यांजकडे मोकाशाचा अमल सरंजाम होता, त्यास ते मोगलाईत गेले, सबब त्यांजकडून साल गुदस्तां दूर करून त्यांचे बंधु सुलतानजी बंडगर अमिरल उमराव दिमत मशारनिल्हे यांसी फौजेचे बेगमीस सरंजाम सालगुदस्तां सन अर्बापासून करार करून दिला असे, तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन मोकाशाचा अमल वाजबी सुदामत प्रमाणें तहत सालगुदस्त व सालमजकूरचा सुरळीत देणें म्हणोन. सनदा.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. रविलावल २.

१० माहालच्या जमीदारांचे नांवें.

१ परगणे आवसें तिजाई.

१ परगणे कलबुरगेंपैकीं.

१ तर्फ कडगची.

१ तर्फ कमळापूर.

२

१ परगणें यादगीर.

१ परगणें प्रतापपूर निमें.

---

575. Certain persons formerly in the service of Government treacherously obtained possession of the fort of Purandhar. Dhondo Malhar Purandhare's Karkun was at the fort, and Dhondo himself was implicated in the conspiracy. His Saranjam was therefore ordered to be attached.

A. D. 1764-65.

576. Haibatrao Bandgar serving under Shahaji Bhosale having gone-over to the Mogal, his Saranjam had been attached in the previous year. It was now restored to his brother, Sultanji Bandgar, Amiral Umrao.

A. D. 1764-65.

१ परगणें ढोकीपैकीं फूटगांव.
१ परगणें सगर.
१ परगणें मैंदरगी.
१ परगणें चितापूर.
१ परगणें नळदुर्गपैकीं फूटगांव.
१ परगणें अबजलपूर.
१०

५ गांवांस मोकदमांचे नांवें
१ मौजे उंबरगें परगणे निलंगें.
१ मौजे माठमू कर्यात निंबसोलीमाईणी.
१ कसबे हिपरगे.
२ परगणे नळदुर्गपैकीं.
१ मौजे काटगांव.
१ मौजे मंगरूळ.
२
६

१ जमीदारास परगणे नळदुर्ग चिटणिशी दोन गांवानिशीं.
१६

रसानगी यादी.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं, लेखांक ५७७–५७९.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. जमादिलावल.

५७७ (२८१). गणेशभट बिन रामभट करंबेळकर यानें हबशी याजकडे राजकारण करून तुळाजी अंगरे यांस जंजिऱ्यास घेऊन जावें ऐसा मजकूर केला तो हुजूर विदित जाहल्यावर भट मजकुरास कैद करून तुम्हांकडे तालुके शिवनेरीस रवाना केला असे, तरी यास किल्ले शिवनेरीवर अटकेस ठेवून पोटास दररोज शेर देत जाणें, बंदोबस्तानें ठेवणें म्हणोन, रामचंद्र नारायण यांस छ. २० जमादिलावल. सनद १.

रसानगी सर्वोत्तम शंकर.

५७८ (२८२). विष्णु प्रभु व गाजे प्रभु उभयतां भाऊ वस्ती मौजे कोतापूर व

577. Ganeshbhat bin Rambhat conspired with the Janjirkar to taking Tulaji Angria to Janjira. He was arrested and sent to be imprisoned at fort Shiwaneri.
A. D. 1764-65.

578. Two brothers, Vishnu Prabhu, and Gaje Prabhu of Kotapur, and Kashibhat Ramchandra bhat Main of Khara-Patan in Taluka Vijayadurga, joined the Habshi in a conspiracy to take Tulaji Angria to Janjira and kept some 50 or 100 men at
A. D. 1764 65.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. जमादिलावल.

रामचंद्रभट माईन याचा लेक काशीभट वस्ती कसबें खारेपाटण तालुके विजेदुर्ग यांनीं तुळाजी अंगरे यांस जंजिऱ्याकडे राजकारण करून गाजे प्रभु व काशीभट जंजिऱ्यास जाऊन हबशी याचा कौल आणून अंगरे यांस जंजिरेयास घेऊन जावें ऐसा मजकूर केला. शेंपन्नास माणूस पुण्यामध्यें ठेविलें, त्यास हा मजकूर विदित जाहल्यावर चौकशीकरितां कांहीं लोक सांपडले. मुद्दा शाबूत जाहला. विष्णु प्रभु व गाजे प्रभु पळोन गेले. काशीभट येथें सांपडला आहे. यांचीं घरें तालुके मजकुरीं आहेत. ऐशास हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी तुम्ही पंचवीस माणूस व एक शाहाणा कारकून ऐसा दोहीं जागा पाठवून घरें जप्त करून वस्तवानी नगनगोटें हांडेंभांडें व मुलेंमाणसें किल्ला नेऊन अटकेस ठेवणें. वस्तवानीचा जाबता हुजूर लेहून पाठवणें. विष्णु प्रभु व गाजे प्रभु पळोन गेले त्यांचा शोध लावून धरून आणून बिडी घालून ठेवणें, व यांचें खोतीचे गांव व इनाम व जमीनजुमला शेतभात असेल तें दोन्हीं जागांचे जप्तींत ठेवून आकार होईल तो सरकार हिशेबीं जमा करीत जाणें म्हणोन, कृष्णाजी विश्वनाथ यांस छ. २० जमादिलावल. सनद १.

रसानगी सर्वोत्तम शंकर.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. जमादिलावल.

५७९ (२८३). जिवाजी गणेश यांस पत्र कीं, विष्णु प्रभु व गाजे प्रभु यांनीं जांजिऱ्याकडे राजकारण करून तुळाजी अंगरे यांस जंजिरेयास घेऊन जावें, तो मजकूर विदित जाहल्यावर चौकशी करितां कांहीं लोक सांपडले ते कैद करून रवाना——— असामी.

१ रहिमानखान दोशीखान.
१ मालजी बाळोजी गाईकवाड वस्ती चाकण.
१ देवजी रघोजी बेंदरे वस्ती बारागांवनांदूर.
१ मुदसींग मयाराम.
१ पिराजी सखोजी खराडे.
१ सिताराम वस्ती सायवान.
१ देवी वस्ती पलटू.
१ मदारी वलद करीमखान कसबे पुणें.
१ सतोखी वलद सुकदेव वस्ती पेठ बुधवार.
१ सटवोजी त्रिंबकजी सांवत.
१ किसनदास वस्ती बदलें.
१ फाजल वलद नथु.
१ गोंदजी शिदोजी निगडे.

Poona. The plot having become known, an inquiry was made and the two brothers absconded, Kashibhat was, however arrested. The houses, inam lands, and watans and other property of these persons were ordered to be attached, and the members of their families were ordered to be thrown into prison.

579. Seventeen persons (their names are given) implicated in the above conspiracy were arrested and sent to prison.

A. D. 1764-65.

१ सावजी धुनाजी वाघ.
१ शेख बंडु वलद शेख आदम.
१ मलकोजी भिकाजी साळोंखे.
१ सुजानसिंग बिरामण.
१७

एकूण सतरा असामी तुह्मांकडे किल्ले सिंहगडास पाठविले आहेत, तरी यांस किल्ल्यावर घेऊन बिड्या घालून इमारतीवर मजुरी माणसांत काम घेऊन पोटास दररोज दर असामीस शेर किल्ले मजकूरचे कोठीपैकीं देत जाणें; बंदोबस्तीनें चौकशीनें रखवाली करणें ह्मणोन छ० २२ जमादिलावल. सनद १.

५८० ( ). गोविंद मल्हार याचे नांवें सनद कीं, बाजी नरसी, महादजी शिंदे यांजबरोबर गेले आहेत. त्यांचें घर कसबें इंदापूर येथें आहे. त्याचे जप्तीस तुम्हांस पाठविलें आहे, त्यास मशारनिल्हेचें घर मोडून लांकडें ठेवाल त्यापैकीं बदल देणें लांकडें किंमत. रुपये.

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. सफर २६.

१४०० बक्षीस खर्च लेहून.
१००० कृष्णराव बल्लाळ काळे शिलेदार यांस आयतीच इमारतीचीं मोकळीं असतील त्यांपैकीं.
४०० गंगाधर त्रिंबक कारकून शिलेदार यांस.
१४००
४०० धोंड जोशी श्रीवर्धनकर आश्रित यांस धर्मादाय.
१८००

एकुण अठराशें रुपये किंमतीचीं लांकडें इंदापूरचे निरखानें देविलीं असत; तरी पावतीं करणें ह्मणोन. सनद १.

रसानगीयादी.

५८१ ( ). परगणें आळंद येथील मामलत पिराजी नाईक निंबाळकर यांजकडून तुह्मांस होती त्यास ते सरकारांतून गेले, सबब परगणे मजकूर सरकारांत जप्त केलेंअसतां तुह्मी अमल न दिला. परगणे मजकुरी तुह्मी वसूल घेऊन शिबंदीस खर्च केला. हल्लीं ठाणें तुम्हीं सरकारांत द्यावयाचा करार केला; त्याजवरून तुम्हावर कृपाळू होऊन परगणे मजकुरीं तुम्ही वसूल घेतलाअसेल तो तुम्हांस माफ केला असे. तुह्मी खातर जमेनें सरकारांत येत जात जाणें. तुह्मांस कांहीं तगादा लागणार नाहीं. कसबे मजकूरचें ठाणें व परगण्यांतील ठाणीं राजश्री विसाजी कृष्ण यांजकडील कमावीसदाराची

इ० स० १७६५।६६. सित सितैनमया व अलफ रमजान १.

580. Baji Narsi of Indapur having gone-over to Mahadaji Sindia, his house was ordered to be pulled down and the materials sold.
A D. 1765-66.

581. Piraji Naik Nimbalkar having deserted the cause of the Peshwa, his pargana of Alande was attached.
A. D. 1765-66.

रसीद घेऊन खातरजमेनें हुजूर येणें. देखतपत्र ठाणीं मशारनिल्हेच हवालीं करणें म्हणोन, जिवाजी राजदेव यांचे नांवें. सनद १.

रसानगीयादी.

५८२ (४३७). कसबे अष्टी परगणें पाथरी येथें नारो मल्हार दिमत निंबाळकर यास हुजूर आणावयास फौज पाठविली होती. ते निघोन गेले. मुद्दा उंटे घोडीं गांवकरी यांजकडे लागला, सबब गुन्हेगारी रुपये १४००१ चौदा हजार एक रुपया करार केला असे. सदरहूप्रमाणें सरकारांत देऊन तुम्ही गांवांत सुखरूप राहणें. नारो मल्हार यांचा मुद्दा घोडीं उंटे तुम्हांस माफ केलीं असेत म्हणोन मोकदमाचें नांवें. कौल १.

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. जिलकाद ३.

सदरहू चौदा हजार एक रुपया निशा महादशेट वीरकर यांनीं सरकारांत द्यावें. येणेंप्रमाणें करार. रसानगीयादी.

रामचंद्र गणेश यांच्या रोजकीर्दीपैकीं. लेखांक ५८३-५८४.

५८३ (४४५). मौजे ताकरी कर्यात भिलवडी प्रांत मिरज हा गांव राजश्री नीळकंठराव थोरात यांजकडे बदल मुशाहिरा होता. त्यास मशारनिल्हे भवानराव यांस सामील जाहले सबब त्यांजकडून दूर करून सालमजकूरापासून सुभानराव थोरात यांजकडे बदल मुशाहिरा करार करून दिला असे तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन मौजे मजकूरचा अमल पेशजीप्रमाणें वसूल सुरळीत देणें म्हणोन मोकदमाचें नांवें. सनद १.

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. जिल्हेज २.

येविशीं गोविंद हरि यांस पत्र कीं,
मौजे मजकूरचा अमल सुरळीत देणें
म्हणोन.

१/२

रसानगीयादी.

५८४ (४४६). भिकाजी कृष्ण यांचे नांवें सनद कीं, कर्यात आटपाडी येथील

---

582. An army was sent to Kasbe Ashti in pargana Pathari to arrest Naro Malhar in the service of the Nimbalkar. He, however, left the place before the arrival of the army, but his horses and camels were found with the villagers The villagers were therefore fined Rs. 14,001 and were permitted to retain the animals.

A, D. 1765-66.

583. Nilkanthrao Thorat having gone over to Bhawanrao, his village of Takari in Karyat Bhilwadi was transferred to Subhanrao, Thorat.

A. D. 1765-66.

584. The Deshpande of Atpadi having accepted service uner Haidar Naik, his watan was attached.

A. D. 1765-66.

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. जिल्हेज २. देशपांडे हैदर नाईक यांजकडे जाऊन चाकरीस राहिला आहे, सबब कर्यात मजकूर येथील देशपांडेपणाचें वतन सरकारांत जप्त करून जप्तीची कमावीस तुम्हांस सांगितली असे, तरी इमानेंइतबारें वर्तोन कर्यात मजकूर येथील देशपांडेपणाचे वतनाचा हक्कदक मानपान जो असेल तो घेऊन कचा हिशेब सरकारांत आणोन समजवावा म्हणोन, सनद १.

परवानगीरूबरू.

५८५ ( ) मोकदम देहाय परगणे फलटण यांचे नांवें सनद कीं, जानोजी भोसले. सेनासाहेब सुभा यांजकडे परगणे मजकूर येथील लोक चाकरीस गेले असतील त्यांचीं घरें व मुलेंमाणसें व इनाम वतनें चीजबस्तीची कूलजप्ती करावयास हुजुरून गोविंद अनंत

इ० स० १७६८।६९. तिसा सितैन मया व अलफ. जिल्काद २.

कारकून पाठविले आहेत, यांसी तुम्ही सामील होऊन जे लोक गेले असतील त्यांचा पत्ता लावून देणें यास नौदिगर केल्यास परिछिन्न पारपत्य केलें जाईल स्पष्ट समजोन वर्तणूक करणें म्हणून. सनद १.

परवानगी रूबरू.

५८६ (६०७). नानाजी विठ्ठल पालेकर निसबत राघोराम हे महादजी शिंदे यांजकडे चाकर असोन त्यांजवरच चालोन आले त्यास लढाई होऊन राघोराम मारले गेले. हरामखोरी केली सबब मशारनिल्हे यांचें घर चांभारगोंद्यांत आहे. त्यास मशारनिल्हेचे घरीं वस्तभाव व जराबाजरा जें असेल त्याची जप्ती करून किल्ले अमदानगर येथें आणून ठेवणें. आणि जाबता हुजूर लेहून पाठवणें म्हणोन, महादाजी नारायण यांचें नांवें सनद १.

इ० स० १७६८।६९. तिसा सितैन मया व अलफ. जिल्काद ४.

रसानगी बरोबर सनद लष्कर.

राघोराम हे महादजी शिंदे यांजकडे चाकर असोन त्यांजवर फौज घेऊन चालोन आले त्यास लढाई होऊन राघोराम मारले गेले हरामखोरी केली, सबब राघोराम व त्यांजकडील बाबुराव काशी या दोघांचीं घरें बांगणी नजीक इसलापुरास आहेत. तीं जप्त करून घरांत वस्तभाव जराबाजरा असेल ते झाडीयानिशीं हुजूर पुण्यास पाठवणें, व त्यांचीं शेतें मळें व वतनें असतील तीं जप्त करून आकार सरकार हिशेबीं जमा करणें, व मौजे वेरू-

---

585. An officer was sent to attach the houses of all persons of pargana Phaltan who had accepted service under Janoji Bhosle Sena Saheb Subha.

A. D. 1768-69.

586. Ragho Ram and his employed Nanaji Vithal Palekar, who were in the service of Mahadaji Scindia led an army against him. In the battle that took place, the former was killed. For this treacherous conduct their houses at Chambhargonde and Islampur were ordered to be attached.

A. D. 1768-69.

ळें प्रांत कन्हाड हा गांव रावोराम यांजकडे जातीस सरंजाम आहे, तो सरकारांत जप्त करून कमावीस तुम्हांस सांगितली असे तरी इमानें इतबारें अमल करून मौजे मजकूर पैकीं, दुमाले जमीनीचा आकार वजा होऊन बाकी ऐवज रुपये ३६६७।=॥ छत्तीशे सवासदुसष्ट रुपये साडेतीन आणे पैकीं बाळाजी महादेव कमावीसदार खासगीगांव प्रांत मजकूर दिमत त्रिंबक सदाशिव यास रुपये ३३४ तीनशें चवतीस रुपये देऊन बाकी ऐवज रुपये ३३३३।=॥ तेहतीशें सवातेहतीस रुपये साडेतीन आणे मशारनिल्हेस सरंजाम लाऊन दिला होता तो वसूल करून हुजूर भरणा करून जाब घेणें, तेणेंप्रमाणें मजुरा पडेल. घरांतील वस्तवानीची जप्ती करून आणावयाकरितां बाजी जीवन कारकून पाठविले आहेत. यांस तुम्ही सामील होऊन वस्तभावीची मोजदाद करून पुण्यास पाठविणें व आणखी कोठें वस्तभाव मशारनिल्हेची असेल तिचा पत्ता लाऊन तीही जप्त करून हुजूर पाठवणें म्हणोन, महादाजी हरि कमावीसदार प्रांत कन्हाड यांचे नांवें. सनद १.

५८७ ( ) राघो सदाशिव, हैदर नाईक यांजकडे चाकरीस गेले आहेत, सबब मशारनिल्हेचें घर श्रीगोंद्यांत आहे, तें जप्त करावयास सरकारांतून पिलाजी विठ्ठल हुजूर हशमकडील कारकून पाठविले आहेत, हे घराची त्यांच्या जप्ती करतील त्यास करूं देणें म्हणोन, सखुबाई शिंदे यांचे नांवें. सनद.

इ० स० १७७०।७१. हिदे सबैन मया व अलफ. रजब ७.

परवानगी रूबरू.

---

७. न्यायखातें.

(ब) फौजदारी. (अ) गुन्हे.

२. खून व आत्महत्या.

५८८ (२६९). मौजे साखरें परगणे जळोद व मौजे कटारी परगणे येरंडोल येथील शिवेचा कजिया लागला आहे, सबब कजिया होऊन साखरकरांनीं कटारीकर पाटलाचा खून केला. जिवेंच मारिला, याजकरितां त्यांस मसाला हुजूरून जासूद जोडी रवाना केली आहे, तरी तुम्ही हरदूवाद्यांस आणून यांचा त्यांचा करिना भोवरगांव व जमीदार दोन्ही महालचे मेळवून कोण्हाची रुईरयात (रुयात) न करितां वाजबी मनास आणून विल्हेस लावणें, व खून केला आहे याजकरितां गुन्हेगारी घेणें, व मसाला सरकारचा जासुदास देऊन हुजूर पाठवणें म्हणोन, नारो कृष्ण दर्वे यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

इ० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. जमादिलावल ५.

587. Ragho Sadashiv having gone over to Haidar Naik, his house in Shri-
A. D. 1770-7I. gonde was ordered to be attached.

588. There was a boundary dispute between the villages of Sakhari in par-
gana Jalod and Katari in pargana Erandol, in consequence
A. D. 1764-65. of which the villagers of the former village killed the patel
of the latter. Naro Krishna Darwe was therefore directed

५८९ (३२१). गोविंद हरि यांस सनद कीं, शहाजी शिंदे व भगवंतराव शिंदे या उभयतांचा मौजे बेदरी परगणे रायबाग येथील पाटीलकीचा काजिया होता, त्यास शहाजी शिंदे यांचे बंधु सुलतानजी शिंदे व भगवंतराव यांची पंचाईत राजश्री त्रिंबक हरि यांनीं गोसाजी शिंदा यास जामीन घेऊन मौजे खोची परगणेमजकूर येथील थळास नेमून दिली; त्याजवरून उभयतां मौजे मजकुरास गेले असतां रात्रौ भगवंतराव शिंदे यांनीं सुलतानजी शिंदे यास जिवें मारलें, सबब भगवंतराव शिंदे यांची पाटिलकी व मोकासा मौजे बेदरीचा सरकारांत जप्त करून तुम्हांस सनद सादर केली असे, तरी मशारनिल्हेहची पाटिलकी व मोकासा सरकारांत जप्त करून आकार होईल तो सरकारांत जमा घरीत जाणें. भगवंतराव शिंदे यास मुलेंमाणसेंसुद्धां धरून आणून कैदेंत ठेवणें व गोसाजी शिंदा उभयतांस जामीन होऊन थळास घेऊन गेला, आणि लबाडी केली, याजकरितां गोसाजी मजकुरांसही कैदेंत ठेवणें म्हणोन,

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. जिल्काद २९.

सनद १.

रसानगीयाद.

५९० (३७५). जनार्दन तिमाजी याचे नांवें सनद कीं, मल्हार दिनकर देशपांड्या तर्फ चाकण यानें मौजे चांगदेव परगणा एदलाबाद येथील शंकर पांड्या गुजराथी ब्राह्मण याच्या बायकोसी अकर्म करून शंकर पांड्या गुजराथी यास जिवें मारिलें, सबब मशारनिल्हेचे देशपांडेपणाचा विभाग सरकारांत जप्त करून जप्तीची कमावीस तुम्हांस सांगितली असे, तरी इमानेंइतबारें देशपांडेपणाचा मानपान हक्क लवाजिमा व इनामइकराम मल्हार दिनकर याचे विभागाचा कुल आकार होईल तो सरकारांत पावता करून पावलियाचा जाब घेणें म्हणोन, मशारनिल्हेचे नांवें.

इ० स० १७६५।६६ सित सितैन मया व अलफ. रविलावल ६

सनद १.

रसानगीयादी.

---

to bring the parties before him and to decide the dispute impartially with the assistance of the villagers of the neighbouring villages and the district hereditary officers of the pargana. He was further directed to levy a fine for the murder that had been committed.

589. There being a dispute regarding a patilki watan between Shahaji Sinde and Bhagwantrao Sinde of Bedari in pargana Raybag. Shahaji's brother Sultanji and Bhagwantrao were sent by Trimbak Hari to Khochi to adjudicate on their dispute. While there, Bhagwantrao killed Sultanji. The patilki watan was ordered to be attached and Bhagwantrao with his family was ordered to be imprisoned.

A. D. 1764-65.

590. Malhar Dinkar Deshpande of tarf Chakan had illicit intercourse with the wife of Shankar Pandya, a Gujerathi Brahmin of Changdeo in pargana Edlabad, and killed Shankar. Malhar's watan was therefore ordered to be attached.

A. D. 1765-66.

५९१ (३७९). मौजे चांगदेव परगणे एदलाबाद दिमत नाना पुरंदरे मौजे मजकुरी शंकर पांड्या गुजराथी ब्राह्मण होता. त्याचे बायकोशीं मल्हार दिनकर चाकणकर देशपांड्या कमाविशीस होता त्यानें पांड्या-मजकुराचे बायकोशीं अकर्म करून गुजराथी ब्राह्मणमजकुरास मारेकरी घालून जिवें मारिलें. त्याचे खुळांत होते त्यांजकडे गुन्हेगारी, विद्यमान रामशास्त्री, करार केले.

इ० स० १७६५।६६
सित सितैन मया व अलफ.
रविलाखर ३.

रुपये.

१००० दत्तू चौधरी चांगदेवकर याजकडे ठाऊक असतां जाहीर न केलें सबब.
५०० शिवाजी कोळी मौजे मजकूर याचा लेक मारेकरीयांत होता सबब.

१५००

एकूण दीड हजार रुपये करार केले ते नानापुरंदरे यांनीं हवाला घेतला असे.

रसानगीयाद.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

५९२ (४३३). रंगभट ढेकणें वास्तव्य कसबे पुणें यांनीं हुजूर विदित केलें कीं, आमची सून सौभाग्यवती ठमा नाहींशी जाहली, त्याचें कारण यंदा भाद्रपदमासीं रात्रौ ग्रहण पडिलें, तेव्हां स्पर्शस्नानास ठमा आपला पुत्र सहा वर्षांचा घेऊन नदीस जाऊं लागली. त्यासमयीं मूल दुखणाईत आहे, याजला नदीस नेऊंनये असें आम्ही बोलिलों, त्या रागानें ती स्पर्शस्नानास गेली तेथें उदकांत आपला प्राणत्याग करूं लागली, तेव्हां घरच्या वगैरे बायका समागमें होत्या त्यांनीं माघारी घरास आणिली. आम्ही राखणेस बसलों. त्यास मोक्ष स्नानास आह्मांस न कळतां बाहेर गेली. कुंभारवेशीपुढें नदीच्या तीरीं तांब्या एका ब्राह्मणास दिला. त्याउपर तिचा थांग लागत नाहीं. आज सहा महिने शोध बहुत केला. तथापि ठिकाण न

इ० स० १७६५।६६.
सित सितैन मया व अलफ.
रमजान ३०.

---

591. Malhar Dinkar Deshpande of Chakan, while a Kamavisdar of Changdeo in pargana Edlabad, committed adultery with the wife of Shankar Pandya, a Guzarathi Brahman and murdered him. The following persons concerned in the matter were fined by Ramshastri as follows:—

A. D. 1765-66.

Rs,
1000 Dattu Chaudhari of Changdeo, for having failed to give information though he was aware of the commission of the offence;
500 Siwaji Koli's son, for being one of his assassins.

592. A woman named Thama, daughter-in-law of Rangbhat Dhekne of Poona wished to go with her son aged 6 to the river to bathe one night in the month of Bhadrapad, there being an eclipse of the moon. The child was ill and Rangbhat told her not to go. She got vexed, went to the river and tried to commit suicide, but was prevented from doing so and was brought home. However, she again went out for the second bathe after the eclipse was over and was never seen afterwards. Rangbhat applied to Government for permission to perform the necessary rites in regard

A. D. 1765-66.

लागे, याजवरून तिनें निश्चयें प्राणत्याग केला असें दिसतें, त्यास तिची क्रिया होऊन पुढें आमचे घरी मांगल्यादि कार्यें जाहलीं पाहिजेत येविशींची आज्ञा करावी ह्मणोन; त्यावरून, तिनें आपला प्राणत्याग करून आत्मघात केला. त्याचें शास्त्रता (तः) प्रायश्चित तुम्हांकडून करवून ब्रम्हदंडही होऊन तुम्हांस शुद्ध केलें असे, तरी पूर्ववत्प्रमाणें ब्राह्मणांचीं कर्में आचरोन सुखरूप राहणें. यासंबंधें तुह्मांकडे राजदंड रुपये १०० एकशें करार केले असेत, ते सरकारांत जमा जाहले असेत. ह्मणोन भटजींचें नांवें. चिटणीसी पत्र १. छ. २४ रमजान.

इ० स० १७६७।६८
समान सितैन मया व अलफ.
रबिलावल ९.

५९३ (५२२). सूरदास गुजराथी ब्राह्मण यानें हुजूर विदित केलें कीं, आपला भाऊ गोपाळा यानें भगवंतदास व माणिकदास वाणी वस्ती सातारा यांस कर्ज दोनशें रुपये दिले होते, त्यास चार वर्षें होत आलीं. उपरांतिक गोपाळा रुपये मागूं लागला. त्यास भगवंत व माणिकदास बोलले कीं तुझे रुपये दोचहूं रोजांनीं देतो. याप्रमाणें बोलोन त्यास राहविलें आणि विष घालून मारिलें. ऐशियास खुनाचा जाब करून माझे रुपये वारीत तें करावें म्हणून, त्यास सूरदास ब्राह्मण व माणिक व भगवंत वाणी यांचें वर्तमान मनास आणून वाजबी रीतीनें अन्याय ज्याकडे ठरेल त्याजपासून गुन्हेगारी घेणें, व सूरदासाचें कर्ज खतांप्रमाणें उगवून देऊन चौथाई सरकारांत घेणें ह्मणोन, गणेश विठ्ठल मुक्काम सातारा यांसी.

सनद १.

चिटणिसी पत्र दिलें असे.

इ० स० १७६८।६९
तिसा सितैन मया व अलफ.
रजब ८.

५९४ (५९१). रामकृष्ण नागनाथ याजकडे जगरूप गोसावी याचें येणें आहे, त्यास गोसावी यानें त्यास फार निकड केली. उपोषणें झालीं, त्यामुळें रामकृष्ण मृत्यु पावला. आठारोजांत कर्जाचा निकाल करीत असतां गोसावी यानें फार निकड करून ब्राह्मणास जिवें मारिलें व रामकृष्णाचें कर्ज लोकांकडे आहे तें कोणी देत नाहीं म्हणोन, हुजूर विदित जाहलें. ऐशास वर्तमान मनास आणून गोसावी याच्या तसदीमुळें रामकृष्ण मेला असें खरें जाहलि-

---

to her death, so that there might be no objection to the celebration of festive ceremonies at his house. The woman having evidently committed suicide, Rangbhat was made to undergo the penance prescribed by the Shastras and to pay a penalty to the caste. A fine of Rs, 100 was levied from him by Government and the permission asked for was given.

593. Surdas, a Gujerathi Brahmin, represented that his brother Gopala had lent Rs. 200 to Bhagwantdas and Manikdas of Satara, that after 4 years Gopala asked for the return of the amount and was consequently poisoned by the two debtors and prayed that they might be called upon to answer the charge of murder and to repay the loan. Ganesh Vithal was directed to inquire into the matter.

A. D. 1767-68.

594, The Government learnt that Ramkrishna Nagnath owed some money to Jagrup Gosavi and was so hard pressed by the latter for its repayment, that he went without food and died of starvation. Mahipatrao Trimbak of Satara was directed to

A. D. 1768-69.

यास गोसावी याजपासून जीवन माफिक गुन्हेगारी घेणें व रामकृष्णाचें कर्ज लोकांकडे आहे; तें वाजबी मनास आणून ताकीद करून देवणें. त्यापैकीं चौथाई सरकारची घेणें म्हणून, महिपतराव त्रिंबक मुक्काम सातारा यांस चिटणिसी. पत्र १.

५९५ (५९८). मौजे ओझरडे संमत हवेली प्रांत वाई येथील दरोबस्त अमल प्रांतमजकुर येथील पिसाळ देशमुख यांजकडे इसाफत आहे. पिसाळाच्या भाऊपण्यांत काजिया होऊन मालोजी बीन खानाजी पिसाळ याचे गुलामाचा खून जाहला सबब गांवची जप्ती करून कमावीस राजश्री गंगाधर शामराव यांजकडे सांगितली असे तरी मशारनिल्हेशीं रुजू होऊन मौजेमजकूर येथील दरोबस्त अमल सुरळीत वसूल देणें म्हणोन गांवचे मोकदमास सनद १.

इ० स० १७६८।६९. तिसा सितैन मया व अलफ. रमजान २७.

रसानगीयाद.

येविशीं महिपतराव त्रिंबक मुक्काम सातारा यांस कीं, तुम्ही मौजे मजकुरीं देखरेख न करणें. स्वार व लोकपैकीं जे असतील ते उठवून नेणें. गंगाधर शामराव अमल करतील म्हणोन चिटणिसी. पत्र १.

२

दोन.

५९६ (६२१). मौजे रोहिलेखुर्द परगणे कन्नड हा गांव नारायणराव आपाजी यांजकडे जाहागीर आहे, त्यास मौजे मजकुरचे असामीदार कुणब्याचा मूल व मौजे रोहिलेबुद्रुक येथील जंगमाचा व कुणब्याचा मूल असें तिघेजण रानांत जाऊन जुवा खेळत होते. त्यास मौजे रोहिलेखुर्द येथील असामदाराच्या मुलानें त्या दोघांस जिंकलें म्हणून त्या दोघांनीं जिवें या मुलास मारिलें आणि विहिरींत टाकिलें, त्यावर त्या मुलाचा बाप तुह्मांकडे फिर्याद आला, त्यास तुम्ही इनसाफ मनास न आणतां मुलाच्या बापापासून जंगमाच्या सांगितल्यावरून दोनशें रुपये गुन्हेगारी जाहगिरीच्या ऐवजीं मौजे मजकुरापासून घेतली म्हणोन नारायणराव आपाजी यांनीं हुजूर विदित केलें; त्याजवरून हें पत्र सादर केलें असें, तरी ज्यानें अन्याय केला असेल त्यास शिक्षा न करितां ज्याचा मूल मारिला त्यापासून दोनशें रुपये तुम्ही घेतले याचें कारण काय, तरी वाजबी इनसाफ करून ज्यानें अन्याय केला असेल त्यापासून गुन्हेगारी घेऊन हिशेबीं जमा करणें. कुळंब्यापासून गैरवाजबी रुपये घेतले

इ० स० १७६९।७०. सबैन मया व अलफ. रबिलावल ७.

---

inquire into the matter and if it appeared that Ramkrishna's death was due to the dunning by the Gosavi, to levy a suitable fine from the latter.

595. A slave of Maloji bin Kanoji Pisal having been killed in an affray between the members of the Pisal family, their Isafat village of Ozarde in prant Wai was attached.

A. D. 1768-69.

596. A boy of Rohile-Khurd in pargana Kannad and two others of Rohile-Budruk, were gambling in the jangle : the former having won was killed by the latter and thrown into a well, The murdered boy's father complained to the Kamavisdar of Kannad, who instead of proceeding against the offenders, fined him Rupees 200.

A. D. 1769-70.

आहेत ते माघारे देणें, गैरवाजबी होऊं न देणें ह्मणोन, चिंतामण बाबूराव कमावीसदार परगणे कन्नड फुलमरी यांचे नांवें. चिटणिसी. पत्र १.

५९७ (६६५). प्रवरासंगमकर ब्राह्मण यांनीं ब्रह्महत्त्या केली असतां ज्यांनीं ब्राह्मण मारिला त्यांची नांवनिशी न सांगतां सर्वांनीं मारला म्हणोन बोलत असत. त्याजवरून सर्व प्रवरासंगमकर ब्राह्मण यांसी वाळींत घातले. हल्लीं ज्यांनीं ब्राह्मण मारिला त्यांची नांवनिशी सांगतात ह्मणोन हुजूर विदित जाहलें, तरी हल्लीं ब्राह्मण नांवें सांगतो प्रायश्चित देऊन मुक्त करावें असें बोलत असतील तर चवकशी करून नांवनिशी लेहून घेऊन ज्यांनीं ब्राह्मण मारला त्यांपैकीं, बंदीखानीं जे आहेत त्यांस तसेंच असों द्यावें. राहिले व पळोन गेले असतील त्यांचा शोध करून बंदीखानीं ठेवावे. बाकी राहिले ब्राह्मण ज्यांकडे ब्रह्महत्त्येचा गुंता नाहीं, त्यांस प्रायश्चित देऊन मुक्त करावें ह्मणोन, वेदशास्त्रसंपन्न राजश्री गोविंद दीक्षित यांस पत्र लिहिलें आहे, तरी प्रायश्चित यथायोग्य क्षौरपूर्वक दीक्षितांस सांगोन देऊन ब्राह्मणांस मुक्त करवणें. क्षेत्रीं सुखरूप राहूं देणें. ज्यांनीं ब्रह्महत्त्या केली, त्यांस तसेंच ठेवणें ह्मणोन, धोंडो महादेव किल्ले दौलताबाद यांचे नांवें चिटणिसी पत्र १.

इ० स० १७७०।७१. इहिदे सबैन मया व अलफ. रविलावल २१.

५९८ (६८४). ब्राह्मणांनीं सोनाराचा पोर जिवें मारिला ते असामी.

१ राघोबा विंझ्या.
१ रामाजी दसपुत्र्या.

इ० स० १७७०।७१. इहिदे सबैन मया व अलफ. जिल्काद ७.

एकूण दोन असामी यांच्या पायांत बेड्या घालून तुह्मांकडे अटकेंत ठेवावयास पाठविलें आहेत तरी जंजिरें सुवर्णदुर्ग येथें पक्क्या बंदोबस्तानें अटकेंत ठेवून पोटास शिरस्तेप्रमाणें दररोज देत जाणें ह्मणोन, रामाजी महादेव यांस सनद १.

रसानगी, केशवराव बल्लाळ केतकर कोतवाल.

५९९ (७३८). नारो बल्लाल कमावीसदार सरकार हंडे याचे नांवें पत्र कीं, कोदरभट व्यास वस्ती सरकारमजकूर यांनीं हुजूर विदित केलें कीं, आपली बायको व मुरारभट गुमास्ता निसबत पेमसिंग देशमुख सरकार मजकुर याची कुणबीण या दोघी नर्मदेस पाणी

इ० स० १७७२।७३. सलास सबैन मया व अलफ. जमादिलावल ३०.

The man appealed to the Peshwa. The Kamavisdar's explanation was called for and he was directed to impose a fine on the real culprits.

597, Some Brahmins of Prawara Sangam murdered another Brahmin. The Brahmin community of the place refused to disclose the names of the offenders alleging that the deed had been committed by them all. They were therefore all ex-communicated. They subsequently agreed to disclose the names of the real offenders. They weee then ordered to be admitted into caste after undergoing the usual penance. The murderers were ordered to be imprisoned.

A. D. 1770-71.

598. Two Baahmins—Raghoba Vinzya and Ramaji Dasputrya had murdered a gold-smith's son. They were sent to be imprisoned in fetters in fort Suwarnadurga.

A. D. 1770-71.

599. The wife of Kodarbhat Vyasa, a resident of Sirkar Hande, had one day

आणावयासी गेल्या होत्या त्यास कुणबीण आमचे बायकोस म्हणो लागली कीं, तूं माझी मातीची घागर बदलून नेलीस म्हणून, त्याजवरून दोघींचा कजिया होऊन आपलाल्या घरास आल्या. मागती फिरोन आपली बायको पाण्यास गेली. तिजला मुरार भवानी याच्या बायकोनें गल्लींत गांठून कजिया करून शिवीगाळ बहुत केली, आणि घरास जाऊन आपल्या दादल्यास सांगितलें, तेव्हां त्यांनीं आमच्या घरास येऊन बायकोस शिवीगाळ केली, ते वेळेस तिनें कपाळास दगड मारून घेतला.यास्तव मुरार भवानी नर्मदेपलीकडे ब्राह्मणाचे घरीं जाऊन राहिला.उपरांत आमची बायको देशमुखाचे घरास जाऊन हें वर्तमान सांगितलें त्याजवरून त्यांनीं सांगितलें कीं, तूं त्याचे घरीं जाऊन चित्तास येईल तें करणें. तेव्हां ती मुरार भवानी याच्या घरास जाऊन जीव देते ह्मणो लागली; त्याजवरून मुरार भवानी याच्या बायकोनें आपले लेकाकरवीं आमची बायको गरोदर होती तिजला काठ्या व 'पायपोसांनीं मारविलें. त्यामुळें ती मृत्यु पावली. याजकरितां आपण नारो बल्लाळ यांजकडे फिर्याद गेलों तेथें त्यांनीं मनास न आणितां हुजूर जाणें ह्मणोन सांगितलें; त्याजवरून आपण हुजूर आलों तरी स्वामींनीं येविशींची चौकशी करून त्याचें पारिपत्य केलें पाहिजे ह्मणोन, त्याजवरून हें पत्र सादर केलें असे, तरी तुह्मीं खोटा असेल त्याची रुरयात न धरितां चौकशीमुळें मुरार भवानीकडे अपराध लागल्यास मातबर पारपत्य करून गुन्हेगारी घेऊन सरकारांत पाठवणें. सरकारांतून या कामास जासूद पाठविला आहे, त्याचा रोजमरा होईल तो त्याजकडून देववणें, याचा फडशा तेथें न होय तरी हरदोजणांस जासुदाबरोबर हुजूर रवाना करणें म्हणोन, चिटणिशी. पत्र १.

७. न्यायखातें.

(ब) फौजदारी. (अ) गुन्हे.

३ दुखापत.

६०० (५३१). महीपती ब्राह्मण यानें बाबूराव सदाशिव यास दगा करून वार

A. D. 1772-73.

gone to fetch water from the Narmada and had a quarrel about change of pots with a female slave of Murar Bhawani, an agent of the Deshmukha of the province. Afterwards both Murar's wife and Murar himself came to Kodarbhat's house and abused Kodarbhat's wife, whereupon the latter took up a stone and struck her head.Murar consequently went to reside in a Brahman's house on the other side of the river. Kodarbhat's wife complained to the Deshmukha, and was told by him to go to Murar's house and do what she liked. She went to the house and threatened to commit suicide; whereupon Murar's wife had her beaten by her son; and being pregnant she died. Kodarbhat complained to the Kamavisdar who referred him to Government. The man came to Poona and represented the facts to Government. The Kamavisdar was directed to impartially investigate the matter, and to inflict an exemplary fine on Murar if after inquiry he was found guilty. He was further directed to send the parties to the Huzur, if the matter could not be decided there. A Government peon was sent for the purpose.

600. Mahipati, a Brahmin, wounded Baburao Sadashiv and was therefore

इ० स० १७६७।६८. समान सितैन मया व अलफ. रजब ५. केला, याजकरितां अन्यायी सबब कैद करून किल्ले मजकुरीं अटकेस ठेवण्यास पाठविला आहे, यास पोटास दररोज वजन पक्कें

६६।।।९ तांदुळ मोठे सडीक.
६६६९ दाळ.
६६६२ तूप.
६६६१ मीठ.

६६१६३

एकूण एक शेर तीन टांक वजन पक्कें, दररोज किल्ल्यास पोंहचल्यादिवसापासून देत जाऊन पायांत बिडी आहे तशीच ठेवून पक्क्या बंदोबस्तानें किल्ल्यावर अटकेस ठेवणें म्हणोन, उमाजी हणंगभर हवालदार व कारकून किल्ले घनगड यांस. सनद १.

परवानगी रूवरू.

रुजू हरएक किल्ल्यास अटकेस ठेवणें आणि सदरहूप्रमाणें पोटास देणें म्हणोन नारो त्रिंबक यांस सनद दिल्ही असे.

७. न्यायखातें.

(ब) फौजदारी. (अ) गुन्हे.

४ चोऱ्या व दरवडे.

६०१ ( ). कमावीस मसाला दहा रुपये दिमत मोकदम मौजे माऊ तर्फ नाणेंमावळ याजकडून देवविला. सबब कीं, थोपणदास कळवणकर यांचें तट्टू रुपये व हांडेभांडें भरून पुण्याहून कळवणास जात होतें तें मार्गी मौजे मजकुरीं वस्तीस राहिलें तेथून रात्रीची कंठाळच चोरानें नेली, म्हणून विदित जाहलें. तर गावांत वांटेवरी वस्तीस राहिले असतां चोरी जाहली हे गोष्ट कार्याची नाहीं. हल्लीं येविशींचें वर्तमान हुजूर मनास आणावयाकरितां रोखा करून मसाला देविला. छ. ३० रोज.

इ० स० १७६२।६३ सलास सितैन मया व अलफ. रमजान २९.

नारो आपाजींच्या रोजकीर्दीपैकीं.

६०२ (१०८). आत्माराम रघुनाथ सबनीस किल्ले भोरप यांस पत्र कीं, अबदुल

---

sent to fort Ghangad to be imprisioned. It was directed that the shackles put round his feet should not be removed.

A. D. 1767-68.

601. A trader on his way from Poona to Kalwan halted one night at a village in Nane Mawal, and was robbed of his goods. The Mokadam of the village was taken to task and called to the Huzur for inquiry. A process fee of Rs. 10 was imposed on him.

A. D. 1762-63.

602. Abdul Karim Bohari of Poona was removing his property from Poona

इ० स० १७६३।६४ अर्थां सितैन मया व अलफ. सफर७.

करीम वगैरे बोहरी पुणेवाले यांनीं हुजूर विदित केलें कीं, आह्मी मालमालेत घेऊन दंग्यामुळें कोंकणांत पाल किल्ल्यास जात होतो, त्यास घांटमाथा भोरपकराकडील पंचवीस माणूस चौकीस होते, त्यांनीं आह्मांस अडथळा करून पंचवीस रुपये घेतले, त्यानंतर आपण ते दिवशीं तेथें घांटमाथा वस्तीस राहत होतों. परंतु चौकीचे लोकांनीं राहूं दिलें नाहीं. मग घांटाखालें उतरून लचकोडीस जाऊन राहिलों. त्यास रात्रौ सदरहू चौकीचे लोकांनीं येऊन आपणावर दरवडा घालून पंचवीस हजार रुपयांचा माल व नगदी नेली. तरी येविशीं ताकीद होऊन देविलें पाहिजे ह्मणोन, त्याजवरून या बाबींची हकीकत कसकशी तें मनास आणून लिहिणें म्हणोन, राजश्री शंकराजी केशव सरसुभेदार तळ कोंकणचे यांस व राणोजी बलकवडे यांस पत्रें सादर केलीं. त्यांनीं उत्तरें भोरपकराचेच लोकांनीं कर्म केलें याप्रमाणें कित्येक पत्तेवार लिहिलीं ऐशियास दंग्यामुळें पुण्याची रयत कोंकणांत जात असतां याप्रमाणें किल्लेमजकूरचे लोकांनीं बेकैदी केली. त्यांचें पारिपत्य तुह्मीं करून बोहरी यांचा माल देववावा. तेंही न केलें; त्याजवरून तुह्मी आपला काय परिणाम बरा पाहिला आहे? हल्लीं येविशीं हवालदारांचे नांवें पत्र सादर करून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, व राजश्री पंतसचीव यांनींही आपलीं पत्रें व माणसें पाठविलीं असेत तर सदरहू चौकीचे लोकांनीं दरवडा घातला आहे त्यांचे खूप पारिपत्य करून बोहरी मजकूर यांची मालमत्ता नेली आहे ती कुल जराबाजरा यांची यांस देणें; अगर चौकीचे लोक हुजूर पाठवणें. येविशीं दिकत्त केली आणि हुजूर बोभाटा आला ह्मणजे परिछिन्न कार्यास येणार नाहीं. स्पष्ट समजोन वर्तणूक करणें या कामास सरकारांतून लक्ष्मण बापूजी कारकून रवाना केले असेत, यांचे मार्फतीनें बोहरी यांचा माल देणें अगर सदरहू माणूस हुजूर पाठवणें छ. ७ सफरचें पत्र १.

६०३ (३५४). खंड्या बेरड चाकणकर चोऱ्या करीत होता, सबब त्याचीं माणसें

A. D. 1763-64.

to fort Pal, owing to the disturbances of the Mogals in the preceding year. On the way certain men of the Bhorap fort who were guarding a chauki above the Ghats obstructed him and levied from him Rs. 25. He wished to pass the night at chauki but was not allowed to do so. He therefore went down the Ghats and halted at Lachkodi, The men of the chauki came down at night and took from him property worth Rs. 25,000. The Bohari complained to the Peshwa, Shankaraji Keshav, Sir Subhedar of taluka Konkan, and Ranoji Balkawade were directed to make inquiries and they found that the robbery was commited by the men at the chauki, Atmaram Raghunath, the subnis of the fort, was then written to and directed in very strong terms to arrange to return all the property taken by the men of his fort and to adequately punish the delinquents.

A. D. 1765-66.

603. Khandya Berad of Chakan having committed thefts, his mother, wife and three children were ordered to be imprisoned at fort Kohaj.

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया अलफ. सफर. २.

कैद करून तुम्हांकडे किल्ले मजकूरीं अटकेस ठेवावयास पाठविलीं आहेत.

१ आई.
१ बायको.
३ पोरं.
२ खंड्याचीं.
१ सोम्या बेरडाचा.
३
५

एकूण पांच असामी पाठविले आहेत यांस किल्लयावर बहुत खबरदारीनें अटकेस ठेवून पोटास शेर शिरस्तेप्रमाणें सनद पैवस्तगिरीपासून रोज देत जाणें, ह्मणोन, मामले कोहज निसबत येशवंतराव शिवाजी यांचे नांवें. सनद १.

रसानगीयादी.

६०४ (४९१). भाट चोरींत सांपडलें त्यांच्या बायका व पोरें किल्ले सिंहगड येथें बंदीस ठेवावयास पाठविलीं असेत. बितपशील,

इ० स० १७६६।६७ सबा सितैन मया व अलफ. साबान १९.

११ बायका.
१२ पोरें.
२३

एकूण तेवीस आसामी पाठविले आहेत, त्यांस किल्ले मजकुरीं बहुत खबरदारीनें ठेवून इमारतीकडे वगैरे कामाकडे काम घेऊन पोटास दर असामीस थोरास एक शेर व पोरास अच्छेर येणेंप्रमाणें किल्ले मजकुरपैकीं देणें ह्मणोन, शिवराम रघुनाथ यास.

सनद१.

रसानगी, लक्ष्मण आपाजी एकबोटे.

६०५ (५०२). बाजी सोनार यानें चोरी केली, सबब कैद करून बायकोसुद्धां तुह्मांकडे किल्लयास अटकेस ठेवावयास पाठविला आहे, तरी किल्ले मजकुरीं अटकेस ठेवून पोटास शेर दररोज देत जाणें ह्मणोन, सनदा.

इ० स० १७६६।६७ सबा सितैन मया व आलफ. सवाल १०.

१ बाजी सोनार याची बायको किल्ले सिंव्हगडास पाठविली आहे ह्मणोन शिवराम रघुनाथ यांस.

---

604. Certain Bhats having been caught thieving, 11 women and 12 children of their families were sent to prison in fort Sinhagarh, The daily ration allowed them was one seer for each adult and half a seer for each child.

A. D. 1766-67.

605. Baji Sonar having committed theft, he and his wife were imprisoned, the former in fort Visapur and the latter in fort Sinhagarh.

A. D. 1766-67.

१ बाजी सोनार यास किल्ले विसापुरास पाठविला आहे म्हणोन गोपाळजी शिंदे हवालदार व कारकून किल्ले मजकूर यांस.

२

सनद.

परवानगी रूबरू.

६०६ (५४७). जिवाजी दामोदर कुळकर्णी मौजे देवळाली तर्फ कडे प्रांत कडेवलीत याचे घरावर दरवडा पडोन बाबूराव दामोदर भाऊ मारला गेला, त्याचा माग कसबें तीसगांव पावेतों गेला. पुढें माग रात्र जाहली म्हणोन चालला नाहीं. याजकरितां जिवाजी दामोदर याची वस्तभाव चिरगूट पांघरूण भांडें यांची किंमत शपथपुरस्कर लेहून घेतली. रुपये ८५७२ आठ हजार पांचशें बहात्तर रुपये तीसगांवकरांपासून जिवाजी दामोदरास दोन महिन्याचे मुदतीनें द्यावें असा करार करून सरकारांत ऐवज घ्यावयाचा करार रुपये.

इ० स० १७६७।६८
समान सितैन मया व आलफ.
सवाल १६.

१५०० जिवाजी दामोदर याची वस्तभाव वगैरे तीसगांवकरांकडून देविली त्याची चौथाई सरकारची घ्यावी ते रुपये २१४३ पैकीं बेरीज धरली २१२५ पैकीं मशारनिल्हेचा भाऊ मारला गेला सबब सोडले रुपये ६२५, बाकी घ्यावयाचे करार केले ते रुपये.

१००० तीसगांवकरांनीं माग काढूं दिला नाहीं. सबब गुन्हेगारी घ्यावयाचा करार केले ते रुपये.

२५००

येणेंप्रमाणें अडीच हजार रुपये छ. ८ रमजानापासून दोन महिन्यांनीं सरकारांत द्यावे येणेंप्रमाणें करार असे बरहुकूम करारी याद १.

६०७ (६८३). चोर ———————— असामी.

इ० स० १७७०।७१
हिदे सबैन मया व अलफ.
सवाल३०.

१ शेख रहिमान उमर वर्षें दहा बारा.
१ एकतर अहीर उमर वर्षें पंधरा.

२

एकूण दोन असामी तुम्हांकडे प्रांत कोंकण येथें अटकेंत ठेवावयास पायांत बेडया घालून पाठविलें असेत. तरी हरएक किल्ल्यावर पक्क्या बंदोबस्तानें अटकेंत ठेवून पोटास

606. A dacoity of property worth Rs. 8,257 was committed in the house of Jiwaji Kulkarni of Dewlali in tarf Kade in prant Kadewalit, The theft was traced to the village of Tisgaum. Orders were issued to recover the value of the property from the villagers of Tisgaum and to remit it to the owner, retaining one fourth for Government. A fine of Rs. 1,000 was also imposed on the villagers of Tisgaum.

A. D. 1767-68.

607. Two boys, Shek Rahiman aged about 10 or 12 years and Ektar Ahir aged 15 were sent to prison for theft. Orders wete issued to employ them on building work.

A. D. 1770-71.

शेर शिरस्तेप्रमाणें दररोज देत जाऊन इमारतीचें काम घेत जाणें म्हणोन विसाजी केशव यांचे नांवें. सनद १.

राजश्री सदाशिव यशवंत कारकून निसबत बाळाजी वामन दामले.

६०८ (७०८) पुता वल्द तुळा राऊत मांग वस्ती मौजे रावणगांव तर्फ कडेवळीत हा आपल्या मुलांमाणसांसुद्धां येऊन मौजे आरणगांव तर्फ पांडे-पेडगांव येथें लष्करानजीक राहून चोऱ्या करीत होता, तो सांपडला, त्यास चवकशी करितां त्याचे लोक घोड्यावर बसून गेले. सबब त्यांस कैद करून आणिलें. त्या असामी.

इ० सन० १७७१।७२
इसन्ने सबैन मया प आलफ.
रमजान २४.

१ खुद्द पुता वल्लद तुळा राऊत.
१ जानु वल्लद पुता पोर.
२ पोरें लहान.
१ खंडू वल्लद सदू.
१ बिच्या बल्लद सदू.
२
३ मांगाचे चाकर वस्ती मौजे वडगांव तर्फ कडेवळीत.
१ शेवा वल्लद लालू.
२ पोरें.
१ पिऱ्या.
१ सत्या.
२
१ येशी बायको सून.
८

एकूण आठ असामी पाठविल्या आहेत, त्यांस किल्ले अहमदनगर येथें अटकेस ठेवून पोटास माणूस पाहून शिरस्तेप्रमाणें देत जाणें. म्हणोन महादजी नारायण यांस.

सनद १.
परवानगी रूबरू.

७ न्यायखातें.

(ब) फौजदारी (अ) गुन्हे.

१ फसवणूक.

६०९ (५६३). कृष्णा मारवाडी वाणी वस्ती कसबे तिटवाळें तर्फ बाऱ्हे प्रांत

---

608. Puta walad Tula Raut Mang of Rawangaon in tarf Kadevalit resided near the Peshwa's camp and used to commit thefts. He was arrested with his servants and children.

A. D. 1771-72.

609. Krishna Marwadi, a trader residing at kasbe Titwale in tarf Bare in

इ० स० १७६७।६८ समान सितैन मया व अलफ. मोहरम ३.

कल्याण यानें रुप्याचे दागिन्यांवर सोनेरी मुलामा करून वहिवाट केली. सबब चारशें रुपये खंड सुभा बांधला होता. त्यापैकीं, पावणे दोनशें रुपये घरदार वस्तवानी आदिकरून विकून भरणा केला. बाकी सवादोनशें रुपये राहिले, त्यास वाणी मजकूर यास द्यावयास ताकद नाहीं. अन्नास मोताद जाहला. भक्षावयास नाहीं. सबब सदरहू सवादोनशें रुपये याचे नांवें सूट खर्च लिहिणें म्हणोन, मोरो गोविंद प्रांत कल्याणभिवंडी यांचे नांवें. सनद १.

रसानगीयादी.

७. न्यायखातें.

(ब) फौजदारी. (अ) गुन्हे.

६. खोटा वेष घेऊन फसाविणें.

६१० (१३९). काशीबा वीर, रघोजी थोरात हा आपलें नांव जनकोजी शिंदे म्हणोन सांगत होता, त्या लबाडींत हे होते. सबब सरकारची गुन्हेगारी करार केली रुपये २००० तीन हजार रुपये करार केले, त्याचा हवाला महादशेट वीरकर यांनीं घेतला, आणि मशारनिल्हे कैदेंत होते ते वस्तभावसुद्धां महादशेटीचे हवाला केले असेत. रसानगीयाद.

इ० स० १७६३।६४ अर्बा सितैन मया व अलफ. जमादिलावल ६.

७. न्यायखातें.

(ब)फौजदारी. (अ) गुन्हे.

७. जबरीचीं लग्नें.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

६११ (२३३). चिंतामण बाबूराव कमावीसदार परगणे कन्नडफुलंब्री यांस पत्र कीं, कृष्णाजी गणेश वस्ती मौजे बासेदरे यांनीं हुजूर विदित केलें कीं, आपली मूल गोविंदा दंडनाईक वस्ती मौजे शिऊर यानें जबरदस्तीनें नेऊन रामाजी दंडनाईक यासी लग्न लाविलें; याज-

इ० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. मोहरम.

A. D. 1767-68. prant Kalyan gilded certain silver ornaments and passed them off as made of gold. He was therefore fined Rs. 400 at the Subha. Out of the fine Rs. 175 were recovered by destraint and sale of his property. The remainder was remitted in consideration of his poverty.

610. Raghoji Thorat attempted to pass himself off as Jankoji Sinde. Kashiba Vir being implicated in the matter was imprisoned.

A. D. 1763-64. Mahad Shet Virkar, however, agreed to pay Rs. 3,000 as a fine on account of Kashiba, and the latter therefore with his property was handed over to the former.

611. Krishnaji Ganesh of Mouze Basedare represented that Govinda Danda

करितां पारपत्य जाहलें पाहिजे म्हणोन, त्याजवरून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे; तर तुम्ही शिऊरकर पाटील व ब्राह्मण व हरदूजण नाईकमजकूर यांस आणून येविशीची चौकशी करून जबरदस्तीनें लग्न केलें, सबब त्यांचें पारपत्य करून गुन्हेगारी सरकारांत घेणें म्हणोन, चिटणिसी. पत्र. छ. ९ मोहोरम.

नारायणरावबल्लाळ यांच्या रोजकीर्दीपैकीं.

६१२ (५७२). सदाशिव गबाजी बामणीकर यानें जगन्नाथ शामजी वस्ती जैतापूर परगणे कन्नड येथें राहतो, त्याची कन्या जबरदस्तीनें धरून नेऊन आपल्या लेकाशीं लग्न लाविलें व मुलीच्या बापास जखमा केल्या आहेत, म्हणोन राजाराम शिवराम कुळकर्णी जैतापूरकर यानें हुजूर विदित केलें, त्याजवरून सदाशिव गबाजी याचे कुळकर्णाचें गांव परगणे गोताळें पैकीं बितपशील.

इ० स० १७६८।६९ तिसा सितैन मया व अलफ. मोहरम २७.

१ मौजे बामणी.
१ मौजे गोताळवाडी.
१ मौजे रिटी.
१ मौजे हिवरसोडे.
१ मौजे दाणेगांव.

५

एकूण पांच गांव कुळकर्णाचें वतनाचे मशारनिल्हेचे आहेत. ते सरकारांत जप्त करून जप्तीची कमावीस तुम्हांकडे सांगितली असे, तरी कुळकर्णसंबंधें हकदक्क मानपान लवाजिमा सुदामत प्रमाणें जें असेल त्याचा आकार करून सरकारांत पावता करणें म्हणोन, येविशीं. सनदा.

१ चिंतामण बाबूराव कमावीसदार परगणे कन्नडफुलंबरी यांचे नांवें सदरहूप्रमाणें. सनद.

A. D. 1764-65. Naik of Siur forcibly took his daughter and married her to Ramji Dand-Naik, and prayed that the offender might be punished. The Kamavisdar of Kanad Fulambari was directed to call before him the 2 Naiks, the Patels and Brahmins of the village, to inquire into the matter, and to inflict a fine on the person who might have forcibly got the girl married. The fine recovered was ordered to be credited to Government.

A. D. 1768-69. 612. Sadashiv Gabaji of Bamni forcibly took away a daughter of Jaganath Shamji of Jaitapur in pargana Kanad, married her to his son, and also inflicted some wounds on Jaganath. Rajaram Shivram Kulkarni of Jaitapur having given information about this occurrence, the Kulkarni watan of Sadashiva was attached by Government.

१ जमीदार परगणे गोताळे यांचे नांवें सनद कीं, वतनसंबंधें सुदामतप्रमाणें असेल त्याचा वसूल सुरळीत देणें म्हणोन.

२

रसानगीयादी.

७. न्यायखातें.

(ब) फौजदारी. (अ) गुन्हे.

८. बदकर्म.

६१३ (२५३). कांसोजी करकटा चौगुला मौजे तरडोली परगणे सुपें यानें हुजूर विदित केलें कीं, मौजे कलनाड परगणे पिंपरी येथें आपण वोलांडा पेशजी केला होता. तेव्हां तेथील भागवत कुणबी याचे लेकीस तिचे भ्रतारानें सोड दिली; ती उपाशी मरों लागली, सबब माझें घर निघाली. आपण तिचा अंगिकार करून ठेविली. तीस चारपांच मुलें जाहलीं. आपण आपले गांवींच असतां तिचे मामें, चुलते, चुलत्या वगैरे गोत जेजुरीचे यात्रेस येतांजातां आपले घरीं येत जात होते, तेव्हां त्यांस चोळी लुगडें, पागोटें वगैरे यथोचित् आपण आपलें काळानुरूप बोळवण करीत गेलों. तेव्हां तिचेविशीं कोणीच कांहीं बोलिलें नाहीं. त्याजवर तिचा भाऊ येऊन लग्नाकरितां शंभर रुपये चौघांचे विद्यमानें मागितले, ते आपण दिले असतां तो पुण्याचे सुभा फिर्याद जाहला. आपली बहीण जोरावारीनें नेली आहे. असें विदित करून तीस रुपये मसाला करून बायकोस व आपणास पुण्यांत नेऊन गंगाधरराव व महिपतराव सुभ्याकडील यांनीं पुरसीस केली. तेव्हां बायकोनें सदरहू पहिला मजकूर त्यांस सांगितला. आपण आत्मसंतोषें करकटाचें घर निघालें. असें असतां गंगाधरराव व महिपतराव यांनीं मारहाण करून तीनशें रुपयांचा कतबा घेतला. म्हणून, ऐशियास बेवारीस बायको करकटास राजी असतां गुन्हेगारीचा कतबा घेतला असेल तो माघारा देणें, व ती बायको त्याचे हवालां करणें म्हणोन, नारो आपाजी यांस चिटणिशी.——पत्र १.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. रबिलाखर ११.

---

613. A woman of Kalnad in pargana Pimpri was deserted by her husband and having nothing to subsist on, became the mistress of Kasoji Karkata Chaugula of Tardole in pargana Supe. She bore him four or five children. Her relations were aware of the fact and often came to Karkata's house while she was there and received presents from him. Not with-standing this, her brother complained to the Subha at Poona that his sister had been forcibly taken away by Karkata, a process was issued against Karkata (on account of which he had to pay Rs. 30) and he and the woman were taken to Poona. The woman on being questioned by Gangadhar rao and Mahipatrao, serving at the Subha, stated that she was living with Karkata of her own free will. Gangadhar rao and Mahipatrao, however,

A. D. 1764-65.

६१४ (७२३). सई देशमुखीण चिकोडीकर हिनें मद्यपान करून बाळाजी हरि जोगळेकर यासीं बदकर्म केलें, सबब किल्यास उभयतां अटकेंत ठेवावयासी पाठविले असेत, तरी चांगल्या बंदोबस्तानें किल्ल्यांत अटकेस ठेवून तेथें दाखल होतील त्या तारखेपासून मध्यम प्रतीचा शिधा दररोज देत जाणें. म्हणोन रामाजी महादेव यांस. ———— सनदा.

इ० स० १७७१।७२. इसन्ने सबैन मया व अलफ. जिल्हेज २९.

१ बाळाजी हरि जोगळेकर यांस किल्लेपट्टा येथें पाठविला त्याविशीं.

१ सई देशमुखीण चिकोडीकर हिजला किल्ले करनाळा येथें पाठविली. त्याविशीं व समागमे कुणबीण एक आहे तीस दररोज [शेर] देत जाणें म्हणोन लिहिलें असे.

२

परवानगी रूबरू.

६१५ (७५७). उधो वीरेश्वर तालुके शिवनेर यांस सनद कीं, रुकमी, जाती मात्र ब्राह्मण स्त्री, हिला शूद्र व ब्राह्मण यांसीं व्यभिचार घडोन, भोजनादिक शूद्रासी व्यवहार घडला. सबब किल्ले शिवनेर येथें अटकेंत ठेवावावयासी पाठविली असे. तरी हिला पोटास शेर व वर्षास दोन लुगडीं उणाख व एक खादी देऊन किल्ल्यावर निगेनें ठेवणें म्हणोन. सनद १.

इ० स० १७७२।७३. सलास सबैन मया व अलफ. मोहरम १३.

रसानगीयादी.

६१६ (७६४). जान्हवी कोम राजारामभट बिन सदाशिवभट धाडाधाडी पुणतांबेकर ब्राह्मण हिचा दादला मृत्यु पावला. तेव्हां तिचें क्षौर जाहलें होतें, त्यास ही बायको अंताजी मुकुंद गोळक राजेवाडीकर याचे घर निघाली, आणि केश राखोन कांकणें हातांत घालून गोळक मजकूर यांसी संग करून राहून पुत्र जाहला. तो सात आठ वर्षांचा तिज समागमें आहे. त्यास याप्रमाणें अपराधी आहे, सबब पोरगा समेत दोघांजणांस किल्ले पुरंधरास अटकेस ठेवावयास पाठविलीं आहेत. तरी यांजकडून चुना वाटवून पोटास दररोज देत जाणें म्हणोन, नारो आपाजी यांस. सनद.

इ० स० १७७२।७३. सलास सबैन मया व अलफ. रबिलावल ६.

---

gave Karkata a beating and compelled him to pass an agreement to pay Rs. 300 as fine. Karkata appealed to the Peshwa and it was decided that as the woman had been abandoned by her husband and as she was living with Karkata of her own-accord, the agreemet taken from him should be given back and the woman restored to him.

614. Sai Deshmukhin of Chikodi got drunk, and had illicit intercourse with Balaji Hari Jogalekar : she and her paramour were imprisoned in different forts.

A. D. 1771-72.

एकूण चार आसामीस तुम्ही आपल्या स्वाधीन करून घेऊन किल्ल्यांत बंदोबस्तानें अटकेस ठेवणें आणि सदरहूप्रमाणें शिधा दररोज देत जाणें चार असामी पावल्याचें कबज हुजूर पाठवून देणें म्हणोन महादाजी नारायण तालुके नगर यांस ——— सनद.

रसानगी, बाळाजी वामन दामले.

६४१ (६९९). धावज्या कोरडा याचा बाप माणका हा, शिवनेरी तालुक्यांत
इ० स० १७७१।७२. शिपाई जिवें मारिला, त्याचें खुनांत होता. तो गैर हजीर जा-
इसन्ने सबैन मया अलफ. हला, सबब तो हजीर होईतोंपर्यंत त्याचा लेक धावज्या
जमादिलाखर. २० मजकूर यास किल्ले सिंहगड येथें अटकेंत ठेवण्यास पायांत
बेडी घालून पाठविला असे, तरी किल्ले मजकूरीं पक्के बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पोटास
शिरस्तेप्रमाणें दररोज देत जाणें म्हणून, शिवराम रघुनाथ यांस सनद १.

६४२ (७५६). चिंतामण नारायण गोळा यानें नाशकांत कळवंतिणीसी अध-
इ० स० १७७०।७३. र्माचरण केलें सबब त्याचे पायांत बिडी घालून किल्ले शिवनेरीस
सलास सबैन मया अलफ. अटकेंत ठेवावयास पाठविले आहे. पायांत बिडी घातली आहे.
मोहरम ३. ती भोजनाचे वेळेस काढून मग घालीत जाणें. पोटास

A. D. 1765-66. two female prisoners of the Banjari caste and then to let them go.

640. Chinto Vithal was sent to be imprisoned at fort Ahmednagar, with 3
A. D. 1770-71. servants. It was ordered that Chinto should be given a first class ration.

641. The father of one Dhawajya Korda was implicated in the murder of a
A. D. 1771-72. peou in taluka Siwaneri and absconded. Dhawajya was therefore put in irons and sent to prison till his father surrendered.

642. Chintaman Narayan Gole was confined in the fort of Siwaner for im-
A. D. 1772-73. moral conduct with a dancing girl at Nashik. Fetters were put on his legs, to be removed only at dinner time.

रोज ——————————————— वजन.

६६॥- तांदूळ मोठे सडीक.
६६६९ दाळ.
६६।९ पीठ जोरीचें.
६६६१ मीठ.
६६६२ तूप.
६६१६३

एकूण एकशेर तीन टांक वजन दररोज देविलें असे. देऊन किल्ल्यावर अटकेंत बंदोबस्तानें ठेविणें, म्हणून उधो विरेश्वर यांस सनद १.

८. सरकारी कामगार व जाहागीरदार यांचें गैरवर्तन.

६४३ (४६). बाबूराव हरि यांचे नांवें सनद कीं, परगणें जाफराबाद येथील जमीनदारांनीं हुजूर येऊन विदित केलें कीं, परगणेमजकूर तालुकदाराच्या उपद्रवामुळें खराब जाहला याचा बंदोबस्त करून अमीन नेमून द्यावयाची आज्ञा करावी म्हणून, त्याजवरून परगणे मजकूरची अमीनी तुह्मांस सांगितली असे. तरी कचा वसूल आकार डौल होईल तो जाहागीरदार व मोकासदार व बाबती साहोत्रा देखील सरदेशमुखी यांस हिशाप्रमाणें कचेरीस ज्यांचा त्यांस नेमून देणें. त्याप्रमाणें तालुकदार वसूल घेतील म्हणोन, सनद १.

इ० स० १७६२।६३
सलास सितैन मया व अलफ.
सबान २२.

रसानगीयादी.

६४४ (१८६). रामाजी महादेव यांचे नांवें सनद कीं, तालुके सुवर्णदुर्ग येथील बंदोबस्त एकहातीं जरूर जाहला पाहिजे. तेथील कारभारी आहेत ते रात्रंदिवस सरकार कामास जपत नाहींत ह्मणोन हुजूर बोभाट आला. तुमचें राहणें नेहमीं तेथें होत नाहीं. रत्नागिरी व विजयदुर्ग तालुक्यांचा बंदोबस्त जाहला आहे; त्याप्रमाणें तालुके मजकूरचा जाहला पाहिजे.

इ० स० १७६३।६४
अर्बा सितैन मया व अलफ.
साबान १२.

643. The Jamidars of Jafrabad, represented that owing to the exactions of the talukdars, the pargana was reduced to much poverty and prayed that an Amin be appointed by Government. Baburao Hari was therefore appointed Amin and was directed to fix the revenue to be recovered on account of Jahagir, Mokasa, Babti, Sahotra and Sir-Deshmukhi.

A. D. 1762-63.

644. Government was informed that the officers at taluka Suvarnadurga did not watch with care the interest of Government, that Ramaji Mahadev did not stay there permanently, that the expenditure of the taluka was extravagant and called for reduction, that various items of revenue were not brought to account, that fines and penalties remained un-credited to Government, and that arrangements like those effected at Ratnagiri and Vijayadurg were called for in taluka Suvarnadurg. Dhondo Vishwanath, an old and trusted servent of Government, was ap-

A. D. 1763-64.

जाजती खर्च मनस्वी आहेत ते दूर जाहले पाहिजेत. जमेच्या कसरी पोकळीस राहतात त्या जमेस आल्या पाहिजेत. कमावीशीचीं कलमें पोकळींत रहातात, त्यांचे निवाडे होऊन हरकी जीवनमाफक जमेस आली पाहिजे. यास्तव हुजुरून धोंडो विश्वनाथ विश्वासू प्रामाणिक सरकारचे पदरचे बहुतां दिवसांचे शिलकी चाकर तुमचे निशेचे यांस तालुके मजकूरची अमीनी सांगोन वेतन सालीना.

नक्त. ——————रुपये.
५०० खासा कदीम रुपये ८०० पैकीं करार.
६६ आफतगिरा.
५५ दिवट्या.

६२१

कापड अंदाज ३०० पैकीं निमे करार १५० अंदाज.
तेल वजन दर रोज पक्के ४४।.

येणेंप्रमाणें सहाशें एकवीस रुपये नक्त व दीडशें अंदाज कापड सालिना व पावशेर तेल दररोज करार करून देविलें असे तरी तालुके मजकूरपैकीं पावतीत जाणें. तालुके मजकूरचें कुल कामकाज यांचे हातें घेऊन वंदोबस्त करविणें. दुसरे कारभाऱ्याचा लढा काडीमात्र न ठेवणें. तालुके मजकुरीं कसरीचा ऐवज मशारनिल्हे जमा करतील त्याजवर सरकारांतून मशारनिल्हेच्या रदकर्जाची वरात होईल त्याप्रमाणें ऐवज पावता करणें. म्हणोन सनद १.

रसानगीयादी.

६४९ (१८४). विठ्ठल गणेश भिडे सरखोत मौजे अडिवरें प्रांत राजापूर यांनीं हुजूर येऊन विनंति केली; कीं मौजे मजकूरचे कुळकर्णी गोविंद बाबाजी व अंताजी विश्वनाथ, यांनीं तुळाजी अंगरे यांचे अमलाचे अखेरीस हरजिनसी बाकी गांवांकडे होती, ते सरकारचा अमल जाहल्यावर अमलदाराजवळून दंग्यामुळें सूट घेतली. ते सरखोतास सांगितली नाहीं. बाकीचा वसूल करून मध्येंच ठेविला. जबरदस्तीनें सरखोतास व कुळास हिशेब देत नाहींत.

इ० स० १७६३।६४ अर्बा सिबैन मया व अलफ. साबान १४.

pointed Amin at the taluka, on a salary of Rs. 500 plus allowances aggregating to Rs. 271 on account of torch-bearers, clothes etc. Ramaji Mahadeo was directed to employ him and to entrust him with the sole management of the taluka.

645. Vithal Ganesh Bhide, Sir-Khot of Adiware in prant Rajapur, informed Government that certain arrears of revenue, remitted by Government in consequence of Tulaji Angria's disterbances, had been recovered by the Kulkarni Govind Babaji and Antaji Kashinath and appropriated by them without his knowledge, that they were in the habit of collecting revenue from the ryots over and above what was due and of harassing the village in many ways and that the ryots had consequently left the village. Krishnaji Vishwanath of Vijayadurga was directed to depute a karkun and a peon to inquire into the matter, to recover, from the kulkarnis any revenue illegally levied by them together with fine, and to warn them that they would be punished for such acts in future.

A. D. 1763-64.

हरएक कारभार पट्टीपासोडी वगैरे आपले मतें करितात. दुबार वसूल गांवांत घेतात. गांवची जमाबंदी कळों देत नाहींत. गांवांत नानाप्रकारचे उपद्रव करितात. यांजकरितां गांवचीं कुळें पळून गेलीं. येविशींची चौकशी जाहली पाहिजे. ह्मणोन, त्याजवरून हे सनद सादर केली असे. तरी तुम्ही सदरहूच्या चौकशीस सुभ्याहून कारकून व शिपाई पाठवून अंगऱ्याचे कारकीर्दीचे बाकीचा व अलीकडील सालोसालचा कच्चा आकार समजोन घेऊन वाजबी गांवखर्च खोताचे विद्यमानें पाहून मजुरा द्यावयाचा असेल तो मजुरा देऊन बाकी कसर राहील ते तालुके विजयदुर्ग येथील हिशोबी जमा करणें. कुळकर्णी यानें बाकी सूट घेऊन दरम्यान ठेविली ती व दुबार वसूल घेतला असेल तो भरून घेऊन सरकारची गुन्हेगारी घेणें. व पुढें सरखोताचे विद्यमानें गांवचे जमाबंदीचा ठराव करून वसूल घेत जाणें. लवाडी केली. यास पारपत्य करणें. ह्मणोन कृष्णाजी विश्वनाथ तालुके विजेदुर्ग यांस ——— सनद १.

रसानगीयादी.

६४६ (१९१). वेदशास्त्र संपन्न आप्पा जोशी बसणीकर यांनीं हुजूर येऊन विनंति केली कीं, दादो कृष्ण गोडबोले यांस तालुके रत्नागिरी येथील दिवाणगिरी असतां सन इसन्नेमध्यें नाहक निमित्त ठेवून आपणापासून खंड रुपये ७५० साडेसातशें रुपये घेतले होते.

इ० स० १७६३।६४ अर्वा सितैन मया व अलफ. रमजान ११.

त्यास सन सलासांत नारो त्रिंबक देशमुख यांस तालुकेमजकूरची चौकशी करावयासी हुजूरांतून पाठविले होते. ते समयीं आपली हकीकत त्यांस सांगितली. तेव्हां त्यांनीं चौकशी केली तों सदरहू रुपये सरकारचे हिशेबीं जमा नाहींत. सदरहू पैकीं ५० रुपये सरकारचे हिशेबीं जमा होते. बरकड त्यांनीं मध्येंच ठेविले होते. त्याची चौकशी पंचांचे मतें मशार-

---

646. Dado Krishna Godbole while holding the office of Diwan of taluka Ratnagiri levied from Appa Joshi Basanikar a fine of Rs. 750. Naro Trimbak Deshmukh was in the following year deputed by the Huzur to make inquiries regarding the taluka in question. Appa Joshi represented to him that Rs. 750 had been levied from him by the Diwan without any cause. Naro Trimbak found that out of this amount Rs. 50 had been credited to Government and the remainder appropriated by the Diwan. A panchayat was then held and they decided that the fine had been improperly levied. The Diwan was then made to return to Appa Joshi the portion of the fine appropriated by him. Dado Krishna was removed from the office of Diwan, but was subsequently again appointed to the same post. One day, when Appa Joshi was absent from home, Dado in revenge exacted payment of the amount, that he had been compelled to refund, by posting men at the door of Appa's house and keeping his family members without food and water for three days successively. The amount exacted was on this occasion credited by him to Government. Appa Joshi having complained to the Peshwa against this action, orders were issued to inquire into the matter and to return to the Joshi the amount if it had been illegally levied from him.

A. D. 1763-64.

निल्हेनीं केली. तेव्हां खंड घेऊनये असें जाहलें. त्यासमयीं सरकारहिशोबीं पन्नास रुपये जमा धरिले होते ते सरकारांत ठेवून बाकीचे रुपये दादोकृष्ण यांजकडून आपणास देविले त्याप्रमाणें आपण घेतले. त्याजवर मशारनिल्हेची दिवाणागिरी निघाली होती. पुन्हा तालुके मजकूरास मशारीनल्हे हुजुरून करार होऊन गेले. तेव्हां आपण घरीं नसतां अकस धरून आपले घरीं वरातदार दोन्ही दारीं बसवून तीन दिवस अन्नपाणी बंद करून सदरहू रुपये घेतले; आणि सरकारचे हिशेबीं जमा केले असत. त्यांस स्वामींनीं कृपाळू होऊन सदरहू रुपये देविले पाहिजेत. म्हणोन, त्याजवरून हे सनद सादर केली असे तरी सदरहूची चौकशी तुम्ही करून गैरवाजबी रुपये यांजवळून घेतले असें जाहल्यास माघारे देवविणें. म्हणोन, येविशीं सनदा.

१ विसाजी केशव यास सदरहूप्रमाणें.

रसानगीयादी.

दादासाहेब यांच्या रोजकीर्दीपैकीं.

६४७ (२११). बिरजकुवर कळवंतीण जुन्नरकर हिनें हुजूर विदित केलें कीं, आपण सेरजंगाकडील दरोग्याकडे चाकर राहून त्याजबरोबर शहरास गेले. दरोग्याकडील माणसापाशीं वस्ता आपल्या होत्या तो माणूस दरोग्यापाशीं जुन्नरींच होता. हें वर्तमान अमलदारास कळलियावर त्यानें माणसापासून वस्ता घेतल्या. व आपणास शहराहून आणवून शंभर रुपये गुन्हेगारी घेतली. येविशीं ताकीद जाहली पाहिजे. ह्मणोन, ऐशियास कसबी लोक खातरेस आले तिकडे चाकरी पाहून गेली असें असतां तुह्मांस वस्ता व गुन्हेगारी घ्यावयाची दरकार काय? हे गोष्ट कार्याची नाहीं. हल्लीं हे आज्ञापत्र सादर केलें असे. तरी बिरजकुवर हिची वस्तभाव जराबाजरा व गुन्हेगारी घेतली असेल ती फिरोन माघारी देणें. ह्मणोन, रामचंद्र नारायण तालुके शिवनेर याचे नांवें चिटणिसी छ. ७ साबान पत्र १.

इ० स० १७६३।६४ अर्बा सितैन मया व अलफ. जिल्हेज २.

६४८ (२२४). मौजे पिंपळगांव परगणें गाळणा हा गांव कान्होजी जगदळे यां-

---

647. Biraj Kuwar, a prostitute of Junnar, represented that she accepted employment with a daroga of Ser Jang and went with him to the city leaving her ornaments with a servant of the daroga, that the officer of Siwner finding the servant alone at Junnar took the ornaments away from him and having called her from the city fined her Rs. 100; she prayed that the officer might be called to account for his action Ramchandra Narayan, officer of Siwner, was informed that a prostitute was at liberty to take service where she liked, and that his action in removing the ornaments and in fining her was disapproved by the Pe hwa. The ornaments and fine were ordered to be restored to her.

A.D. 1763-64.

648 The village of Pimpalgaon in pargana Galna which was managed by Kanoji Jagdale was much oppressed by him. The patil represented that three murders were committed by him and that the village was deserted by the inhabitants. The management of the village was therefore assigned to Naro Krishna.

A. D.1764-65.

इ० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. मोहरम ९. जकडे आहे. त्यास मशारनिल्हेचा उपद्रव गांवास लागला. तीन खून केले, यामुळें गांव तजावजा जाहला. ह्मणोन, मोकदमांनीं हुजूर विदित केलें त्याजवरून गांवची देखरेख नारो कृष्ण यांजकडे सांगोन लावणीसंचणी करावयाची आज्ञा केली असे. तर तुम्ही मशानिल्हेकडे रुजू होऊन गांवचा अमल वसूल सुरळीत देत जाणें. ह्मणोन, मोकदमास सनद १.

रसानगीयादी.

येविशीं चिटणिसी पत्रें २.

१ कान्होजी जगदळे यांचे नांवें, दखलगिरी न करणें ह्मणोन.

१ जमीदारांस पत्र.

२ ३

६४९ (२९४). शंकराजी नारायण व माधवराव गोविंद व गणेश नारायण यांस मौजे आंजणी तर्फ खेड प्रांत दाभोळ हा गांव इनाम आहे. त्यास दाभोळ प्रांतीचीं कुळें दोन मौजे मजकुरीं सन सितैनांत येऊन राहिली त्यां कुळांबाबत रुपये १३२ एकशेबत्तीस तुम्ही यांचे गांवापासून घेतले, ह्मणोन यांनीं हुजूर विदित केलें. ऐशास कुळें यांचे गांवीं गेली त्यांची समजावीस तुम्ही करून न्यावी. तीं न नेलीं असतां तुम्ही यांस धाऱ्याचा उपसर्ग करितां, तरी कुळें फितावून नेलीं नसतां कुळें आपले खुशरजावंदीनें येऊन राहिलीं, त्यांनीं यांचे गांवावर कीर्दी केली, त्याचा तगादा यांस करितां तो न करणें. तथापि रुपये घ्यावे तरी तो गांव मशारनिल्हेकडे इनाम आहे. व हे हुजूर चाकरीवर आहेत. यांस तगादा न लावणें. फिरोन बोभाट येऊं न देणें. रुपये घेतले असिले तरी माघारे देणें. म्हणोन, रामाजी महादेव यांस चिटणिसी. पत्र १.

इ० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. रबिलाखर १५.

६५० (२६३). पेठ कादराबाद कसबे जालनापूर फकिराकडे इनाम आहे; तेथें जे अमदानी होत आहे, त्यापैकीं दर्गा पीर नाजुकसाहेब यांचे उरसास व दरग्यास वगैरे शिबंदी सालाबाद खर्च करार आहे, त्याप्रमाणें लाऊन बाकी ऐवज राहील तो सर्वां फकिरांस हिस्सेरसीद वांटून द्यावा. त्यास फकीर बहुत आहेत आपापल्यामध्यें कजिया करितात, आणि पेठ-

इ० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. रबिलाखर १९.

649. Two cultivators of prant Dabhol, went to reside in mouze Anjani in tarf Khed, which was held in inam by Shankaraji Narayan and others. Ramaji Mahadev, officer of the prant, therefore levied Rs. 132 from the village on account of these cultivators. He was informed that if the cultivators had left his province he should have induced them to return, and that as they had gone to the village of their own free will it was improper to make any demands on their account upon the village, which moreover was an alienated one. He was directed to return the amount recovered by him from the village

A. D. 1764-65.

650. The Peth of Kadarabad in Kasbe Jalnapur, was an Inam of the fakirs. Out of the revenue realized a portion was given towards defraying the expenses of the darga of Pir Najuk Saheb, and of the annual fair held in his honor and the remainder

A. D. 1764-65.

मजकूर येथील रयतीस नानाप्रकारें तसदी देतात म्हणोन, रयतीनें हुजूर येऊन विदित केलें. व फकीरही अवघे मिळोन हुजूर आले. त्यावरून पेठ मजकूर येथील बंदोबस्त तुम्हांस सांगोन वेतन सालिना रुपये ३०० तीनशें करार करून देऊन हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी तुम्ही पेठ मजकुरीं जाऊन तेथील अमल करून पेठ मजकुरीं अमदानी होईल त्यापैकीं, सालाबादप्रमाणें दरग्यास व शिबंदीस खर्च लावून व तुह्मांस वेतन सदरहू तीनशें रुपये नेमून दिलें आहे तें वजा करून बाकी ऐवज राहील तो सर्वी फकीरांस हिस्सेरसीद वांटून देणें. ह्मणोन, रामाजी विश्वनाथ यांचे नांवें सनद १.

रसानगीयादी.

याखेरीज ——— कलमें.

नजरमहंमद व सैदजलाल व घुडण वगैरे फकीर म्हणतात कीं, पेठ मजकूरचा कारभार दहा बारा वर्षें जानमहंमद व शेख मानुल्ला यांनीं करून कारभारांत बहुत तफावत केली आहे. पेठ मजकूरचे अमदानीपैकीं रुपये खादले आहेत. त्यांचे आंगीं लावून देऊं. त्यास नजरमहंमद वगैरे यांजपासून मुचलक्यांत ऐवजाची बेरीज लेहून घेऊन व जानमहंमद वगैरे यांजपासून मुचलके घेऊन रुजुवात करावी आणि ज्यांजकडे खोटेंपण लागेल त्यांजपासून सदरहू मुचलक्यांत लेहून देतील ती बेरीज भरून घ्यावी. कलम १.

जाठाचा लेक मोंगलाईत आटकाविला होता तो सोडून आणावयाबाबद फकीरांनीं रयतेपासून रुपये घेऊन दिले आहेत ते खोटा होईल त्याजपासून घेऊन रयतेचें देणें. कलम १.

गुल्लू फकीर संगीन गढी बुरूजदार बांधीत आहे म्हणोन जानमहंमद वगैरे यांनीं विदित केलें. त्यास गढीचें काम पाहून संगीन काम असल्यास बांधो देणें, तकिया मात्र चार दिवाली साधाअसल्यास बांधों देणें. कलम १.

पेठ मजकूर येथील हिशेब नाजुकसाहेब याच्या दर्ग्यांत हाजीइस्मायल वगैरे फकीर यांजवळ समजावीत जाणें कलम १.

एकूण चार कलमें करार करून दिलीं असेत; सदरहूप्रमाणें बंदोबस्त करणें. ह्मणोन, सनद १.

रसानगीयाद.

बाळाजीजनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

६५१ । २६७ . बाबूराव माणकेश्वर यांचे नांवें सनद कीं, परगणें कर्डे रांजणगांव येथील जमीदार देशमुख व देशपांडे यांनीं साल तिगस्तां सनसलासामध्यें मोंगलांच्या दर्ग्यांत रयतेपासून मनमानें तैसा खंडणीचा ऐवज घेतला त्यापैकीं मोंगलांस कांहींसा दिला, बाकी सरकारांत

इ० स० १७६४।६५
खमस मितैन मया व अलफ.
रबिलाखर.

---

was distributed among the fakirs. The inhabitants complained to the Peshwa that the fakirs quarrelled among themselves and oppressed the ryots in various ways. Ramaji Vishwanath was therefore appointed to manage the Peth, on an annual salary of Rs. 300, chargeble on the revenues of the Peth.

651. The district hereditary officers of Karde Ranjangaum had collected tri-

द्यावा, तो न देतां मध्यें आपणच खादला. याजकरितां त्यांचीं वतनें सरकारांत जप्त करून जप्तीची कमावीस तुह्मांस सांगितली असे, तरी वतनें सरकारांत जप्त करून वतनसंबंधें मानपान हक्क लवाजिमा होईल तो हुजूर पाठवून देणें. ह्मणोन छ. २० रोज. सनद.

परवानगीरूबरू.

इ० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. जिल्हेज १३.

६५२ (३३३). महादाजी त्रिंबक व राजाराम त्रिंबक व महिपतराव त्रिंबक व सखाराम यादव यांचे तीर्थरूप त्रिंबक मुकुंद, अंताजी माणकेश्वर यांजपाशीं सेवा बहूत दिवस करीत होते. हिंदुस्थानांत गेलियावर दिल्लीची फौजदारी सांगोन ठेविले होते. ते समयीं कित्येक कामकाज मध्यस्थी राजकारणें करीत होते. त्यास कारभारसंबंधें अंतस्थ मेळविलें त्याचा संदेह अंताजी माणकेश्वरास जाहला; त्याजवरून मशारनिल्हे पुरसीस करीत होते. त्याचा बोभाट जाहला. त्यावरून मशारनिल्हेचे पुत्र भगवंतराव अनंत यांसी पुरसीस केली. त्यावरून मशारनिल्हे यांनीं गोविंद शिवराम यांचे विद्यमानें दहा पंधरा लक्षांचा लांझा लागला होता. ह्मणोन विदित केलें; त्यावरून तुह्मांस हूजूर आणून कित्येक प्रकारें चौकशी केली, त्याजवरून तुह्मी आपला कच्चा हिशेब हुजूर समजाविला कीं, कमकसर रुपये साडेतीन लक्ष पर्यंत आपले तीर्थरूप मृत्यु पावले तेसमयीं कुल मालीयत देवघेवसुद्धां होती. ह्मणोन शपथपुरस्कर निवेदन केलें; त्याजवरून तुम्हांकडे सरकारची नजर रुपये १००००० एक लक्ष रुपये करार करून वसूल नारोबाबाजी यांचे विद्यमानें घेऊन सदरील मालीयत तुमची तुम्हांस माफ केली असे. तरी याउपरी तुह्मांस सरकारतर्फेनें व अंताजी माणकेश्वर यांचें पुत्रांकडील कोणेविशीं उपसर्ग लागणार नाहीं. तुम्ही बेबसबसा राहणें अभय असें. सदरहू अजमास साडेतीन लक्षांचा तुह्मी समजविला त्याजवरून सदरहूचा फडशा केला असे. याजखेरीज पुढेंमागें जाजती ऐवज तुम्हांकडे लागल्यास जो ऐवज लागेल तो सरकारांत भरून घेतला जाईल. ह्मणोन मजकुराची सदरहू मशारनिल्हेचे नांवें सनद १.

रसानगीयादी छ. १५ जमादिलाखर.

A. D. 1764-65. bute at their pleasure from the ryots of pargana Ranjangaum during the period of the Mogal disturbance two years previously. Part of the money levied was paid by them to the Mogal but the rest was appropriated by themselves instead of remitting it to Government. Their watans were therefore ordered to be attached.

A, D, 1764-65. 652. Trimbak Mukund had served Antaji Mankeshwar for a long time and was appointed by the latter to the office of Fouzdari at Delhi. Many political matters consequently passed through his hands, and Antaji suspected that he had secretly obtained some money while in office. Antaji was therefore making inquiries and this news having got abroad, Antaji's son Bhagwantrao, was questioned by the Peshwa. Bhagwantrao stated that Trimbak Mukund was suspected of having

६५३ (३३९). त्रिंबक हरि वर्तक यांचा चुलतबंधु कोंकणांतून येऊन पुरंधर-
इ० स० १७६४।६५ खमस सितैन मया व अलफ. जिल्हेज. १३
कराकडे चाकरीस खालीं स्वारांत राहिला. त्याजकरितां मशारनिल्हेचे बंधु जनार्दन हरि किकवीस राहतात त्यांस तुम्ही वडगांवीं आणून दोनशें रुपये व मसाला घेतला. ऐशास मशारनिल्हे सरकारांत चाकरी करितात हें तुम्ही जाणतां. यांजपासून अंतर पडलें न पडलें यांचा विचार न केला दोनशें रुपये व मसालासुद्धां अडीचशें रुपये घेतले. त्यास याचा चुलतभाऊ पोटास्तव तिकडे गेला. त्याचा अन्याय यांजकडे नाहीं. ऐशास यांजपासून रुपये घेतले असतील ते माघारें देणें. अथवा रोखा पत्र घेतला असेल तो फिरोन देणें. ह्मणोन वेंकाजी माणकेश्वर यांस चिटणिशी पत्र १.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

६५४ (३४३). जमीदार परगणे कर्डे रांजणगांव यांनीं सन सलासांत मोगलांचा
इ० स० १७६४।६५ खमस इिशैन मया व अलफ. जिल्हेज.
दंगा जाहला तेव्हां मोगलास सामील होऊन नानाप्रकारें लबाडी करून पैका खादला, सबब नजर वगैरे सरकारचा ऐवज करार रुपये.

९००० ऐन नजर.
३००० सरकार.
१००० बाळाजी जनार्दन फडनीस.
१००० कित्ता मुछदी.
५०००
५०० हुजूरून मसाला केला तो.
५५००

---

acquired about Rs. 1000000 or Rs. 1500000. Trimbak's sons were consequently brought to the Huzur and were examined. They stated on taffirmation that the whole of the property left them by their father amounted to Rs. 350000 only. A nazar of Rs. 100000 was levied from them and they were assured that in regard to their property they would in no way be troubled either by Government or by Antaji's heirs.

653. A cousin of Janardan Hari resident of Kikwi, acccpted service as a sowar under Purandharkar. Venkaji Mankeshwar there-
A, D, 1764-65, fore fined Janardan R. 200. He was informed that Janardan's cousin accepted employment under the Purandharkar in order to maintain himself and that for this Janardan was not to blame; and he was directed to refund the amount levied.

654. The Jamidars of Karde Ranjangaon had illegally obtained money in various ways by conspiring with the Mogals during the
A, D. 1764-65. Mogal invasion in A.D. 1762-63. The following Nazar was therefore imposed.

एकूण साडेपांचहजार रुपये करार जाहले ते दखलबाद लिहिले आहेत. छ. ९ जिल्हेज मुक्काम पुणें. यासी मुदती सन सित सितैनांत द्यावे.

२९०० आश्विनमासीं.
२५०० कार्तिक शुद्ध पौर्णिमा.
५०० मसाल्याबाबत तूर्त परभारें वसूल.

५५००

येणेंप्रमाणें साडेपांचहजार रुपयांच्या मुदती आहेत. बरहुकूम करारी याद १.

६५५ ( ). नारो कृष्ण यांचे नांवें पत्र कीं, मिठाराम सोनार बऱ्हाणपूरकर यानें हुजूर विदित केलें कीं, आपल्या घरीं लग्न होतें. लग्नास दहाजण सोनार कुटुंबेंसुद्धां आले होते, त्यास देवा चौधरीनें मुकाट्यानें धर्माजी गोपाळ मजमदार याजवळ जाऊन सांगितलें कीं, सोनाराचे घरीं मुली बहुत चांगल्या आहेत. त्या पाहवयास आणवणें त्याजवरून धर्माजी गोपाळ यानें आपले घरीं ढालाईत पाठविले, आणि मुली दाखविल्या नाहींत सबब आपल्याजवळून सातशें रुपये जबरदस्तीनें घेतले म्हणोन विदित केलें. त्यास तुम्ही धर्माजी गोपाळ यास ताकीद करून जर अशी गोष्ट खरीच असली आणि सातशें रुपये गुन्हेगारी घेतली असें असेल तर सोनाराचे सातशें रुपये माघारे देविणें, आणि धर्माजी गोपाळ मजमदार याजपासून तुम्हीं सातशें रुपये गुन्हेगारी घेऊन सरकारांत जमा करून त्यास हुजूर पाठविणें, म्हणोन चिटणिसी पत्र १.

इ० स० १७६५।६६
सित सितैन मया व अलफ.
मोहरम ११.

६५६ (४७७). ताहा शेटे, महाजन, व रयत कसबे डभई, रतन शेट्या यानें हुजूर येऊन अर्ज केला कीं, कसबे मजकूर येथें सरकारचे कमावीसदार व किल्लेदार यांनीं पांच सात वर्षें अन्यायाखेरीज खंड घेतला. व जकात सुदामत आहे त्यापेक्षां जाजती घेतात, व साहुकाराजवळ कर्ज जबरदस्तीनें मागतात, व उचापत घेऊन रुपये वाजबी देत नाहींत,

इ० स० १७६६।६७
सबा सितैन मया व अलफ.
जमादिलाखर ९.

Rs.
3000 for Government;
1000 for Balaji Janardan;
1000 for other officers.
5000

655. Mitaram Goldsmith of Burhanpur represented that various persons of his caste had come to his house with their families to attend a marriage ceremony, that Dharmaji Gopal Majamdar learning that very beautiful girls were at his house, wished to see them and sent soldiers to bring them, that he (Mitaram) refused to comply with the Majamdar's wishes and that he was therefore fined by the Majamdar in the sum of Rs. 700. Naro Krishna was directed to ascertain if these facts were true, and if so to order Dharmaji to refund the fine levied and to fine him, in the same amount of Rs. 700, which was to be remitted to the Huzur.

A. D. 1765-66.

656. Ratan Shetya of Dabhai represented that during the past 5 or 7 years,

नानाप्रकारें उपद्रव करितात. यामुळें शेटे महाजन व रयत कसबेमजकूरची तजावजा होऊन शहराची खराबी जाहली आहे. येविशीं अभयपत्र देऊन शहराची अबादी होय तें करावें ह्मणोन. त्याजवरून रयतेचे गरीबीवर नजर देऊन हें अभयपत्र सादर केलें असें. तरी तुम्ही शहरांत बेवसवसा राहणें, उदीम बेवसवसा करून शहरची आबादी करणें, गैरवाजबी तोशीस लागणार नाहीं. तुह्मांपासून जबरदस्तीनें कर्ज कोणी घेणार नाहीं. व अन्यायाखेरीज खंड घेणार नाहीं. गैरवाजबी चहाडी करील त्याचें पारिपत्य होईल, जकात सुदामत प्रमाणें घेतील, जाजती तोशीस लागणार नाहीं. शहरची आबादी करणें, अभय असे. ह्मणोन शेटे महाजन व रयत कसबे मजकूर यांचे नांवें कौल १.

येविशीं बाजी शंकर कमावीसदार परगणे डभई यांचे नांवें पत्र १.

२

६५७ (४९७). तुको बयाजी जाफराबादकर यांनीं हुजूर विदित केलें कीं, आपले वडिलास जाफराबादकर देशमुखाची गुमास्तगिरी होती. त्याबद्दल जाफराबादकर देशमुख देशपांडे यांनीं आपलें घर लुटून पंचवीस हजार रुपये खंड घेऊन मुलें माणसें बंदी घातलीं, सबब देशमुख देशपांडे यांचे वतनाची जप्ती पेशजी करवीली होती, त्यास इनसाफ जाहला नाहीं आणि जप्ती मोकळी केली. ह्मणोन, त्याजवरून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे, तरी इनसाफ जाहला नसतां जप्ती मोकळी करावयासी कारण काय? याउपरी पूर्ववत्प्रमाणें देशमुख देशपांडे यांचे वतनाची जप्ती करणें. इनसाफ जाहलियावरी मोकळी करणें ते केली जाईल. ह्मणोन, नारो बाबाजी यांचे नांवें सनद १.

इ० स० १७६६।६७ सबा खितैन मया व अलफ. रमजान ३.

रसानगीयादी.

६५८ (१३९). चिरंजीव राजश्री नारायणराव बल्लाळ यांस पत्र कीं, त्रिंबकजी सोनार

A. D. 1766-67. the kamavisdar and killedar of Government oppressed the ryots in various ways, imposed fines for nothing, levied octroi at exhorbitant rates, extorted loans from sawkars against their wishes and did not pay for the purchases that they made. He further represented that the ryots had consequently fled, and asked for a letter of assurance promising them protection against illegal acts of this nature. An assurance was accordingly given and the people were exhorted to settle in the town and to carry on their business as before. The peaple were informed that any officer acting in an illegal manner would be severely punished. An order to the same effect was also sent to the Kamavisdar.

657. Tuko Bayaji's father was an agent of the Deshmukh of Jafarabad. Tukoji's house was plundered by the Deshmukh and Deshpande and a fine Rs. 25,000 was levied from him. His relations were moreover imprisoned. The Deshmukh and Deshpande watans were consequently attached. Before the matter was finally decided, the attachment was however unauthorizedly removed. Noro Babaji was called on to explain how this happened and was directed to re-attach the watans.

A. D. 1766-67.

658. Trimbakji Sonar of Awalkati in pargana Karde complained that Vithal

इ० स० १७६७।६८ समान सितैन मया व अलफ. रजब ३. वस्ती अवळकठी परगणें करहें यानें हूजूर विदित केलें कीं, मजपासोन विठ्ठळ आपाजी कमावीसदार दिमत बांडे यांनीं जबरदस्तीनें दोनशेंबारा रुपये घेतले. त्यास येविशींचा इनसाफ करून माझे रुपये देविले पाहिजेत. ह्मणोन, त्यास सदरहू वर्तमान मनास आणून सोनार मजकुरापासून रुपये घेतले ते गैरवाजबी असे पंचाईतमत्तें ठरल्यास जे रुपये घेतले असतील त्याची चौथाई सरकारांत घेऊन बाकीचे रुपये सोनारास माघारा देणें. ह्मणोन चिटणिसी पत्र १.

६५९ (९५३). शहर बऱ्हाणपूर येथील पटोळे वगैरे रयत यांपासून त्रिंबक नारायण माजी कमावीसदार यांनीं अन्यायाखेरीज पैका घेतला सबब पटोळे वगैरे फिर्याद सरकारांत हुजूर आले. त्याजवरून पंचाईतमतें मनास आणितां गैरवाजबी पैका घेतला. हें जाणून शहरमजकूरचे आबादीवर नजर देऊन सदरहू पैका माघारा द्यावयाचा करार करून नांवनिशीवार रुपये.

इ० स० १७६७।६८ समान सितैन मया व अलफ. जिल्काद १७.

१४५० सन सबांत घेतले ते.

७०० बकरअछी.

६९७ त्रिंबक नारायण यांचे हिशेबीं जमा.

३ रुजुवात होणें.

७००

२५० बिठिया तारकस.

१२५ त्रिंबक नारायण यांचे हिशेबीं जमा.

१२५ रुजुवात होणें.

२५०

५०० महादू साळी याचे रुपये ६०० पैकीं वजा त्रिंबक नारायण यांजकडून रोख देविले रुपये १०० बाकी सन सबांत जमा आहेत त्याप्रमाणें रुपये.

१४५०

A. D. 1767-68. Appaji Kamavisdar under Bande forcibly levied from him Rs. 212. Orders were issued to Narayanrav Ballal to investigate the matter with the aid of Punch and to cause the money to be refunded to Trimbakji if it appeared to have been illegally exacted from him.

A. D. 1767-1768. 659. Certain ryots of Buranpur complained of the exactions made from them by the formar Kamavisdar Trimbak Narayan. The matter was inquired into with the aid of Panch. Peshwa ordered that the amounts exacted viz Rs. 3145 to be refunded to the parties concerned.

११९५ सालमजकुरीं घेतले ते रुपये.

३३० शंकर पटोळा.
४२५ कल्याण पटोळा.
२४० जव्हेर पटोळा.
३०० माणीकचंद पटोळा.
१४० छबिला पटोळा.
५० किका पटोळा.
२२५ कल्याणराय तारकस.
१२५ मोहन खत्री.

१८३९

एकूण अठराशें पस्तीस रुपये त्रिंबक नारायण यांचे हिशेबीं जमा सालमजकुरीं आहेत, त्यापैकीं छबिला पटोळा याजकडे अन्याय आहे सबब माघारे द्यावयाचे नाहींत रुपये १४० बाकी रुपये.

३११५

तपशील.

३०१७ त्रिंबक नारायण यांजकडे हिशेबीं जमा आहेत. तीन हजार सत्रा रुपये.

१२८ रुजुवात शहरीं हे करून देतील त्याजपासून घेऊन द्यावयाचे रुपये.

३१४५

एकूण तीन हजार एकशें पंचेचाळीस रुपये पैकीं तीन हजार सत्रा रुपये त्रिंबक नारायण यांचे हिशेबीं जमा आहेत ते हल्लीं तुम्हांकडून शहरचे ऐवजीं देविले असेत, तरी पावते करून कबज घेणें, व एकशें अठ्ठावीस रुपये तारकस वगैरे त्रिंबक नारायण यांजकडील कारकुनाकडे रूजू करून देतील ते रुजुवात पडल्यास ज्यांजकडे लागतील त्यांजकडून यांस देवणें. याजखेरीज कलमें बितपशील.—

कित्ता सदरहू कुळापासून ऐवज घेतला रुपये.

२१ जव्हेर पटोळा.
१५ माणीकचंद पटोळा.
६० छबिला पटोळा.
९० कल्याणराय तारकस.
५ मोहन खत्री.
२५ महादू साळी.

२१६

दोनशे सोळा रुपये घेतले आहेत ते शहरीं हरिश्चंद्र गुमास्ते कानगो व सदरहू कुळें शिवाजी विठ्ठल याजकडील पागेचे बटकीची वगैरे जकात शहरांत त्रिंबक नारायण यांनीं सन सबांत घेतली, त्या बरहुकूम शिवाजी विठ्ठल यांनीं भगवानदास वाणी शहर मजकूर यांजपासून घेतले रुपये १७३ एकशें त्र्याहत्तर रुपये घेतले, ते तुम्हांकडून हल्लीं देविले असेत, तरी शिवाजी विठ्ठल यांचें नांवें लिहून भगवानदास यास शहर मजकूरचे ऐवजीं पावतें करून कबज घेणें, आणि सदरहू रुपये करोटगिरीचे ईजारीयाचे मामलतींत कच्या हिशेबीं घेतले आहेत, कीं

ज्यांजकडे रुजूं करून देतील त्यांपासून घेऊन सरकार हिशेबीं जमा करणें. कलम १.

नाहींत तें रुजूं पाहून हुजूर लिहून पाठवणें कलम १.

येणेंप्रमाणें दोन कलमें करार करून दिलीं असेत, तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें. ह्मणोन कमळाकर भास्कर कमावीसदार शहर मजकूर याचे नांवें सनद १.

रसानगीयादी.

६६० (६०९). भास्कर कान्हो चाकर सरकार यांनीं हुजूर विदित केलें कीं, वेंकटराव नारायण यांजकडील मामलत धारवाड, कोपळ वगैरे तालुके सात, तेथील चौकशीस हुजुरून जिवाजी गोपाळ यांस पाठविले होते. त्यांनीं चौकशी यथास्थित केली नाहीं. दोन वर्षें मामलतींत घालमेल करून हुजूर आल्यावर कचें वर्तमान विदित करावें तें केलें नाहीं. व पेस्तर बंदोबस्त करून ध्यावा तोही घेतला नाहीं. सात तालुक्यांपैकीं धारवाड तालुक्यांत वगैरे मजला तफावत दिसून आली. ते विदित व्हावी यास्तव विनंति बितपशील.—

इ० स० १७६८।६९ तिसा सितैन मया व अलफ. जिल्काद १३.

माजी मामलेदारांनीं बेहेड्यांत खर्च घालून खेडीं चालविलीं तेथील जमा सरसाल——— रुपये.

मौजे कलेगिरे, परगणे धारवाड हा गांव श्रीमंत कैलासवासी नानासाहेब यांनीं श्रीरंग शेणवी यास तीनशें होनाचा देविला, त्यास मौजे मजकूर बेरजेचा गांव चालवितात. तेथील वसूल जाजती आहे, बेहेड्यांत खर्च पडतात सरसाल रुपये ४०९० चार हजार नव्वद. त्यास शेणवी मजकुरांस तीनशें होन वजा देऊन बाकी जमेस यावे ते दरसाल——— रुपये.

३०००

मौजे चंदन मोठे कर्यात अमीनबाव तर्फ मजकूर हा गांव सावनूरकर यांनीं आपले आप्तास दिला होता तो घेतला तेव्हां जमेस धरावा तो नवलगुंदकर देसाई यांस खर्च घालून दिला, तेथील जमा बेहेड्यांत वजा पडतात रुपये २९००.

एकूण गांव दोन पैकीं जमेस यावे रुपये ९५००.

तालुके धारवाड येथील जमेस यावयाचीं कलमें.

वरकड तालुकेयांत वहीवाट होते परंतु तालुके मजकूर यांत मजला आढळ आहेत तीं कलमें.

660. A complaint was made to the Peshwa by one Bhaskar Kanoba regarding the administration of Venkat Narayan Kamavisdar of Dharwar and other talukas. The allegations made were as follows:—

A. D. 1767-68.

(1) that the Kamavisdar in his acconnts showed the revenue of Kalegir in Dharwar as alienated to Shrirang Shenvi, while in fact the Shenvi received only 300 hons out of the total revenue of Rs. 1490;

(2) that the village of Chandan-mote was taken back and conferred without authority on the Desai of Nawalgund;

(3) that fields were being continued in inams and sanads were being issued by the Kamavisdars themselves;

सरकारचा अमल जाहलियावर जमीदारांनीं सावनूरकरांचा××वगैरे यांस रुपये देऊन त्यांच्या सनदा मागील साले व तेरखा घालून(घेऊन)गांव व शेतें अनुभवितात त्यांची चौकशी केलियावर सरकार किफायत बहुत आहे.

महालच्या कमाविसदारांनीं जमीदारांस वगैरे सरकारचा अमल जाहलियावर त्यास पंचात (पेचांत?) आणून त्यांजपासून चतुःसिमा करून दगड पुरून शेतें घेतलीं आहेत. परगणे मजकुरीं तूर्त चालतात तेथील आकार दरसाल रुपये ४०००.

कित्ता बंदोबस्त होणें सात तालुके मिळोन कलमें.

१ किल्ले धारवाड येथें चौसाला रुपये वजा पडत आले इमारतीस व जकीन्यास रुपये ४०००० चाळीस हजार. पैकीं मामलेदाराकडे बाकी अजमासें रुपये १४००० चौदा हजार. त्यास किल्ले मजकूरची इमारत होणें व जकीरा पाहिजे. मामलेदाराची बाकी महालीं येणें आहे, त्यापैकीं ऐवज घेऊन किल्ल्याकडे सरंजाम करावयाची आज्ञा. कलम १.

१ पारगडचे किल्ल्यांत फितवा जाहला, त्या फितवेकरांस बंदीं ठेवून फिरोन किल्ले मजकुरीं चाकरीस ठेविले. येविशीं विनंति करावयाची आहे.

१ कसबे सुपे तालुके मर्दनगडपैकीं तेथेंही फितवा आहे. त्यास तेथील बंदोबस्त पाहिजे.

जलतरूपाषाण म्हणून सनदा धाऱ्यांनीं द्याव्या त्यांमध्यें चढ मामलेदारांनीं करून देऊन शेतें चालवितात तीं जमेस आणावीं. कलम १.

महालोमहालांत जमीदार व हुद्देदार यांनीं जमाखर्चांत गाळोन पोकळी राखोन शेतें खातात. जमीनझाडें पाहून जमेस आणावयाचीं आहेत. कलम १.

चोर व तरळीखोर चोऱ्या करितात, याजमुळें रयत परागंदा आहे. चोर धरून मामलेदाराचे हवालीं केले असतां रुपये घेऊन सोडून देत आले. ते फिरोन चोऱ्या करितात. येविशींचा बंदोबस्त माहितगिरीनें करून सरकार किफायत होय तें केलें पाहिजे. कलम १.

माजी मामलेदारांची फाजिलें सरकारांत व मामलतींत पांचसात लक्ष रुपये बुडाले म्हणतात आणि सरकारांत मागतात. त्यास सेवकास सेवा सांगितल्यास त्यांजकडे कलमें लागू करून निकाल करून देईन. कलम १.

जिवाजी गोपाळ यांनीं चौकशी केली, त्यास ऐवज निवळ पोत्यास जाजतीच होईल परंतु रुपये दहा लक्ष व पेस्तर बंदोबस्त जाहलियावर जमा जाजती दरसाल साधेल अजमासें रुपये एक लक्ष. त्यास येविशींचा मजकूर मामलतींत जाऊन वर्तणूक करून आले ! शिफारसी येकत्यार होऊन गेले (?) येविसीं रूबरू विनंति करून बंदोबस्त जा-

---

(4) that land was not brought to account by the Jamidars and officers and was wrongfully enjoyed by the latter;

(5) that out of the amount of Rs. 40,000 given to the Kamavisdar for repair to the fort Rs. 14,000 were mis-appropriated;

(6) that robbers were allowed to go unpunished, they were let off on payment of certain sums, and committed crimes again. The Peshwa's brother Narayanrav Ballal was asked to inquire into the matter.

१ जिवाजी गोपाळ यांनीं आपले मम- हला पाहिजे, जमेस जाजती, खर्चास कमी, तेचे कमावीसदार व कारकून ठेवून करावें लागतें. येणेंप्रमाणें कलम १. नेले आहेत. तेथील चौकशी केली पाहिजे.

१ सात तालुकेयांत शिबंदी आहे त्याची चौकशी करून बंदोबस्त केला पाहिजे.

५

एकूण पांच कलमें त्यास सात तालुक्यांत ठाणीं व किल्ले वगैरे जागां शिबंदी आहे, देखील कारकून कम जाजती, हुजूरसनदी व सुभेसनदी यांत चौकशी करून इतबारी मर्द माणूस ठेवून बंदोबस्त करावा लागतो. येणेंप्रमाणें. कलम १.

एकून दहा कलमें निवेदन केलीं, त्यास यांचा बंदोबस्त करावयाची आज्ञा करावी. म्हणून, त्याजवरून हें पत्र तुम्हांस लिहिलें असे, तरी सदरहू कलमें मशारनिल्हेयांचे माहितगिरीनें रुजुवात मनास आणून चौकशी करून वाजबी कलमें सरकार किफायतीचीं असतील तीं व शिबंदी कमजाजती पाहून वाजबीचे रीतीनें बंदोबस्त करून तुम्हीं हुजूर याल तेव्हां भास्कर कान्हो यास समागमें घेऊन येणें. म्हणोन, चिरंजीव राजश्री नारायणराव बल्लाळ यांस चिटणिशी पत्र १.

६६१ (७०९). नागो निळकंठ यानें मौजे बोरगांव परगणे शिराढोण येथील पाटिलकी चौथी तक्षीम विकत घेतली. त्याचें खरेदीखत व महजर जमिदारांच्या साक्षी मोज्यानिशी जाहला; त्यावर मामलेदाराची मोहर असावी म्हणोन नागो निळकंठ तुम्हांकडे आला. त्यास पाटीलकीचा अर्थ न पहातां नजर मोहर करून द्यावयाविशीं भारी मागो लागला, हें जाणोन नागो निळकंठ हुजूर आला. मागें तुम्ही त्याचे दोघां मेहुण्यांस कैद करून बिडी घातली म्हणोन हुजूर विदित जाहलें, त्यास नागो मजकूर हुजूर आला असतां मागें त्याचें मेहुण्यांस कैद केलें आणि बिडी घातली ही गोष्ट कार्याची नाहीं. हल्लीं हें पत्र सादर केलें असे, तरी याचे मेहुण्यांस सोडून देणें. व मौजे मजकुरची पाटिलकी चौथी तक्षीम यानें खरेदी करून घेतली,

इ० स० १७७१।७२ इसन्ने सबैन मया व अलफ. रमजान ३०.

---

661. Nago Nilkantha purchased a fourth share of the patilki of Borgaon in pargana Siradhona. A deed of sale and an account were drawn up and attested by the Jamidars. The seal of the Mamlatdar being necessary for the completion of these documents, Nago went to him. He however demanded an exorbitant Nazar for affixing his seal to the documents. Nago therefore went to the Huzur. During his absence the Kamavisdar arrested 2 of his relations and imprisoned them. The

A. D. 1771-72.

सबब याचें जीवन पाहून महजरावर मोहोर करून द्यावयाविसी याजपासून नजर रुपये २०० दोनशें सरकारांत घेतले. तरी याचे महजरावर मोहर करून देणें. या कामास खंडोजी टकल्या व खंडोजी काळभर खासबारदार दिमत लछीराम असामी दोन २ पाठविले आहेत, यांचे गुजारतीनें महजरावर मोहर करून देणें, व याचे मेहुणे सोडून देणें, आणि मौजे मजकूरचे पाटिलकीचे चौथे तक्षिमेचें कामकाज घेणें. ह्मणोन कमावीसदार परगणें सिराढोण दिमत शाहाजी भापकर यांस. पत्र १.

कित्ता सदरहूअन्वयें पत्रें. २

१ शहाजी भापकर यांस.

१ जमीदार परगणे मजकूर यांस.

२ ३

येणेंप्रमाणें तीन पत्रें दिलीं असेत.

६६२ (७६८). परभाजी पाटिल कचाळा मौजे दुलंगे तर्फ बारागांव परगणें बाळापूर प्रांत वऱ्हाड याची बायको तोलाई हिनें हुजूर येऊन विदित केलें कीं, हणमंतराव आटोळे यांनीं अन्याय नसतां आपले गांवावर स्वारी पाटवून गांव लूटून नेऊन माझीं माणसें कैद करून दोन दीर जीवें मारिले. वरकड माणसें कैदेंत ठेवून दोन हजार रुपये खंड केला. त्यास जामीन सयाजी पाटिल मौजे जानफळ परगणें साखरखेडलें यांस दिला. त्यास दोन हजार पैकीं वसूल कांहीं दिला. बाकी राहिली ते द्यावयास नमिळे, याकारितां माझा दादला व लेक व सून कैदेत ठेवून मारकूट करितात. व आपल्या लेकी दोघी मौजे हिवरें येथील पाटलांनीं अटकेंत ठेवल्या आहेत, येविशीं ताकीद जाहली पाहिजे. ह्मणोन, ऐशास बायको हुजूर फिर्याद आली हीस समागमें जासूद देऊन तुह्माकडे पाठविली आहे. तरी येविशींचें तुह्मी सविस्तर समजोन (घेऊन) आटोळे यांनीं गैरवाजबी केलें असल्यास घेतला ऐवज माघारा देऊन कैदेत माणसें आहेत तीं सोडणें. आटोळे गैरवाजबी वर्तले व दोघेजण जिवें मारिले सबब त्यांजपासून जितका ऐवज साधेल तितका सरकार हिशेबीं जमा करणें व फडशाचें वर्तमान हुजूर लिहिणें. ह्मणोन बाळाजी पलांडे यांस चिटणिसी पत्र १.

इ० स० १७६३।६४ आर्बा सबैन मया व आलफ. रविलावल २०.

---

matter being represented to the Peshwa, the Kamavisdar was censured and was directed to release the men and to affiz his seal to the documents in question in the presence of 2 Huzur servants who were sent for the purpose. The requisite amount of Nazar viz. Rs. 200 was levied at the Huzur.

662. Hanmantrav Athole attached and plundered the village of Dulange in tarf Baragaon in pargana Balapur in prant Berar, killed two brothers of the patil Parbhaji, and took away Parbhaji, his son and daughter-in-law prisoners. The price of their ransom was fixed at Rupees 2000, and owing to its non-payment, they, were beaten. Parbhaji's wife came to Poona and personally complained to the Peshwa. Orders were issued to release the prisoners, to return any sums levied from them, and to punish Athole for the murder by imposing on him as heavy fine as could be recovered.

A. D. 1763-64.

९. इनाम, नक्त नेमणुकी, वतनें वगैरे. (अ) देणग्या.

१. नोकरी केल्याबद्दल, नुकसानी झाल्याबद्दल, अगर मेहेरबानी दाखल.

६६३ (१७). आपाजी हरि तालुके धोडप यांसीं सनद कीं, राजश्री हरि नारायण दिवाण तालुके मजकूर यांनीं सालगुदस्तां कोळवणचे स्वारींत वाघेरीचे लढाईंत कस्त मेहनत करून सेवा केली. सबब राजश्री विसाजी केशव यांचे विद्यमानें बक्षीस रुपये २०० दोनशें पावले आहेत; ते तालुके मजकूरचे हिशेबीं खर्च पडले पाहिजेत म्हणोन तुम्ही विनंति केली; त्याजवरून हरि नारायण यांनीं मेहनत करून सेवा केली, सबब सदरहू दोनशें रुपये बक्षीस मशारनिल्हेस केले असेत. तालुके मजकूरचे हिशेबीं खर्च लिहिणें; मजुरा पडतील म्हणून

इ० स० १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. रजब १.

सनद १.

६६४ (२९). राजश्री महाराव निंबाळकर यांनीं सालगुदस्ता स्वारी समागमें येऊन कामकाज उत्तम प्रकारें केलें, सबब सरंजाम बक्षीस सालमजकुरापासून बितपशील रुपये.—

इ० स० १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. साबान १.

× × × × × ×

एकूण अठरा हजारांचा सरंजाम करार करून दिला असे, तरी सदरहू जाहागिरीचा अमल करणें. म्हणोन मशारनिल्हे यांचें नांवें

सनद १.

६६५ (३८). पिलाजी सांवत व केदारजी व संभाजी व दर्याजी सांवत, हे चौघेजण पाणिपतावर पडले, सबब त्यांचे बायकांस बालपरवेशी सालिना रुपये २०० दोनशें करार केले असेत, तरी प्रांत पुणें पैकीं पावते करीत जाणें, म्हणोन निळकंठ महादेव यांस सनद १.

इ० स० १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. साबान ९.

रसानगीयादी.

६६६ (५४). कसबे खरगोण येथें कृष्णराव रामचंद्र व नारो बल्लाळ सरमंडलोई

---

663. Hari Narayan, Diwan of taluka Dhodap who had exerted himself much at the battle of Wagheri in the campaign against the Kolwan in the preceding year, was given a present of Rs. 200.

A. D. 1762-63.

664. Maharav Nimbalkar having done excellent service during the campaign led by the Peshwa in the preceding year, was given a Saranjam worth Rs. 18,000.

A. D. 1762-63.

665. Pilaji and 3 other Sawants having been killed at the battle of Panipat, an allowance of Rs. 200 per annum was granted to their widows.

A. D. 1762-63.

666. Some land was required by Krishnarao Ramchandra and Naro Ballal,

इ० स० १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. साबान. सरकार बिजयागड यांनीं वाडा वतनी बांधला आहे, त्यास चौसोपी बरोबर जाहली पाहिजे, त्यास वाड्याजवळ मुसलमानांचीं लहान झोंपडीं पिछवाड्यास आहेत, ती जागा वाड्यांत असली म्हणजे चार खुंट जागा बरोबर होईल. त्यास त्या मुसलमानांचे घरांची चतुःसीमा जागा वाडयाचे पश्चिमेकडे पूर्वपश्चिम रुंदी हात सवीस व लांबी दक्षिणोत्तर हात पन्नास याप्रमाणें करार करून द्यावी म्हणोन मशारनिल्हेनीं विनंती केली; त्यावरून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे, तर सदरहू चतुःसीमेप्रमाणें जागा मशारनिल्हेचे स्वाधीन करणें; आणि मुसलमानांस दुसरी जागा नेमून देणें. म्हणोन नारो बल्लाळ कमावीसदार सरकार बिजयागड यांस. पत्र १.

येविशीं. ३.

१ कृष्णराव रामचंद्र व नारो बल्लाळ यांस कीं, सदरहू जागा आपले दुमाला करून घेऊन घर बांधोन सुखरूप राहणें म्हणोन.

१ मंडलोई व कानगो परगणे हवेली खरगोण यांस कीं सदरहू जागा मुसलमानांस ताकीद करून कृष्णराव रामचंद्र व नारो बल्लाळ यांचे हवाली करणें.

१ शेख उसमान व शेख मान्नुला वगैरे मुसलमान वस्ती कसबे खरगोण यांस कीं तुमची जागा कृष्णराव रामचंद्र व नारो बल्लाळ यांचें हवाली करणें. तुम्हांस राहावयास जागा द्यावयास नारो बल्लाळ कमावीसदार यांस आज्ञा केली आहे ते देतील ते जागियावर घर बांधून सुखरूप राहणें. छ. १६ साबान.

३ ४

६६७ (५९). हुसेन वल्द साहेबदीन बेलदार दिमत मानसिंग हा मिरजेच्या मोर-
इ० स० १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. रमजान ६. च्यांत गोळी लागोन ठार जाहला; सबब त्याचे आईस बालपरवेशी सालीना रुपये २० वीस करार केले असेत, तरी दरसाल पावते करीत जाणें. म्हणोन जिवाजी गणेश यांस सनद १. रसानगीयादी.

६६८ (६४). वणगोजी नाईक व शहाजी नाईक व रामचंद्र नाईक व यशवं-
इ० स० १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. रमजान १६. तराव नाईक बिन खंडेराव नाईक निंबाळकर यांनीं हुजूर कसबे पानगांव येथील मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, आपले वडील राजश्री स्वामींच्या राज्यांतील पुरातन सेवक, त्यास तीर्थरूप

A. D. 1762-63. Sir Mandoli of Bijagad, for inclusion in their watan house at Kasbe Khargon. The land was occupied by huts belonging to 2 Mahmedans. Orders were issued to Naro Ballal Kamavisdar to acquire the land and to give to the owners another site in exchange.

667. Husen walad Sahebdin a stone-cutter under the command of Mansing, having been killed by a bullet in the attack
A. D. 1762-63. against Miraj, an annual allowance of Rs. 20 was granted to his mother.

668. In consequence Khanderao Naik Nimbalkar being killed at Panipat

खंडेराव नाईक निंबाळकर हे श्रीमंत भाऊ साहेब यांजबरोबर हिंदुस्थानांत पाणीपतचे लढाईत कामास आले याजकरितां साहेबीं मेहेरबान होऊन आमचे योगक्षेमास एक गांव इनाम देऊन चालविलें पाहिजे ह्मणोन, त्याजवरून मनास आणतां यांचे वडील पुरातन राजश्री स्वामींच्या राज्यांतील सेवक, श्रमसाहस करून स्वामीसेवा उत्तमप्रकारें करीत आले, व पाणीपतावर तीर्थस्वरूप भाऊसाहेब यांजबरोबर तुमचे पिते खंडेराव नाईक निंबाळकर कामास आले. याजकरितां यांचें चालवणें आवश्य जाणून यांजवरी कृपाळू होऊन मौजे कोळेगांव परगणे भालवणी सरकारविजापूर येथील स्वराज्य व मोगलाई अमल देखील सरदेशमुखी व नाडगौडी दरोबस्त कुलबाब कुलकानु हल्लीपटी पेस्तररपटी देखील इनामतिजाई जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण, निधि, निक्षेपादिसहीत खेरीज हक्कदार व इनामदार करून नूतन इनाम सालमजकुरापासून करार करून दिल्हे असे. तरी मौजे मजकूर सदरहूप्रमाणें पूर्व मर्यादेप्रमाणें यांचे दुमाला करून देऊन हे व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवीत जाणे. प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रत लेहून घेऊन असल पत्र मशारनिल्हेजवळ भोगवटियास परतोन देणें. म्हणोन मोकदम मौजे मजकूर यांस सनद १.

रसानगीयादी.

मशारनिल्हेच्या नांवची	सनद	१.
चिटणीसी	पत्रें	२.
१ जमीदार परगणे मजकूर यांसी.		४
१ देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी.		
२		

६६९ (१४८). सदाशिव नाईक बिन गोपाळ नाईक गोडशे पोतदार प्रांत जुन्नर यांनीं हुजूर येऊन विदित केलें कीं, आपले बाप गोपाळ नाईक यांस श्रीमंत कैलासवासी राव व नानासाहेब यांनीं प्रांत मजकूरचें पोतदारीचें वतन वंशपरंपरेनें करून देऊन वतनास हक्क दरसदे रुपया एक रयत निसबत देखील जकात आकार होईल त्यास करून देऊन वतनपत्रें करून दिलीं आहेत. त्याप्रमाणें आपण अनुभवीत आहों. त्यास पहिले पत्रांप्रमाणें नवीन पत्रें करून दिलीं पाहिजेत म्हणोन, त्यावरून तीर्थरूप कैलासवासी राव व नानासाहेब यांनीं पत्रें करून दिलीं आहेत, त्याप्रमाणें हल्लीं करार करून दिलीं असेत, तरी प्रांत मजकूरचे पोतदारीची सेवा यांचे हातें घेऊन वतन यांस व यांचे पुत्रपौत्रादिवंशपरंपरेनें चालवणें. या पत्रांची प्रत लेहून घेऊन हीं असल पत्रें भोगवटियास परतोन देणें; नूतन पत्रांचा आक्षेप न करणें. म्हणोन चिटणीसी पत्रें.

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. जमादिलोवल १७

A. D. 1762-63. and in consideration of his excellent service to the state, Kolegaum in pargana Bhalwani in Sirkar Bijapur was given in Inam to his sons Vangoji Naik, Shahaji Naik, Ramchandra Naik, and Yeshwantrav Naik.

A. D. 1763-64. 669. The potadar watan of prant Junnar, with the right of levying from the ryots one rupee for every 100 rupees of the revenue was continued to Sadasiv Naik bin Gopal Naik Godse.

१ देशधिकारी लेखक वर्तमान व भावी यांस.
१ देशमुख व देशपांडे प्रांत जुन्नर यांस.
२

६७० (३१८). वेंकटराव मल्हार येबिन वेंकटराव गोविंद उपनाम वैद्य गोत्र वासिष्ठ सूत्र आश्वलायन वास्तव्य हरपनहल्ली. यांनीं हुजूर कसबे हावनूर परगणे गुंतल येथील मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, परगणे हरीहर येथील सरदेसाईपणाचें वतन पूर्वी अल्ली मुसलमान याचें होतें, त्यास त्याचें नक्कल जाहलें, त्यापासून पंचवीस वर्षें वतन सरकारांत जप्त आहे. ऐशीयांस आपण स्वामीचे राज्यांत कष्ट मेहनत फार दिवस केली. कुटुंब वत्सल आहों यास्तव स्वामींनीं कृपाळू होऊन सरदेसाईपणाचें वतन सरकारांत जप्त आहे तें आपणास करार करून देऊन भोगवटियांस पत्रें करून दिलीं पाहिजेत. म्हणोन त्याजवरून मनास आणून तुम्ही एकनिष्ठपणें कष्ट मेहनत करून स्वामीसेवा उत्तमप्रकारें केली. कुटुंबवत्सल आहां यास्तव तुमचें चालवणें जरूर जाणोन तुम्हावरी कृपाळू होऊन परगणे मजकूरचें सरदेसाईपणाचें वतन मुसलमानाचें होते, त्याचें नक्कल जाहले त्यापासून वतन सरकारांत जप्त होते, तें हल्लीं तुम्हांस करार करून दिलें असे. वतनसंबंधें हक्क वगैरे.—

इ०स० १७६४।६५. खमससितैन मया व अलफ. जिल्काद ६.

सुदामत प्रमाणें कलमें.	पेशजी वतनी गांव परगणेमजकूर पैकीं होते ते गांव.
१ गांवगन्ना हक्क होन नाणें ३०० तीनशें.	१ मौजे ककरगोळ.
१ सायेरावरी दर गोणीस रुके ⅘३ तीन.	१ मौजे डोंगहल्ली.
१ गांवगन्ना सव्वादहा होनांची जमीन.	१ मौजे वडरहल्ली.
१ बाजाराचे दिवशीं दुकानास फसकी.	१ मौजे पानानहल्ली.
१ परिटाजवळची पडद.	४
१ घर ठाणें.	चार गांव पेशजी होते ते सरकारांत ठेवून त्यांचे मुबदला मौजे कंचनहल्ली परगणे मजकूर हा गांव करार.
६	
सहा कलमें पेशजीप्रमाणें करार कलम १.	तेथील तनखा होन नाणें २० एकूण कलम १.

एकूण दोन कलमें सदरहू लिहिल्याप्रमाणें तुम्हांस सरकारांतून करार करून दिलीं असेत, तरी परगणेमजकूरचें सरदेसाईपणाचें वतन सदरहू लिहिल्याप्रमाणें हक्क वगैरे तुम्ही आपले दुमाला करून घेऊन सुदामत प्रमाणें वतनी सेवा करून पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें

670. The watan of Sirdesai of pargana Harihar belonged to a Mahomedan family. The family having become extinct, the watan lapsed to Government. It was now conferred on Vyankatrav Malhar Vaidya of Harpanhalli, for his loyalty and

A. D. 1764-65.

वतन अनुभवून सुखरूप राहणें. परगणेमजकूरचे देशमुख व देशपांडे व नाडगीर सरकारची शेरणी प्रतिवर्षी देतात, त्याप्रमाणें तुम्ही आपल्या हक्कवतनावरी हिस्सेरसीद सरकारांत शेरणी दरसाल देत जाणें. सरदेसाईपणाचें वतन तुम्हांस करार करून दिलें सबब वतनसंबंधीं तुम्हांकडे नजर रुपये ४००१ चार हजार एक रुपये करार केले असेत. सरकारांत पावते करून पावलियाचा जाब घेणें, त्याप्रमाणें मजुरा पडेल. म्हणोन मशारनिल्हे यांचे नांवें

सनद १.

येविशीं मोकदम देहाय परगणेमजकूर यांचें नांवें पत्र १.

२

चिटणिसी.
१ जमीदार यांचे नांवें.
१ वर्तमान भावी (लेखक).
२

रसानगीयादी.

सरसुभे प्रांत कोंकण यांच्या रोजकीर्दीपैकीं

६७१ (३४). छ. ३ जिल्हेज सनद कीं, मौजे आधारणें तर्फ सीमाहाल या गांवीं व्याघ्रानें उपद्रव केला, त्यामुळें रयत तजावजा जाहली. तेव्हां मौजे मजकूरचे ठाकूर यांनीं हिंमत धरून छ. ३० जिल्काद सन अर्बामध्यें पेणचे मुक्कामीं मोठा पटाईत वाघ मारून आणून दाखविला. आणि अर्ज केला कीं साहेबीं कृपाळू होऊन घरपट्टी माफ करावी. पुढेंही रानाचा काढा काढून गांवास व्याघ्राचा उपद्रव होऊं देणार नाहीं म्हणोन, त्यावरून ठाकूर याजवर कृपाळू होऊन हे सनद सादर केली असे, तरी ठाकूर ———— असामी.

इ० स० १७६४।६५. जमस खितैन मया व अलफ. जिल्हेज ३.

कित्ता. ———— कित्ता. ————

---

good services to the state. The perquisites of the watan in addition, to one watan village, were as follows:—

(1) haks from villages amounting to 300 Hons;
(2) three Rukas on every bag of grain subject to Sayer taxation;
(3) land assessed at 10¼ Hons;
(4) a charge on shops on market days;
(5) the cloth remainlng with the washerman; and
(6) one house.

The Sirdesai was to pay to Government on annual contribution fixed on his receipts at the rate applicable to Deshmukh, Deshpande and Nadgir. A nazar of Rupees 4001 was levied from him for the grant of the watan.

671. The ryots of Adharne sufferred considerable loss from a tiger. A Thakur of the village with great courage killed the animal which was a big one. He was granted exemption from house tax and other persons who assisted him were granted a partial exemption.

A. D. 1764-65.

१ हिरोजी ठाकूर यानें वाघ मारिला.	१ सावजी ठाकूर.
१ कृष्णाजी ठाकूर.	१ पाराजी ठाकूर.
१ हेमाजी ठाकूर.	१ बाळोजी ठाकूर.
१ भिवजी ठाकूर.	१ केरोजी ठाकूर.
१ बयाजी ठाकूर.	१ माळू ठाकूर.
५	५

एकूण दहा असामीपैकीं हिरोजी ठाकूर यानें वाघ मारिला, सबब दरोबस्त घरपट्टी व बाकी नऊ असामीस निमे घरपट्टी गांवचे वसाहतीवर नजर देऊन सालमजकूरापासून माफ केली असे, तरी खर्च लिहिणें. येविशीं सदाशिव पंडित सचीव यांस सदरहू मजकुराप्रमाणें किल्ले सुधागडचा हिस्सा खर्च लिहितजाणें म्हणोन, सनदा २.

६७२ (३६०). बाग संगम निसबत हरि विश्वनाथ भावे यांजकडे पेशजी गांवगन्नापैकीं दरसाल खात गाडे सव्वाशें पावत होते. त्याप्रमाणें हल्लीं सालमजकुरीं गांवगन्नापैकीं खात गाडे सुमारें १२५ सव्वाशें देविले असे. तरी प्रांत पुणें येथील गांवगन्नापैकीं पावते करणें. म्हणोन चिरंजीव निळकंठ महादेव यांस सनद १.

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. सफर २९.

रसानगीयादी.

६७३ (३७४). उधो रघुनाथ देशपांडे परगणे शिरवळ यांनीं हुजूर कसबे पुणें येथील मुक्कामी येऊन विदित केलें कीं, आपले भाऊबंद निळो विठ्ठल देशपांडे परगणे मजकूर यांनीं आपली नात बाळाजी जनार्दन करजखोपकर याचे पुत्रास दिली त्यास ते सुलतानजी निंबाळकर यांजकडे चाकरीस गेले. हे निमित्त निळो विठ्ठल याजवर कैलासवासी श्रीमंत महाराज राजश्री स्वामी यांनीं ठेऊन त्यास बारा हजार रुपये खंड बांधिला, तो द्यावयासी त्याजला ताकद नाहीं, मग आम्हांस व आवघ्या भावांस व देशमुखास नेऊन नागवण घेतली त्याचा हिसा आपल्याकडे आला तो द्यावयास मवसर नवते. आबरूवर आले म्हणोन आमचे वडीलभाऊ बाजीरघुनाथ यांनीं विष घेऊन प्राणत्याग केला. तेव्हां तें वर्तमान महाराजास कळलियावर त्यांजला दया येऊन आमचे बाप रघुनाथ महादेव होते, त्यांस बोलावून नेऊन दोन चावर जमीन इनाम देऊं लागले, ते समयीं त्यांनीं विनंति करून आपल्यासुद्धां देशपांडेयांची बुडें तीन त्या तिहीं बुडांस तीन चावर व देशमुखास दोन चावर व आपणास खाजगत सर्व भावांखेरीज एक चावर एकूण सहा चावर जमीन इनाम मागून घेतली. त्याची राजप-

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. रबिलावल २५.

---

672. Orders were issued to grant Hari Vishwanath Bhawye, 125 carts of Manure from certain villages. A. D. 1765-66.

673. An inam was granted under the following circumstances:—Balaji Janardan KarjaKhopkar, having gone over for service to Sultanji Nimbalkar, the Satara Raja fined Nilo Vithal Deshpande, who had given his grand daughter in marriage to A. D. 1765-66.

त्रेंही जाहलीं, त्याजप्रमाणें ज्यांची जमीन त्यांनीं भोगवटा घेतला. रघुनाथ महादेव यांनींही आपले चाहूर जमीनींपैकीं आदचावर जमीन लाऊन भोगवटा घेतला, आदचावर लागली नव्हती. तशीच पडली होती. त्यास रघुनाथ महादेव मृत्यु पावल्यानंतर आपणही कांहीं दिवस भोगवटा घेतला, त्यावर वेंकाजी कृष्ण मधल्या बुडांतील भाऊ यांनीं आपण आदचावर जमीन वहात होतो ते घेतली, आणि आदचावर जमीन पडली होती त्यापैकीं पाव चावर घेऊन लावणी केली, आणि त्यानें एकल्यानेंच दहा वर्षें उत्पन्न खादलें. उपरांतिक आमच्या नांवांचें राजपत्र एका चावराचें होतें तेंही जबरदस्तीनें आम्हांपासून घेतलें, त्या नंतर नवद बिघे जमीन तीहीं बुडास तीस तीस बिघेप्रमाणें वांटून घेतली आणि आम्हांस तीस बिघे सचंतर जे जमीन लागली नव्हती ते दिली. त्याची लावणी करून नातवांनींमुळें उगेंच राहिलों होतों, त्यास सन सलास सितैनांत आमचा पुत्र खंडो उधोव यानें वेंकाजी कृष्णास व आवघ्या भावांस म्हटलें कीं आमची जमीन नवद बिघे तुम्ही घेतली आहे ते काय निमित्त ? याचा जाबसाल करावयासी गोतांत येणें, अगर आमची जमीन आम्हांस देणें. त्यांस घरचेघरीं बोलल्यानें जाबसाल तुटक जाहला नाहीं. तैसाच राहिला. त्याजवर परशराम मोरेश्वर प्रभु यांचा व वेंकाजी कृष्ण यांचा घराचा कजिया होऊन सातारीयांस गेले. ते समयीं तेथें आपला मुलगा खंडो उधव होता त्याजला वेंकोजी कृष्ण म्हणाला कीं तुम्ही इनामाचा जाबसाल करा म्हणत होता त्यास तुमची जमीन खरी, आम्ही बळें घेऊन वांटणी केली. ही गोष्ट फटकळ केली आहे. तुमची जमीन तुम्हांस आवघ्या भावांचे गुजारतीनें देतों आणि तुमचें राजपत्र रघुनाथ महादेव यांचे नांवचें एका चावराचे घेतलें आहे तेंही आपण देतों. याप्रमाणें स्वसंतोषें बोलून राजपत्र हातांखालीं नाहीं राज्यक्रांतीमुळें दूर ठेविलें आहे. तेंही दोन महिन्यांनीं आणून देऊं ऐसा करार करून कागद लिहून दिला. त्याजवर वेंकाजी कृष्ण गांवांस येऊन सर्व भावाबंदास वर्तमान सांगितलें. त्यावरून सर्व भावाबंदांनींहीं तुमचा इनाम तुम्ही अनुभवणें ऐसें पत्र लेहून दिलें असें असतां व्यंकाजी कृष्ण याचा नातू खंडो कृष्ण यांनीं तिगस्ता सन अर्बा सितैनांत हुजूर येऊन विदित केलें कीं आपले तिही बुडांचे भावांची चाल आहे कीं कोणी वतन मिळविलें तर यथाविभागें वांटून घ्यावें ऐसें असून उधो रघुनाथ यांनीं चावर जमीन मिळविली आहे, ते वांटून देत नाहीं. जबरदस्तीनें आपले आजाजवळून कागद लेहून घेऊन जमीन आपणच अनुभवितात. ते जप्त करावी. आणि कागदपत्र आणवावें, असें निवेदन करून आपल्यास ताकीदपत्र आणिलें. आपण यावें तों स्वारी कर्नाटक प्रांतें होऊन छावणी तिकडेच जाहली याजमुळें तसेंच राहिलों. आपण आवघे कागदपत्र आणिले आहेत ते मनास आणून आज्ञा करावी, म्हणोन विनंति केली. त्याजवरून तुम्हांपासील कागदपत्र मनास आणतां तुमचे भाऊ बाबाजी रघुनाथ यांनीं नागवणेचे देणेयाकरतां आपला घात केला, यास्तव महाराज कृपाळु होऊन दोन चावर

Balaji's son, a sum of Rupees 12000. Nilo could not pay the amount, so his Bhaubands were called on to make it up. One of them, Baji Raghunath, had no money, and fearing that the honour of the family would be tarnished, committed

जमीन देत होते. तेव्हां रघुनाथ महादेव यांनीं विनंति करून आपल्यासुद्धां तिही बुडांचे भावांस तीन चावर, देशमुखांस दोन चावर व याशिवाय आपल्यास एक चावर एकून सहा चावर जमीन घेतली हें खरें जाहलें. त्याजपैकीं कसबें शिरवळ येथील अर्धा चावराचा भोगवटाही तुमचा तुम्ही घेतला, त्यानंतर वेंकाजी कृष्ण यानें बखेडा केला होता तोही तोडून त्यानें व अवध्या भावाबंदांनीं रजावंदीनें चावर जमीन तुमची तुमच्या हवालीं करून कागदपत्र दिलें आहेत. असें असोन खंडो कृष्ण यानें गैरवाका समजाऊन सरकारचें पत्र नेऊन तुमचे जमीनीस अडथळा केला. वतन मेळविलें तें अवध्या भावांनीं वांटून घ्यावें हे चाल म्हणावी तरी तुमच्या बापांनीं अवध्या भावास जमीन देविली आणि तुमचा अपघात जाहला सबब तुम्हांस एक चावर जमीन दिली. त्या जमीनीस तुमच्या आवध्या भावाबंदांचा वारसा पोंहोंचत नाहीं. हें खरें जाहलें. हें जाणोन हें आज्ञापत्र सादर केलें असे, तरी पूर्वी कैलासवासी महाराजांनीं तुमचे बाप रघुनाथ महादेव यांसी सर्व भावाबंदाखेरीज जमीन कसबे शिरवळ निमचावर व मौजे कवठे पावचावर व मौजे पळसी पावचावर एकूण एकचावर जमीन इनाम दिली आहे, त्याप्रमाणें तुम्ही आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम अनुभवून सुखरूप राहणें.

म्हणोन नांवाचें ——————————————— पत्र १

येविशीं पत्रें ——————————————— ३

१ देशमुख परगणे मजकूर.
१ देशपांड्ये समस्त भाऊ परगणे मजकूर.
१ मोकदम कसबे शिरवळ व मौजे पळशी व मौजे कवठें देहे तीन एकून पत्र एक. ४

२ चार पत्रें चिटणिसी.

६७४ (४२५). दिनकर दादाजी नेने यांनीं किल्ले रत्नागिरीचे स्वारीस किल्ल्यास माळ लाविली ते समयीं ते सरकार कामास आले सबब त्यांची बालपरवेशीची नेमणूक सरकारांतून करार करून दिली त्याप्रमाणें पांच सात वर्षें ऐवज पावला. गुदस्तांपासोन बालपरवेशीचा ऐवज पावत नाहीं. म्हणून विदित जाहलें; त्याजवरून बालपरवेशीची नेमणूक पेशजी होऊन

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. सावान १४.

suicide. The Raja on hearing of this was grieved and gave some Inam land to Baji Raghunath's father and the other Bhaubands of the family.

674. In the attack on fort Ratnagiri, Dinkar Dadaji Nene planted the flag of Government on the fort and was afterwards killed. A pension was given to his family, payment was not made during the previous year, and orders were issued for its payment in the current year.

A. D. 1765-66.

त्याप्रमाणें ऐवज पावला; आणि सांप्रत गुदस्तांपासोन ऐवज पावत नाहीं, तरी पेशजी नेमणूक होऊन ऐवज पावत आला असेल त्याप्रमाणें हल्लीं ऐवज पावता करणें. ह्मणोन मोराजी शिंदे तालुके रत्नागिरी यांस पत्र १.
विसाजी केशव यांस पत्र १.
२

चिटणिशी पत्रें.

६७५ (४६४). दत्तवरद विठ्ठल कवि यांस वर्षासन दोनशें रुपये सरकारांतून पेशजीपासून पावत आहे, त्याप्रमाणें सालमजकुरापासून वर्षासन रुपये २०० पेशजीप्रमाणें करार करून देऊन हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी सदरहू ऐवज प्रांत गंगथडीचे ऐवजापैकीं साल दरसाल देत जाणें. दरसाल ताजे सनदेचा आक्षेप न करणें. म्हणोन बाळाजी महादेव यांस सनद १.

इ० स० १७६६।६७
सबा सितैन मया व अलफ.
रबिलाखर १०.

रसानगीयाद.

६७६ (६९९). दयाराम वगैरे वाणी यांनीं सरकारचीं दप्तरें मोगलाचे दंग्यांत गेलीं त्यांचें ठिकाण लावून दिलें सबब सालाबाद प्रमाणें सालगुदस्त सन सबैनचे ——— रुपये.
२०० दयाराम.
१०० गुंडोमल्हार.
३००

इ० स० १७७०।७१
इहिदे सबैन मया व अलफ.
सफर १३.

एकूण तीनशें रुपये देविले असेत, तरी परगणेमजकुरचे गुदस्ताचे बेहेड्यास नेमणूक आहे, त्याप्रमाणें पावते करून कबज घेणें. ह्मणोन गोपाळ बल्लाळ कमावीसदार परगणे फुलंमरी यांस सदन १.

रसानगीयादी.

६७७ (७२७). मोरशेट व सदाशिवशेट वगैरे कासार असामी ७ सात यांनीं सरकारांत तोफांचें काम चांगलें केलें, सबब दोन गांव पांचशें रुपयांचे कमाल आकाराचे द्यावयाचा करार, त्याप्रमाणें तर्फ नागोटणें तालुके अवचितगड पैकीं दोन गांव नेमिले त्यांचा आकार बरहुकूम पाहणी सालगुदस्त सन इहिदे सबैन, सुधागड तक्षीम वजा होऊन बाकी सरकार ताक्षिमेची बेरीज रुपये.

इ० स० १७७१।७२
इसन्ने सबैन मया व अलफ.
मोहरम.

675. Balaji Mahadev was directed to pay from the revenues of Gangthadi a pension of Rs. 200 to poet Datta-Varad Vithal Kavi.
A. D. 1756-67.

676. A reward of Rs, 300 was granted to Dayaram wani and Gundo Malhar for recovering Government records lost during the Mogal invasion.
A. D. 1770-71.

677. Morshet, Sadasivshet and other copper-smiths having done good service in manufacturing cannon, were granted Inam villages of the value of Rs. 500.
A. D. 1771-72.

३५७॥ मौजे कडसुरे.
१२२ मौजे वासगांव.
४७९॥

एकूण चारशें साडेएकुणऐशी रुपये दोन गांवचा आकार जाहला बाकी पांचशें रुपयांचे भरतीस कमी रुपये २०॥ साडेवीस आहेत. त्यांची जमीन नेमून द्यावयाचा करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदरहू साडेवीस रुपयांचे आकाराची लागवड भातशेत जमीन मौजे बालशे तर्फ मजकुरपैकीं पाहणी करून चतुःसीमापूर्वक नेमून देऊन जाबता तपशिलवार हुजूर लेहून पाठविणें. ह्मणून गणेश त्रिंबक यांचें नांवें सनद १.

परवानगी रूबरू.

६७८ (७६५). विठोजी धोंड दिमत रघसांवत हशम तालुके अंजनवेल यानें वाघ मारला, सबब यास तैनांत वगैरेविशीं कलमें.—

इ० स० १७७२।७३
सलास सबैन मया व अलफ.
रबिलावल ७.

कडे रुप्याचे बक्षीस एकसाल रुपये २२ बेवीस रुपये देणें. कलम १.

इजाफा शाई शिरस्ता दरमहा रुमये ४ चार पेस्तर साल सन अर्बा सबैन मयापासून करार केले असे तरी सदरहू चार रुपये दरमहा शाई शिरस्तेप्रमाणें चाकरी घेऊन देत जाणें. कलम १.

एकूण दोन कलमें सदरहू लिहिल्याप्रमाणें वर्तणूक करणें. ह्मणून कृष्णाजी विश्वनाथ तालुके अंजनवेल यांचें नांवें सनद १.

रसानगीयादी.

---

९. इनाम नक्त नेमणुकी वतनें वगैरे.

(अ) देणग्या. २. धर्मकृत्यें व नवस.

६७९ (६५). नारो बल्लाळ कमावीसदार सरकार विजयागड यांस सनद कीं, वेदमूर्ति राजश्री विश्वनाथभट वैद्य मंडलेश्वरकर यांसी सूर्यग्रहण पर्वी धारादत्त इनाम जमीन चावर १ एक द्यावयाचा करार करून तुह्मांस सनद सादर केली असे, तरी सदरहू एक चावर जमीन चांगली नर्मदातीरीं चारपांच कोस गांव चांगला पाहून एक चावर जमीन भटजींच्या पदरीं

इ० स० १७६२।६३
सलास सितैन मया व अलफ.
रमजान २८.

---

678. Vithoji Dhond, in the service of Ragh Savant having killed a tiger was given a silver ornament worth Rupees 22 and an increase of four Rupees to his monthly pay.
A. D. 1772-73.

679. Land measuring one chawar situated somewhere on the banks of the Narbada was ordered to be granted in inam to Vishwanathbhat, a Brahmin learned in the Vedas, in fulfillment of a vow to that effect made by the Peshwa during an eclipse of the sun.
A. D. 1772-73.

दुमाला करून हुजूर लिहून पाठवणें, त्याप्रमाणें भटजींस इनामपत्रें करून दिलीं जातील. तरी पत्र पावतांच सदरहू जमीन वेदमूर्तिच्या दुमाला करणें सनद दाखल जाहल्यापासून भटजीचे पदरीं जमीन मोजून घालाल ते दिवसापासून भटजी जमीनीचा वसूल घेतील, तुम्ही वसूल न घेणें. सदरहू जमीनीचा वसूल ग्रहणापासून भटजीकडे देणें भटजीचें उपनांम, गोत्र, सूत्र, लेहून पाठविले जाईल. तुम्हीही वेदमूर्तिचे बंधु गबाभट वैद्य यांस गोत्र, सूत्र, पुसून लेहून पाठविणें. भटजीस जमीनीवर दक्षणा रुपये १२५ सवाशें देविले असेत. देणें ह्मणून सनद १.

परवानगी रूबरू राजेश्रीदादासाहेब.

६८० (१३८). ब्राम्हणांस रोज मोगलाईतून नबाब निजामअल्लीखान यांनीं करार करून देऊन सनदा करून दिल्या, त्याप्रमाणें चालत आलें. मोगलाई अमल सरकारांत आल्यापासून चालत नाहीं तरी कृपा करून करार करून द्यावा ह्मणोन ब्राह्मणांनीं विदित केलें. त्यावरून नबाब निजामअल्लीखान यांच्या सनदा पाहून त्याप्रमाणें रोज करार करून दिला असे. पेशजीपासून चालत आल्याचा भोगवटा मनास आणून सुदामत चालत आल्याप्रमाणें रोज पावीत जाणें. दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें. या सनदेची नकल करून घेऊन असल सनद भटजींजवळ देणें म्हणून वर्तमान भावी कमावीसदार महालानिहाय यांचे नांवें. सनदा.

इ० स० १७६३।६४
अर्बा सितैन मया व अलफ.
जमादिलावल ४.

२ परगणे अंबड.

१ बाबा जोशी बिन गोविंद जोशी गोत्र शांडिल्य सूत्र आश्वलायन वास्तव्य कसबें नाशिक यांसीं दररोज रुपया एक १.

१ परशरामभट उपनांम कोपरकर गोत्र जामदग्न्य सूत्र आश्वलायन वास्तव्य कठोरे यांसीं दररोज रुपया एक १.

२

२ परगणे पैठणपैकीं

१ कृष्णंभट बिन आपाभट उपनांम पटवर्धन गोत्र कौंडण्य सूत्र आश्वलायन वास्तव्य नाशिक यांसीं दररोज रुपया १.

१ जनार्दन भट बिन यशवंत भट उपनांम अभ्यंकर गोत्र वासिष्ठ सूत्र हिरण्यकेशी वास्तव्य नाशिक यांसीं दररोज रुपया एक १.

२

१ परगणे शेंदूरवादेंपैकीं कृष्णंभट बिन आपाभट उपनांम खरे गोत्र कौशिक सूत्र हिरण्यकेशी वास्तव्य नाशिक यांस दररोज रुपया १ एक.

५

रसानगीयादी.

---

680. Certain daily allowances granted to Brahmins by Nawab Nizam Alikhan in parganas Ambad and Paithan were continued on the parganas coming under the Peshwa.

A. D. 1763-64.

६८१ (१४१). हरिभक्तपरायण तिमया गोसावी वास्तव्य नाशिक यांस कर्ज जाहलें तें वारावें असा करार साल गुदस्ता जाहला त्यापैकीं सरदारांवर वांटणी कर्ज वारावयाचि घातली रुपये ३०००० तीस हजार, त्यास ऐवज क्षेप निक्षेप गोसावीबाबांस पावता करणें

इ० स० १७६३।६४.
आर्बा सितैन मया व अलफ.
जमादिलावल. १२

म्हणून सालमजकुरीं रसानगीयादी ——————————— सनदा.

१ मल्हारजी होळकर यांजकडे वांटणी रुपये ११५५० पैकीं, सालगुदस्तां पावलें २५०० बाकी राहिले ते रुपये. ९०५० नऊ हजार पन्नास हल्लीं देविलें.

२ केदारजी शिंदे यांजकडे वांटणी रुपये ११५५० यासी वराता.

१ त्रिंबकराव शिवदेव यांस सालगुदस्तां मशारनिल्हेची दिवाणगिरी सांगितली तेसमयीं सदरहू ऐवज पैकीं, रुपये ५००० पांच हजार गोसावी यांस देविले ते त्यांनीं नाईक म्हाळे यांजकडून देविले त्याप्रमाणें पावले, परंतु त्रिंबकराव शिवदेव यांसी शिंद्यांकडून पावले नाहींत, सबब हल्लीं वरात दिली. ऐवज त्रिंबकराव शिवदेव यांस देणें म्हणून लिहिलें असें.

१ कित्ता वरात रुपये ६५५० सहा हजार पांचशें पन्नास देविले गोसावी बावांस.

२

१ खंडेराव पवार यांजकडून देविले रुपये ४८०० अठेचाळीसशें.

१ कृष्णाजी पवार व जिवाजी पवार यांजकडुन देविले रुपये २१०० एकवीसशें रुपये.

५

६८२ (१६६). सालगुदास्तां कसबे नगरानजीक मोगल आला होता. ते

---

681. A contribution of Rs. 30,000 was levied from the following Sardars for the liquidation of debts incurred by Timayya Gosavi of Nasik:—

A. D. 1763-64.

	Rs.
Malharji Holkar	— 11,550
Kedarji Sinde	— 11,550
Khanderav Pawar	— 4,800
Krishnaji and Jiwaji Pawar	— 2,100

682. Ganesh Vithal, the officer of fort Ahmednagar made a vow to perform a Maharudra ceremony in honour of the deity, Shri Shukleshwar Mahadev of Kasbe Bhingar, on the occasion of the Mogals encamping near Nagar in the preceding

A. D. 1763-64.

इ० स० १७६३।६४. अर्वा सितैन मया व अलफ. रजब १४.

समयीं श्रीशुक्लेश्वर महादेव वास्तव्य कसबे भिंगार येथील देवास होमद्वारा महारुद्र करावयाचा नवस तुम्ही केला होता, तो करावयाबद्दल रुपये ३०० तीनशें करार करून दिले असेत. तुम्ही हरएक कमाविशींचा ऐवज मेळवून महारुद्र उत्तम प्रकारें देवास करणें. ह्मणोन गणेश विठ्ठल तर्फ हवेली नगर यांस सनद १.

रसानगीयादी.

६८३ (१६८). वेदशास्त्र संपन्न राजश्री परमेश्वरभट बिन वासुदेवभट उपनांम वामनाचार्य, गोत्र गौतम, सूत्र आश्वलायन, अग्निहोत्री वास्तव्य श्रीसुंदरक्षेत्र चांगदेव परगणे येदलाबाद प्रांत खानदेश यांनीं हुजूर येऊन निवेदन केलें कीं, आपणास सालगुदस्तां चैत्रमासीं सूर्यग्रहणीं दान जमीन चावर १ एक मौजे मेहूण परगणे मजकूर येथें करार करून देऊन नारोकृष्ण मामलेदार प्रांत मजकूर यांस जमीन नेमून देणें ह्मणोन सनद दिली. त्याजवरून त्यांनीं जमीन मौजे मजकुरीं नेमून देऊन आपणाकडे चालती केली, परंतु जमीनीची दानपत्रें भोगवटीयास सरकारांतून करून दिलीं नाहींत, यास्तव स्वामीनीं कृपाळू होऊन जमीनीचीं इनामपत्रें भोगवटीयास करून देऊन चालविलें पाहिजे. ह्मणोन, त्याजवरून मनास आणून सालगुदस्तां सूर्यग्रहणीं तुह्मांस जमीन दान दिली त्याचीं पत्रें भोगवटीयास दिलीं नाहींत सबब सदरहूप्रमाणें तुह्मांस एक चाहूर जमीन इनाम करार करून देऊन हीं इनाम पत्रें करून दिलीं असेत, तरी जमीन चतुःसीमापूर्वक तुम्हीं आपले दुमाला करून घेऊन तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें जमीन इनाम अनुभवून सुखरूप राहणें म्हणोन. येविशींचीं पत्रें—

इ० स० १७६३।६४. अर्वा तितैन मया व अलफ. रजब १६.

१ भटजींचे नांवें दानपत्र.
१ मौजे मजकुरांस.
३ चिटणिसी.
१ देशाधिकारी लेखक वर्तमान भावी परगणे येदलाबाद यांस.
१ देशमुख देशपांडे.
१ केदारजी शिंदे व महादेव शिंदे यांस.

३

५

रसानगीयादी.

---

year. The vow was permitted to be fulfilled and a sum of Rs. 300 was sanctioned for the purpose.

683. One chahur of land was given to a Brahmin of Shri Sundar Kshetra Changdev in pargana Edlabad, prant Khandesh, on the occasion of an eclipse of the Sun, which had occurred in the preceding year.

A, D. 1763-64.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं. लेखांक ६८४-६८५.

६८४ (२०३). पाद्री फेल्वाद्र फिरंगी वैद्य यांनीं हुजूर कसबे पुणें येथील मुक्कामीं येऊन अर्ज केला कीं, आपला देव माजरदेस मामले रेवदंडा येथें आहे. तेथें देवाजवळ बागायत वाडी पादरी माजरदेस आहे ते साहेबीं कृपाळू होऊन देवाकडे नूतन इनाम करार करून देऊन भोगवटीयास सनद करून दिली पाहिजे. म्हणोन त्याजवरून पादरी मजकूर याचा अर्ज खातरेस आणून यांजवर कृपाळू होऊन मामले मजकुरीं माजरदेस देवाजवळ बागायत वाडी पादरी माजरदेस आहे त्याची मोजणी जमीन बिघे तपशिलवार.

इ. सन १७६३।६४.
अर्बा सितैनमला व अलफ.
जिल्काद १९.

४।४२ देवळाचे दक्षिणेकडील वाडी.
४॥३। देवळाचे उत्तरेकडील वाडी.
४।१॥। देवळाचे पूर्वेकडील खराब जमीन माळवे करावयाची.
४२४२

एकूण दोन बिघे दोन पांड जमीनपैकीं, बागायत पावणेदोन बिघे पाव पांड व खराब जमीन पाव बिघा पावणेदोन पांड येणेंप्रमाणें जमीन वाडी पेस्तरसाल सन खमस सितैनापासून इनाम करार करून देऊन हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी सदरहू जामिनीचा आकार होईल तो पेस्तरसालापासून साल दरसाल देवाकडे इनाम खर्च लिहित जाणें. दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें या सनदेची प्रति लेहून घेऊन हें असल सनद पाद्री मजकूर यांजवळ भोगवटियांस परतोन देणें म्हणोन महादाजी रघुनाथ कमावीसदार जंजिरे रेवदंडा यांस.

सनद १.

छ. १९ जिल्काद. रसानगीयाद.

६८५ (२३०).

इ० स० १७६४।६५
खमस सितैन मया व अलफ.
मोहोरम.

१० खैरात खर्च. ——————————रुपये.

४ छ. ६ रोज देणें शेखसल्ला पीर कसबे पुणें यास मोहरम महिन्याचे ईदीबद्दल सालगुदस्तांप्रमाणें सालमजकुरीं रसानगी चिठी.—रुपये.

४ छ. ७ रोज देणें शेखसादत पीर कसबे पुणें यास सालगुदस्तांप्रमाणें सालमजकुरीं रसानगी चिठी.—————————रुपये.

---

684. A Portuguese priest prayed that a piece of garden land adjacent to his church at Manjarde in Mamle Revdanda might be given
A. D. 1763-64. him. His prayer was granted and land measuring two bighas and two pands was assigned as inam to the church.

685, Four rupees are debited as presented to Shekhsala Pir, and the same amount to Shekh Sadat Pir of Poona on the occasion of
A. D. 1764-65. the Moharram festival. One rupee is debited as paid to Piraji Bhilara by the order of Sagunabai, the said Piraji having in obedience to a vow became a fakir during the Moharram festival.

१ छ. १० रोज देणें शिंदे पोरगे स्वारी राजश्री नारायणराव नवसाचे मोहरम महिन्याचे फकीर जाहले त्यास परवानगी राजश्री नारायणराव ——— रुपये.

१ छ. ११ रोज देणें पिलाजी भिलारा यानें नवसाची फकीरी घेतली, सबब परवानगी सगुणाबाई. ——— रुपये.

१०

दादासाहेब यांच्या रोजकीर्दीपैकीं.

६८६ (२४८). महिपतराव जगंनाथ कमावीसदार परगणे नाशिक यांस सनद कीं, जयनभदास बैरागी दुधाधरी यासी दररोज दूध वजन पक्कें ८८२ दोन शेर द्यावयाचा करार करून सनद सादर केली असे, तरी बैरागी मजकूर ब्राह्मण स्नानसंध्या करून सुकर्म करीत असेल आणि निराहार करीत असेल याची चौकशी करून दररोज दोन शेरप्रमाणें हजिरी गैरहजिरी चौकशी करून देत जाणें म्हणून. सनद १.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. रबिलाखर १०.

रसानगीयादी.

६८७ (२७२). श्रीमंत परमहंसादि श्रीपूर्णानंद सरस्वती व श्रीरामानंद सरस्वती स्वामी मठ कवले व खानापूर यांस भिक्षेस मौजे मळेवाडी कर्यात काटगाळी तो खानापूर हा गांव दरोबस्त पूर्वी सकारांतून इनाम करार करून देऊन भोगवटियास पत्रें करून दिलीं त्याप्रमाणें गांव स्वामीकडे चालत आहे, त्यास गतवर्षी कितुरकरांच्या दंग्यामुळें मठ लुटला गेला, ते समयीं पत्रें गळहाटलीं. ऐशास हल्लीं नवीन पत्रें करून दिलीं पाहिजेत म्हणोन विठ्ठल विश्राम यांनीं हुजूर कसबे तडस प्रांत कर्नाटक येथील मुक्कामीं येऊन विनंति केली त्यावरून मनास आणून कैलासवासी तीर्थरूप नानासाहेब यांनीं स्वामींचे भिक्षेस मौजे मजकूर इनाम दिला तो परंपरागत चालल्यानें राज्यास श्रेयस्कर जाणोन मौजे मजकूर स्वराज्य व मोगलाई एकूण दुतर्फा खेरीज हक्कदार व इनामदार करून दरोबस्त कुलबाब, कुलकानू, जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण, निधि, निक्षेपासहित पेशजीप्रमाणें इनाम करार करून दिला असे, तरी मौजे मजकूर सुदामत प्रमाणें स्वामींचे स्वाधीन करून स्वामीस व स्वामींचे शिष्य परंपरेनें इनाम चालवणें. दरसाल नूतन सनदेचा उजूर न करणें. यासनदेची नक्कल लेहून घेऊन हे असल सनद स्वामींजवळ भोगवटियास परतोन देणें, म्हणोन सनदा पत्रें.—

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. जमादिलावल २२.

---

686. The Kamavisdar of Nasik was ordered to supply Jayanabhadas Bairagi with 2 seers of milk every day, after satisfying himself that he was performing daily ablution and daily prayer and leading a pious life, and touching no food.

A. D. 1764-65.

687. A village had been given in inam by the late Peshwa to the Swamis of maths Kawale and Khanapur. During the Kitturkar's insurrection in the preceding year, the Maths had been plundered and the sanads relating to the grant lost. A fresh sanad was now issued.

A. D. 1764-65.

२ सनदा.
१ स्वामींचे नांवांची.
१ गांवांस.
२

२ चिटणिसी तो खानापुरास.
१ जमीदार.
१ देशाधिकारी लेखक वर्तमान भावी.
२

४

रसानगीयादी.

दादासाहेबांच्या रोजकीर्दीपैकीं.

६८८ (४०४). केसो गोविंद यांचे नांवें सनद कीं, पंचहजारी ब्राह्मण यास नेहमीं दररोज बारांशें नमस्कार घालावयाची नेमणूक असोन ब्राह्मणास दररोज देणेची नेमणूक बितपशील.

इ० स० १७६५।६६
सित सितैन मया व अलफ.
जमादिलावल २८.

नक्त दररोज. रुपये २. दूध दररोज वजन पक्कें ८८२.

एकूण नक्त दोन रुपये व दूध दररोज दोनशेरप्रमाणें सनद पैवस्तगिरीपासून सदरहू नेमणूकेप्रमाणें नमस्कार घातल्यास दररोज सदरहूप्रमाणें देत जाणें. ह्मणून सनद १.

रसानगायिाद छ. २८ जमादिलावल.

६८९ (४६५). शहर बऱ्हाणपूर येथील कलमें.

इ० स० १७६६।६७
सबा सितैन मया व अलफ.
रबिलाखर १२.

शहर मजकूरीं पेशजी मोगलाई अमलांत दररोज लंगर पांच सात पल्ले धान्याचा चालत होता, त्यास नारो कृष्ण यांचे कारकीर्दीतही थोडाबहुत चालला आहे, त्यास हल्लीं तीन पल्ले दाणा लंगराचा दररोज करार करून दिला असे, तरी सदरहूप्रमाणें दररोज वांटणें जाजती न वांटणें. कलम १.

शहर हस्तगत व्हावयाकरितां पाण्याचा नहर फोडिला आहे, त्यास थोडका पैका लाऊन नहराची दागदुजी करून शहरांत पाण्याची अमदानी करणें कलम १.

---

688. Panch Hajari, a Brahmin, was granted an allowance of Rs. 2 and 2 seers of milk per day, for prostrating himself 1200 times before the Sun every day.

A. D. 1765-66.

689. Grain measuring about 5 or 7 pallas used to be distributed every day at Barhanpur as langar charity. Trimbak Narayan was directed to restrict the quantity to 3 pallas every day. He was also directed to repair the aqueduct which had been destroyed in the attempt to capture the city.

A. D. 1766-67.

एकूण सदरहूप्रमाणें दोन कलमें करार करून दिलीं असेत तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें. ह्मणोन त्रिंबक नारायण यास सनद १.
रसानगीयाद.

६९० (४७२). हरि उमाजी कारकून शिलेदार नेहमीं श्रीकाशीमध्यें राहावयास जातात, सबब मशारनिल्हेनीं श्रीमध्यें स्नानसंध्या करून असावें. चाकरी कोणाकडे करूंनये. कोणे घालमेलींत पडोंनये. येणेंप्रमाणें करार करून यांस सालीना नेमणूक रुपये ३०० तीनशें रुपये करार केले असेत, तरी सालमजकुरापासून दरसाल देत जाणें. मशारनिल्हेनीं कोणाची घालमेल अथवा चाकरी केली तर देऊंनये. म्हणोन त्रिंबकराव लक्ष्मण कमावीसदार परगणें नेवासें वगैरे महाल यांस सनद १.
रसानगीयाद.

इ० स० १७६६।६७ सबा सितैन मया व अलफ. जमादिलावल ८.

मशारनिल्हेस तैनात असेल ती देऊंनये, व गांव एक होता तोही सरकारांत ठेऊन सदरहूप्रमाणें नेमणूक करार करून सनद दिल्ही आहे.

६९१ (५२१). नवसखर्च किल्ले प्रतापगड येथील श्रीभवानीस नवस, किल्ला फत्ते जाहाल्यानंतर पंचवीस पुतळ्यांची माळ द्यावी असा चापाजी टिळेकर खिजमतगार याचे गुजारतीचा आहे. ऐशास किल्ले मजकूर सरकारांत आला, सबब हल्लीं श्रीस माळ पुतळ्यांची नाणें पंचवीसाची देविली असे, तरी सदरहू पुतळ्यांस फासे लावावयास सोनें लागेल तें सदरहू पंचवीस पुतळ्यांपैकीं लावून बाकी नाण्यांची माळ करून श्रीस देणें, आणि नवस खर्च लिहिणें. म्हणोन रामाजी महादेव यांचें नांवें सनद १.
रसानगी यादी.

इ. स. १७६७।६८. समान सितैन मया व अलफ मोहरम १९.

६९२ (६३७). वेदमूर्ति राजश्री केशव दीक्षित पाटणकर यांस सनद कीं, श्रीकाशींत ब्राह्मण आहेत त्यांची सन तिसा सितैनचीं वर्षासनें वांटावयासीं राजश्री नारो बल्लाळ भट कारकून पाठविले आहेत, वर्षासनाचा जाबता आलाहिदा पाठविला आहे, त्यास तुम्ही व मशारनिल्हे मिळून चौकशीनें नेमणुकेप्रमाणें वांटणी करावी. यासी ऐवज. रुपये.

इ. स. १७६९।७० सबैन मया व अलफ. रजब ५.

690, An annual allowance of Rs. 300 was granted to Hari Umaji Karkun silledar, who was going to settle permanantly at Benaras subject to the condition that he accepted service under no person,
A, D, 1766-67,

691, Chapaji Tilekar, an attendant, made a vow to the deity Bhawani at Pratapgad to present her with 25 putalis if the fort surrendered to Government. The fort having surrendered the vow was ordered to be fulfilled,
A. D. 1767-68.

692. A Karkun was sent to Benaras to distribute the annual Varshasan amounting to Rupees 12,472 to Brahmans residing at the place.
A, D 1769-70,

२३१८॥ पेशजी गोविंद कृष्ण गोखले कारकून सन समानचे वांटणीस पाठविले होते त्यांनीं वांटणी करून बाकी ऐवज राहिला तो तुमचे तसलमातीस ठेविला आहे, तो ऐवज हल्लीं सन तिसाचे वांटणीबद्दल देविला असे, तर तुम्ही सदरहू ऐवज घेऊन पावलियाचें कबज द्यावें.

१०१५३॥ हल्लीं हुंडी हरिदास कृपाराम याजवर पितांबरदास याजकडून देविली आहे.

१२४७२।.

एकूण बारा हजार चारशें सवाबहात्तर रुपये देविले आहेत, तरी ब्राम्हणांस नेमणूक जाबत्या प्रमाणें वर्षासनाची वांटणी करून जाबता लेहून पाठवावा. म्हणोन सनद १.

६९३ (६४२). खंडो गणेश कमावीसदार परगणे नाशीक याचे नांवें कीं, श्रीशंकराचार्य स्वामी शृंगेरीकर यांची समाधी पंचवटी कसबे मजकूर येथें आहे, त्यास स्वामीचे समाधीसन्निध जागा पूर्वेस चाळीस गज व पश्चिमेस साठ गज याप्रमाणें जागा द्यावयाचा करार करून तुम्हांस सनद गुदस्ता सादर केली असे. त्यास स्वामीची समाधि आहे ती जागा पुजारी यांची, ते कटकट करितात म्हणून विदित जाहलें. त्यास सदरहू लिहिल्याप्रमाणें जागा समाधिकडे सरकारांतून कारकून दत्ताजी बाबुराव पाठविले आहेत यांचे विद्यमानें देणें. सदरहू जागा समाधीकडे दिली याचे मुबदला जागा पुजारी यांस कसबे मजकुरीं दुसरी नेमून देऊन चालवणें. येविसीं बोभाट फिरोन येऊं न देतां लिहिलेप्रमाणें करणें. म्हणोन सटद १.

इ. स. १७६९।७० सबैन मया व अलफ. साबान १०

रसानगी यादी.

६९४ (६९४). धूम्रपानी गोसावी चौऱ्याशीं आसनें करीत असतो त्यास रोजमरा एक माही. रुपये.

इ. स. १७७१।७२. इसन्ने सबैन मया व अलफ. रविलाखर २३.

१०	कदीम रोजमरा.
१०	जाजती छ. १ जमादिलोवलपासून.
२०	

एकूण वीस रुपये एकमाही रोजमरा छ. १ जमादिलावलपासून देविला असे, तरी आनंदवल्लीपैकीं देत जाणें. याशिवाय लांकडें वजन ४४५ पांच शेर दररोज देतजाणें. म्हणोन भास्कर बल्लाळ यांचे नांवें सनद १.

रसानगीयादी.

६९५ (७९१). श्रीमंत महाराज सौभाग्यवती मातुश्री दुर्गाबाई साहेब थोरली धनीन

693. A piece of land acquired and granted to be added to the tomb of Shri A ,D, 1769-70. Shankaracharya of Shringiri at Punchwati in Nasik.

694. An allowance of Rupees 20 a month was granted to a Gosavi who in A. D. 177I-72. haled smoke and used to assume 84 postures,

695 Shrimant Maharaj Durgabai Saheb, the elder wife of the Satara Rjaa having given 2 chawars of land in inams to Brahmins in A D, 1772-73 A, D, 1768-69 on the occasion of her visit to Mahuli during the Kanyagat year, (when the Sun is in the 6th Sign of the Zodiac) the grant was confirmed,

इ. स. १७७२।७३. सलास सबैन मया व अलफ जिल्हेज. ९

यांची स्वारी कन्यागतीं सन तिसा सितेनांत साताऱ्याहून माहुली संगमीं श्रीकृष्णास्नानास गेली होती. तेव्हां ब्राम्हणांस धारादत्त जमीन इनाम द्यावयाचा करार केला. जमीन चावर.—

१ वेदमूर्ति रघुनाथभट बिन गणेशभट पराडकर.
·॥२० वेदमूर्ति गणेशभट बिन भास्करभट वालेकर.
·।१० वेदमूर्ति लक्ष्मण भट बिन गोपाळ भट अभ्यंकर.

२

एकूण दोन चावर जमीन तिघां ब्राम्हणांस प्रांत वाईपैकीं द्यावयाचा करार आहे, त्याप्रमाणें सदरहू जमीन चारशें रुपयांचे उगवणीची हल्लीं तुम्हांकडून देविली असे, तरी दोन चावर जमीन चारशें रुपयांचे उगवणीची सालमजकुरापासून तिघा ब्राम्हणांचे मुलांला चतुःसीमा पूर्वक करून देऊन त्यांचे नांवें इनामखर्च लिहीत जाणें, आणि चतुःसीमेचा जाबता जमीनीचा भटजींजवळ देणें. म्हणून गंगाधर शामराव कमावीसदार यांस सनद १.

रसानगीयादी.

१० किताबती व बहुमान.

६९६ (११). किल्ले सातारा येथें आहेत यांस.

इ. स. १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. रबिलाखर ४.

बदनसिंग जमातदार किल्ले मजकुरीं नामजाद आहे. शहाणा माणूस चाकरीस खबरदार याकरितां नवें आफ्तागिर करार करून दिले. त्यास आफ्तागिरीची तैनांत दरमाहा रुपये ५ पांच प्रमाणें छ, १ रबिलाखरपासून करार केले असेत. दरमाही शिरस्तेप्रमाणें किल्ले मजकूरपैकीं पावीत जाणें. येणेप्रमाणें गंगाजीराव खानविलकर नामजाद किल्ले सातारा यांस सनद १.

रसानगीयादी.

६९७ (१२६ अ). बाबुराव राम फडनीस व बाळाजी जनार्दन फडनीस यांस पालखीचे सरंजामास प्रांत खानदेशपैकीं गांव आहेत त्यांजविषयीं सनदा व पत्रें.

इ. स. १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. रबिलाखर १५.

२ मोकदमांस फडनिसी सनदा.

१ मौजे मुडी परगणे डांगरी येथील मुकदमाचे नांवें सनद कीं, मौजे मजकूर जहागीर व बाबती सरदेशमुखी मिळोन सरंजाम होता, त्यास सालगुदस्ता मीरखान ठोके यांस सरंजाम दिला होता, तो हल्लीं त्यांजकडून दूर करून

---

696. Badansing Jamatdar, a servant at fort Satara, was in recognition of his ability and devotion to duty, allowed an aftagir (an
A. D. 1762-63. ornamental umbrella), and an allowance of Rs. 5 per month was granted to him for the purpose.

697. Baburav Ram Fadnis and Balaji Janardan Fadnis were granted saran-
A. D. 1762-63. jams for the expense of keeping palanquins.

पूर्ववत्प्रमाणें सालमजकुरापासून मौजे मजकूर फडनीस मशारनिल्हे यांजकडे सरंजाम करार करून दिला असे. तरी मशारनिल्हेकडील कमावीसदारासीं रुजू होऊन मौजे मजकूरचा जाहागीर व बाबती सरदेशमुखींचा अमल सुरळीत देणें. म्हणोन सनद १.

१ मौजे रोठवद परगणे जळोद येथील मुकदमाचे नांवें सनद कीं मौजे मजकूर जाहागीर व बाबती सरदेशमुखी देखील मुकासा मिळोन सरंजाम होता, त्यास सालगुदस्ता राजश्री निळकंठ महादेव यांस सरंजामांत दिला होता तो त्यांजकडून दूर करून सालमजकुरापासून फडनीस मशारनिल्हे यांजकडे पूर्ववत्प्रमाणें सरंजाम करार करून दिल्हा असे, तरी मशारनिल्हेकडील कमावीसदारासी रुजू होऊन मौजे मजकूरचा दरोबस्त अमल सुरळीत देणें. म्हणोन सनद.

२

२ चिटणिशी पत्रें.

१ निळकंठ महादेव यांचे नांवें पत्र कीं, मौजे रोठवद परगणे जळोद पहिला पालखी सरंजाम फडनिसाकडे होता, त्यास सालगुदस्त तुम्हांकडे फौजेस सरंजाम दिला होता. तो हल्लीं दूर करून पूर्ववत्प्रमाणें फडनीस मशारनिल्हे यांजकडे पालखीचे सरंजामास करार करून दिला असे, तरी तुम्ही याउपर गांवास मुजाहीम न होणें, यांचे हे अमल करतील तुम्ही दखलगिरी न करणें. सालमजकुरीं वसूल घेतला असेल तो माघारा देणें. म्हणोन पत्र १.

१ मौजे मुढी परगणे डांगरी हा गांव पहिला पालखीचे सरंजामास फडनिसाकडे होता. त्यास सालगुदस्त तुम्हांकडे फौजेस सरंजाम दिला होता. तो हल्लीं दूर करून पूर्ववत्प्रमाणें फडनीस मशारनिल्हे यांजकडे पालखीचे सरंजामास करार करून दिला असे. तरी तुम्ही याउपर गांवास मुजाहिम न होणें यांचे हे अमल करतील तुम्ही दखलगिरी न करणें. सालमजकुरीं वसूल घेतला असेल तो माघारा देणें. म्हणोन मीरखान ठोके यांस पत्र.

२

४

एकूण चार.

६९८ (४९८). आखेराज रावळ भावनगरकर संस्थान घोगें यांनीं सरकारचें काम

---

698. Akheraji Rawal of Sansthan Ghoge Bhawnagar, having done some service to Government, his son Kuwar Waktasing was A. D. 1766-67. allowed the services of a torch bearer, and an Aftagirya and was given an annual allowance of Rupees 100 for the purpose.

इ० स० १७६६।६७. सबा सितैन मया व अलफ. रमजान ३. केलें, सबब बहुमान अफ्तागिरे व दिवटे नवे करार करून सालीना मोईन रुपये.

९० कुवर बख्तसिंग पुत्र.

३०	अफ्तागिऱ्या असामी	१.
२०	दिवट्या	१.
९०		२.
५०	रणसोड मेहता कारभारी सदरहूप्रमाणें असामी	२.
१००		४

शंभर रुपये सालीना करार करून देविले असेत, सदरहूप्रमाणें पावीत जाणें. म्हणून विसाजी केशव यांसी रसानगी चिठी. सनद १.

११. सार्वजनिक इमारती व लोकोपयोगीं कामें.

(अ) इमारती.

६९९ (६६८). नारो महादेव कमावीसदार क्षेत्र पंढरपूर दिमत परशराम रामचंद्र यांचे नांवें सनद कीं, क्षेत्र मजकुरीं सरकारचा वाडा बांधावयास तुह्मांस आज्ञा केली असे, तरि क्षेत्र मजकूरचें शिलकेचे ऐवजीं तीन चार हजार रुपयांत वाडा तयार करणें. ह्मणोन सनद १.

इ. स. १७७०।७१ इहिदे सबैन मया व अलफ रजब.३

रसानगीयादी.

११. सार्वजनिक इमारती व लोकोपयोगीं कामें.

(ब) विहिरी व तलाव.

७०० (२४). हरि दामोदर यांनीं हुजूर पुण्याचें मुक्कामीं विनंति केली कीं, कसबे त्रिंबक येथें गौतम तळ्याचें काम श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांचे आज्ञेवरून केलें, त्यास तळ्याचे दक्षिणभागीं पुष्पवाटिकेस व घर बांधावयास जागा पाळीवर व पाळीखाले करून पुष्पांचीं झाडें लाविलीं व घरही बांधिलें आहे, त्यास येविशींचा महजर करून दिला पाहिजे. ह्मणून त्यावरून हें

इ. स. १७६२।६३. सल्लास सितैन मया व अलफ. रजब २८.

699. Orders were issued to build a Government house at Pandharpur and A. D. 1770-71. Rupees 3000 were sanctioned for the purpose.

700. Hari Damodhar Kamavisdar built a tank called Goutam at Trimbak under instructions from Bhau Saheb und built a hosue and led out a garden to the South of the tank. A sanad for the land occupied by the house and garden was at his request issued to him.

A. D. 1762-63.

पत्र तुह्मांस सादर केलें असे तर मशारनिल्हे यांचे जागियासी हद्दमहदूद चतुःसिमा असेल ती मनास आणून यांचे जागियाचा महजर करून देणें. ह्मणून हरि निलकंठ कमावीसदार कसबे मजकूर यांस छ. २८ रजब सनद १.

परवानगी रूबरू.

७०१ (६९२). महादाजी रघुनाथ तालुके विजयदुर्ग यांचे नांवें सनद कीं, महादाजी कृष्ण फडके यांनीं विदित केलें कीं, घोडेपईची तर विजयदुर्ग तालुक्यांत आहे, तेथें अठरा कोश ब्राह्मणाचे उपयोगीं पाणी नाहीं, यास्तव मौजे तिर्लोट येथें आपण विहीर खंटली आहे, तेथें पाण्याचे कांठीं दुकान असल्यास ब्राह्मण आल्या गेल्यास उपयोगी पडेल, याजकरितां दुकान घालोन जिन्नस वगैरे आणावे लागेल त्यास जकातीविषयीं वगैरे उपद्रव न लागे तें केलें पाहिजे.ह्मणोन; त्याजवरून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी आल्यागेल्याचे उपयोगी किरकोळ पानसुपारी वगैरे जिन्नस विहीरीजवळ विकावयास आणील त्यास पांच वर्षें जकात न घेणे. आल्या गेल्या शिवाय उदीम करील त्यास जकात शिरस्तेप्रमाणें घेणें. म्हणोन सनद १.

इ. स. १७६९।७० सबैन मया व अलफ जिल्हेज. ३

रसानगीयादी.

७०२ (६९५). मौजे खंडाळें परगणे शिरोळ नजीक घांट खांबटकीचा येथें सरकारची धर्मशाळा व विहीर आहे त्यास विहिरीस पाणी थोडें आहे, सबब जाजती विहीर खणावयाची आज्ञा केली असे, तरि तीनशें रुपयेपर्यंत प्रांत पुर्णेपैकीं विहिरीस खर्च लावून पाणी पुरतें होईल असें करणें, व धर्मशाळेची दागदोजी सालदरसाल करीत जाणें. ह्मणोन चिरंजीव राजश्री नारायणराव बल्लाल यांचे नांवें. सनद १.

इ. स. १७७१।७२ इसन्ने सबैन मया व आलफ रबिलाखर ३०

रसानगी भगवंत शिवराम.

११. सार्वजनिक इमारती व लोकोपयोगी कामें.

इतर कामें.

७०३ (९६).मौजे वेळू येथें सरकारचें अन्नछत्र आहे त्याजकडील साहित्याविशीं.

रसानगीयादी.

इ० स० १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. साबान २२.

---

701 Mahadaji Krishna Fadke built a well at Mouze Tirlot in taluka Vijaydurg, there being no drinking water available for 36 miles around, and requested that exemption from octroi might be granted in regard to a shop which he proposed to open there for the convenience of travellers. His request was granted.

A. D. 1769-70.

702. Narayanrav Ballal was directed to hava a wel at Khandale, in pargane Sirwal near Ghat Khambatki, deepened and to have the dharmashala adjoining it repaired. Rupees 300 were sanctioned for the purpose.

A. D. 1771-72.

703. There was an institution kept at Government expense for feeding persons gratis at Mouze Velu.

A. D. 1762-63.

दुभत्या म्हसी सर सात जुन्या घेऊन नव्या देणें म्हणून रामाजी विठ्ठल कारकून निसबत थटी यांचें नांवें सनद

कसबे खेड व पेठ शिवापूर निसबत रामचंद्र नारायण कमावीसदार यांस कीं, अन्नछत्राचे गुरांस वैरण गवत पुले १५००० पंधरा हजार देविले असेत. गोगलवाडीचे कुरणापैकीं पावते करणें म्हणून सनद १.

छ. २३ सावान.

७०४ (१२८). त्रिंबकराव लक्ष्मण कमावीसदार परगणे नेवासें वगैरे महाल यांचे नावे सनद कीं, राजश्री धोंडभट अग्निहोत्री वास्तव्य क्षेत्र टोकें यांनीं वामोरीनजीक धर्मशाळा बांधोन सदावर्त घातलें आहे. त्यास नारो बाबाजीच्या अमलांत साहित्य पावत होतें त्याप्रमाणें हल्लीं तुम्हांकडून द्यावयाचें करार केलें असे. बितपशील.–

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. रबिलाखर २२.

कडबा पुले सुमारें ५०००. लांकडें गाडे सुमारें ५० गोंवऱ्या व शेणी सुमार ४००००.

एकूण पांचहजार पुले कडबा व लांकडे गाडे पन्नास व गोंवऱ्या चाळीस हजार येणेंप्रमाणें देविलें असे. गांवगन्नापैकीं पोंहोचवून देणें. म्हणोन सनद १.

रसानगीयाद.

७०५ (५८८). उध्घोविरेश्वर यांचे नांवे सनद कीं मालशेजचे घाटाचा मार्ग पर्जन्यामुळें मोडला आहे यास्तव सरकारचें नुकसान होतें, सबब घांट बांधावयासी तुह्मांस आज्ञा करून बंदिस्तीचे खर्चाचा अजमास रुपये १९०० दीडहजारपैकीं आलाहिदा जकातीचे मामलेदाराजवळून ऐवज घ्यावयाचा खेरीज मक्ता रुपये.

इ० स० १७६८।६९. तिसा सितैन मया व अलफ. जमादिलाखर.

३७५ विसाजी बाबाजी वगैरे वरघांटचे मामलेदार यांजकडून.
३७५ विसाजी वासुदेव व राघो नारायण तळघांटचे मामलेदार.
७५०

७०६ (७१२). वेदमूर्ति धोंडभट खरे अग्निहोत्री वास्तव्य क्षेत्र टोकें यांनीं मौजे सो-

---

704. Dhondbhat Agnihotri built a dharmashala near Wamori, and established a house for feeding people gratis. It was ordered that the following supplies, which used to be given to him during the administration of Naro Babaji, should continue to be collected from villages and given to him. viz straw, 5000 bundles, fuel 50 cart-loads, cow-dung cakes 40,000.

A. D. 1763-64.

705. The road at the Malsej pass which had been washed away during the rains, was ordered to be repaired, and Rupees 1500 were sanctioned for the purpose.

A. D. 1771-72.

706. Dhondbhat Khare Agnihotri of Toke having built a dharmashala and

इ. स. १७७१।७२. इसने सबैन मया व अलफ. सयाल १८. नई व वामोरी या दोन्ही गांवचे दरस्यान धर्मशाळा बांधोन अन्नछत्र घातलें आहे, त्याचें साहित्यास मौजे चरेगांव तर्फ राहुरी परगणे संगमनेरपैकीं ऐवजाची नेमणूक रुपये.

४३४।८॥ पेशजीचा करार मौजे मजकूरचा आकार होईल त्यापैकीं गांवखर्च वजा होऊन बाकी राहील त्यांत मोकाशीयाचा ऐवज वजा होऊन बाकी राहील त्यापैकीं निमे द्यावें. ते सालगुदस्ता सन इहिदे सबैन आकाराप्रमाणें वाटणी रुपये.

२६५॥≈॥ जाजती सालमजकुरापासून मौजे मजकुरचे ऐवजीं.

७००

एकूण सातशें रुपये अन्नछत्राचें साहित्याबद्दल सालमजकुरापासून द्यावयाचा करार करून दिला येविशीं. सनदा.

१ नारो बाबाजी यांस मौजे मजकूची जमाबंदी तुह्मी करून आकार होईल त्यापैकीं सदरहू सातशें रुपये भटजींस पावते करून पावलियाचें कबज घेणें बाकी ऐवज राहील तो तर्फ मजकूर येथील सरकारचे कमावीसदाराकडे देत जाणें. मौजे मजकूरची वेटबेगार सालाबादप्रमाणें भटजींकडे देत जाणें. ह्मणोन सनद १.

१ बहिरो रघुनाथ कमावीसदार तर्फ मजकूर यांचे नांवें कीं, मौजे मजकूरची जमाबंदी नारो बाबाजी करतील आणि सदरहू ऐवज भटजींस पावता करूज पावल्याचें कबज घेतील; बाकी ऐवज राहील तो तुह्मांकडे देतील तो घेऊन सरकारहिशेबीं जमा करणें. मौजे मजकूरची वेठबेगार सालाबादप्रमाणें भटजींकडे देणें. म्हणोन सनद १.

२

रसानगीयादी.

१२. टपालखातें.

७०७ (३४९). हरकारे ब्राह्मण, स्वारी राजश्री दादासाहेब यांस सालमजकुरचे मोइनीचें कापडआंख देविले, त्याचे अडीचपट प्रमाणें नक्त रसानगी याद रुपये.

इ. स. १७६५।६६. सित सतैन मया व अलफ. मोहरम ७.

२० लक्ष्मण भागवत.
२० गोविंद सोमण.
८ वेंकु आंबव्या.

---

established a poor house a grant of Rupees 700 per annum was made to him for meeting the expenses of the institution.

A. D. 1771-72.

707. This gives a list of Brahmin harkaras (messengers).

A. D. 1771-72.

६ मनाजी निंबदेव.
६ गोविंद देशस्थ.
६ वेंकण रामभट.
६ जोगु सिताराम.
६ राजेश्वर बराराम.
६ रामकृष्ण द्रवीड.
६ राजाराम देशस्थ.
६ काशी उद्धव.
६ शंकर भट सितारामभट.
६ काक्या दग्या.
६ पादगा गंगाधरभट.
६ कृष्णा फडका.
६ नाग्या धडेल.
६ मंगभट ओरंगळकर.
६ चिंत्या धडेल.
६ आत्माराम जिवाजी.
१२ वामन फडया.
६ वेंकणभट नरसिंहभट.
६ शंकरभट गणेशभट.
६ लिंगा चिलभट.
६ पिला कृष्णंभट.

१८०

४ बाजेखर्च फिरंगोजी परीट याजकडे कोरी सनंगें राजश्री दादा-कडील धुवावयास दिलीं त्यास मसाल्याबद्दल रुपये.

३।-- पद्माकर वेंकणभट तैलंग हरकारा ब्राम्हण यास रुसकत केला सबब नेबाद सन खमस सितैनचे सालगुदस्ताचे निघाले तें बर-हुकूम हिशेब रुपये.

३० शिदू गुरव, स्वारी राजश्री दादा यास रोजमरा एकमाही छ.१ मोहरमचा रसानगी चिठी हुकेरी रुपये.

५ वेदमूर्ति मुकुंद जोशी अग्निहोत्री नाशिककर यांस तीन असा-मीचा कोठींतून सिधा पावतो त्यास किरकोळ शाकभाजी वगैरे साहित्याबद्दल छ. २५ जिल्हेजी द्यावे ते पांच रुपये दरमहाचे दरमहा पावत आल्याप्रमाणें देत जाणें म्हणोन परवानगी

राजश्री दादा. रसानगी गोविंद रघुनाथ कारकून बरहुकुम चिठी मशारनिल्हे. रुपये.

४१॥≋ गुजारत रामाजी काशी वाकनीस. बंद आलाहिदा १

एकूण ——————— रुपये.

४ होन येकेरी १.

१५॥। मोहर १.

२१॥।≋ नक्त.

४१॥≋

१५ तसलमात सुभानजी कदम खिजमतगार जामदार मोहर भेट-पैकीं नाणें १ रुपये.

२७९

२॥ पागा शिलेदार बंद अलाहिदा.

२८१॥

तपशील

४ होन एकेरी.

३०॥। मोहरा नाणें २

२४६॥। नक्त.

२८१॥

बाकी शिलक ऐन नक्त २३३६०४≋ रुपये.

वैद्यकी आणि शस्त्रक्रिया.

नारो आपाजींच्या रोजकीर्दीपैकीं.

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ रबिलाखर २५.

७०८ (१३६). वेदमूर्ति राजश्री प्राण गोविंदभट बिन हरिभट उपनांव त्रिवेदी वैद्य, गोत्र गाभील, सूत्र कात्यायन, शाखा कोथीमी, सामवेदी, वास्तव्य शहर कसबे अमदाबाद यांनीं हुजूर कसबे पुण्याचे मुक्कामीं येऊन विनंती केली कीं, आपण कुटुंबवत्सल योगक्षेम चालिला पाहिजे यास्तव स्वामींनीं कृपा करून कुटुंबाचे संरक्षणास एक गांव नूतन इनाम करार करून देऊन चालविले पाहिजे म्हणोन; त्याजवरून मनास आणितां तुम्ही थोर सत्पात्र धर्मार्थ बुद्धीनें गरीबगुरीबांस औषधी उपाय करितां तुमचे चालविल्यास स्नानसंध्यादि षट्कर्मे आचरोन राजश्री स्वामीस व स्वामींचे राज्यास अभीष्ट चिंतून सुखरूप राहाल. येणेंकडून श्रेयस्कर हें जाणोन तुम्हांवर कृपाळू होऊन मोजे मिठापूर परगणे दसक्रोई प्रांत गुजराथ तनखा दाम सुमारें १४०००० एकलक्ष च्याळीस हजार येकूण दर पैशास दाम २५ पंचवीस प्रमाणें पैसे ५६०० छपनशें एकूण

708. The village of Mitapur in pargana Daskrohi in Gujarat was granted in Inam to Govindbhat bin Harbhat in consideration of his giving medicines gratis to the poor, The revenue of the village is stated to be Dams 140,000 that is pice 5600 (at 25 Dams per pice), that is Rupees 93-5 (at 60 pice per rupee).

A. D. 1763-64.

दर रुपयास पैसे ६० साठप्रमाणें रुपये ९३।-सवाऱ्याण्णव रुपये एक आणा हा गांव स्वराज्य व मोंगलाई देखील सरदेशमुखी, कुलबाब, कुलकानु, हल्लीं पट्टी, व पेस्तर पट्टी, दरोबस्त खेरीज हक्कदार इनामदार करून नूतन इनाम तुम्हांस व तुमचे पुत्रपौत्रादि वंश-परंपरेनें करार करून देऊन हें इनामपत्र करून दिलें असे, तरी मौजे मजकूर आपले दुमाला करून घेऊन साल दरसाल इनाम अनुभवून सुखरूप राहाणें म्हणोन भटजींचे नांवें सनद १.

येविशीं सनदा व पत्रें.
१ मोकदम मौजे मजकूर.
१ आपाजी गणेश यांस.
२ सनदा.

१ कमावीसदार वर्तमान भावी पत्र.
१ देशमुख देशपांडे यांस पत्र.
२

रसानगीयादी.

७०९ (३२). रामाजी महादेव सुभा प्रांत कल्याण यांच्या दफातेपैकीं. पत्र कीं, मौजे चिलटण तर्फ बोरेटी हा गांव दादजी नाईक गोळे यांजकडे मोकासा आहे, त्यास मौजे मजकुरीं रक्तपितीची वेथा (व्यथा) निर्माण जाहली याजमुळें आठा घरीं व्यथेनें मनुष्यें जेर होऊन आठ कुळें गेलीं. राहिलीं त्यांस गुदस्तपासून आठ दहा कुळांस व्यथा निर्माण जाहली. ती भयाभीत होऊन जाणार. मोकासी याच्यानें राहवत नाहीं. मोकासा दूर करून गांव सोडावा म्हणोन विदित केलें, त्यास महाव्यथेमुळें कुळें परागंदा जाहलीं, सबब मौजे मजकुरावर मोकासी याची दिढी बसली असेल ते दूर करून गांव वसुलाकडे ठेविला आहे. तर आसपास गांव लगते असतील त्यांनीं पायींकस्ता शेतें करून लागवड करावी म्हणोन रामचंद्र विठ्ठल निसबत मोकासी यांसी आज्ञा केली आहे, त्यास महालकरी यांनीं चवकशी करून कमावीशीचे रूईनें उगवणी करून नुकसानी नये तें करावें. घरठाणांचा मक्ता आहे त्यापैकीं पेशजी कुळें गेलीं आहेत, तीं व हल्लीं व्यथित कुळें जातील तीं बाद द्यावीं. बाकी तो मजकुरीं जीं राहतील तीं चवकशीनें मनास आणून त्या गांवाकडे जमा धरणें म्हणोन पत्र १.

इ. स. १७६४।६५.
समस्त सितैन मया व अलफ.
शाबान २५.

Eight villagers being attacked by leprosy, had left the village of Chiltan in tarf Borti. Of those who remained 8 or 10 were afterwards attacked by the same disease, and were about to leave the village. So the Mokasdar surrendered the village to Government.

A. D. 1764-65.

दादासाहेबांच्या रोजकीर्दीपैकीं.

७१० (४५५). बिसाजी केशव यांचे नांवें सनद कीं, सरकारांत औषधाकरितां अविंधमोत्यांचें प्रयोजन आहे, तरी मोत्यें चांगलीं तेजदार पाहून अर्ध रुपयास एक मोतीं पडें ऐशीं एक हजार रुपयांचीं मोत्यें खरेदी करून व हातघड्याळें चांगलीं सुमारें दोन खरेदी करून मोत्यें व घड्याळें आनंदवल्लीस केसो गोविंद यांजकडे सत्वर पाठवून देणें. मशारनिल्हे आनंदवल्लीहून हुजूर रवाना करतील म्हणोन मशालनिल्हेस. सनद १.

इ. स. १७६६।६७.
सबा सितैन मया व अलफ.
मोहरम २४.

रसानगीयादी.

७११ (७४४). वेदमूर्ति राजश्री सदाशिव भट नानल वैद्य यांनीं राजश्री छत्रपति स्वामी यांस औषध देऊन आरोग्य जाहलें (केलें) सबब मौजे नसरापूर तर्फ खेडेबारें येथें नूतन इनाम जमीन चावर १ एक जिराईत लागवड अव्वल, दुम, सिम तीन प्रतीची जमीन दरोबस्त कुलबाब, कुलकानू. हल्लीपट्टी, व पेस्तरपट्टी, खेरीज हक्कदार करून दिली असे, तर सदरहू एक चावर जमीन चतुःसिमापूर्वक नेमून द्यावी आणि जमिनीचा जाबता पाठवावा, त्याप्रमाणें इनामपत्रें भोगवटियास करून दिलीं जातील. म्हणून राजश्री सदाशिव पंडित सचिव यांस सनद १.

इ. स. १७७२।७३.
सलास सबैन मया व अलफ.
रमजाण २१.

रसानगीयादी.

१४. व्यापार व कारखाने.

(अ) पेठा व बाजार वसविणें.

७१२ (६४७). नागोराम उपनाम भागवत, गोत्र कपी, सूत्र आश्वलायन, यांचे नांवें सनद कीं, तुम्ही हुजूर कसबे पुणें येथील मुक्कामीं विदित केलें. आपण स्वामिसेवा एकनिष्ठपणें बहुत दिवस केली त्यास स्वामींनीं कृपाळु होऊन कसबे वामोरी तर्फ राहुरी परगणे संगमनेर सरकार मजकूर येथें सदाशिव पेठ नवी आपण श्रम साहस करून वसाहत केली, तेथील शेटेपणाचें वतन नूतन आपणास करार करून देऊन चालविलें पाहिजे म्हणोन; त्याजवरून मनास आणितां तुम्ही राज्यांतील पुरातन सेवक यास्तव तुमचें चालवणें आवश्यक जाणोन तुम्हावरी कृपाळु होऊन कसबे मजकूर येथें सदाशिव पेठ नवी तुम्ही श्रम साहस करून वसाहत

इ. स. १७६९।७०.
सबैन मया व अलफ.
साबान १६.

---

710. Unpierced pearls being required to be used for medicine for the Peshwa, Visaji Keshav was directed to send such pearls of the value
A. D. 1766-67. of Rupees 1000 at 8 annas a pearl. He was also asked to a send 2 good 'hand-watches.'

711. Sadashiv Bhat Nanal having cured the Raja of Satara, was granted
A. D. 1766-67. a piece of land in inam.

712. Nago Ram Bhagwat having established a Peth called Sadashiv Peth in Kasbe Wamori, taluka Rahuri, was granted the office
A. D. 1769-70. of Shete of the Peth. A list of the perquisites of the watan leviable by the Shete from the various traders and artificers in the suburb is given.

केली तेथील शेटघेपणाचें वतन नूतन सरकारांतून तुम्हांस करार करून देऊन वतनसंबंधें हकदक मानपान बितपशील.—

कित्ता.	कित्ता.
१ भुसार कैली हरजिन्नस दरगोणीस ०।=. दर गाड्यास ०।॥. येणेप्रमाणें दर बैली निठवे व गाड्यास आधोली.	१ तेलियापासून ०।. दर घाण्यास दर आठवड्यास तेल पावशेर तेल्याचे मापी.
१ किराणा वजन पक्के हरजिन्नस. दर बैली वजन ०।॥. दर गाडीस ०।३॥ दर बैली अच्छेर व दर गाड्यास साडेतीनशेर.	०।।२. बिछायती दुकानदार येतील त्यांस व बाजारकरी यांजपासून दर असामीस दर आठवड्यास.
१ डांका (डांक विशेष) घालील त्याजपासून नारळ विडा.	१ चांभाराचे दुकानास जोडा एक दरसाल.
१ तांबोळी यापासून दर बैली पानें सुमारें शंभर व दर रोज दर दुकानास पानें १३ तेराप्रमाणें.	१ साळी कोष्टी दर माणसास दरसाल पासोडी सनंग .॥. निमे.
१ शेव्याचे दुकानास व घरास पट्टी व वेट बिगार व पालपट्टी नाहीं.	१ गुडाखुवाल्यापासून दर दुकानास दोन चिलमांचा तंमाखू दर आठवड्यास.
१ पांती शेव्याची. (?)	१ दुकानदार व पालकरी वाणी यांजपासून दर असामीस दर सणास गूळ पावशेर.
१ माळवे शेव वजन पकें. ०।. दर गाड्यास दहाशेर. ०।१ दर बैली एकसेर. ०।१ मेवा द्राक्षे वगैरे आणतील त्यास दर बैली एकशेर. मोकळी भाजी बचक. निंबे वगैरे दर बैलास पंचवीस. आंबे दर बैली दहा.	१ पेठेंतून भुसार भरून जातील त्यांजपासून दर गोणीस रुके २ दोन.
१ पाट लागेल त्यास शेला व विडा.	१ धनगर दुकानास चवाळे वर्षभऱ्या एक.
१ गोंधळास विडा वाटी व ऊंस फुलें.	१ पेठेंतील घर जागा व मिरासपत्रें केल्यास शेव्याची साक्ष घालून दर शेंकडा ५ पांच (रुपये) शेल्याबद्दल.
१ बाजारचे वाणी यांजपासून दर आठवडा दर असामीस सुपाऱ्या २.	१ दिपवाळीस वाणीउदमी येतील त्यांनीं भेट दर असामीस रुपया एक.
१ झेंडेपटी वर्षाभऱ्या.	१ दंड फुरोई शेव्याचे मार्फतीनें चुकवावी.
१ वैरण विकावयास येईल त्याजपासून पुले.	१ पेठेंत शेव्याचे आधोलीनें व धड्यानें माप व्हावें.
	१ बाहेरील उदमी वाणी येतील त्यांजपासून जीवन पाहून वार्षिक घ्यावें.
	१ सूत व रेशीम व कापड जर मीना दर शेंकडा चवल.
	१ जोगी राऊळाच्या मागास, नवार वगैरे जिन्नस शेटयाचे घरास लागेल तो बिनमजुरी विणून द्यावा.

१५ गाड्यास पंधरा
५ दर कबाडास पांच.
१ ओझ्यास एक.
२१

१ लांकडे विकावयास आणतील त्याजपासून सुमारें.
५ दर गाडीस पांच.
१ दर मोळीस एक.
२ दर कबाडास दोन.
८

१ पाथरवटापासून जाते दर असामीस वर्षाभऱ्या.

१ सरकारचा शिरपाव व विडा.

१ पेठेंत जिनस विकावयास वाणी उदमी बिछाईत वगैरे येतात, त्यांचा निरख चौघे उदमी मिळोन शेट्याचे मार्फतीनें करावा.

१ शेट्याचे घरचें गुरूढोर मरेल त्याचा चरसा शेट्यानें घ्यावा.

१ पेठेंतील मान
१ पोळ्याचे बैल
१ होळीची पोळी.
१ सणाचें वाजिवणें.
३

१८ आठरा कलमें.

पेठेंतील दुकानें दोन तुम्हीं बांधिली आहेत, तीं शेटेपणाकडे दिलीं असत.

१ वार्षिक जिवन पाहून घ्यावें.
१ खिस्ती व सराफ.
१ बोहोरी.
सदरहू आसाम्यापासून

१ सारे खेत्री यांजपासून शेला वर्षभऱ्या एक.

१ सारे मोमिन यांजपासून वर्षभऱ्या पागोटें एक.

१ सारे बजाज मिळून वर्षभऱ्या लुगडें एक.

१ नकाशावर दाखला शेटयाचा असावा, आकार होईल त्यास दर शेंकडा एक रुपया.

१ सलतनगार यांनीं शंभर सागळी विकल्यास एक सागळ द्यावी.

१ गांवकुसूं दर असामीस चार गज डीकरा (?) करून द्यावें. जिमा शेट्याचा.

१ आठरा खूम व बारा बलुती यांनीं जीवन माफक कामगिरी शिरस्तेप्रमाणें करावी.

२२ बेवीस कलमें.

येणेप्रमाणें हकदक मान पान व दुकानें दोन वतनसंबंधें करार करून दिल्ही असेत, तरी शेटेपणाचें वतन तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवून सुखरूप राहणें. वतन संबंधें तुम्हांकडे नजर रुपये १०० शंभर करार केले ते सरकारांत पोता जमा जाहले असेत म्हणोन सनद १.

येविशीं सदरहू अन्वयें सनदा व चिटणीशी पत्रें भोगवटीयास. ३
१ मोकदम कसबे वामोरी परगणें संगमनेर सरकार मजकूर यास सनद.
२ चिटणिसीं पत्रें.

१ देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी परगणे संगमनेर सरकार मजकूर.
१ देशमुख देशपांड्ये परगणे मजकूर.
२
३ ४

दोन सनदा व दोन चिटणिशीं पत्रें.

रसानगीयादी.

१४, व्यापार व कारखाने.

(ब) देशांत येऊन राहणाऱ्या व्यापाऱ्यांस उत्तेजन.

७१३ (४६९). केसो कृष्ण व आबाजी गणेश यांनीं हुजूर येऊन विनंती केली कीं, तारकसी व कलाबतुकारचोबीचे वगैरे कारीगार शहरींहून वगैरे जागांहून कसबे पुणें येथें आणूं त्यांस कौल द्यावा. बितपशील.—

इ० स० १७६६।६७
सबा सितैन मया व अलफ.
रबिलाखर २५

कारीगार ताफे.
१ गुसलीवाले पावटेकरी सोनार.
१ वोढणार गुसलीचे.
१ चपडे.
१ वळणार कलाबतूचे.
१ रेशीमवाले आसारे.
१ मोमीण विणणेवाले जरीचे.
१ किनारी गोट करणार.
२ किनखाप व मसरूथानें विणणार.
१ तारकस कलाबतूसंबंधी उदमी वगैरे.
१०

एकूण दहा ताफे आणु त्यांस पांच सालें पेठकरी यांनीं पट्टीचा वगैरे उपसर्ग लाऊनये पांचसालां कौल द्यावा. तो भरल्या. वरं पट्टी जीवन माफक घ्यावी येणेंप्रमाणें.

कलम १.

सोनें रुपें व पंचमेळ रुपये चांगलें तारकसी कामाबदल कारीगारांनीं गाळावें. त्याची चौकशी आपण करूं. चौकशींत अंतर होणार नाहीं. अंतर पडल्यास हुजूरून चौकशी करावी. येणेंप्रमाणें कलम १.

कारीगार पुणीयांत आणिल्यावरी जागा सोय पाहून नेमून द्यावी येणेप्रमाणें कलम १.

कारीगारांमध्यें चारपांच असामी ओढगस्त असतील त्यांस चार वर्षें सावकारांचा तगादा न लागे, चार साले झाल्यानंतर तजविजीनें उगवते घ्यावें. येणेंप्रमाणें कलम १.

713, Keso Krishna and Abaji Ganesh represented that if a Kowl was granted exempting artizans in silk and embroidery from taxa-
A. D. 1766-67. tion for 5 years, they would induce such persons to settle in Poona. The request was complied with and exemption for 5 years was granted. It was further directed that a site should be selected for the carrying on of these manufactures and that the work should be supervised by Keso Krishna and Abaji Ganesh.

येणेंप्रमाणें चार कलमें सरकारांतून करार करून दिल्हीया सदरहू कारीगार आणून तारकसी कलाबतूचा कारखाना चालीलावू म्हणून. त्याजवरून तारकसी कलाबतूचा कारखाना घातल्यास सरकारउपयोगीं हें जाणून कारीगारांचे नांवें आलाहिदा पांचा सालांचा कौल सादर केला आहे. त्याप्रमाणें कारीगार घेऊन येणें. कारीगार पुण्यांत आल्यावर जागा नेमून दिली जाईल. व कारीगारांमध्यें चार पांच असामी कर्जदार असल्यास त्यांचें सावकारांस ताकीद सरकारांतून होऊन कारीगारांस तगादा होणार नाहीं. व सोन्यारुप्याचें चौकशीचे काम काज तुमचे हातें घेतलें जाईल. एकूण सदरहूप्रमाणें करार करून देऊन हे सनद दिली असे. तरी कारीगार कसबे मजकुरी आणून तारकसीचा कारखाना चालता करणें म्हणोन मशारनिल्हेचे नांवें ——————————————— सनद. १

कारीगार तारकसी कलाबतु व कारचोबी वगैरे यांसकीं, तुम्ही कसबे पुणें येथें येऊन तारकसी कलाबतूचा कारखाना लाऊन उदीम व्यवसाय करणें. पांचसाला सरकारांतून माफीचा कौल दिला असे, पेठकरी यांचा पट्टीचा वगैरे उपसर्ग लागणार नाहीं. कौल भरल्यावर पट्टी जिवनमाफक घेतली जाईल. तरी तुम्ही सदरहूकारीगार बेवसवसा कसबे मजकुरी येऊन कारखाना लावणें म्हणून कौल. १

२

रसानगीयादी.

१४. व्यापार व कारखाने.

(क) सरकारी दुकानें.

दादासाहेबांच्या रोजकीर्दीपैकीं.

७१४ (३०२). मुरार नाईक गोडसे पोतदार जुन्नर यांजपासून सरकारांत कतबा लेहून घेतला कीं, सरकारांतून दुकान घालण्यास तुम्हांस आज्ञा केली आहे, आणि कबूलकतबा लेहून देणें म्हणून; त्याजवरून तुम्ही कबूलकतबा लिहून दिला कीं, इमानेइतबारें सरकारच्या

इ० स० १७६४।१७६५. खमस सितैन मया व अलफ रजब २०.

---

714. Murar Naik Godse, potdar of Junnar, having agreed to open a shop for Government and to conduct it honestly, the following terms were entered into with him:—

A. D. 1764-65.

(1) Murar should duly submit to Government, detailed accounts of the shop and shoud pay to Government the whole of the profit realized, leaving it to Government to give him what portion they liked at the end of the year;

(2) any loss incurred in connection with the shop should be borne by Murar;

(3) interest should be paid by Murar at one rupee per-cent per month on the amount advanced to him by Government;

(4) Rupees 10,000 were paid to Murar to open a shop on these terms.

कामांत तफावत तजावत न करितां चाकरी एकनिष्ठपणें करून सरकारची दुकानदारी चालवीन, त्याचा करार येणेप्रमाणें बितपशील.

दुकान संबंधें नफा होईल तो सरकारांत कच्चा हिशेब आणून समजावीन, त्यापैकीं स्वारीखर्च मजुरा घेऊन बाकी सरकारांत देईन, अखेर सालीं स्वामीच्या दृष्टीस चाकरी पडल्यास स्वामी कृपा करून देतील तेंच घेईन. कलम.

उदीमसंबंधें तोटा आला तरी सरकारांत मागणार नाहीं. माझा मीच कबूल करीन. कलम.

सरकारचा ऐवज ज्या मित्तीस माझे पदरीं पडेल त्या मित्तीपासून सरकारांत ऐवज पावता करीन त्या मित्तीपर्यंत व्याज दरमाहे दरसदे रुपया १ एकोत्रा व्याजमुद्दल सरकारांत निवळ देत जाईन, उदीमास खोट पडूं देणार नाहीं. कलम १.

येणेप्रमाणें तीन कलमें कबूल करून कतबा लिहून दिला असे. सदरहूप्रमाणें वर्तणूक करून सरकार चाकरी बजावून दाखवीन. येणेप्रमाणें कबूलकतबा सरकारांत घेऊन दहा हजार रुपये उदीम करावयास नाईक मजकूर यांस दिले असेत.

कार्तिक वद्य १० शके १६८६ तारणनामसंवत्सरे. छ. २३ जमादिलावलचे मित्तीचा कबूलकतबा घेतला असे.

---

१४. व्यापार व कारखाने.

(ड) किरकोळ.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

७१५ (३२४). गोपाळराव बापूजी यांचे नांवें सनद कीं, परगणे सिहोर दुरहा येथील कापडाचें प्रयोजन सरकारांत आहे, तरी फर्मासी कापड सूत बारीक न्यहार पोशाकी सनगें येणेप्रमाणें खरेदी करून हुजूर पाठवून देणें. सनगें सुमारें.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. जिलकाद १.

२० तिवटे लांब पन्नास साठ हातपर्यंत किंमत दर १० दर १५.
२५ शेले पोशाकी किंमत दर १२ दर १५.
१० दुपेटे साधे किंमत दर १२ दर १५.
२० धोतरजोडे आवणि दर १२ दर १०.
२५ झग्यास महमुद्या बारीक किंमत दर २० दर २५ प्रमाणें.

१००

---

715. Fine cloth was ordered from Sihor Duraha. Dhotis at from Rupees 10 A. D. 1764-68. to I5 per pair were ordered from Maheshwar.

येणेप्रमाणें शंभर सनगें पोशाकी सदरहू किमतीप्रमाणें पत्र पावतांच खरेदी करून पाठवून देणें म्हणून सनद.

रसानगीयाद. छ. ८ जिल्काद.

व्यंकटरामशास्त्री यांचे नांवें पत्र कीं, सरकारांत धोतरजोड्यांचें प्रयोजन आहे. तरी महेश्वरी धोतरजोडे सुमारें पंचवीस लांब रुंद किंमत दहा रुपयांपासून पंधरा रुपयेपर्यंत, सूत चांगलें असें खरेदी करून हुजूर पाठऊन देणें म्हणून बाळबोध पत्र लिहून पाठविलें असे.

छ. ९ जिल्काद.

७१६ (६७१). खासे धोतरजोडे करावयाबदल श्रीनिवास नरसी कारकून शिलेदार यास पैठणास पाठविले आहेत, त्यास त्याज बरोबर धोतरजोड्यांचा मासला पाठविला आहे, या तऱ्हेचे लांब रुंद रेशीम चांगलें घालून करील, तर चांगले कोष्टी असतील त्याजकडून विणवून तूर्त दोन चार धोतरजोडे तयार करून पाठवून देणें. व मागाहून दहाबारा धोतरजोडे लिहिल्याप्रमाणें मासल्याबरहुकूम मशारनिल्हेच्या गुजारतीनें तयार करून पाठवून देणें. सदरहू धोतरजोडयांची किंमत दोईल ते परगणे मजकूरचे ऐवजीं तुह्मांस मजुरा दिली जाईल. मशारनिल्हेचा रोजमरा दुमाही छ. १ साबानचा हुजूर पावला असे, पुढें दोन महिन्यांनीं रुपये २० रोजमरा देविला असे, तरी पावता करून कबज घेणें. ह्मणोन मल्हारराव रामकृष्ण कमावीसदार परगणे पैठण यांचे नांवें सनद.

इ० स० १७७०–७१ इह्दि. सबैम मया व अलफ. रजब. २४.

७१७ (३३२). महादाजी त्रिंबक रुईकर यांजकडे सरकारचा नजरेचा ऐवज रुपये १००००० एक लक्ष करार केले त्याच्या मुदती. रुपये

२५००० कार्तिक वद्य १०
२५००० मार्गशीर्ष शुद्ध १०
२५००० मार्गशीर्ष वद्य १०
२५००० पौष शुद्ध १०

१०००००

इ० स० १७६४–६५. खमस सितैन मया व अलफ. जिल्हेज १३.

एकूण एक लक्ष रुपये सदरहू मित्यांनी भरणा सरकारांत करून द्यावयाचा करार. त्यास हल्लीं मशारनिल्हे तुह्मांकडे पाठविले आहेत, यांसीं आपणाजवळ ठेवून ऐवजाची निशा येणेप्रमाणें. हें तुह्माजवळ पावल्यावर ———— रुपये

७०००० एका महिन्याअलीकडे.
३०००० दोन महिन्यांनीं.

---

716. Orders were sent to Paithan for the manufactures of silken cloth for the personal use of the Peshwa according to a sample sent.

A. D. 1770-71.

717. The value of gold and Mohors is given as follows:—

A. D. 1764-55.

येणेप्रमाणें मुदती बरहुकुम एक लक्ष रुपयांचा रोख भरणा अगर सावकारीनिशा यांजवळून करून घेऊन मशारनिल्हेचे घरीं चौकी बसली आहे ती उठवणें. याखेरीज कलमें–

सदरहू ऐवजाचे भरणेयांत सोनें देतील त्याचा निरख तोळा रुपये–

१६। उत्तम सवासोळा.

१५॥ मध्यम साडे पंधरा.

येणेप्रमाणें व रूपें देतीस ते चांगले असेल तें दर रुपयास अर्धा मासा वरताळा. वाईट असेल तें बाजार निरखेप्रमाणें. नक्त ऐवज अर्काटगंजीकोट पंधरा, येणेंप्रमाणें भरणा करून घेणें. कलम १.

मशारनिल्हेचें कर्ज कुळाकडे आहे त्यास कुळें दारनादार पाहून तुम्ही त्यांस ताकीद बरेवजेनें करून वसूल करून देणें. कलम १.

मशरनिल्हे यांचे नांवें सरकारची फारखत आलाहिदा पाठविली आहे. ऐवजाची निशा जाहल्यावर फारखती यांस देणें. कलम १.

मशारनिल्हे मोहोरा देतील त्याचा निरख–

१५॥ दिल्लीशिका जुन्या व सुरती, साडेपंधरा.

१९। हिंदुस्थान पंचमेळ सवापंधरा.

१४॥ औरंगाबादी साडेचवदा.

१७ पुतळी दर तोळा सतरा.

६२।

सवाबासष्ट रुपये. येणेप्रमाणें घेणें. कलम १.

येणेप्रमाणें चार कलमें सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें म्हणोन, नारो बाबाजी यांचे नांवें सनद.

रसानगीयादी.

---

१५ टांकसाळ व नाणीं.

७१८ (३७२). पांडुरंग मुरार यांचे नांवें सनद कीं, तुम्हीं हुजूर येऊन विदित

			Rs.
Gold	—of the best sort	– per tola	16—4
Do	—Middling	— Do	15—8
Silver	—of the best sort	½ masa in excess per rupee	
Mohor	—of old Delhi currency		15—8
Do	—of Surat		15—8
Do	—of Hindustani Panchmel currency		15—4
Do	—of Aurangabad		14—8
Putali	—	per tola	17—0

718. Pandurang Murar represented that the orders issued by the late Peshwa

इ० स० १७६५।६६ सित सितैन मया व अलफ रविलोवल १३

केलें कीं, सुभे धारवाड येथें पुरातन होन वगैरे नाणें खरें होत होतें, अलीकडे जमीदारांनीं वगैरे घरोघर टांकसाळा घालून खोटें नाणें करीत आहेत. येणेंकरून बटातोटा फार पडतो. याचा बंदोबस्त केल्यानें खरें नाणें होऊन सरकार किफायत होईल. याप्रमाणें सन इहिदे सितैनांत कैलासवासी श्रीमंत नानासाहेब यांजवळ विनंति केली, त्यावरून त्यांनीं सर्व वर्तमान मनास आणून खरें नाणें करावें, या प्रमाणें करार करून कमाविसदारांस व जमीदारांस वगैरे पत्रें दिलीं, त्यासंबंधीं दोन वर्षें दंगा जाहला व मामलेदारांनीं ऐकिलें नाहीं. ऐशियास स्वामींनीं कृपाळु होऊन पूर्वी बंदोबस्त करून दिला आहे तो मनास आणून यथास्थित टांकसाळांचा बंदोबस्त करून दिला पाहिजे. म्हणोन, त्यावरून मनास आणितां पूर्वी कैलासवासी तीर्थरूप नानासाहेब यांनीं करार करून दिला होता, त्याप्रमाणें चालले नाहीं, जमीनदार वगैरे खोटें नाणें करीतच आहेत, या गोष्टीनें नुकसानी फार होत्ये. याजकरिता सालमजकुरांपासून अहद कृष्णा तहद तुंगभद्रापर्यंत खोट्या टांकसाळा आहेत त्या मोडून एक जागा धारवाडी टांकसाळ घालावी. याप्रमाणें करार करून तुम्हांस टांकसाळीचे कामकाज सांगितलें असे. खरे नाणें करावयाची कलमें.

होन एकेरी पहिला शिक्का आहे, त्याप्रमाणें दहा कसी साडेतीन मासी वजन पुरें करावें. कलम १.

नक्त रुपये आरकाटी फुलचरी माल खरा तोल पुरा करावा. कलम १.

मोहर बाराकसी वजन दिल्लीशिक्याप्रमाणें माल खरा करावा येणेप्रमाणें. कलम १.

एकूण तीन शिक्के करार केले असेत, याप्रमाणें शिक्के करून खरें नाणें करीत जाणें. याखेरीज. कलमें.

टांकसाळेचा शिरस्ता पेशजी हासील एक हजार रुपयांस सहा रुपये, व एकहजार होनास सहा होन, व एक हजार मोहरांस होन व मोहरा व रुपये यांचे शिक्के नवे करावे. ते तुम्ही आपल्याजवळ ठेवीत जाणें. कलम १.

A. D. 1765-66. to abolish private mints, from which much debased coin used to be issued, had remained a dead letter. He was directed to abolish all mints in the territory lying between the Krishna and Tungbhadra and to establish a mint at Dharwar. The following subsidiary instructions were issued:—

(1) the Hon to be 10 Kas and 3½ Masas in weight;
(2) the rupee Arkati to be one full tola in weight;
(3) the Mohor to be 12 Kas in weight;

सहा मोहरा घेत होते, त्यास हल्लीं खोटें नाणें मोडून खरें नाणें करावें, येणेकरून सावकारांस तोटा येईल यांजकरितां एक साल हांशील माफ केला असे. इस्तकबीलपासून छ. १ रबिलाखर साल मजकूर तागाईत छ. १ रबिलाखर पेस्तर साल सन सबा सितैन पावेतों माफ केला असे. यापुढें पेशजीप्रमाणें दर हजारीं नाणें सहा प्रमाणें घेत जाणें. याखेरीज तुम्ही आपले नांवें सावकारांच्या रजावंदीनें दर हजारीं एक नाणें घेऊन सरकारहिशेबीं जमा करीत जाणें. पेस्तर तुमची चाकरी पाहून आज्ञा करणें ते केली जाईल. येणेप्रमाणें करार कलम १.

टांकसाळेवरील कारेगर, चाकरीचे लोक व हक्कदार यांचा शिरस्ता सुदामत पेशजीपासून चालत आला असेल तो देऊन चाकरी घेत जाणें. कलम १.

ढलाईत असामी ५ टांकसाळेस कामाबद्दल सरकारांतून नेमून दिले आहेत. त्यांचा रोजमरा व्यंकटाराव नारायण यांजकडून देविला असे. ते देतील. टंकसाळेची अमदानी जाली. यावरी हांशील जमा होईल, त्यापैकीं पांच असामींचा रोजमरा देत जाणे. मजुरा पडेल. कलम १.

येणेप्रमाणें चार कलमें करार करून दिलीं असेत, तरी इमानें इतबारें वर्तोन करार करून दिल्हा आहे, याप्रमाणें जागाजागांच्या खोटया टांकसाळा मोडून एके जागा धारवाडास खरी टांकसाळ घालोन वर लिहिल्याप्रमाणें खरें नाणें करीत जाणें, आणि हांशिलाचा ऐवज जमा होईल तो सरकारांत जमा करून पावलियाचा जबाब घेत जाणें, येणेप्रमाणें मजुरा पडेल. म्हणोन सनद १.

रसानगीयाद.

७१९ (१८०). अहद कृष्णा तहद तुंगभद्रा येथें पुरातन नाणें चांगलें होत होतें.

इ० स० १७६५।६६. सित सितेन मया व अलफ. रविलाखर ४.

दरम्यान जमीदार वगैरे जागाजागा टांकसाळा घालून खोटें नाणें करूं लागले यास्तव पेशजी सन इहिदे सितेनांत कैलासवासी तीर्थरूप नानासाहेब यांनीं सदरहू जागच्या टंकसाळा मोडून एकेजागा सुभे धारवाड येथें टांकसाळ घालून मोहर दिल्लीशिक्याबरहुकूम, होन एकेरी, रुपया फुलचेरी अर्कट प्रतीचा, येणेप्रमाणें खरें नाणें करावयाचा करार करून राजश्री पांडुरंग मुरार यांस सरकारांतून आज्ञा केली असतां त्याप्रमाणें तुही ताकीद करून खरें नाणें वसूल ध्यावा तो घेतला नाहीं. हे गोष्ट उत्तम नाहीं. खोटया नाण्यामुळें सरकारांत बट्टातोटा येत

---

(4) six coins should be paid to Government for every 1000 coins issued : but as owing to the large amount of debased coin now in circulation, persons changing old coins into new would be put to much loss, the above duty, should not be levied for one year;

(5) one Mohor coin per 1000 issued in addition to the above should be taken by Pandurang Murar himself.

719. The attention of the kamavisdars and jamidars of the various Parganas was

आहे. याजकरितां हल्लीं जागांजागांच्या टंकसाळा बंद करून सदरहू प्रतीचें खरें नाणें एके-जागा सुमे मजकुरीं करवावयाचीं आज्ञा मशारनिल्हेस केली आहे, तरी सदरहूप्रमाणें तुह्मीं आपले तालुक्याचे अमलदार यांस ताकीद निक्षून करून जमीदार व रयत यांजपासून नाणें वसूल करून घेतील तो पोत्याच्या दाखल्यानें जमा वसूल करवीत जाणें. दिगर नाणें घेतील तरी कार्यास येणार नाहीं. बट्टातोटा ही मजुरा पडणार नाहीं. सरकारांत रसद आणून घाल तें सदरहू प्रतीचें नाणें ऐवज देत जाणें. टांकसाळेची चौकशी सरकारचे आज्ञेप्रमाणें मशारनि-ल्हेकरून जमाखर्च सरकारांत समजावितील. तुह्मी हरएकविशीं साहित्य करून टंकसाळेची अमदानी होय तें करणें. दरम्यान कोणीही हरकत करतील त्यांचें पारिपत्य करणें. आपले तालुक्याचे अमलदार व जमीदार व पेठापेठांचे सावकार लोक यांस ताकीद करून सदरहू खरें नाण्याची चाल करणें. सावकार टांकसाळेस माल व जिनसा ज्या घेऊन येतील त्यांस हरएक बाबें उपद्रव न लागे ते करणें. ह्मणोन चिटाणिशी पत्रें.

११ कमावीसदारांस.

१ नारायणराव व्यंकटेश.
१ विसाजी नारायण.
१ आनंदराव भिकाजी.
१ बिसाजी कृष्ण.
१ शेषो नारायण.
१ भास्करराव दादाजी.
१ गिरीधरराव संस्थान सावनूर.
१ मालोजी घोरपडे.
१ समस्त कमावीसदार व ठाणेदार यांस.
१ गोपाळराव गोविंद.
१ येसाजी राम.

११

२१ जमीदारांस.

१ परगणे गदक.
१ परगणे कित्तूर.
१ परगणे हुबळी.
१ परगणे खानापूर.

---

invited to the above order regarding the abolition of all private mints and the establishment of one under Government management at Dharwar, and they were directed

A. D. 1765-66.

१ परगणे जमखिंडी.
१ परगणे यादवाड.
१ परगणे गोकाक.
१ परगणे नरगुंद.
१ परगणे मुदकवि.
१ परगणे मनोली.
१ सरकार तोरगळ.
१ परगणे मुरगोड.
१ परगणे चिकोडी.
१ परगणे रामदुर्ग.
१ परगणे मुधोळ.
१ परगणे बागलकोट.
१ परगणे वटकुरकी (वटंबरी ?).
१ परगणे शहापूर.
१ परगणे धारवाड.
१ परगणे नवलगुंद.
१ परगणे अथणी.

२१

१९ साहुकारांस.

१ पेठ धारवाड.
१ पेठ हुबळी.
१ पेठ बेटगिरी.
१ पेठ नवलगुंद.
१ पेठ नरगुंद.
१ पेठ गदक.
१ पेठ लक्ष्मीश्वर.
१ पेठ गोकाक.
१ पेठ कित्तूर.
१ पेठ यादवाड.

---

to receive in Government dues only such coin as might be issued from the new Government mint.

१ पेठ बागलकोट.
१ पेठ मनोळी.
१ पेठ खानापूर.
१ पेठ शहापूर.
१ पेठ सावनूर.
१ पेठ हावेरी.
१ बंदर गोमंतक.
१ पेठ कोपळ.
१ पेठ अथणी.

१९

२१ घटकार, आणकर व कारीगार यांस कीं खरें नाणें धारवाडास एके जागा करविलें आहे, या उपरी टंकसाळा बंद करणें. खोटें नाणें केल्यास पारिपत्य केलें जाईल. म्हणोन पत्रें.

१ टंकसाळ मनोळी.
१ टंकसाळ लक्ष्मीश्वर.
१ टंकसाळ तोरगळ.
१ टंकसाळ अथणी.
१ टंकसाळ शहापूर.
१ टंकसाळ गोकाक.
१ टंकसाळ कित्तुर.
१ टंकसाळ यादवाड.
१ टंकसाळ मुरगोडे.
१ टंकसाळ नवलगुंद.
१ टंकसाळ मुधोळ.
१ टंकसाळ बागलकोट.
१ टंकसाळ जमखिंडी.
१ टंकसाळ बठकूरकी.
१ टंकसाळ मुदकवी.
१ टंकसाळ रामदुर्ग.
१ टंकसाळ नरगुंद.
१ टंकसाळ सावनूर.
१ टंकसाळ बंकापूर.

१ टंकसाळ धारवाड.

१ टंकसाळ चिकोडी.

२१

१ नरसापा नाईक कलकेरी यांस.

१ कारीगारांस पत्रें कीं तुम्हीं धारवाड टंकसाळेंत सरकार चाकरी इमानें इतबारें करीत जाणें. जो शिरस्ता पेशजीपासून कारागिरांचा चालत आला आहे, त्याप्रमाणें द्यावयाची आज्ञा पांडुरंग मुरार यांस केली आहे.

१ समस्त घटकार, आणकार व कारीगार पेठ धारवाड.

१ आबाजी कारीगार वस्ती मनोळी यास.

१

४ टांकसाळेस कोळसे वगैरे सामानाबद्दल रानांतून लांकडें वगैरे साहित्य आणतील त्यांस आणू देणें. म्हणोन पत्रें.

१ येसाजी राम यांस.

१ व्यंकटराव नारायण यांस.

१ देशमुख देशपांडये परगणे धारवाड.

१ त्रिंबकजी मोहिते हवालदार किल्ले धारवाड.

४

१ कित्ता त्रिंबकजी मोहिते हवालदार किल्ले धारवाड यांस कीं, तुम्हीं शिर्बंदी वगैरे खर्चवेंच कराल तो पोत्याचे दाखल्यानें पोतनिसांचे विद्यमानें करीत जाणें.

८०

एकूण ऐंशी पत्रें.

दादासाहेबांच्या रोजकीर्दीपैकीं.

७२०(४०७). लक्ष्मण आपाजी यांचे नांवें सनद कीं, कसबे नाशिक येथें टांकसाळ घालावयाची नेमणूक करून टांकसाळेचा कारभार तुम्हांस सांगितला आहे. त्याची कलमें येणेप्रमाणें बितपशील.

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. जमादिलावल २९.

---

720. Laxman Appaji was entrusted with the work of opening a mint at Nasik. He was allowed an establishment of a karkun on Rs, 20. 2 peons on Rs. 6 each and 10 workmen:—

A. D. 1766-67. 1 blacksmith, 5 goldsmiths, 2 hammerers, engraver &c.

The rupee was to be $11\frac{1}{4}$ Masas in weight or half a Masa less than the quantity

शिबंदी दरमहा.

२० कारकून असामी. १

१२ प्यादे२ दर ६ प्रमाणें.

३१ ३

एकूण तीन असामीस तैनात दरमहा बत्तीस रुपये करार केले असेत. कारखान्यांचें काम सुरू लागल्यावर सदरहु लोक ठेवणें. रोजमरा दीडमाही नेमणुकप्रमाणें देत जाणें. हजीरी गैरहाजीरीप्रमाणें चाकरी घेऊन रोजमरा देणें. कलम १.

कसबे नाशिक, शिक्का गुलशनाबाद रुपयावर घालावा. त्यास खरेदी रुपें दर रुपयास मासे ११॥। पैकीं रुपया तयार दर रुपयास मासे ११। बाकी कसर मासा ८॥ अर्धा राहिला त्याचा आकार रुप्याची कसर रुपये ४५.

यांस तपशील.

१२॥ नुकसान हजारीं.

१० सरकारचा महसूल.

७॥ ऐन महसूल.

२॥ हकदार

१०

५ कारीगर टिकली करावयास दर हजारीं मेहनत.

१ शिक्के करणावळ दरहजारीं मेहनत.

१ लोहार शिक्के करावयास वगैरे सामान लोहार यास.

रुपें मोडून आधेल्या केल्यास तोटा येईल त्यास तुम्ही इमानें इतबारें चौकशीनें वर्तणूक केल्यास तोटा येईल तो वाजबी मजुरा दिला जाईल. कलम १.

सरकारांत अधेल्यांचें प्रयोजन आहे. त्यास केसो गोविंद यांजकडून रुपये पंचवीस हजार देविले आहेत. त्यास मशारनिल्हे रुपें व रुपये देतील ते तुम्हीं घेऊन सदरहू पंचवीस हजार रुपयांच्या अधेल्या पन्नास हजार तयार करून देणें. कलम १.

कारीगर, लोहार व सोनार वगैरे लोक असामी सुमारें.

१ लोहार.

५ सोनार.

२ घणकरी.

१ शिक्के करणार.

१ भातेकरी.

१०

एकूण दहा असामीस तैनात चौकशी करून करार करावी. पुढें तैनातेचा आकार करून आणावा त्याजवर करार करून दिला जाईल. कलम १.

लोखंड व पोलाद व कोळसे व टाकणखार व पापडखार व नवसागर व चिंच वगैरे लागवड असेल तो चौकशीनें देत जावा. येणेंप्रमाणें करार. कलम १.

---

of silver that could purchased for a rupee. The profit on every 1000 rupees coined was thus Rs. 45 and this was deemed a sufficient set off against wastage in coining, wages of labourers and cost of materials.

५ लोखंड व पोलाद व कोळसे व टाकणखार व पापडखार व नवसागर व चिंच येणेप्रमाणें वगैरे लागवड.
१ घणकरी मेहनत दरहजारीं.
८॥ टांकसाळी कारीगर व भाते वगैरे मिळोन.
१ धर्मादाय दरहजारीं.
४९

टांकसाळ सरकारांतून घातली आहे, त्यास नुकसान जें होईल त्याची चौकशी होऊन करार होईल त्याप्रमाणें मजुरा दिलें जाईल. कलम १.

ऐकूण पंचेचाळीस रुपये दरहजारास करार केले असेत, त्यास सदरहू लोकसुद्धां पंचेचाळीस रुपये आकार जाहला आहे. त्यास लोकांची तैनांत आलाहिदा करार जाहल्यास सदरहू ऐवज सरकारांत कसरेचा जमा करावा. येणेप्रमाणें कलम १.

येणेप्रमाणें सात कलमें करार करून दिल्हीं असेत. इमानें इतबारें चौकशीनें टांकसाळेचा कारभार करून हिशेब सरकारांत आणून समजावीत जाणें. म्हणोन सनद १.

रसानगीयाद. छ. २९ जमादिलावल.

दादासाहेब यांच्या रोजकीर्दीपैकीं.

७२१ (४०८). रामचंद्र नरसिंह तुळपुळे यांचे नांवें सनद कीं, किल्ले त्रिंबकपैकीं हुजूर खर्चास ऐवज एक लाख रुपये आणावयाविषयीं पेशजी पत्र सादर केलें होतें, त्यावरून तुह्मीं किल्ले मजकूरचे दास्तानापैकीं ऐवज पाठविला तो जमा पोता येणेप्रमाणें, बितपशीलः—

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. जमादिलावल २९.

२०८०० जोतपुरी.
५००० चांदवड.
१००० आधेल्या चांदवडी.
५८५०० अरकट गंजीकोट.
१४००० मिठे
५०० कित्ता जोतपुरी.
१९९ खंदार
१ तांब्याचा.
४ कित्ता आधेल्या.

१००००

721. The various kinds of rupees in use at this time are noted in this sanad. A. D. 1766-67.

एकूण एक लाख रुपये सदरहूप्रमाणें सरकारांत पोता जमा जाहले असेत. म्हणोन जाब लिहून दिल्हा असे.

७२२ (४९९). तुकु सोनार व मोराजी सोनार टांकसाळवाले वस्ती मौजे चिंचवड देवाचे तर्फ हवेली प्रांत पुणें यांचे नांवें कौल लिहून दिल्हा कीं, मौजे मजकूर येथें टांकसाळ चालत आहे, त्यास अलीकडे चौकशीकरितां माल खरा रुपया व मोहर उतरत नाहीं, सबब तुम्हांस चौकशीकरितां हुजूर पुण्याचे मुकामीं आणलियावर तुह्मीं अर्ज केला कीं साहेब आज्ञा करतील त्याप्रमाणें मोहरा व रुपये करूं म्हणोन, त्यावरून बराय अर्ज खातरेस आणोन महामुरीवर नजर देऊन हल्लीं टंकसाळ पाडावयाचा करार केला. कलमः—

इ० स० १७६६।६७. सबा सितैन मया व अलफ. रमजान १३.

तळेगांवदाभाडयांचे येथें सुरती शिक्का पडतो त्याप्रमाणें मौजे मजकुरीं पडत होता तो पाडूं नये. हल्लीं दुसरा शिक्का जैनगरी शिक्कयाचा जुन्या फुलचरीप्रमाणें वजन पुरा व रूपें माल खरा त्याजप्रमाणें असावें. सन सालाचे सालांत फिरवीत जावा. येणेप्रमाणें.

कलम १.

मोहरा हरसंजी जुन्या औरंगाबादीप्रमाणें जैनगरी शिक्क्याच्या, वजन पुऱ्या सोनें कसास हरसंजीप्रमाणें असावें उणे असों नये. सन मोहरेवर सालाचे सालांत फिरवीत जावा. येणेप्रमाणें

कलम १.

एकूण दोन कलमें करार केलीं असेत. तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें मोहरा व रुपये पाडीत जाणें. सदरहू करार करून दिल्हा आहे, यांत मोहरेंत व रुपयांत अंतर पडल्यास पारपत्य करून गुन्हेगारी सरकारांत घेतली जाईल म्हणोन सोनार मजकूर यांचे नांवें कौल लिहून दिल्हा.

कौल १.

रसानगीयादी.

---

722. Inquiry having shown that good coin was not being turned out from the mint of Tuku Sonar and Moraji Sonar of Chinchawad Dewache in tarf Haweli they were called to the Huzur and the following instructions were issued to them:—

A. D. 1766-67.

(1) rnpees of the Surat stamp should not be coined : the rupees should be of the Jainagari stamp, like the old Fulchari, of full weight and good silver : the year on the stamp should be altered every year;

(2) the Mohors should also be of the Jainagiri stamp, like the old Aurangabad Mohor, and of full weight and fine gold: the year on the stamp should be altered every year,

(3) any departure from these instructions would be punished.

७२३ (५००). सदाशिव शेट सोनार टंकसाळवाला वस्ती मौजे तळेगांवदाभाड्याचें तर्फ चाकण प्रांत जुन्नर याचे नांवें कौल लिहून दिल्हा, कीं मौजे मजकूर येथें टंकसाळ पेशजीपासून चालत आली आहे, त्यास अलीकडे चौकशी करितां मोहरा व रुपये खरे उतरत नाहींत, सबब तुजला हुजूर पुण्याचे मुक्कामीं आणलेयावर अर्ज केलास कीं साहेब आज्ञा करतील त्याप्रमाणें मोहरा व रुपये करीन म्हणोन; त्याजवरून बराय अर्ज खातरेस आणून महामुरीवर नजर देऊन हल्लीं टांकसाळ पाडावयाचा करार केला.

इ. स. १७६६।६७.
सबा सितैन मया व अलफ.
रमजान १४.

जुने रुपये फुलचरीप्रमाणें वजन पुरे व रुपें त्या कसाप्रमाणें असावें. शिक्का सुर्तीची नक्कल पेशजीप्रमाणें पाडावा. सन रुपयावर सालाचे सालांत फिरवीत जाणें. येणेप्रमाणें कलम १.

मोहरा हरसंजी जुन्या औरंगाबादीप्रमाणें पाडाव्या, वजन पुरे, व माल खरा सोनें कसास हरसंजीप्रमाणें असावें. वजनास व कसास उण्या करूं नये. सन मोहरेवर सालाचे सालांत फिरवीत जावा. येणेप्रमाणें कलम १.

एकून दोन कलमें करार केलीं असेत. तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें मोहरा व रुपये पाडीत जावे. सदरहू करार करून दिल्हा आहे यांत मोहरेंत व रुपयांत अंतर पडल्यास पारिपत्य करून गुन्हेगारी सरकारांत घेतली जाईल. शेट मजकूर याचे नांवें कौल लिहून दिला असे. कौल. रसानगीयादी.

७२४ (५३९). जागाजागीचे टंकसाळीयांचीं घरें पत्रदर्शनीं सरकारांत जप्त करून कागदपत्र जें असतील तें माफजतीनें सत्वर हुजूर पाठवणें, वरकड वस्तभाव झाडून तेथेंच बंदोबस्तानें ठेवणें, आणि तिचा मोजदाद जाबता हुजूर पाठवून देणें. टंकसाळीयांचीं मुलें माणसें असतील त्यांचा हजीरजामीन घेणें. म्हणोन सनदा.

इ. स. १७६७।६८.
समान सितैन मया व अलफ.
रजब ६.

१ विनायक केशव कमावीसदार कसबे पेडगांव यांस कीं टंकसाळी असामी.
१ शिवरामशेट वस्ती कसबे मजकूर.
१ कोंडाजी सोनार वस्ती रासीन.

---

723. A similar sanad to Sadashiv shet sonar, owner of a mint at Talegaum Dabhadyache.
A. D. 1766-67.

724. The houses of the mint-owners at Pedgaum, Rasin, Talegaum Indori and Talegaum Dhamdhere were ordered to be attached and the papers found therein to be sent to Poona. Recognizances were ordered to be taken from the mint owners and from their relations.
A. D. 1767-68.

२ मोराजी सिद्धटेककर वस्ती कसबे मजकूर व त्रिंबक सदाशिव निजामपूरकर वस्ती कसबे मजकूर.

४

चार असामींच्या घरांविषयीं

१ बाबाजी प्रल्हाद यांचे नांवें सनद कीं सदाशिव वल्लद भिवजी टंकसाळी वस्ती तळेगांवइंदुरी यांचें घर जप्त करणें म्हणोन.

१ गोविंद शिवराव यांचे नांवें सनद कीं, धोंडी वल्लद कुसाजी टंकसाळी वस्ती तळेगांव ढमढेऱ्याचें तर्फ पाबळ यांचें घर जप्त करणें म्हणोन. सनद.

३

परवानगी रूबरू.

७२५ (५४९). अण्णाजी नरसो आणिकार व निळकंठ वल्लद परशराम सोनार वटकार टंकसाळ किल्ले नसीराबाद उर्फ धारवाड यांनीं हुजूर कसबे पुणें येथील मुक्कामीं येऊन अर्ज केला कीं, टंकसाळेचें कामकाज पुरातन वतनी आपले वडील करीत आले. त्याप्रमाणें भोगवटा मोगलाई अमलांत चालत आला. त्यास मोगलाई अमल सरकारांत आलियाबर दरम्यान सुबाजी नरसिंह श्रीरंगपट्टणकर हा वतनदार नसतां टंकसाळेचें कामकाज आपण करून खोटें नाणें करितो. याची चौकशी करून आपलेपाशीं मोगलाई अमलांतील कागदपत्र आहेत ते पाहून भोगवटा चालत आलियाचा दाखला मनास आणून माझें वतनी कामकाज पूर्ववतप्रमाणें बहाल करून सरकारचीं पत्रें करून दिल्हीं पाहिजेत. म्हणोन, त्याजवरून मनास आणितां सुबाजी नरसिंह वतनदार नव्हे, खोटें नाणें केलें, हें जाणोन तुह्मांपाशीं मोगलाई कागदपत्र आहेत तें पाहून, व भोगवटा चालत आलीयाचा दाखला मनास आणून तुमचे वडील खरें नाणें करीत आले सबब तुम्हावरी कृपाळू होऊन टंकसाळेचें आणिकरी व वटकरीचें कामकाज तुमचें तुह्मांकडे करार करून दिल्हे असे. तरी खरें नाणें करावयाचा सालगुदस्तां सरकारांतून करार जाहला आहे, त्याप्रमाणें नाणें माल खरा व तोल पुरें बितपशिल.

इ० स० १७६७।६८. समान सितेन मया व अलफ. सबाल २१

---

725. Certain persons of fort Nasirabad alias Dharwad were permitted to start a mint and the following instructions were issued to them:—

A. D. 1767-68.

(1) the Hon should be $3\frac{1}{2}$ Masas in weight, $2\frac{3}{4}$ Masas and half a gunj being gold of the Delhi Standard and $5\frac{1}{2}$ gunjas being silver;

(2) the Mohor should be of gold of the Delhi Standard, $\frac{3}{4}$ tola, $\frac{3}{4}$ masas and 1 gunj in weight;

(3) the rupee should be of pure silver of the Delhi Standard $11\frac{1}{4}$ masas in weight.

होन वजन.	नक्त रुपये.
८२।।।-।।- ऐन सोनें चांगलें दिल्लीशिक्का जुने मोहरेचें कसाचें पावणेतीन मासे अर्धी गुंज.	फुलचरी रुपयाप्रमाणें माल खरा, तोल वजन तोळे -।।।२।- सवा अकरा मासे चांदीचा निवळ रुपया करावा. रुपें दिल्लीप्रमाणें असावें.
८।।१।। होन साडेतीन मासे असावा असा शिरस्ता आहे सबब भरीस रुपें साडेपांच गुंजा घालावें.आटतेसमई सदरहू जळ जाऊन निकें सोनें लिहिल्याप्रमाणें उतरावें.	येणेंप्रमाणें कलम १. मोहोर दिल्ली शिक्क्याची आलमशाईप्रमाणें वजन तोळे -।।।१।।।१ पाऊण तोळा पावणे दोन मासे एक गुंज याप्रमाणें करणें. कलम १.

८।-।।
साडेतीन मासे होन सदरहु लिहिल्याप्रमाणें करणें. कलम १.

एकूण तीन कलमें करार करून दिल्हीं असेत. होन व मोहर व नक्त रुपया सदरहू लिहिल्याप्रमाणें खरें नाणें राजश्री पाडुरंग मुरार सरकारचे कारकून यांचे विद्यमानें करून सुखरूप राहणें. वतनसंबंधें तुम्हांकडे नजर शेरणी वितपशील रुपये.

२९१	आपाजी नरसो आणीकार.
२५०	निलकंठ वल्लद परशराम सोनार वटकार.
५०१	

एकून पांचशें एक रुपये करार केले ते सरकारांत पोता जमा जाहले असेत. म्हणोन सनदा.

१	आपाजी नरसो आणीकार.	रसानगीयादी.
१	निलकंठ वल्लद परशराम सोनार वटकार.	
२		

The different kinds of Hons mentioned in the diary under date 30th Moharam are as follows:—

		Rs.	as.
Ellori	at	4	0
Hyderi	„	4	0
Sangiri	„	4	0
Harpanhali	„	3	14
Dharwari	„	3	14
Vyankatpati	„	3	8
Mahamadshai	„	3	8
Ekeri Dharwari	„	4	4
New Dharwari	„	4	4

४ चिटणिशी पत्रें सदरहुअन्वयें.

१ व्यंकटराव नारायण यांस.

१ पांडुरंग मुरार यांचें नांवें.

१ देशमुख व देशपांड्ये परगणे धारवाड.

१ समस्त साहुकार कसबे पुणें यांचे नांवें कीं, धारवाडचे टांकसाळेचा होनएकेरी प्रमाणें तोल पुरे व माल खरा, रुपये फुलचरी अर्कटीप्रमाणें तोल पुरे माल खरा असतां बट्टा घेता म्हणोन विदित जाहलें, त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तरी खरें नाणें कसाप्रमाणें वजन पुरें असल्यास बट्टा न घेणें. चालीवरहुकूम चालवणें. म्हणोन पत्र.

४

६

एकून दोन सनदा व चार पत्रें दिल्हीं असेत.

७२९अ. रोजकीर्द राजमंडळ स्वारी राजश्री पंत प्रधान सु॥ तिसा सितैन मया व अलफ छ. ३० मोहरम मुक्काम पुणें, विद्यमान राजश्री नारायणराव बल्लाळ इस्तकबिल छ. १८ मोहरम तागाईत छ. ३० मिनहू.

जमा. रुपये.

२३५८०॥⁄ परगणा थोरलेंबाळापूर निसबत महीताजी शिंदे यांजकडे साल गुदस्त समानचा ऐवज बेणें त्यापैकीं जमा गुजारत महादाजी अनंत फडणीस. होन नाणें,

६९८४ एकेरी नाणें १६४६ दर ४ प्रमाणें.

१०४ हैदरी नाणें २६ दर ४ प्रमाणें.

१८० सनगिरी नाणें ४५ दर ४.

४९६९॥⁄ हरपनहल्ली नाणें दर ३॥॥⁄.

५८४⁄ धारवाडी १५ दर ३॥॥⁄.

११३४ व्यंकटपती ३२४ दर ३॥.

६०२ महमदशाई नाणें १७२ दर ३॥.

दुबेरजीचे तपशील.

९३॥ एकेरी धारवाडी होन २२ दर ४। प्रमाणें

२३३७॥ होन नवे धारवाडी ९५० दर ४।-

याप्रमाणें नाण्यांचा तपशील लागला आहे. (एकंदरीची बेरीज मिळत नाहीं.)

७२६ (७११). तुकोजी होळकर यांचे नांवें सनद कीं, तुम्हांकडील विठ्ठल गणेश कारकून यांनीं पुण्याचे मुक्कामीं येऊन विनंती केली कीं, कसबे चांदवड परगणे मजकूर येथें टांकसाळ होती. तेथें माल खरा, तोल पुरा रुपया पडत नव्हता. सबब सरकारांतून टांकसाळ बंद केली आहे, त्यास वरकड जागा टांकसाळेचा बंदोबस्त सरकारांतून करून दिला आहे, त्या रवेसीनें कसबे मजकूरचे टांकसाळीचा बंदोबस्त करून देऊन टांकसाळ चालवावयास आज्ञा जाहली पाहिजे म्हणोन; त्याजवरून किल्ले दौलताबाद येथें सरकारांतून टांकसाळ चालत आहे, त्या शिरस्तेप्रमाणें कसबे मजकुरीं टांकसाळ चालविण्यास आज्ञा केली. त्याविषयीं कलमें.

इ० स० १७७२।७३. सलास सबैन मया व अलफ. सफर २७.

१ टांकसाळसंबंधें कारीगारांस अजुरा व किरकोळ जिन्नस लोखंड, कोळसे, खार, चिंचं वगैरे लागेल तो व शिबंदी खर्च देखील सरकारांतून द्यावयाचा नाहीं. टंकसाळेचे उत्पन्नापैकीं खर्च करावा. येणेप्रमाणें कलम.

१ साहुकारांपासून रुपें घेणें तें चौकशी करून घेऊन शोधावें, माल खरी चांदी जाहल्यावर लगडी करून चकत्या कराव्या, दर चकतीस वजन तोळे -।।।२८१ पाऊण तोळा दोन मासे एक गुंजप्रमाणें करून त्याजवरी शिक्का होईल, ते रुपये गंजीकोट प्रतींत चालावे. यांत दिकत नसावी. सरकारांतही तेच रुपये घेतले जातील. गंजीकोट रुपयाचें वजन सवाअकरा मासे आहे. सदरहु चांदीचे रुपें वाईट यास्तव एक गुंज कमी करून रुपये पाडावे. रुपयाची चांदी हल्लीं पुण्यांत नवा शिक्का पडतो त्याप्रमाणें चांदीचे रुपये करावे. येणेप्रमाणें करार कलम.

---

726. At the request of Vithal Ganesh, karkun of Tukoji Holkar, permission was given to open a mint at Chandwad, on the same conditions as those under which the Government mint at Daulatabad was worked, viz:—

A D, 1772-73.

(1) all expences on account of labour, charcoal &c. should be defrayed out of the profits of the mint;

(2) silver purchased from traders should be tested, made into bars and then cut off into pieces, each piece to weigh 11 Masas, 1 Gunj, and to be stamped : these coins would then be taken to be equivalent to a Gunjikot rupee and would be received by Government;

(3) security should be taken from the manager of the mint for the observance of these rules; and any breach of them would be severely punished.

१ चांदी खऱ्या रुप्याची करावी, रुपया माल खरा, तोल पुरा करावा यांत कृत्रिम जाहल्यास परिछिन्न कार्यास येणार नाहीं. येविशींचा जाबसाल तुम्हांस पुसला जाईल. येणेप्रमाणें करार कलम.

३

एकूण तीन कलमें करार करून किल्ले दौलताबाद येथील शिरस्तेप्रमाणें दिल्हीं असेत. तरी कसबे मजकुरीं टंकसाळ चालती करून दौलताबादेस रुपया पडतो त्याप्रमाणें पाडीत जाणें. सदरहू करारप्रमाणें रुपया पाडीत जावा येविशींचा टंकसाळियापासून जामीन घेणें. पेस्तरसालापासून जामीन घेणें. पेस्तरसालापासून टंकसाळ चालती करणें. वजनांत व रुपयांत अंतर पडल्यास टंकसाळीयांचें पारपत्य करून टंकसाळ बंद केली जाईल. ह्मणोन सनद १.

---

१६. सरकारानें घेतलेलें कर्ज.

७२७ (८४). साहुकार सातारकर यांचे नांवें पत्रें कीं, सातारियास खर्चाची वोढ आहे. त्यास राजश्री व्यंकाजी माणकेश्वर व विष्णु नरहर तुम्हांजवळ खर्चास ऐवज मागतील तरी तुम्हीं त्यासमयीं तरतूद करून मशारनिल्हेकडे रुपयांचा भरणा करावा. खासा स्वारी देशास आलियावर तुमच्या ऐवजाचा निकाल करून दिल्हा जाईल. तरी लिहिल्याप्रमाणें हरतरतूद करून रुपयांचा भरणा मशारनिल्हेकडे करणें. निकडीचा प्रसंग जाणून लिहिलें असे, तरी जरूर जरूर ऐवजाचा भरणा करणें. ह्मणोन पत्रें:—

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. जिल्हेज १०.

१ परशराम नाईक अनगळ यांस रुपये २५०००.
१ भिकाजी नाईक रास्ते यांस रुपये २५०००.
१ सदाशीव नाईक रास्ते यांस रुपये २५०००.

३

रसानगीयादी.

Tukoji Holkar was enjoined to be particularly careful that the coin turned out was of pure silver and of full weight.

727. Venkaji Mankeshwar and Vishnu Narhar (officers at Satara) being in urgent need of money, Parshuram Naik Angal, Bhikaji Naik Raste and Sadashiv Naik Raste sawkars of Satara were directed to arrange to pay each Rs. 25,000 to the above 2 persons. They were informed that the amount would be returned on the Peshwa's return from the campaign.

A. D. 1763-64.

७२८ (१७८). सालमजकुरीं ऐवजाचें प्रयोजन लागलें. यास्तव पेस्तरसालचे रसदेपैकीं तूर्त रसद सरकारांत ध्यावयाचा करार करून तुम्हांवर वराता किल्लेहायचे बेगमीच्या आलाहिदा केल्या आहेत. त्यास वरातांप्रमाणें ऐवज पावता करून कबज घेणें. त्याप्रमाणें व्याजास मित्या लागतील, सदरहु ऐवज पेस्तरसालचे रसदेचे ऐवजीं मजुरा द्यावा. याप्रमाणें करार केला असे. तरी मुद्दल ऐवज पावेल तेथपर्यंत व्याजाचा हिशेब एकोत्रा बिनसूटप्रमाणें करून व्याजाचा ऐवज होईल तो चहूं महिन्यांनीं पुढें घेणें. म्हणोन सनदा.

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. साबान ५.

१ रामचंद्र कृष्ण तालुके अवचितगड रुपये १०००० दहा हजार.

१ परशराम रामचंद्र देशमुखी बेलापूर रुपये ३३०० तीन हजार तीनशें.

१ नारो गोविंद देशमुखी साष्टी रुपये ६७०० सहा हजार सातशें.

१ बाळाजी महादेव देशमुखी वसई रुपये १५००० पंधरा हजार.

१ रामाजी महादेव तालुके कर्नाळा तर्फ आऊरवलीत व तुंगरतन रुपये १९००० पंधरा हजार पेस्तरसालीं साष्टी तालुक्याकडे ऐवज बाकी काढिला आहे त्या ऐवजीं घेणें म्हणोन.

१ शकरांजी केशव सरसुभेदार यांजकडे प्रांत कोंकण येथील जुने असामींची घालमेल करून अगर नवे असामींची तैनात करून दरक सांगावा, त्या ऐवजीं पेस्तरसालची रसद रुपये २५००० पंचवीस हजार रुपये करार करून वराता केल्या आहेत त्याप्रमाणें ऐवज ज्याचाल्यास देऊन कबज घेणें. सदरहु ऐवज रदकर्जाची वरात तालुके रत्नागिरी निसबत मोरोजी शिंदे यांजवर दिली असे. तेथें जे मितीस ऐवज पावेल तेथपावेतों कबजाचे मित्यांपासून एकोत्रा बिनसूटप्रमाणें व्याजाचा ऐवज होईल तो पुढें चहूं महिन्यांनीं प्रांत कोंकणपैकीं घेणें म्हणोन.

६ एकूण सनदा सहा.

रसानगीयादी.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

७२९ (१८९). भिकाजी नाईक रास्ते यांचे नांवें खतें लिहून दिलीं. छ. १३ साबान. खतें.

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. साबान.

---

728. Money being required by Government, the officers of certain provinces were directed to advance certain amounts and to recover them from the next years revenue. It was ordered that interest would be allowed at 12 per cent per annum.

A. D. 1763-64.

729. A loan of Rs. 3,32,631 was taken from Bhikaji Naik Raste at interest of Rupees 12 per cent per annum.

A. D. 1763-64.

१ प्रत खत कर्ज घेतलें मुद्दल, मित्या, रुपये.

२७१३४९॥= मिती कार्तिक शुद्ध प्रतिपदा.

६१२८५॥ मिती पौष शुद्ध प्रतिपदा.

३३२६३१४=

एकूण तीन लक्ष बत्तीस हजार सहाशें एकतीस रुपये चवल यांसी व्याज दरमाहे दरसदे १ एकोत्रा शिरस्तेप्रमाणें करार केलें असे. जाहले मुदतीचें व्याज व मुद्दल हिशेब करून देऊं. शके १६८४ चित्रभानुनाम संवत्सरे, खत लिहून दिल्हें.

१ प्रत खत कर्ज घेतलें मुद्दल रुपये ५०००० पन्नास हजार घेतले, त्यास व्याज दरमाहे दरसदे १ एकोत्रा शिरस्तेप्रमाणें करार केलें असे. जाहले मुदतीचें व्याज व मुद्दल हिशेब करून देऊं. शके १६८२ विक्रम नाम संवत्सरे, खत लिहून दिल्हें.

१ प्रत खत घेतले मुद्दल रुपये १४२००० एक लक्ष बेचाळीस हजार यांसी व्याज दरमाहे दरसदे १ एकोत्रा शिरस्तेप्रमाणें करार केलें असे, जाहले मुदतीचें व्याज मुद्दल हिशेब करून देऊन मित्ती कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १६८४ चित्रभानुनाम संवत्सरे, खत लिहून दिल्हें असे.

३

रसानगीयाद.

७३० (५३०). चिंतो त्रिंबक लेले यांचे नांवें खत लेहून दिल्हें कीं, तुम्हांपासून कर्ज घेतलें सरकारांत, मिती आश्विन वद्य नवमी शके १६८३ वृषनाम संवत्सरे सन इसन्ने सितैन. मुद्दल १००००० एक लक्ष यास व्याज दरमाहे दरसदे रुपये १८= एक रुपया चवल शिरस्तेप्रमाणें करार केलें असे. जाहले मुदतीचें व्याज व मुद्दल हिशेब करून देऊं. म्हणोन मशारनिल्हेचे नांवें खत १.

इ० स० १७६७।६८.
समान सितैन मया व अलफ.
जमादिलावल २०.

रसानगीयादी.

---

730. A loan of Rs. 100,000 was taken from Chinto Trimbak Lele, at interest
A. D. 1767-68. of Rs. 13-8 per cent per annum.

समाजी नाईक दातार यांचे नांवें सदरहु रुपयांचें सदरहु मितीचें खत होतें, त्यास मशारनिल्हे यांस चिंतो त्रिंबक यांजकडून सदरहु मित्तीस ऐवज देऊन त्यांचे नांवें खत होतें तें माघारें घेऊन फाडून दफ्तरीं ठेविलें असें.

७३१ (९३२). तुम्हांकडे कर्जाचा ऐवज करार करून तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेबांकडे देविला असे. पेस्तरसाल सन तिसा शके ११९० सर्वधारीनाम संवत्सरे. रुपये.

इ० स० १७६७।६८. समान सितैन मया व अलफ. जमादिलाखर ४.

१०००००	जिवाजी नाईक येवलेकर, मिल्या सन तिसा.
५००००	भाद्रपदअखेर.
५००००	आश्विनअखेर.
१०००००	
१०००००	त्र्यंबक नाईक व शिदापाशेट वीरकर, मिल्या सन तिसा.
५००००	भाद्रपदअखेर.
५००००	आश्विनअखेर.
१०००००	
२०००००	

एकूण दोन लक्ष रुपये देविले असेत. तीर्थस्वरूपाकडे भरणा करून पावलियाचे जाब घेणें. सदरहु मुदतीप्रमाणें तुम्हांस ऐवज सरकारांतून पावेल. कदाचित् मुदतीस जाजती दिवस लागल्यास मुदतीपुढें व्याज दरमहा दरसदे रुपये १ एकोत्राप्रमाणें करार केलें असे. जाहले मुदतीचें व्याज मुदल हिशेब करून दिल्हा जाईल. म्हणून सदरहू नांवनिशीप्रमाणें खतें २.

रसानगीयादी.

७३२ (५८१). साहुकार यांजपासून सन सबा सितैनांत स्वारींत व पुण्यांत नक्त व कापडाचा ऐवज घेतला होता त्यांची नांवनिशी. असामी.

इ० स० १७६८।६९. तिसा सितैन मया व अलफ. रबिलावल ४.

१० कापड खरेदी केलें त्याची नांवनिशी असामी.

---

731. Rupees 200000 were obtained on loan at interest of one rupee per cent per month, for payment to Dadasaheb (Raghoba Dada.)
A. D. 1767-68.

732. This gives a list of sawkars from whom loans amounting to Rupees 16,22,292 had been received by the Peshwa either in cash or in clothes
A. D. 1763-64.

१ गुजारत आबाजी नाईक काबरस रुपये २०७९४॥
१ गुजारत रामचंद्र नाईक परांजपे रुपये ५४७३२।=
१ गुजारत शिवराम नाईक भिडे रुपये ३२५१५॥=
१ गुजारत गंगाधर नाईक वानवळे रुपये ८९०९॥
१ गुजारत नारोबा नाईक कांबळे रुपये ६२५५॥-
१ गुजारत श्रीनिवास नाईक तांबेकर रुपये ७२३८॥-
१ गुजारत वाघोजी बगाडे रुपये ७३७३॥=
१ गुजारत निंबाजी नाईक दशपुत्रे रुपये ५१२८॥-
१ गुजारत शंकरपा नाईक आनगळ रुपये ३२९७।=
१ गुजारत शंभु नाईक पारगांवकर रुपये ११७२९।-
१ गुजारत भगवंतराव बाळकृष्ण रुपये १२०५३।=
१ गुजारत शिवबा नाईक थोरात रुपये ३०९६॥=
१ गुजारत शामजी गोविंद तांबेकर रुपये ८६२४=
१ गुजारत कृष्णाजी नाईक मंडळी रुपये ९९०६॥=
१ गुजारत चिमाजी नाईक पंढरी रुपये ३६४९॥=
१ गुजारत मल्हारजी नाईक कान्हेरे रुपये ३३६२।-
१ गुजारत गोपाळ नाईक कानडे रुपये ९७३॥-
१ गुजारत नारो बापुजी भिडे रुपये २७७९।=
१ गुजारत काशिनाथ नाईक अनगळ रुपये ९८४५
१ गुजारत महादोबा नाईक दामले रुपये २३७०।
१ गुजारत चिमाजी नाईक लाळे रुपये ४४९३॥
१ गुजारत नागोबा नाईक कागदी रुपये ३३६६
१ गुजारत मार्तंड नाईक ताटके रुपये १४११०॥
१ गुजारत हरबाजी नाईक वानवळे रुपये १५६६१॥
१ गुजारत रामचंद्र नाईक साखरे रुपये ९९०३॥
१ गुजारत कृष्णाजी नाईक दातार रुपये ५५३०॥=
१ गुजारत बापूजी गोविंद दातार रुपये १०८८६।
१ गुजारत बाबुदेव पैठणकर रुपये ८६७२।=
१ गुजारत रामाजी नाईक दातार रुपये ७१४४।
१ गुजारत दिनानाथ नाईक महाजन रुपये ६७९।=

३० २८२९१९॥.

१ गुजारत रामचंद्र नाईक परांजपे वगैरे यांजपासून तीन लाख

३००००० रुपये तीन लाख रुपयांचा होनांचा ऐवज घेऊन नक्त रुपये दिल्हे. ते.

१ रामचंद्र नाईक परांजपे व आबाजी नाईक काबरस वगैरे यांजपासून पुण्यास घेतले रुपये १००००० पैकीं कमी भरणा ६२० बाकी रुपये ९९३८०.

४ कित्ता ऐवज लष्करांत घेतला. रुपये.

१ गुजारत आबाजी नाईक काबरस व रामचंद्र महादेव परांजपे वगैरे ७१६८९२।≡ रुपये.

१ गुजारत वाघाजी बगाड्या रुपये ५३०३ पांच हजार तीनशें तीन.

१ गुजारत बाबुराव विश्वनाथ वैद्य रुपये २६२६२.

१ गुजारत कृष्णाजी भैरव भदे (थत्ते) रुपये १०६०७.

४ ७५९०२४।≡

१ गुजारत रामचंद्र नाईक परांजपे व आबाजी नाईक काबरस यांजकडून राजश्री दादासाहेब यांजकडील तोफखान्याचा ऐवज पेशजी देविला रुपये ३००००.

१ कित्ता गुजारत आबाजी नाईक काबरस व रामचंद्र नाईक परांजपे सन सितचे ऐवजीं सन सबांत बाकी देणें निघालें ते रुपये १४४३२०.

१ निसबत आबाजी नाईक काबरस वगैरे कापडकरी रुपये ७०४९.

३९ १६२२२९२।।।≡

एकूण एकूणचाळीस असामी यांस सोळा लक्ष बेवीस हजार दोनशें पावणेत्र्याणव रुपये तीन आणे मुद्दल बेरीज रद कर्ज पावलें. सदरहूचें व्याज आबाजी नाईक काबरस व रामचंद्र नाईक परांजपे वगैरे यांचे नांवें एकंदर हिशेब करून खर्च पडलें असे. सदरहूचे व्याजाचा गुत्ता सरकारांत राहिला नाहीं.

१७. निरख.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं. लेखांक ७३३–७३५

७३३ (२०२). राजेश्री बाळाजी गोविंद यांनीं उंट खरेदी केले आहेत, त्यांचे किंमतीचे

इ० सं० १७६३।६४.
अर्बा सितैन मया व अलफ,
जिलकाद १९.

१५० गुजारत सुलतानजी बाळापा वस्ती मौजे वरपणें परगणें कर्डे, उंट १.
१५० गुजारत सुभानजी थोरात वस्ती मौजे हिंगणी तर्फ सांडस, उंट १.
३०० एकूण २

एकूण दोन उंट तीनशें रुपयांस खरेदी करून घेतले आहेत, त्यास सदरहू रुपयांचे जकातीचा आकार होईल तो मशारनिल्हेचे नांवें खर्च लिहिणें. जकातीचा तगादा न करणें. म्हणोन महादाजी नारायण व सदाशिव रघुनाथ कमावीसदार जकाती प्रांत पुणें व जुन्नर यांचे नांवें सनद १.

छ० १९ जिलकाद.

रसामगीयादं.

७३४ (२१८). ५॥।= खरेदी जिन्नस वटसावित्री व्रताबद्दल.

इ० स० १७६४।६५.
खमस सितेन मया व अलफ.
जिल्हेज. १४.

३ फण्या.
२ हस्तीदंती सुमारें १०
१ लांकडी सुमारें ६०
३

२।= करंडे लांकडी सुमारें ७०
दर ८६ प्रमाणें टक्के ८॥।
दर ३॥। प्रमाणें
८= जानवी जोडे सुमारें ३
।= खरेदी बांगड्या सुमारें १०० एकूण.
५॥।=

---

733. Two camels were purchased for Rupees 300.
A. D. 1763-64.

734. The prices of the following articles are given as under:—
A. D. 1764-65.

	R.	a.
10 ivory combs	2	0
60 wooden combs	1	0
3 bundles of Janwi thread	0	3
100 banglis 100	0	6

७३५ (२३९). -॥- छ. १४ रोज जनार्दन कृष्ण कोल्हटकर यास पाईपोस जोडा खरेदी करून दिल्हा. त्याची किंमत गुजारत महादजी भिताडा खिजमतगार.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. सफर १४.

दादासाहेबांचे रोजकीर्दीपैकीं. लेखांक ७३६।७३७.

७३६ (२७७). गुजारत भगवंत भैरव याजकडून शहरीहून जिन्नस आणविला. गुजारत खंडोजी नलवडे खिजमतगार.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. जमादिलावल १३.

वजन पक्कें.		अंबर वजन तोळे.	
६६६९ अगर किंमत रुपये ४	८॥।	प्रत दर तोळा रु १ प्रमाणें	
६६६९ पांच किंमत -॥-		किंमत ८७॥-	
६६२ गुलकंद दरशेरीरुपये १॥।- प्रमाणें एकूण रुपये ३॥-	५॥·	प्रत दर तोळा रु. ९ किंमत २७॥	
	१४।		११५
६६१॥।९ गंगावन दर शेरी रुपये १८प्रमाणें किंमत रुपये २९।-	४	सुमारी बिलोरी दागिने. २ हुक्के १८ दर ९ प्रमाणें.	
६६३॥।९ ३७।-	२	चिलमी ६ दर ६ प्रमाणें.	२४
	४		
	१	नेच्या साधा रुपये ५.	३१
			रुपये १ ३।-

७३७ (२७८). १११६॥। खाजगीतखर्च. खेरीज जिन्नस.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. जमादिलावल २९.

१०५॥ दूध वजन पक्कें १।३॥।७
९९ कणीक कैली १।-॥।१ दर ८।-
७५ दाळ दुरीची कैली -॥२॥ दर ६६२

---

735. The price of a pair of shoes purchased for Janardan Krishna Kolhatkar is given as 8 annas.

A. D. 1764-65.

736.

A. D. 1764-65.

	R.	as.	
Attar Ambar	10		per tola.
Do	5		per tola.
Gulkand	1	— 12	per seer.
Gangawan	18		per seer.

२६॥। हरभरे कैली -।१॥२। दर ०।-
२४॥ जोरी कैली -।३०२ दर ०।१
१८ दाळ हरभरे कैली ०३ दर ००२
११ मठि कैली -।-॥ दर ०॥-
१३॥ गहूं कैली ०४॥ दर ०।१
४ मुग कैली ०१ दर ०।-
४ साळी कैली ०१ दर ०।-
१० तींळ कैली ०॥-१॥ दर ००॥।-
-।- राळे केली ००१ दर ०।१
३ बीज राजगिरा कैली ०।- दर ००१
२७२०० तूप वजन पक्कें -॥-॥।८॥
१०७ साखर वजन पक्कें -।-।॥-
६४॥ गुळ वजन पक्कें -।३०३

737.
A. D. 1764-65.

		Khandis.	Maunds.	Seers.	Rate Seers	Value Rs.	as.	p.
milk (by weight)		1	8	37		105	8	0
flour (by measure)		1	5	31	12	95	0	0
pulse Tur	Do	0	12	24	8	75	0	0
gram	Do	0	6	33	12	26	12	0
jowari	Do	0	8	8	16	24	8	0
pulse gram	Do	0	3	0	8	18	0	0
salt	Do	0	5	24	24	11	0	0
wheat	Do	0	4	24	16	13	8	0
mug	Do	0	1	0	12	4	0	0
rice unhusked	Do	0	1	0	12	4	0	0
til	Do	0	0	30	3	10	0	0
rale	Do	0	0	4	16	0	4	0
rajgira	Do	0	0	12	4	3	0	0
ghee (by weight)		0	10	38½	0	272	2	0
sugar	Do	0	5	30	0	107	0	0
gul	Do	0	8	3	0	64	8	0
tamarind	Do	0	1	3	6	7	2	0
cotton	Do	0	0	3	4	0	12	0
tin	Do	0	0	5¼	R.1	a.8	7	14	0
grapes	Do	0	0	1½	1R.	14a.	2	12	0
cocoa nut pieces	Do	0	0	19	2⅛	8	12	0
almonds	Do	0	0	1	2	0	8	0
hing (by weight)		0	0	2	5Rs	10	0	0
betel nut	Do	0	0	4	3	1	4	0
ginger	Do	0	0	2	0	1	0	0
uda	Do	0	0	⅛		0	3	0
&ca,	&ca.							

७०१ चिंच वजन पक्कें ०१०३ दर ००६
-।।।= कापूस वजन पक्के ००३ दर ००४
७।।।= कथील वजन ००५। दर शेरी १।।
६।। नवसागर ००३। दर शेरीं २
२।।। द्राक्षें वजन ००१।। दर शेरी १।।।=
८।।। खोबरें वजन ०।९ दर ००२०९
-।।- बदाम वजन ००१ एक
४।। जिरें वजन ००९ दर ००२
०= ऊद वजन ०००९
१० हिंग वजन ००२ दर शेरीं ५
१। सुपारी ००४ दर ००३
१ सुंठ वजन ००२
५ खडीसाखर ००५ दर ००१
१३ पोहे वजन ०२।।४ दर ००८
१२।। मिरीं वजन ०।. दर शेरी १।
२ सैंधव वजन ००५ दर ००२।।
·।· शेंगा मुगाच्या वजन ००२ दर ००८
·।।· सुतळी ००१ दर ००२
५।।। नारळ सुमारे ३१ दर ५
१२। खाद्या पासोड्या सुमारे ८ दर १।।
१०२०- खेरदी माळवें. खुर्दा टक्के.
९६।।६ भेंड्या वजन -।।।४।३ दर ०६
५४।६ दोडके ·।।·।।।९ दर ०५
२७।।६ शेंगा गोवारी वजन ०१।७ दर ·।।·
५।। वांगी ०।१ दर ·।।·
३९।।। पडवळे ०४०७ दर ·।·
१३०= आलें ०।१ दर १०९
७।। कारलीं ०।।।· दर ·।·
१८।।। मिरच्या वजन ०१।४ दर ·।३
२२।६ रताळीं ०२।।।१ दर ०९
१। शेंगा चवळी ००६ दर ०९
·।।।· पारोसी ००३ दर ·।·
९।· कोथिंबीर जुडच्या १३६ दर टक्यास १९
९०६ काकड्या ८० दर ०६
·।· कणसें सुमारें १०

'।' पेरू सुमारे ५
७८६ दुधेभोपळे सुमारे ३०
१४ आलुं जुड्या ३२२ दर टक्यास २९
२५।।।६ केळीं हिरवीं ९८८
१०।। निंबें सुमारें ३७०
४३।। काळे भोपळे २३
'॥' मुळे सुमारे १७ एकूण दर ४ प्रमाणें.

४०८।
१ खरीज वाती सुमारे १२०००
७७ लांकडें वजन खंडी ११ दर ७ रुपये.

११ । ६ ।।।

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

७३८. २९८). १७।। खरेदी भांडीं.

इ. स. १७६.।६५.
खमस सितैन मया व अलफ.
रजब.

९। तपेलें तांबें वजन पक्कें ८८४।।९ दर शेरीं रुपये २ प्रमाणें.
१ पळी पितळी १ एक वजन ८८।। दर २ प्रमाणें.
२ वेळणी वजन ८८१.
५।। परात ८८२।।। दर शेरीं २ प्रमाणें.

१७।।।

७३९ (३०९). ४ रुपये साबण वड्या ८८५.

इ० स० १७६४।६५.
खमस सितैन मया व अलफ.
रमजान ८.

७४० (६६२). कासोजी महाडीक शिलेदार दिमत पागा हुजूर यांनीं पेठ आदितवार मुक्काम पुणें येथें शेताकरितां बैल सर ८ एकशें तीस १३० रुपयांस खरेदी केले असोन त्यास सदर रुपयांचे जकातीचा आकार होईल तो मशारनिल्हे यांचे नांवें बदलमुशारा खर्च लिहून

इ० स० १७७०।७१.
इहिदे सबैन मया व अलफ.
रबिलावल ७.

738. Copper and brass pots were purchased at the rate of Rs. 2 per seer. D.A.1 770-7I.

739. Five seers of soap was purchased for Rupees 4.

740. Eight bullocks were purchased in Poona for agricultural purposes for A. D. 1770-71. Rs. 130.

जकातीचा तगादा न करणें म्हणोन विसाजी बावजी कमावीसदार जकात प्रांत पुणें व जुन्नर यांस. सनद १.

रसानगीयादी

१८. वेठ.

नारो आपाजींच्या रोजकीर्दीपैकीं.

७४१ (१३२). सरकारचे कुरणांतील गवत कापावयासी महालानिहायचे बेगारी येऊन सालाबाद गवत कापून उतरून देतात. व कांहीं महालचे बेगाऱ्यांनीं गवत कापून द्यावें, त्याचे दर हजारीं रुपये ४ चार प्रमाणें रुपये पाठवितात, त्याप्रमाणें साल मजकुरीं बेगारी व रुपये पाठवून देणें म्हणोन; कमावीसदार माहालानिहाय यांस सनदा.

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. रबिलाखर २५.

रसानगीयादी छ. १२ रबिलाखर.

६ गवत कापून द्यावयाचा करार त्याचे नक्त दर हजारीं रुपये ४ प्रमाणें साल गुदस्तप्रमाणें साल मजकुरीं रुपये हुजूर पाठवून देणें म्हणोन.

१ परगणे वणदिंडोरी गवत पुले २९०००० एकूण दर ४ प्रमाणें रुपये १००० एक हजार.

१ परगणे हवेली संगमनेर निसबत शिवाजी बल्लाळ गवत पुले २००००० एकूण दर ४ प्रमाणें रुपये ८०० आठशें.

१ कसबे वावी निसबत

गवत पुले२७५००एकूण दर ४ प्रमाणें रुपये. ११० एकशें दहा.

१ तर्फ राहुरी निसबत मोरो नारायण गवत पुले ४१०००० एकूण रुपये १६४० सोळाशें चाळीस.

१ परगणें नेवासे वगैरे महाल निसबत लक्ष्मण कोन्हेर गवत २००००० दर हजारीं रुपये ४ प्रमाणें ८०० आठशें.

१ परगणें सिन्नर निसबत आनंदराव जिवाजी गवत पुले १६०००० एकूण रुपये ६४० सहाशें चाळीस.

६ १२४७५०० ४९९०

८ सालगुदस्तप्रमाणें सालमजकुरीं गवत कापून द्यावें व उतरून द्यावें. कुरणें निसबत हरी बाबाजी सालगुदस्त प्रमाणें सालमजकुरीं.

---

741. Grass in Government Kurans was annually cut by labourers supplied by the various Mahals. Some Mahals preferred, in lieu of sending labourers, to pay Rs. 4 per 1000 bundles of the grass they would have had to cut. Orders were issued as usual in the current year to supply labourers or send money in lieu there of

A. D. 1763-64.

४ कुरण कातरज.
१ प्रांत जुन्नर निसबत हरीदादा माणर गवत १२५०००.
१ कसबे खेड निसबत बाजी माणकेश्वर ४५०००.
१ मौजे वढु तर्फ पाबळ गवत पुले सुमारें १२५००.
१ मौजे कोरेगांव तर्फ पाबळ गवत १४०००.
४

३ कुरण नांदोशी.
१ कसबे तळेगांव तर्फ पाबळ गवत ५००००.
१ निसबत पंत सचीव गवतपुले सुमारें ५००००.
१ कसबे कडूस निसबत धोंडो विश्वनाथ गवतपुले २५०००.
३

१ कुरण पाषाण येथें कसबे नारायणगांव निसबत धोंडो विश्वनाथ पुले ५००००.
८

१४ ३७१५००

१९ गुलाम.

७४२ (५९). बदी कुणबीण सरकाची इणें अजे केला कीं, आपण सरकारची कुणबीण आहे, तर आपल्यास सोड देविली पाहिजे, म्हणून तुजला सोड दिली असे, कोण्हेविशीं वसवसा न धरितां तुझे चित्तास येईल तेथें जाऊन राहणें म्हणोन सोडचिठी दिली.

इ० स० १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. साबान. १९.

रसानगीयादी चिटणिसीकडे आहे छ १९ साबान.

७४३ (६७). देणें कुणबिणी यांसीं दसन्याची लुगडीं व चोळखण द्यावे त्याचे नक्त रुपये दिले. वांटणी गुजारत चिंतो विश्वनाथ कारकून निसबत मुदपाककोठी बरहुकूम यादी रुपये.

इ० स० १७६२।६३. सलास सितैन मया व अलफ. रमजान २९.

---

where that system was preferred. Pargana Wan Dindori had to contribute Rs. 1000 in lieu of this service, pargana Haveli Sangamner, Rupees 800, Kasbe Wavi Rupees 110 &c.

742. Badi, a female slave belonging to Government, prayed for her release.
A. D. 1772-73. She was set at liberty and was permitted to reside any where she liked.

743. In the rawasudgi portion of this day's diary, Rs. 1303-4 are debited on
A. D. 1762-63. account of clothes presented to 197 female slaves of Government on the Dasara festival. The names of the slaves are given.

२६४॥- निसबत थोरली कोठी लुगडी एकूण.

४॥ उदी लुली.
४॥ मोहनी, समसेर बहादरपैकीं.
४॥ लछी, गोविंद बल्लाळपैकीं.
४॥ राधी, मुसाफरजंग पैकीं.
४॥ पिराणी, शिकारखाना पैकीं.
४॥ बंदिया.
४॥ रावी.
४॥ कृष्णी धनगर.
४॥ स्वरूपीं खानदेशी.
४॥ कुशी, सोनारीण.
४॥ कच्छी, गोविंद बलाळ पैकीं.
४॥ पिराणी.
४॥ बहिरजी, होळकर पैकीं.
५ शिवी म्हातारी.
४॥ अमृती.
४॥ येशी, आटोळ्या पैकीं.
४॥ मैनी, पागा उंबरे पैकीं.

४॥ जानी.
४॥ चांदी, मुसाफरजंग.
४॥ लक्ष्मी, समशेर बहादरपैकीं.
४॥ बची, मुसाफरजंग पैकीं.
४॥ बहिरजी, गाडीवान पैकीं.
५ आनंदी बटगी.
४॥ रूपीं, पवार पैकीं.
४॥ आवडी, पवार पैकीं.
४॥ शामी जुनी.
४॥ गोजरी आधली.
४॥ रहिमानी.
४॥ गौरी.
४॥ धनी रोगीण.
४॥ उदी जुनी.
४॥ रखमी गुंड भटकळ पैकीं.
४॥ तुळसी, उंबरे पैकीं.
९ राधी, रायाजी मल्हार पैकीं. लुगडी २ रुपये ९

४॥ लक्ष्मी, लक्षुमण कोन्हेर.
४॥ सोनी, बुदरूक.
४॥ गांधी, जिरायत खाना पैकीं.
४॥ राजी, पागा पैकीं.
४॥ कस्तुरी, पवार पैकीं.
४॥ स्वरूपी, गोविंद बल्लाळ पैकीं.
४॥ आनी जदीद.
३॥ कमी, मुसाफरजंग पैकीं.
३ पारी, मुसाफर जंग पैकीं.
४॥ जानकी जुनी.
४॥ मिठी, पागा उंबरे पैकीं.

४॥ मैनी, बेलदार पैकीं.
४॥ खरगी, पागा उंबरे पैकीं.
४॥ गुणी आछणी.
४॥ भिमी परटीण.
४॥ भागी लंगडी.
४॥ लाडी, धायवर पैकीं.
४॥ सुखी, हरी विठ्ठल पैकीं.
३॥ हबीब, आबदुल करीम याची बायको.
४॥ तुळसी, राघो गोविंद पैकीं.
४ भागी, खेमीची आई.
३॥ सती म्हातारी.

४॥ राणी चुकारू.

२६४॥-

३१॥ निसबत थट्टी.

४॥ माणकी पाशाणे.
४॥ मैनी कराडकर.
४॥ बछनी, शनवार पैकीं.
४॥ सई सिन्नरकर.
४॥ केशरी.
४॥ मानी, थटी कात्रज.
४॥ केशरी, मुक्काम पेठ.

३१॥ ७ आसामी.

३१॥ निसबत नाटक शाळेकडे.

४॥ जानकी, गोविंद बल्लाळ पैकीं सोनाकडे.
४॥ शामी, नारोशंकर पैकीं रखमीकडे.
४॥ हंसी स्वरूपीकडे.

९ निसबत मैनीकडे.

४॥ रतनी, सिंद्यापैकीं.
४॥ देवकी, उपाध्या पैकीं.

९

९ निसबत आनंदीकडे.

४॥ परसी, राघो गोविंदपैकीं.
४॥ देवकी, गोविंद बल्लाळ पैकीं.

९

३१॥ असामी ७

९ निसबत पाबळकर पोवी कडे.

४॥ पावली.
४॥ कोडी.

९ असामी २

९९ निसबत पारीकडे.

९ निसबत चंदाकडे.

४॥ देवकी सिन्नरपैकीं.
४॥ रुपी खाजगीपैकीं.

९

३ चिमी, मुशाफरजंग पैकीं.

५९ असामी.

४॥ सुमी, जकाल्यापैकीं निसबत येशीकडे.
४॥ आंबरी, बागमारीयापैकीं, निसबत स्वरूपाकडे.

९ निसबत गुणसागर.

४॥ यमनी सुतारपैकीं.
४॥ गिरजी तेलंगी.

९

२२॥ निसबत स्वरूपीकडे.

४॥ हरी, झेंड्यापैकीं.
४॥ चेनी, नारोशंकरपैकीं.
४॥ रत्नी खानदेशी.
४॥ जिवी, वासुदेव जोशी पैकीं.
४॥ × × × ×

२२॥ आसामी ५

४॥ जाई निसबत फुलांकडे.

१३॥ निसबत कमळीकडे.

४॥ संती.
४॥ रखमी.
४॥ नारंगी.

१३॥

२२॥ नितबत येशीकडे.

४॥ हरकी माळीण.
४॥ बखती.
४॥ रंजी.
४॥ सोनी.
४॥ साखरी, लक्ष्मण कान्हेरीपैकीं.

२२॥ आसामी ५

९ निसबत गुणसागर.

४॥ रूपी खानदेशी.
४॥ यमनी, नारायणगडपैकीं.

९

९९ आसामी २२

१८ निसबत पागा हुजूर.
४॥ तुकी परटीण.
४॥ राये बैले.
४॥ चमेली, मुसाफरजंगपैकीं.
४॥ बस्ती.
१८ ४ असामी

३६ किरकोळ कारखाने.
४॥ गणी धनगरीण, शिकारखानाकडे.
४॥ भागी खानदेशी, निसबत जिरायतखाना.
४॥ जमाली, निसबत पिलखाना.
४॥ गंगी माळीण बंगल्यांत.
४॥ कमळी, निसबत रथखाना.
१३॥ निसबत श्रीदेवदेवेश्वर.
४॥ गाधी, जिरायतखानापैकीं
४॥ इदी, वासुदेव जोशीपैकीं.
४॥ राणी सातारकरीण.
१३॥ ३
३६ इसामी ८

३१॥ निसबत शंकरदास.
४॥ गंगी.
४॥ रत्नी.
४॥ रूपी.
४॥ स्वरूपी.
४॥ तुळजी.
४॥ परमी आंधळी.
४॥ शामी.
३१॥

९ निसबत पागा चाकण.
४॥ राधी.
४॥ रंजी.
९

६३ निसबत पागा कवडी.
४॥ राधी.
४॥ रूपी.
४॥ येशी.
४॥ बिरजी.
४॥ बसी.
४॥ राजी.
४॥ बसवंती.
४॥ बिबणी.
४॥ मैनी.
४॥ गंगी.
४॥ सोनी.
४॥ रत्नी घुलं.
४॥ रत्नी बुदरूक.
४॥ स्वरूपी.
६३ १४

२५९॥ निसबत मुदपाक कोठी.
४॥ गवरी.
४॥ अनुपी.
४॥ जमनी.
४॥ मानी.
४॥ रत्नी, नारोशंकरपैकीं.
४॥ येशी, बाबरपैकीं.
४॥ लछी तेलंगी.
४॥ राणी, कमावीसपैकीं.
४॥ पाची.
५ सेवंती.
९ लवंगी.
८ येशी जुनी.
९ काशी.
९॥ आवडी आहीर.
५ रंगी.
५ लाडी चुकारू.

नि० मु०

११ तुलसी थोरली.
५ गाडी सिंद्यापैकीं.
८॥ शिवी जुनी.
९॥ द्वारकी कोळीण.
५॥ रूपी बुद्रुक.
१०॥ राधी बुद्रुक.
१०॥ फुली, आंबरीची आई.
९॥ धोंडी.
१०॥ भागी बुद्रुक.
१०॥ सखी सोनारीण.
९॥ देवकी खुर्द.
१०॥ नवसी.
५॥ रखमी.
५ सगुणी.
९॥ राधी लोहारीण.
११ तुळसी म्हसकी.
१०॥ गुणाऊ थोरली.
९॥ कुशी कोळी.
११ मैनी उंचेली.

२९९॥ असामी. ३५

२२। निसबत राधाबाई.

५॥ सखी.
५॥ रूपी.
१०॥ मानी.

२२। ३

६९ निसबत सौभाग्यवती पार्वतीबाई.

१०॥ फुली.
९॥ जिवी.
९॥ गंगी.
४। आवडी.
४। चांदी.

नि० पा०

९॥ संती.
९॥ रूपी.
१०॥ आंबरी, माहेरपैकी नवी साल-मजकुरी.

६९ ८

१९६॥ निसबत मातुश्री बाई.

५॥ रूपी, नारो बाबाजी पैकीं.
५॥ संती.
१०॥ जानकी, निसबत गोदुबाई.
१०॥ आवडी २.
१०॥ शामी २.
५॥ बारकी.
१०॥ मैनी, नाटकशाळेपैकीं २.
९॥ मल्ली, कानडी लुगडी २.
१०॥ मानकुवर २.
१०॥ कस्तुरी सनगें २.
९॥ गणी २.
१०॥ द्वारकी २.
९॥ चुनडी सातारकर २.
९॥ नवसी सातारकर. २.
१०॥ ठकी, लुगडी २.
१०॥ मैनी, सिरक्यापैकीं लुगडी २.
१०॥ नारंगी, लुगडीं २.
४॥ खेमी १.
१०॥ रखमी, लुगडीं २.

२१॥ निसबत राजश्री नारायणराव.

१०॥ गंगी, लुगडीं २.
१०॥ उमेदी २.

२१॥

१९६॥ असामी २७.

६०॥ निसबत सगुणाबाई.
९॥॥ भिवी, लुगडी २.
९॥॥ गंगी २.
९॥॥ देवकी, लुगडी २.
१०॥॥ बदी, लुगडी २.
९॥॥ धोंडी २.
१०॥॥ रुपी २.
६०॥ असामी ६.

५१॥॥ निसबत लक्ष्मीबाई.
१०॥॥ राणी सातारकर २.
१०॥॥ केशरी, लुगडी २.
१०॥॥ रुपी २.
९॥॥ देवकी २.
९॥॥ भागी, लुगडीं २.
५१॥॥ ५

३७ निसबत सौभाग्यवति रमाबाई.
१०॥॥ चांदी, लुगडीं २.
९॥॥ बिरजकुवर १.
१०॥॥ कुशी कुसळी २.
९॥॥ जिवी, लुगडीं २.
३७ ४
१२८९॥॥

१३॥ निसबत हब्या बन्या याजकडील साताऱ्यास होत्या त्यांस लुगडीं बरहुकूम मखलासी चिठी.
४॥ राजी.
४॥ उदी.
४॥ राधी.
१३॥ ३
१३०३। असामी १९७.

एक हजार तीनशें सव्वातीन रुपये. बरहुकूम ऐवज तसलमात चिंतो विश्वनाथ यांजकडे छ. ५ जमादिलाखरीं तसलमातीस सोळाशें त्र्यांयशीं रुपयांची बरात महादाजी नारायण व सदाशिव रघुनाथ कमाबीसदार जकात प्रांत पुणें व जुन्नर यांजकडून रसदेचे ऐवजीं देविली होती त्यापैकीं सदरील रुपयांचा जमाखर्च उगवून देविले. छ. २८ रोज, वांटणीची मखलासीची यादी.

देणें स्वार दिमत त्रिंबकजी भालेराव यांस रुपये १०.

नारो आपाजींच्या कीर्दीपैकीं.

७४४ (१३१). धोंडो विश्वनाथ जोगळेकर यांची कुणबीण किल्ले तळा येथें पळोन गेली आहे म्हणोन मशारनिल्हेनीं हुजूर विदित केलें, त्याजवरून सदरहू कुणबीण यांची यांस देणें, सदरील कुणबिणीस जो पोटखर्च वगैरे लागला असेल तो मशारनिल्हेच्या नांवें बदलमुशाहिरा लिहिणें आणि कुणबीण यांची यांस देणें, म्हणोन, कृष्णाजी महादेव प्रांत राजपुरी यांस सनद १.

इ. स. १७६३।६४.
अर्बा सितैन मया व अलफ.
रबिलाखर ७.

रसानगी यादी छ. ५ रोज.

---

744. A female slave of Dhondo Vishwanath Joglekar who had absconded to
A. D. 1763-64. fort Tala, was ordered to be restored to him on payment by him of her feeding expenses,

७४५ (१६९). पागा दिंमत बाबा महात याचे पागेस गोविंदराव मांजरे पैकीं बटीक सरकारची आहे ती म्हातारी झाली, बहुत दिवस चाकरी केली, सबब तीस सोड दिली असे, तरी पागा मजकुरीं बटीक सोड खर्च लिहिणें आणि सोड देणें. म्हणोन सोडचिटी १.

इ० स० १७६३।६४. अर्बा सितैन मया व अलफ. रजब ११.

रसानगीयादी.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

७४६ (२१९). भास्कर गोपाळ माजी कमावीसदार कसबे चाकण यांनीं कर्जात कुळापासून घेतलें.

इ० स० १७६४।६५. खमस सितैन मया व अलफ. जिल्हेज.

मुरारभट कडूसकर यांजवळून बटीक कस १ किंमत रुपये ६० साठ रुपये खरेदी केली. कलम १.

मौजे कोलीत तर्फ चाकण येथील कुणबियापासून म्हैस सर एक खरेदी केली तिची किंमत रुपये ३० तीस रुपयास खरेदी केली. कलम १.

एकूण नव्वद रुपयांत दोन खरेदी केली, त्यास सदरहूचा जकातीचा आकार होईल तो मशारनिल्हेचे नांवें माफ खर्च लिहिणें, म्हणोन महादाजी नारायण व सदाशिव रघुनाथ कमावीसदार जकाती प्रांत पुणें व जुन्नर यांचें नांवें छ. ३ जिल्हेज. सनद १.

सर सुभे प्रांत कोंकण यांच्या रोजकीर्दीपैकीं.

७४७ (३६). छ. ७ जिल्काद, नारो त्रिंबक यांसी सनद कीं, तालुके मजकुरीं कुणबिणी शिद्दिणी आहेत; त्या दारूखान्याचें काम करितात, मेहनत फार पडते, जंजीरे मजकुरीं सरसुभाची स्वारी जाहली तें समयीं कुणबिणींनीं अर्ज केला त्यावरून रुपये ३० तीस साला वादचे नेमणूक खेरीज एक साला दर असामीस एक रुपयाप्रमाणें दिल्हे. ते बक्षीस खर्च लिहिणें मजुरा असेत म्हणोन. सनद १.

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. जिल्काद ७.

---

745. A female slave, in the service of Baba Mahat, a cavalry officer was on account of her oldage and for her long service, discharged from servitude.
A. D. 1763-64.

746. Bhaskar Gopal Kamavisdar of Chakan received from his debtor a female slave in payment of his debt for Rs. 60.
A. D. 1764-65.

747. Siddhi female slaves at Taluka Konkan employed in the manufacture of ammunition complained to the Sirsoobha, when he visited the taluka, that they were over-worked. He ordered them to be paid Rupees 30 one rupee each as a present.
A. D. 1765-66.

दादासाहेबांच्या रोजकीर्दीपैकीं.

७४८ (५२४). सखी कुणबीण दिंमत पागा हुजूर हीस अभयपत्र कीं, तुज-
इ० स० १७६७।६८. पासून नवी कुणबीण सरकारांत घेऊन तुजला सोड दिल्ही असे, तरी
समान सितैन मया व अलफ. तूं हरकोठें सुखरूप राहणें तुजकडे सरकारचा लांइया नसे.
रबिलावल ६. म्हणोन पत्र १.

रसानगीयादी.

७४९ (७३१). अजबकुवर कुणबीण निसबत सौभाग्यवती रमाबाई, हिनें कुणबीण
इ. स. १७७२।७३. कस १ एक नवद रुपयांस खरेदी केली आहे. तिचे जकातीचा
सलास सबैन मया व अलफ आकार होईल तो माफखर्च लिहिणें. म्हणोन विसाजी बाबाजी
रबिलावल ४. कमावीसदार जकात प्रांत पुणें व जुन्नर यांस सनद १.

रसानगी.

राजश्री राव. रसानगी बाळाजी कृष्ण ठोसर.
जबानी पुताजी साबील खिजमतगार.

---

२०. धर्मसंबंधीं व सामाजिक.

७५० (५१). संभाजी बिन हरजी गौळी खांडेकर मौजे आबटे तर्फ नीड प्रांत क-
इ. स. १७६२।६३. ल्याण यानें हुजूर येऊन विदित केलें कीं, सिंगरूप गौळी चे-
सलास सितैन मया व अलफ ऊलकर मयत जाहलियावर त्याची बायको फिरत फिरत आपला
साबान. बाप हरजी याजवळ येऊन राहिली. तिचा व हरजी मज-
कूराचा मुहूर्त न लागतां संग होऊन चिमाजी पुत्र उत्पन्न जाहला. त्याउपरी हरजी व ती बायको ऐसी दोघेंही मेलीं, त्यांस हरजीनें मरतेसमयीं आपल्यास चिमाजीची गोत पतकरून जातींत घ्यावयास सांगितलें होतें, त्यावरून आपण व आपला चुलता ऐसे दोघेजण गोता-कडे जाऊन जाहलें वर्तमान अवघें सांगितलें, गोतानें कबूल करून चिमाजीस जातींत घ्यावयास सिद्ध जाहले आहेत. त्यास चिमाजीस पुणीयांत सोयरीक केली आहे. येथेंच लग्न करणार याजकरितां साहेबीं पुणेकर गोतास आज्ञा करावी म्हणोन, त्याजवरून पुणेकर गौळी यांस हुजूर आणवून रूबरू पुसतां त्यांनीं सदरहूप्रमाणें

748. Sakhi, a female slave, having given another female slave in her place,
A. D. 1767-68 was set at liberty.

749. Ajab Kuwar, a female slave in the service of Lady Ramabai purchased
A. D. 1772-73. a female slave for herself for Rs. 90.

750. A widow of the Gouli-caste lived with Harji Gouli, of Abte in tarf Nid
of prant Kalyan as his mistress, had bore him a son named
A. D. 1762-63. Chimaji. Harji on his death-bed enjoined his lawful son
Sambhaji to arrange to get Chimaji admitted into the

अर्ज केला, त्यावरून चिमाजीची गोत पतकरावयास पुर्णेकरांस आज्ञा करून हें आज्ञापत्र तुम्हांस सादर केलें असें तरी पुर्णेकर गौळी यांनीं चिमाजीची गोत पतकरून जातींत घेतला आहे. तुम्ही कोण्हेविसी दिक्कत न करितां चिमाजीस जातींत वर्तवणें. म्हणोन गौळी तर्फ महाड व पेण व बिरवाडी व भोरप व आबटें व पाल व बोरधामणी वगैरे गौळी यांचें नांवें सनद १.

येविशीं सदरहू मालुमतप्रिमाणें रामाजी महादेव यांस पत्र १/२
छ० १० रोज रसानगीयाद.

दादासाहेबांच्या रोजकीर्दीपैकीं.

७५१ (२३७). १६०।= इमारत खर्च इमारत त्र्यंबकेश्वरी होमशाळा नवी बांधावयास तसलमात महादाजी केशव. रुपये. रसानगीयाद.

इ० स० १७६४।६५
खमस सितैन, मया व अलफ.
सफर २९.

बाळाजी जनार्दन यांच्या रोजकीर्दीपैकीं.

७५२ (३११). २०० छ० ६ रोज, बद्दल गंगा जमना कळवंतिण कसबे पुर्णे ह्या नागेश्वर महादेव वास्तव्य पेठ सोमवार कसबे पुर्णे याचे देवालयांत शिवरात्रीचे दिवशीं गेल्या सबब गुन्हेगारी करार केली ते जमा गुजारत राणोजी सोरटी प्यादा दिंमत येसजी शेळके.

इ० स० १७६४।६५.
खमस सितैन मया व अलफ.
रमजान. ९

३० छ०८ रोज गुदस्त, शंकराजी गुरव कसबे पुर्णे यानें श्रीनागेश्वर महादेव वास्तव्य कसबे पुर्णे याचे देवालयांत शिवरात्रीचे दिवशीं गंगा जमना कलवंतिणी गेल्या त्यास प्रसाद दिला सबब गुन्हेगारी करार केली ते जमा गुजारत बाळशेट सोनार.

---

caste. Sambhaji and his uncle accordingly moved the caste-people to admit Chimaji and the caste-people consented to do so. Chimaji's marriage was then to be celebrated and as the bride chosen was a resident of Poona and as the ceremony was to be performed at that place, Sambhaji prayed the Peshwa to direct the gaulis of Poona to admit Chimaji into the caste. This prayer was granted and a nazar of Rupees 25 was levied.

751. A new building for offerings, homshála was built at Trimbakeshwar.
A. D. 1764-65.

752. Two prostitutes of Poona, Ganga and Jamna were fined Rs. 200 for having gone into the temple of Nageshwar Mahadev in
A. D. 1762-63. Peth Somwar on the Shivratra holiday and Shankaraji Gurav at the temple who had given them prasad as a blessing, was fined Rupees 30.

७९३ (३७६). गणेश विठ्ठल यांचे नांवें सनद कीं, सिदोजी कारंजकर यानें आपल्या लेकाचें लग्न सालगुदस्तां साताऱ्यास केलें तेव्हां नवऱ्यावर आफ्तागीर धरविलें. हा अन्याय वेंकाजी माणकेश्वर यांनीं ठेऊन गुन्हेगारी रुपये १३६ एकशे छत्तीस घेतले आहेत, ह्मणून हुजूर विदीत जाहलें. त्यास अफ्तागीर धरिलें इतकाच शिदोजीकडे अन्याय असेल तरी सदरहू रुपयांपैकीं रुपये १०० एकशें माघारे देऊन कबज घेणे. ह्मणोन सनद १.

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. रबिलावल २९.

रसानगीयादी.

७५४ (३९८). पादरी फरेलयान दरे माजरदेस यांनीं हुजूर विदित केलें कीं रेवदंडा येथें आपली देवी आहे. तिचा उत्साह नवरात्र होतो, त्यास शेवटचे दिवशीं तोफेचा एक बार करावयाचा हुकूम आहे. त्यास साहेबी मेहेरबान होऊन जाजती दोन बार करावयासी आज्ञा केली पाहिजे. ह्मणोन, त्याजवरून हे सनद सादर केली असे तरी यांचे देवीचा उत्साह नवरात्र जाहलियावर शेवटचे दिवसीं तोफेचे बार—

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. जमादिलावल १५.

१ पेशजीचे सनदेप्रमाणें.

२ जाजती सालमजकुरापासून.

३

एकूण तीन बार तोफेचे करावयासी आज्ञा केली असे तरी जंजीरे रेवदंडा येथील तोफेचे सदरहू प्रमाणें तीन बार करणें. ह्मणोन महादाजी रघुनाथ यांस.

सनद १.

रसानगीयादी.

---

753. The Peshwa was informed that Vyankaji Mankeshwar imposed a fine of Rupees 136 on Sidoji Karanjkar for his having held an Aftagir over his son at the time of the latter's marriage in the previous year. Ganesh Vithal was directed, if Sidoji's offence was merely the one above referred to, to refund to him Rupees 100 out of the fine levied.

A. D. 1765-66.

754. A Portuguese priest represented that a festival in connection with his Goddess at Revadanda and lasting for nine days, took place every year, and that the Government cannon was fired only one on the occasion: he prayed that leave might be given to the cannon being fired thrice. His request was granted.

A. D. 1765-56.

दादासाहेबांचे रोजकीर्दीपैकी.

७५५ (४०९). केसो गोविंद यांचे नांवें सनद कीं, पुस्तकांच्या कारखान्याकडे बेगमी, निसबत सदाशिव कृष्ण आंबेकर कारकून यांजकडे.

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. जमादिलावल.

बितपशील.

रोजमरा ———— रुपये.

२१ जगनाथ भट लेखक यासी एक माही.

१५ रोजमरा.

६ पोटास.

२१

५ सदाशिव कृष्ण आंबेकर कारकून हे आनंदवल्लीस पावतील ते तारखेपासून पोटास दरमहा रोजमरा रुपये.

५ माणुस पेशजीपासून आहे. त्यांस रोजमरा एक माही मागील हिशेब आज पावेतों करून जे नेबाद निघेल तेवढें देऊन पुढें दरमहा देत जाणें.

३१

एकूण एकतीस करार करून देविले असेत. जगन्नाथभट यास पेशजी रोजमरा पावला असेल त्या तेरखेपासून सदरहूप्रमाणें रोजमरा एकवीस रुपये देत जाणें. कलम १.

सदाशिव कृष्ण आंबेकर कारकून यासी पेस्तर सालापासून मोईन.

श्रीत्र्यंबकेश्वरीं पुस्तकें आहेत तेथें दिवाबत्तीस तेल दर रोज वजन पक्के ४४४९. अदपाव वजन पक्के दररोज देत जाणें. कलम १.

नवीं पुस्तकें लिहावयास कागद व शाई वगैरे जें साहित्य लागेल तें देत जाणें. कलम १.

केसो महादेव लेखक यासी भोजनासी चौदा भाष्यांची पोथी लिहित तों पावतों आनंदवल्लीत देणें. कलम १.

नवीं पुस्तकें लिहावयासी जी प्रती लागेल ती मेळऊन देणें. कलम १.

पुस्तकास वेष्टणें व फळ्या ज्या लागतील त्या एकसालीं तयार करून देणें. कलम १.

---

755. An establishment costing Rupees 31 a month was maintained, (it appears, at Anand wali) for making copies of old boeks.

A. D. 1765-66.

१०० नक्त.

२० कापडनिरख.

३२०

एकूण तीनशें वीस रुपये सालिना हजीरी-
प्रमाणें पावीत जाणें. कलम १.

येणेंप्रमाणें सात कलमें करार करून दिल्हीं असेत. सदरहू प्रमाणें पावतीं करणें. म्हणून सनद १.

रसानगीयाद छ. २९ जमादिलावल.

७५६ (४२२). केसो गोविंद यास पत्र कीं, तुम्हांकडे शिसे सुमार ३० तीस पाठविले आहेत. त्यांपैकीं वीस शिसे लहान आहेत. ते श्रींचे तीर्थानें भरून कावडी पांच तयार करून दर कावडीस शिसे ४ चार प्रमाणें कावड्ये असामी पांच चाकर ठेवून त्यांजबरोबर हुजूर लष्करांत रवाना करणें म्हणून. पत्र १.

इ० स० १७६५।६६.
सित सितैन मया व अलफ.
रजब १५.

रसानगीयादी छ. १५ रजब.

७५७ (४२९). काजी शाहुदीन वस्ती कसबे संगमेश्वर यानें हुजूर येऊन विदित केलें कीं, मौजे धामणी तर्फ मजकूर येथील महाराचा पोर भोरी मुसलमानीन वस्ती कसबे संगमेश्वर इजकडे चाकर होता तो पळोन गेला. पोराच्या बापानें बहुत शोध केला. परंतु ठिकाण लागलें नाहीं. एके दिवशीं वर्तमान ऐकिलें कीं महाराचा पोर राजपुरीस जाऊन बाटला त्याजवरून आळी मोकदम आपले गांवचे खोतीचे वगैरे गुमास्तपणाचे चाकरीवर ठेविला आहे, त्यानें कांहीं आकसामुळें महारास शिकवून आपला लेक काजीनें बाटविला म्हणून रत्नागिरीस जाऊन बाळाजी गणेश यास सांगविलें त्याप्रमाणें सांगोन मजला मसाला करून सुभा नेलें आणि जामीन मुचकले घेऊन तहकीयात बहुत केली. परंतु आपल्या आंगीं मुद्दा लागला

इ० स० १७६५।६६.
सित सितैन मया व अलफ.
रमजान ३.

---

756. Twenty bottles were sent to Keso Govind with instructions to return them to the Peshwa's camp filled with water of the sacred river.

A. D. 1765-66.

757. A Mahar boy of Dhamani in tarf Sangameshwar was in the service of Bhori a Mahemedan woman. The boy disappeared and could not be found. His father subsequently made a complaint to Balaji Ganesh at Ratnagiri that the boy had been converted to Mahamedanisom by Kazi Shahabudin of Sangameshwar. An inquiry was made and the complaint was proved to be false. Balaji Ganesh, however, levied from the Kazi Rupees 825 and the officer of Vishalgad also levied

A. D. 1765-66.

नाहीं. असें असतां सवा आठशें रुपये आपणापासून घेतेले आणि सांगितलें कीं, दोन तक्षिमा रुपये तुम्ही देणें तिसरी तक्षीम भोरी देईल. याप्रमाणें पुण्यास येतें समई नावडीच्या मुक्कामीं सांगितलें आणि आपणास तुजकडे पोर बाटविल्याचा मुद्दा नाहीं असें शिक्यांनीशीं पत्र दिलें. हें वर्तमान विशाळगडी कळल्यावर त्यांनींही तीनशें रुपये घेतले याप्रमाणें बगरअन्यायें आपल्यावर गहजब जाहला आहे. याजकरितां साहेबीं मनास आणून आज्ञा करावी, ऐसीयांस महाराचा पोर बाटविला नाहीं. असें सुभ्याचें पत्र काजी मजकुरांजवळ आहे. व सवा आठशें रुपये घेतले त्यापैकीं, दोनशें रुपये सरकारांत पुण्याचे मुक्कामीं अखेर कीर्दीस जमा धरिले आहेत त्याचे ऐवजीं मोबदला बाळाजी गणेश याजपासून दोनशें रुपये घेऊन काजीस देवणें, व सवा साहाशें रुपये काजीपासून ज्यांनीं घेतले असतील ते ठिकाणीं लाऊन काजीस माघारे देवणें. या कामास सरकारचे ढलाईत पाठविले आहेत. यांच्या गुजारतीनें काजीच्या पदरीं घालवणें म्हणोन मोराजी शिंदे नामजाद तालुके रत्नागिरी यांस चिटणिसी. पत्र १.

७५८ (४४३). केदारजी शिंदे यांचें नांवें पत्र कीं, हुसेन शहा पीरजादे निजामशाही वस्ती आमदानगर यांनीं विदित केलें कीं, × × × × गांव पेशजी अलमगीर व बहादूरशहा पातशा यांनीं आपले वडिलास ईनाम देऊन फरामीन (फरमान) करून दिलें आणि चालविला व येविशीं राजपत्रें व श्रीमंत कैलासवासी थोरले नाना व रावसाहेब व नानासाहेब यांचीं पत्रें आहेत. त्यास दरोबस्त गांव आपणाकडे चालत असतां आपण मक्केस गेलों याजमुळें अलीकडे आठ वर्षे चालला नाहीं. शिंद्यानीं लावणी केली. त्यापासोन आमल तेंच करितात. आपणाकडे चालत नाहीं म्हणोन, त्यावरून मनास आणितां प्राचीन गांव पीरजादे यांचा त्यास यांजवळ फरामीन अलमगीर बहादूरशहा यांचे व राजपत्रें व कैलासवासी थोरले नानासाहेब व रावसाहेब व नानासाहेब यांचीं पत्रें आहेत; त्याजकरितां पूर्ववत्प्रमाणें गांव यांचा यांजकडे करार केला असे. दरम्यान तुम्हीं लावणी करून गांव खातां ही गोष्ट उत्तम नाहीं. हल्लीं पत्र लिहिलें असे तरी बहुत दिवसांचा भोगवटा फकिराचा आहे. याजकरितां गांव सोडून देणें. अमल हे करितील. याजउपरी मौजे मजकूरची दखलगिरी करावयास

इ० स० १७६५।६६. सित सितैन मया व अलफ. जिल्हेज १२.

Rupees 300. The Kazi applied to the Peshwa. It was found that Rupees 200 only were shown in the accounts as received from the Kazi. Moraji Sinde, officer of Ratnagiri was directed to make Balaji Ganesh refund Rupees 200 and to recover the remaining amount of Rupees 625 from whoso-ever might have received the same and to pay it to the Kazi.

758. There is a reference in this Sanad to Hasen Khan Pirjade Nizam Shahi having gone to Mecca. The village × × × granted to his ancestors by the Mogal Emperor was continued to him by the Peshwa.

A. D. 1765-66.

तुम्हांस प्रयोजन नाहीं, येविशीं तुम्ही आपले अमलदारांस ताकीद करून पूर्ववत्प्रमाणें गांव पीरजाद्याकडे चालवणें. दिकत न करणें. फिरोन बोभाट येऊं न देणें. म्हणोन चिटणिसी पत्र १.

येविशीं सदरहू मजकुराचीं पत्रें ४.

१ राघो विठ्ठल किल्ले अमदानगर यासीं.
१ बळवंतराव गोपाळ यांस.
१ देशमुख व देशपांड्ये परगणे मजकूर यांस.
१ मोकदम मौजे मजकूर यांस.

४ ५

पांच पत्रें.

७५९ (४८०). भवानी पांढरे मिसा साळी राहुरीकर याचा व राजाराम कांबळा नगरकर याचा सोयरीकीचा कजिया होता. तो मनास आणितां भवानीची सोयरीक राजारामाकडे लागू जाहली. ते राजारामानें द्यावी. या प्रमाणें करार होऊन कागद लिहून दिला. वाजवी सोयरीक देऊं केली असतां लबाडी करून भवानीस स्वारींत वर्षभर हैराण केलें, सबब गुन्हेगारी रुपये.

इ० स० १७६६।६७. सबा सितैन मया व अलफ. जमादिलाखर २७.

२०० ऐन राजारामाकडे.
१०० गोपाळजी कांबळा राजारामाचा चुलता यानें म-
३००

ध्यस्ती केली असतां लबाडी केली सबब त्याजकडे गुन्हेगारी यास जामीन मनाजी साळी रुपये.

येणेप्रमाणें तीनशें रुपये करार केले असेत. यांचा वसूल तुम्हीं घेऊन मानाजी व रघोजी जासूद जेथें भिकाजी नाईक यांस पाठविलें आहे. यांजबरोबर आणखी दोन माणसें तुम्ही आपल्याकडील देऊन सदरहू रुपये यांजबरोबर हुजूर पाटवून देणें. म्हणोन राघो विठ्ठल किल्ले नगर यांस सनद १.

रसानगीयादी.

७६० (९२५) मोराजी शिंदे नामजाद जंजिरे रेवदंडा यांचे नांवें सनद कीं, जं-

759. Bhawani Pandhare, a weaver in Rahuri, having failed to keep his promise to give a girl of his family to Rajaram was fined Rupees 200.
A. D. 1766-67.

760. It was represented that the church of a certain Portuguese priest in Jangire Revadanda had no image in it and that it was out of repair. Permissiom was accorded to the wood of the building being handed over to another Portuguese priest for the use of his church.
A. D. 1767-68.

इ० स० १७६७।६८. समान सितैन मया व अलफ. रबिलाखर २६.

जिरे मजकूर येथें पाद्री विगार यांचें सेंटचें देवालय आहे त्यांत देव नाहीं. देवालय मोडकळीस आलें आहे म्हणोन हुजूर विदित जाहलें, त्यास हल्लीं त्या देवालयाची लांकडे सिनोर पाद्री फेलपाद्र माजरदेश यास माजरदेशचे देवालयास लांकडें देविलीं असेत तरी पाद्री विगार याचे सेंटचे देवालय यांत देव नसलियास देवालय मोडकळीस आलें आसिल्यास वरोत वगैरे लांकडें असतील ती सिनोर पाद्री फेलपाद्र माजरदेश याजकडे देऊन पावलियाचे कबज घेणे. म्हणोन

सनद १.

परवानगीरुबरू.

७६१ (९४८). जोगी, भराडी व गोंधळी यांचा सूर संमोळ वाजवावयाचा कजिया होता. तो पेशजी सरकारांत मनास आणितां जोगी यांनीं सूरसंमळ वाजवावा ऐसे ठरलें सबब त्यांजकडे सरकारची नजर ठरविली त्याचे पट्टीपैकीं बाकी राहिली आहे त्याच्या यादी आलाहिदा पाठविल्या आहेत.त्याप्रमाणें ऐवज वसूल करून गोपाळजी काळा व शेव्याजी व कान्होजी खैरा व रघोजी गाईकवाड वगैरे खिजमतगार पाठविले आहेत. तरी ऐवज वसूल करून यांचे पदरीं घालून हुजूर पाठवून देणें म्हणोन चिटणिशी. पत्रें.

इ० स० १७६७।६८. समान सितैन मया व अलफ. सवाल.१९

१ श्रीदेवसंस्थान चिंचवड यांस कीं चतुरनाथ वगैरे असामी १३ तेरा यांजकडे येणें रुपये २१६ दोनशें सोळाविशीं. पत्र.

१ नारो त्रिंबक यांस कीं, खंडनाथ वगैरे जोगी वडगांवकर आसामी १५ पंधरा यांचकडे रुपये ३१० तीनशें दहा येणें त्याविशीं पत्र.

१ खंडो बाबुराव कमावीसदार तर्फ हवेली संगमनेर यांस कीं तर्फ मजकूर येथील जोगी यांजकडे रुपये २८६ दोनशे शांयशीं येणें त्याविशीं पत्र.

१ महादाजी नारायण हवेली अमदानगर यांस कीं, हवेली मजकूर याजकडे जोगी असामी १२४ येकूण रुपये १२४० बाराशें चाळीस येणें त्याविशीं पत्र.

१ शिवराम रघुनाथ यास कीं, कर्यातमावळ येथील जोगी असामी यांजकडे रुपये १४९ एकशें एकूणपन्नास रुपये येणें त्याविशीं पत्र.

---

761. A dispute betwee Jogis Bharadi and Gondhali regarding the right of using certain musical instruments had been decided by
A. D. 1767-68. Government in favour of the former and an order had been issued to levy Nazar from the Jogis all over the country. Orders were now issued to the various officers to collect arrears of the nazar amounting to Rupees 2137-4-0.

१ राजेश्री पंत सचीव यांस कीं, तुह्मांकडील मावळ तालुक्यांत जोगी यांजकडे रुपये ४२० चारशेंवीस रुपये येणें त्याविशी पत्र.

१ गंगाधर यशवंत यांस कीं, परगणें कोतूळ येथील जोगी यांजकडे रुपये ४० चाळीस येणें त्याविशीं पत्र.

१ खंडो बाबुराव यांस कीं, परगणे आकोलें येथील जोग्याकडे रुपये ६० साठ येणें त्याविशीं पत्र.

१ महादाजी निळकंठ यांस कीं, प्रांत पुणें येथील जोगी यांजकडे ऐवज येणे त्याविशीं.

२६९ मल्हारनाथ वगैरे कासारसाई व पात्राणेकर असामी १२ यांजकडे येणें रुपये.

२७६ अंबरनाथ वानवडीकर असामी १० दहा यांजकडे येणें रुपये.

१६९ कोंडनाथ व घोंडनाथ वाघोलीकर असामी २०वीस यांजकडे रुपये.

३४६ सटवानाथ दरगा असामी यांजकडे.

१०६०

१ बाबुराव सदाशीव यांस कीं, कसबे बारामती येथील जोगी असामी ५ पांच यांजकडे रुपये ६० साठ येणें त्याविशीं पत्र.

१ आनंदराव त्रिंबक सुभेदार यांस कीं, परगणे सुपें येथील जोगी असामी ५ पांच याजकडे रुपये ६० येणें त्याविशीं.

१ विसाजी कृष्ण यांस कीं, परगणें सांगोलें येथील असामी १० दहा यांजकडे रुपये १२० एकशें वीस येणें त्याविशीं पत्र.

१ महादाजी नारायण यांस कीं, परगणे इंदापूर येथील जोगी १० असामी दहा यांजकडे रुपये १२० एकशेवीस येणें त्याविशीं पत्र.

१ गोपाळजी भोसले यांस कीं, मौजे आंतुरी परगणे सिरोळें येथील जोग्याकडे रुपये १३ तेरा येणें त्याविसीं पत्र.

१ कमावीसदार कसबे पोहूर परगणे जामनेर दिंमत आनंदराव भिकाजी रास्ते येथील जोग्याकडे ७२ रुपये बहात्तर रुपये येणेंविशीं पत्र.

१ माधवराव रामचंद्र यांस कीं, कसबे मेहूणबारे येथील जोगी असामी १२ बारा यांजकडे रुपये १४४ एकशेंचवेचाळीस येणें त्याविशीं पत्र.

१ सुधोजी नाईक निंबाळकर यांस कीं, परगणे फलटण येथील जोग्याकडे असामी ५० येकूण रुपये ६०० सहाशें येणें त्याविशीं पत्र.

१ कृष्णाजी त्रिंबक यांस कीं, जोग्याकडे ऐवज येणे रुपये.

१२० परगणे खटाव असामी १० दहा यांजकडे.

१२० तर्फ पाटणखोरे असामी १० दहा यांजकडे.

२४०

दोनशें चाळीस येणें त्याविशीं पत्र.

१ नारो बाबजी यांस कीं, परगणे पारनेर येथील जोगी असामी १४ चौदा यांजकडे रुपये ६८ आडसष्ट येणें त्याविशीं पत्र.

१ भिकाजी कृष्ण यांस कीं, परगणे हरसूल सातारे येथील असामी ५ पांच याजकडे रुपये ११० एकशें दहा येणें त्याविशीं पत्र.

१ चिंतामण बाबुराव यांस कीं, परगणे कन्नड व फुलंबरी येथील जोगी असामी ४५ पंचेचाळीस यांजकडे रुपये ४९७ चारशें सत्याण्णव येणें त्याविशीं पत्र.

१ कृष्णाजी त्रिंबक यांस कीं, प्रांत कन्हाड येथील असामी १० साठ यांजकडे रुपये १६४५ सोळाशें पंचेचाळीस येणें त्याविशीं पत्र.

१ गणपतराव विष्णु कमावीसदार दिंमत तुकोजी होळकर यांस कीं, परगणे आंबड येथील जोगी असामी ६० साठ यांजकडे रुपये ६८० साहाशें ऐशीं येणें त्याविशीं.

१ नरहर लक्ष्मणराव यांस कीं, परगणे शेवगांव येथील असामी ३५ पसतीस यांजकडे रुपये ४०७ चारशें सात येणें त्याविशीं पत्र.

१ विसाजी केशव यांस कीं, प्रांत कोकण असामी ९२ ब्याण्णव यांजकडे रुपये १७३१ सत्राशें एकतीस येणें त्याविशीं पत्र.

१ गोविंद हरि यांस कीं, प्रांत बागलाण असामी ३० तीस यांजकडे रुपये २२५ दोनशें पंचवीस येणें त्याविशीं पत्र.

१ राजश्री भगवंतराव पंडीत प्रतिनिधी यांस कीं, प्रांत माणदेश असामी १३९ एकशें एकूणचाळीस यांजकडे रुपये १९१८ एकूणीसशें अठरा येणें त्याविशीं पत्र.

नारो बाबाजी यांस कीं परगणे गांडापूर असामी १८ अठरा यांजकडे रुपये, १४३ एकशें त्रेचाळीस येणें त्याविशीं पत्र.

१ त्रिंबक लक्ष्मण यांस कीं, परगणे नेवासे वगैरे महाल येथील जोग्यांकडे ऐवज येणें रुपये.

४६९ परगणे नेवासे असामी ९८ अठ्ठावन यांजकडे.
२६६ परगणे वैजापूर असामी २२ बेवीस यांजकडे.
१८० परगणे खंडाळे असामी २० वीस यांजकडे.
२०० परगणे दाभाडी असामी १५ पंधरा यांजकडे.

१११५

अकराशें पंधरा रुपये येणें त्याविशीं पत्र.

१ धोंडो महादेव यास कीं, परगणे दौलताबाद वगैरे परगणे येथील जोगी यांजकडे रुपये.

१९७ परगणे दौलताबाद असामी ११ अकरा यांजकडे
११९ परगणे वाळुंज असामी १३ तेरा यांजकडे.
१०२ परगणे खानापूर असामी ६ सहा यांजकडे.

४१८

चारशें अठरा येणें त्याविशीं पत्र.

१ देवराव महादेव यांस कीं, परगणें टाकळी येथील असामी ११ अकरा यांजगडे रुपये ५१ एकावन्न येणें त्याविशीं पत्र.

१ रामकृष्ण गोविंद यांस कीं, परगणे पैठण येथील असामी २५ पंचवीस यांजकडे रुपये २१७ दोनशें सतरा येणें त्याविशीं पत्र.

१ महिपतराव त्रिंबक यांस कीं, तर्फ सातारा येथील असामी ३० तीस यांजकडे रुपये ३२० तीनशें वीस येणें त्याविशीं पत्र.

१ सदाशिव शामराव यांस कीं, प्रांत वाई येथील असामी १५९ एकशें पंचावन्न यांजकडे रुपये ४०३५ चारहजार पस्तीस येणें त्याविशीं पत्र.

१ दीपसिंग यांस कीं, कसबे बारागाव नांदूर येथील रतननाथ वगैरे असामी ६ साहा यांजकडे ७२ बहात्तर येणें त्याविशीं पत्र.

१ कमावीसदार दिमत महादाजी निळकंठ यांस कीं, कसबे पाचोरें येथील असामी २५ पंचवीस यांजकडे रुपये ३००तीनशें येणें त्याविशीं पत्र.

१ कमावीसदार परगणे उत्राण दिमत तुकोजी होळकर यांस कीं, परगणे मजकूर येथील असामी १२ बारा यांजकडे रुपये १४४ एकशें चवेचाळीस.

१ जोत्याजी जाधवराव यांस कीं, परगणे पिंपरी. येथील जोग्याकडे. रुपये.

११० नायगव्हाण असामी ५ पांच यांजकडे.
१२ कमावीसदार असामी १ एक याजकडे.

१२१

एकशे बेवीस रुपये येणें त्याविशीं पत्र.

१ आनंदराव भिकाजी यांस कीं, तर्फ पौडखोरे येथील देवकेळी अवळस यांजकडे रुपये ९१ एकावन येणें त्याविशीं पत्र.

१ कमावीसदार परगणे भडगांव दिंमत महादाजी निळकंठ कीं, परगणेचे जोग्याकडे रुपये.

१९१ मौजे खेडगांवकर असामी १६ सोळा एकूण.
३२० बहिरनाथटाकळी दामखाची असामी १६ सोळा यांजकडे.

९१२

पांचशें बारा येणें त्याविशीं पत्र.

१ चिंतामण हरि यांस कीं, प्रांत खानदेश येथील जोगी भराडी यांजकडे रुपये.

४२ खाटिकबारे व लोणखेड असामी १ साहा एकूण.
४२ मौजे साखरी व भाडणें येथील असामी १ सहा एकूण.
२६ बरखनाथ तळेगांवकर असामी ३ तीन यांजकडे.
६३ संभुनाथ वगैरे असामी ९ दिगरखेडकर यांजकडे.

१७३

एकशें त्र्याहत्तर रुपये येणें त्याविशीं पत्र.

१ शिवाजी विठ्ठल यांस कीं, परगणे पाटोदे येथील असामी ३४ चौतीस यांजकडे रुपये २३० दोनशें तीस येणेंविशीं पत्र.

१ महिपतराव जगन्नाथ यांस कीं, परगणे नाशिक येथील असामी ३१ एकतीस यांजकडे रुपये २१० दोनशें दहा येणें त्याविशीं पत्र.

१ भिमाजी बापूराव यांस कीं, परगणे वण येथील असामी ९ नव यांजकडे रुपये ६१ एकसष्ट येणें त्याविशीं पत्र.

१ तुकोजी होळकर यांस कीं, परगणे चांदवड येथील असामी २८ अठ्ठावीस याजकडे रुपये १९१ एकशें एक्याण्णव रुपये येणें त्याविशीं पत्र.

१ शिवराम रघुनाथ यांस कीं, परगणे सिन्नर येथील जोगी असामी ३ तीन यांजकडे रुपये २० वीस रुपये येणें त्याविशीं. पत्र.

१ नारायणराव बल्लाळ यांस कीं, प्रांत जुन्नर येथील जोगी असामी ६७ सतसष्ट यांजकडे रुपये ४९५ चारशें पंचाण्णव येणें त्याविशीं. पत्र.

४७ २१३७१।-

सत्तेचाळीस पत्रें. एकूण रुपये एकवीस हजार तीनशें सत्याएकाहत्तर.

७६२ (५९८). दत्ताजी कृष्णाजीशेट सोमवंशी कासार देशमेहेतरे व महाजन दफात कासार व समस्त कासार प्रांत कऱ्हाड व महालानिहाय यांचे घरीं लग्नकार्यें होतात, त्यांची वरात कलशासमेंत देवदर्शन घेऊन पेठेंतून जानवशाचे घरास मिरवत जाते. ऐसी पूर्वापार चाल असतां येविशीं कसबे कऱ्हाडचे लिंगाईत वाणी यांनीं कजिया केला. याची मनसुबी जिल्हेकडील सुभेदार व हुजूर मामलेदार यांनीं शास्त्रमतें केली; त्यांत कासार सोमवंशी क्षेत्री यांची वरात कलशासमेंत मिरवावी असें शास्त्रमतें होऊन राजश्री पंडित प्रतिनिधी यांनीं आपलीं पत्रें करून दिलीं आहेत, त्याप्रमाणें दत्ताजी मजकूर यांस सरकारचीं पत्रें करून दिलीं. पत्रें.

इ० स० १७६७।६८. समान, सितैन मया व अलफ. जिल्हेज ३.

१ नावाचें पत्र कीं, तुम्हीं आपले समस्त जाती जमातीची वरात कलशा सहीत उभे पेठेंतून देवदर्शन घेऊन जानवशी याचे घरास सुखरूप वंशपरंपरेनें मिरवीत जाणें ह्मणून पत्रें.

१ राजश्री पंडित प्रतिनिधि यांस रुजूं कमावीसदार वर्तमानभावी.

१ समस्त वाणी यांस.

१ महिपतराव त्रिंबक यांस.

१ जमीदार परगणे मजकूर यांस.

५

कासार मजकूर यांजकडे नजर रुपये १५०० पंधराशें करार केले ते बाळाजी महादेव प्रांत गंगथडी यांचे हिशेबी जमा जाहले असेत.

७६३ (६०१). धोंडजी बीन कनकोजी गोडसा व उदाजी बिन आवजी फासा

762, The Kasars of Karad and other Mahals used to take their marriage processions, through the streets Kalash Samet (with pots of water). The practice was objected to by Lingayats of Karad. The mater was inquired into and it was decided that the Kasars were Somavanshi Kshatryas and that they should be allowed to take their processions Kalasha Samet as before,

A. D, 1767-68,

763. A weaver, born of a female slave, married into a family of the pure

इ० स० १७६८।६९. तिसा सितैन मया व अलफ. सवाल ३.

मेहेत्रे कोष्टी पेठ शहापूर कसबे पुणें वगैरे कोष्टी बाजे पेटा कसबे मजकूर शके १६९० सर्वधारीनामसंवत्सरे तुम्हीं हुजूर कसबे मजकूरचे मुक्कामीं विदित केलें कीं, सटवाजी आदमणा कोष्टी जातीचा कडू बटकीचा वंश वस्ती कजबे मजकूर यानें पुण्यांतील चांगले जातीचें कोष्टी जानु गोडसा व राणू दिडा व ठेंगू आदमणा या तिघांस आपले मिलाफी करून मौजे कोऱ्हाळे परगणें संगमनेर येथें जाऊन गोताईकरून चांगले जातीचे कोष्टी यांच्या सोयरिका केल्या आहेत. त्यास आमचे जातींत बटकीचा वंश गोत पतकरून चांगले जातींत घेत नाहींत येविशींचा शोध साहेबीं मनास आणून निर्वाह केला पाहिजे. म्हणून; त्याजवरून सटवा आदमणा व त्यांचे मिलाफी पुण्यांतील असामी तीन व कोऱ्हाळेकर कोष्टी असामी सात यांस हुजूर आणिले. त्यांची नांवनिशी ब्रितपशील.

कित्ता.	कित्ता.
१ राजु पाडकर.	१ सुभ्यानजी चाव्या.
१ संभु सरवदा	१ ताहान्या.
१ केरोजी करजकर.	१ बाळु घटा.
१ कुसाजी रसाळ.	३
४	

येणेंप्रमाणें सात असामी आणून तुमच्या व त्यांच्या तकरीरा व राजीनामे व वर्तुणुकेस जामीन घेतले, त्यास सटवा वगैरे यांनीं बटकीचा वंश गोत पतकरून जातींत कोष्टी यांचे घ्यावयाची रीत आहे म्हणून विदित करून मौजे वाल्हें व मौजे निंबुत तर्फ नीरथडी व मौजे नांदेड तर्फ कर्यातमावळ व नागी कोष्टीण पुण्यांतील यांत बटकीचे वंश वर्तले आहेत हा त्यांच्या मुखें दाखला पुरवून देऊं म्हणून लेहून दिले. त्यास साक्षीस तुम्हीं मान्य जाहले त्याजवरून त्या गांवचे कोष्टी हरदू वाद्यांच्या कराराच्या असाम्या हुजूर आणून फुरसीस केली, तेव्हां त्यांनीं लेहून दिलें कीं, बटकीचा वंश चांगल्या कोष्टियांत घ्यावयाची रीत नाहीं. आम्ही अगर आमच्या वडिलीं घेतला नाहीं. या अन्वयें लेहून दिलें. तेव्हां सटवा आदमणा व त्याचे मिलाफी बोलिलें कीं, वाल्हेकर व निंबूतकर कोष्टी यांनीं लेहून दिलें हें श्रीनागोबाचे देवळीं उचलून द्यावें म्हणजे आम्ही मान्य. त्याप्रमाणें वाल्हेकर व

A, D, 1768-69

weaver caste and the matter came before the Peshwa on a complaint. Inquiries were made at various places and it was ascertained that inter-marriages did not take place between weavers proper and weavers born of female slaves. The distinction was ordered to be observed in future and a nazar of Rs. 5000 was levied from the successful litigants.

व निंबूतकर यांनीं श्रीनागोबादेव पेट शहापूर कसबें पुणें याच्या देवळीं सत्यपूर्वक सदरहू साक्षी उचलून दिल्या, तेव्हां सटवा वगैरे यांस आज्ञा केली कीं तुम्ही जें म्हणत होतां तें पुरलें नाहीं. पुढें विचार काय ? तेव्हां त्यानें अर्ज केला जे, आपण काईल जाहलो याउपरी पंचाईत मतें व पांच सांत जागे मातबर येथील गोताचे विचारें जी आज्ञा कराल त्याप्रमाणें वर्तू म्हणून, त्याजवर वांई, कऱ्हाड व नातेपुतें व ताऱ्हळे व बारामती व येवलें व तिसगांव, वगैरे कोष्टी मेहेत्रे वगैरे हुजूर आणून त्यांजला पृथकप्रकारें पुरसीस केली कीं बटकीचा वंश तुमचे जातींत गोताई करून घेत असतात कीं नाहीं, हें सांगणें; त्याजवरून त्यांनीं लेहून दिलें कीं, बटकीचा वंश कोष्टी यांचे जातींत घ्यावयाची रीत नाहीं. कोण्ही घेतला नाहीं. याप्रमाणें त्यांनीं व पुणेंकर समस्त कोष्टी यांनीं लेहून दिलें, तेव्हां सटवा याची निशा होऊन रजावंदीनें यजीतखत तुम्हांस आलाहिदा लेहून दिलें. तें तुम्हापाशीं आहे, त्याजवरून हें पत्र करून दिलें असें, तरी सटवा आदमणा जातीचा कडू हा म्हणत होता कीं बटकीचा वंश चांगले कोष्टी यांत घेत असतात. म्हणून आपण चांगल्याशीं सोयरिका केल्या, ऐसें म्हणत होता. यामुळें तुमचा व त्याचा कजिया लागोन मनसुबी हुजूर पडली, त्याचा निर्वाह गोतमुखें व पंचाइतांचे मतें मनास आणून निवाडा करितां तुम्हीं खरें जाहले, तो खोटा जाहला. त्यानें तुम्हांस यजीतखत लिहून दिलें असें. बटकीचा वंश चांगले कोष्टी जातींत घेत नाहींत. सटवा आदमणा जातीचा कडु आहे. याजला चांगले जातींत सोयरिका करावयाचा संबंध नाहीं; कडू जातींत वर्तावें. याप्रमाणें निवाडा जाहला असे. तुम्हीं याउपरी कडु जातीची गोत पतकरून चांगले जातींत कोणी घेऊं नये कडू जातीनें चांगले जातींत वर्तू नये. याप्रमाणें निर्वाह होऊन तुम्ही खरें जाहला सबब तुमचे माथा सरकारची नजर रुपये ५००० पांच हजार करार केले असेत. याचा भरणा सरकारांत करून जाब घेणें म्हणोन चिटणिशी पत्र १.

इ० स० १७६९।७०. सबैन मया व अलफ. रजब १०.

७६४ (६३९). पांडुरंग नारायण जोशी कुळकर्णी कसबे तळेगांव व मौजे जातेगांव तर्फ पाबळ व मौजे करंदी तर्फ चाकण यांचे नांवें चिटणिशी पत्र कीं, रामाजी मल्हार जोशी कुळकर्णी देहाय मजकूर यांनीं हुजूर येऊन विनंति केली कीं, या तिन्हीं गांवांत आपला ज्योतिष कुळकर्णाचा विभाग आहे, त्यास आपणास पुत्र एक नारोबा होता त्याचे पहिले

764, Ramji Malhar Joshi Kulkarni of Talegaum and Jategaum in tarf Pabal and Karandi in tarf Chakan, suddenly lost his only son

A. D. 1769-70. Naro. Naro left 2 wives, the elder being Chimabai, but no issue. On his death Chimabai insisted on being burnt on her husband's pyre. The relations and gentlemen of the village then assembled, and seeing that Ramaji had no one left to take care of him and that Chimabai refused to survive her husband because she had no son, they decided to give a son

स्त्रीस दोघी कन्या होत्या व पुत्रसंतान नव्हतें म्हणोन दुसरें लग्न केलें. त्याउपरी नारोबाचे शरीरीं एकाएकीं वाखा होऊन त्याचा काळ कसबे मजकुरीं जाहला. तेव्हां त्याची बायको चिमाबाई आपली सून इनें सहगमनाचा फारच अतिशय केला. ते समयीं आपले सर्व भाऊबंद व कसबे मजकूरचे मोकदम व समस्त पांढर व शेटेमहाजन व बाराबलोते व गांवांतील गृहस्थ व ब्राह्मणमंडळी कसबे मजकुरीं सर्व मिळोन विचार केला. कीं, रामाजीचा वृद्धापकाळ त्याचें संगोपन जाहलें पाहिजे व चिमाबाई पुत्रविरहित राहात नाहीं. यास्तव तिचे मांडीवर पुत्र बसवून द्यावा असा निश्चय केला. त्यास आमचे पुतणे अंताजी विनायक व विसाजी विनायक यांचा पुत्र घ्यावा तरी ते उभयतां बंधू कुटुंबांसहवर्तमान गांवीं नाहींत परगांवीं नांदतात. येथें रात्रीचा प्रसंग पडला. अवधि नाहीं. आणि विसाजी विनायक यास पुत्र नाहीं. अंताजी विनायक यास दोन पुत्र आहेत. त्याचे आपले बद्धवैर कटाक्ष पूर्वीपासून चालत आहे. याजकरितां ते देतील हा भरंवसा नाहीं; याजकरितां आपले चुलतबंधू आबाजी मोरेश्वर यांचा पुत्र मागितला. त्यानें उत्तर केलें कीं, मजला दोन पुत्र आहेत. परंतु आपली स्त्री शांत जाहली आहे. मजला पुढें पुत्रसंतान व्हावयाची उमेद नाहीं. यास्तव मजला पुत्र द्यावयाविषयीं अनुकूल पडत नाहीं. असें उत्तर केलें. त्याउपरी सर्वांनीं इत्यर्थ केला कीं, रामाजी मल्हार याचे घरभाऊ सदाशिव आपाजी सन्निध आहे. त्यास चौघे पुत्र आहेत त्यास पूर्वी सदाशिव आपाजी यांचा वडील गिरमाजी दादाजी यांस पुत्रसंतान नव्हतें तेव्हां त्यांनीं रामाजी मल्हार यांचे आजे आण्णाजी काकदेव याचा पुत्र चिंतो आपाजी रामाजी मल्हार यांचे चुलते मागून घेतले. असें यांचे भाऊपण्यांत पूर्वीपासून चालत आलें आहे याजकरितां सदाशिव आपाजीचे चवघा पुत्रांपैकीं एक पुत्र मागून घ्यावा. ऐसा इत्यर्थ करून त्यांची स्त्री सौभाग्यवती मनुबाई व जेष्ठ पुत्र विठ्ठल सदाशिव यांजपाशीं आपण व समस्त ग्रामस्त मंडळी जाऊन बहुताप्रकारें मिनत करून पदर पसरून कनिष्ठ पुत्र पांडुरंग आहे तो आमचे ओटींत घालणें म्हणजे आम्हांस नातू व नारोबास पुत्र होईल. असे बहुताप्रकारें बजीद जाहलों. तेव्हां सौभाग्यवती मनुबाईस भीड पडून सर्वांचे विद्यमानें पांडुरंगास ओटींत घातला. आपण त्यास घेऊन चिमाबाईचे मांडीवर बसविला. आणि तिचें समाधान करून राहविले येविशीं पत्रें आपण व गांवकरी यांनीं पांडुरंगास लिहून दिलीं आहेत, तीं स्वामींनीं मनास आणून भोगवटीयास

to Chimabai in adoption. The nearest relation of Ramaji, viz—his nephew, had sons—but he was absent from the village. Another relation who had 2 sons refused to give either of them in adoption as he was a widower and had no prospect of any more issue. The villagers then went to a distant relative of Ramaji and begged him and his wife to give one of their sons. They consented and their son was given in adoption to Chimabai. The circumstances being reported to the Peshwa, a sanad confirming the adoption was issued.

पत्र पांडुरंग नारायण याचे नांवें करून दिले पाहिजे. म्हणोन, त्याजवरून मनास आणितां चिमाबाई कोम नारोराम हे पुत्रव्यतरिक्त न राहे, व रामाजी मल्हार यांचा वृद्धापकाल, त्यास त्याचे संगोपन झालें पाहिजे यास्तव सर्व ग्रामस्थांनीं वाग्दत्त पुत्र पांडुरंग यास रामाजीचे ओटींत घालून चिमाबाईचे मांडीवर बसवून घेवविला. या अन्वयें गांवकरी यांचे व रामाजीचीं पत्रें आहेत. तीं पाहून तुम्हीं नारोराम यांचे पुत्रत्वास अर्ह जाहला हें खरें जाणोन तुम्हांस भोगवटीयास हें आज्ञापत्र सादर केलें असें, तरी तुम्हांस रामाजी मल्हारजी व कसबे तळेगांव येथील गांवकरी यांनीं पत्र लिहून दिलें त्याप्रमाणें तिन्हीं गांवचे ज्योतीष कुळकर्ण हक्क व मुशाहिरा व वानवळा व घरवाडे, मानपान वगैरे लवाजिमे सुध्धा रामाजी मल्हार यांचे विभागाचे सुदामत चालत आल्याप्रमाणें तुम्हीं व तुमेच पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवून सुखरूप राहणें म्हणोन. पत्र १.

७६९ (६५०). वेदमूर्ति देवकृष्ण जोशी बीन दादाजोशी व चूडामण याज्ञिक चोपडेकर व रामकृष्णभट धर्माधिकारी येरंडोलकर व यादवभट मांडे अमळनेरकर व धर्माकर भट अग्निहोत्री नसिराबादकर व घनशाम भट सांडिल्य शेंदुरणीकर व भास्कर भट गोचरे बहाळकर यांचे नांवें निवाडपत्र दिल्हें. जें तुमचेवर व आनंदराम जोशी याजवर विसाजी गणेश देशमुख परगणे चोपडे वगैरे ब्राह्मण हुजूर फिर्याद जाहले जें, आनंदराम जोशी प्रभृति ब्राह्मण हे अभीर असतां पंक्तीचा आग्रह करितात. त्यांची आमची जात एक नव्हे. आम्ही माध्यांदीन ते अभीर आहेत. यांचा आमचा शरीरसंबंध नाहीं. आमचे घरची उपाधिकें जबरदस्तीनें चालवीत होते. आम्हीं प्राचीन गंगातीरकर या प्रांतीं बहूत दिवस आहों, आमचे वडिलास अभीर अपंक्त कळलें नव्हतें. याजकरितां पंक्तीस पुरातन बसत होते. आपणास अपंक्त ऐसें कळलें त्याजवरून आमची ज्ञात पंक्तीस घेत नाहीं. व त्यांचे घरीं आम्हीं जात नाहीं. ते पहिल्यापासून आमचे घरीं भोजनास येतात. म्हणोन म्हणत होते. व आनंदरामजोशी म्हणत होते कीं, आम्ही प्रभृती समस्त प्राचीन खानदेशवासी ब्राह्मण व विसाजी गणेश व हरबाजी नाईक खाटीक कसबे सेंदूरणी व गोपाळभट वरणगांवकर वगैरे हे एक ज्ञात यजुर्वेदी माध्यांदीन आहो परस्पर शरीर संबंध व अन्नव्यवहार पूर्वीपासून चालत आला असतां हे आम्हांस अभीर म्हणून आमच्या पंक्ती व उपाध्यपणें मना केलीं. त्यास आम्ही अभीर नव्हों. त्याजवरून

इ० स० १७६९।७०. सबैन मया व अलफ. रमजान २९.

765. Visaji Ganesh Deshmukh of Chopda and other Brahmins of Khandesh represented that one, Anandram Joshi, insisted on dining with them, that he was an Abhir and that his caste was therefore different from theirs. An inquiry was made and it was found that there were no Abhirs in Khandesh. Orders were issued accordingly to the Brahmins at various places in Khandesh that their was no objection to their dining with Anandram Joshi.

A. D 1769-70.

येविशींची हुजूर मनसुबी पंचाईत मतें मनास आणितां विसाजी गणेश यांजकडील गृहस्थांचे घरीं आनंदरामजोशी यांजकडील वैदिक ब्राह्मणांची उपाध्यिकें व यांच्या त्यांच्या पंक्ती पूर्वापार चालत आल्या होत्या. असे दाखले गुदरले, याविशींचा संदेह राहिला नाहीं. हे अभीर अपंक्त असते तर त्यांच्या पंक्ती व पुरोहितें पूर्वी कशीं चालतीं. विसाजी देशमुख प्रभृती म्हणतात जे शरीरसंबंध चुकोन जाहले, त्याचा अर्थ पाहातां शरीरसंबंध चुकोन कसे होतील? खानदेश प्रांतीं अभीर नाहींत. माध्यांदीनांचें घरीं यांचीं उपाधिकें व पंक्ती पुरातन चालत आहेत, त्याप्रमाणें पुढें चालतील. अन्न संबंध कोणी माध्यांदीनांनीं केला तरी प्रत्यवाय नाहीं. न केला तरी यांनीं आग्रह करूनये. पंक्ति व उपाधीकें चालवून सुखरूप राहणें. म्हणोन देवकृष्ण जोशी वगैरे यांचे नावें पत्र १.

सदरहू निवाडपत्रांची नक्कल तपशीलवार करून ठेविली असे.

देशाधिकारी लेखक वर्तमान व भावी प्रांत खानदेशयांस पत्र. १

२

एकूण दोन पत्रें चिटाणिशीं देऊन नजरेचा ऐवज करार केला. त्यास हतेबंदी रुपये.

१२००० वैशाख शु. १.

१३००१ भाद्रपद शु. १.

२५००१

संदरहूचा हवाला बाबूराव बल्लाळ पेठे यांनीं घेतला असे.

७६६ (६५३). पाद्री फरेलपाद्र माजरदेश वस्ती रेवदंडा यांचें नांवें आज्ञापत्र कीं

इ० स० १७६९।७०. सबैन मया व अलफ. जिल्हेज १७.

तुवां हुजूर कसबे पुणें येथील मुक्कामीं येऊन अर्ज केला कीं, ठाणें साष्टी येथील रमेदीच्या देऊळचे पाद्रीपण आपलें पुरातन आहे. त्याप्रमाणें रामाजी महादेव यानीं मनास आणून सुदामत पाद्री पण आपले आपल्याकडे करार करून दिले त्या प्रमाणें सरसुभाहून मनास आणून पत्र करून दिलें आहे. ते साहेबीं मनास आणून हुजुरून करार करून पत्र करून दिलें पाहिजे म्हणोन, त्याजवरून सरसुभेदारांनीं रमेदीच्या देऊळचे पाद्रीपण करार करून दिलें आहे, त्याप्रमाणें तुजकडे सरकारांतून करार करून दिलें असे, तरी पुरातन पाद्रीपण चालत आल्याप्रमाणें अनुभवून सुखरूप राहाणें. म्हणोन रसानगी यादी फडणिशी. पत्र १.

---

766. A Portuguese priest of Rewadanda prayed that a Government letter might be issued recognizing his claim to officiate as priest in the church of Ramedi in Salsette. His prayer was granted, and the officer of Salsette was directed to allow the priest to send an agent of his, to officiate as priest as he himself was unable to do so owing to his being employed under Government.

A. D. 1769-70.

चिटणिशी पत्र रामाजी महादेव यांचे नावें कीं पाद्री मजकूर यास हुजूरचे चाकरी-मुळें तेथें जावयास अनुकूळ पडत नाहीं याजकरितां पादरी आपला गुमास्ता ठेवून पाठवून देईल त्याचे हातें रमेदीचें देऊळाचें कामकाज घेत जाणे ह्मणोन पत्र १.
२

७६७ (६६०). बाळाजी नाईक भिडे यांनीं विदित केलें कीं, मौजे वारें तर्फ वाकस परगणें नसरापूर हा गांव दरोबस्त पेशजीपासून आम्हांकडे आहे. त्यास मौजे मजकूरचे कुणबियानें बैल मारिला करितां प्रायश्चित्त केलें. सबब गांवकरी याजपासून तर्फ मजकूरचे हवालदार यांनीं बावीस रुपये मसाला घेतला व कुणबियाचे बायकोनें बदमल केला याजकरितां सोनार व बायको माहाली अटकेंत ठेविली आहेत. त्यास गांव आपल्याकडे दरोबस्त देखील कमावीस शिंगशिंगोटी व लग्नचिठी व फडफर्मास सुद्धां असतां राजश्री नागो त्रिंबक देशमुख व हवालदार म्हणतात कीं, गांव तुम्हांकडे मोकासा मात्र आहे. कमावीस बाब नाहीं. तरी येविशीं आज्ञा होऊन बायको व सोनार अटकेंत ठेविलीं आहेत. तीं सोडून व मसाला घेतला आहे तो परतोन देत तें केलें पाहिजे. ह्मणोन त्याजवरून हें पत्र सादर केलें असे तरी पेशजीपासून गांवचा अमल चालत असतां नवीन दिक्कत करितां हे ठीक नाहीं. यापूर्वी गांवची कमावीस सुद्धां चालत आलें, त्याप्रमाणें चालविणें, मसाला घेतला आहे तो व बायको व सोनार सोडून देणें पुन्हां बोभाट येऊ न देणें. ह्मणोन नारो त्रिंबक तालुके राजमाची यास चिटणिशी पत्र १.

इ० स० १७७०।७१. इहिदे सबैन मया व अलफ. सफर १५.

येविशीं विसाजी बाबाजी हवालदार तर्फ वाकस परगणें नसरापूर प्रांत कल्याणाभिवंडी यांस सदरहू मजकुराप्रमाणें. पत्र १.
२

दोन पत्रें चिटणिशी.

७६८(६९६). बाबुसींग, येसु खासेचाकरीची बायको इचा पुत्र याचे लग्नास खर्च

---

767. A Kunbi in Mauze Ware in tarf Wakas in pargana Nasarapur having killed a bullock had to undergo penance.
A. D. 1770-71.

768. Details are given here of the expenses incurred in connection with the marriage of Babusing, son of Yesu, a female attendant of the Peshwa. The names of the ornaments then in use, the various ceremonies gone through and the prices of various articles are given. The total expenditure is Rupees 3748.
A. D. 1771-72.

इ० स० १७७१।७२. इसन्ने सबैन मया व अलफ. जमादिलावल.

जाहला, तो गुजारत रामचंद्र नारायण गोरे व रामचंद्र श्यामजी कारकून शिलेदार. इस्तकबील छ० ९ सफर तागाईत छ० ११ मिनहू इहिदे, रसानगी यादी रुपये.
बाबूसिंग यांजकडे रुपये.

३१८॥ किरकोळ
१९४८ धर्मादाय.
·।८ मागणी समयीं.
४८ हळद लावते समयीं.
·।· देवक स्थापने समयीं.
१ पत्रिका पूजन समयीं.
३॥ सुवर्णाभिषेकास होन धारवाडी १.
४।।।८ लग्नासमयीं व साड्यासमयीं भूयसी.
२ साड्यासमयीं नवरीचे मंडपांत.
१।।।८ वडाचे पौर्णिमेनिमित्त वाणास दक्षणा.
५ दिनकर जोशी व्यवहारे यास उपाध्येपणासंबंधें.
१९४८

६॥ तस्तांत टाकण्यासमयीं.
२ रुखवत वधूकडून आलें त्यासमयीं.
१ रुखवतावरी.
१ आंबवण.
२
४॥ बायकांचे पाय धुतेवेळीं.
६॥

५॥इनाम.
२ जासूद आले ४
